
सौ. कमला भागवत

इ.सन. १९७१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
१९५७





पथिक

REFBK-0018183


५५६ ~~अप्रेषित~~
७२०६८
८।३।८७

१९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ८.७०६८... दि: ~~अप्रेषित~~ अनोंदणी
आवक ७१५८ ... जो दि: ८।३।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

पथिक



आयुष्य हा एक झगडा आहे.
सुखाचे क्षणी हुरळून न जाता, व
दुःखाचे क्षणी खचून न जाता,
वृत्तींत समतोलपणा राखता आला तर,
हाच झगडा उमेदीने करता येईल, आणि
आयुष्याचा प्रवास कंटाळवाणा वाटणार नाही.
—हे सुविचार मनात जोपासणाऱ्या
एका सात्विक माणसाची जीवनकहाणी.

सौ. कमला भागवत



मूल्य ६ रुपये

(सर्व हक्क लेखिकेचे स्वाधीन)

प्रकाशक :
प्र. स. भागवत
९५ हजरा रोड
कलकत्ता २६

मुद्रक :
बाप्टिस्ट मिशन प्रेस
४१ए आचार्य जगदीश बोस रोड
कलकत्ता १६

ज्यांच्या प्रोत्साहनाने ही कलाकृति
रसिक वाचकांपुढे सादर करण्याची स्फूर्ति मला झाली
त्या माझ्या परमपूज्य श्वशुरानां—
(ती.स.ह. ऊर्फ बापूसाहेब भागवत यांना),
ही माझी पहिलीच साहित्यसेवा
अत्यंत आदरपूर्वक अर्पण.

सदानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
अनुक्रम ७३०६ दि: ...
अंक ...
१९५०
१९५२
ठा.मी. १८५३

'मणि, ओ मणि'—

'आशि काकीमा'—

बोटीच्या कठड्याला रेलून मावळत्या सूर्याच्या लाल प्रतिबिंबाची तरळती रेषा हलत्या समुद्रपृष्ठावर अर्धवट आळसावलेल्या डोळ्यांनीं बघत उभ्या असलेल्या सदानंदाचे कानावर वरील दोन वाक्ये पडली. हाक मारणारी स्त्री, आणि उत्तर देणारी पण स्त्रीच—पण किती भिन्नता होती दोघींच्या आवाजात ! पहिलीच्या हाकेत हुकमतीची व चढेलपणाची रग होती, तर दुसरीच्या उत्तरात अगतिकता व मार्दव होते. त्याने मागे वळून पाहिले—De luxe केबीनच्या दारासमोरील बाकावर एक मध्यम वयाची बंगाली स्त्री व एक तरुण मुलगा बसलेले होते. त्या बाईचा वेष आणि थाट तिच्या वयाला न शोभण्याइतका भडक होता, आणि तो तरुण तर कुठल्याही आधुनिक हिंदी चित्रपटात हिरोचे काम करण्याला लायक असाच होता. प्रथमदर्शनीच त्या दोघांविषयी त्याचे प्रतिकूळ मत झाल्याने आतून नम्र पण कंटाळवाण्या आवाजात ओ देणारी ही मणि कोण याचे उगाचच कुतुहल त्याला वाटले.

"सुरेन्, तुझ्या नादाने मणिला घेऊन मी इकडे निघालेय् खरी, पण ही मणि तुझी नि माझी नक्कीच निराशा करणार ! अरे, लहानपणा-पासूनच मोठी हट्टी न् आतल्यागाठीची आहे ती. अगदी तिच्या आई-सारखीच ! "

"आत्या, जरा धीराने वागून तिच्या कलाने घे ना. तिच्या सहवासाची संधि मला अधिक दे, नि मग बघ."

हा सारा संवाद हलक्या आवाजांत बंगालीतून झाला. बंगालमध्यें गेली दोन वर्षें राहिल्यांनें व ती भाषा आवडली म्हणून शिकून घेतल्यामुळे सदानंदाला उत्तम समजू लागली होती. बोलताना उच्चारण नीटसे जमत नसे, तरीपण तो खूपच चांगले बंगाली बोलतो असे त्याचे चहाते म्हणत व त्याच्या चुकांकडे कौतुकानें पाहात.

केबिनचा जाळीदार दरवाजा ढकलून एक नाजुकसा गोरा हात पडद्यातून बाहेर आला, निळसर साडीच्या नक्षीदार काठाचा घोळदार भाग पडद्याखालून दिसला, त्यावरून ही मणि आपल्याला दिसेलच म्हणून तो मान वर करणार इतक्यात समोरच्या दुसऱ्या केबिनमधून "अरे क्या करता है, डाक्टरसाब, आइये न यहाँ" म्हणत हुमायूनसाहेबने त्याला खांद्याला धरून गर्कन फिरविले व जवळजवळ ओढीतच दुसरीकडे नेले. त्याचा हात ढकलून व मान वळवून मणीला बघण्याची जिज्ञासा तृप्त करावी असे त्याला वाटले. इतक्यात वरच्या डेकवरून जिन्याने खाली येणाऱ्या दुलालभाईने ट्रॅन्झिस्टरचा व्हॉल्यूम कमी करीत त्याचा उजवा हात पकडला, व "केम् डॉक्टर, आज आप उपरके डेक्पर आयेहि नहीं?" असें म्हणत त्याला संभाषणात गुंतविले. त्याला कांहींसे उत्तर देऊन त्यानें वळून पाहिले तर मणि तेथे नव्हतीच, पण ती थाटबाज बंगाली स्त्री आणि तो तरुणही कोठे बेपत्ता झाले होते.

वास्तविक सगळ्या जगाविषयी बेफिकीर असलेल्या, अबोल व गंभीर स्वभावाच्या सदानंदाला कोणाविषयी इतकी उत्सुकता कधी वाटलीच नव्हती. आपल्या भोवतीचे व्यापार आणि व्यक्तींचे स्वभाव यांचे निरीक्षण करण्याची सवय त्याला होती, पण व्यक्तिशः त्याचे मन त्या व्यापारात न गुंतल्यामुळे त्या निरीक्षणात एक प्रकारची अलिप्तता होती. मग आजच आपल्या मनाला गुंतविणारा हा कसला अदृश्य पाश निर्माण झाला याचें त्याला नवल वाटले.

स्वतःचा प्रांत सोडून गेली चारपाच वर्षे तो हिंदुस्तानात बऱ्याच ठिकाणीं भटकला होता. मन मानेल तेथें रहावे, नाहीतर जावे दुसरीकडे, असे एखाद्या अखंड वाटसरूसारखे त्याचे आयुष्य चालले होते. कुठलेही एकच स्थळ किंवा व्यक्ति त्याच्या मनाचा वेध घेऊ शकले नव्हते. त्याने खूप अनुभव घेतले होते, बऱ्याच व्यक्तींशी त्याचा परिचय झाला होता, त्यांतील कित्येक जणांशी त्याचे मित्रत्वाचे संबंध जडले होते, पण तरीही त्याच्या व्यक्तिमत्वाला कायम स्वरूपाचे रंग भरणारें चित्र त्याच्या मनःपटावर अजून उमटलेले नव्हते.

रात्री केबिनमध्ये त्याचे सहप्रवासी गाढ झोपले होते. ती केबिन चार बर्थची होती. त्याच्या वरच्या बर्थवर हुमायूनसाहेब हा टिंबर

मर्चन्ट घोरत होता. समोरच्या दोन बर्थवर दुलालभाई व त्याचा भाऊ लल्लूभाई हे दोघे वेगवेगळ्या सुरांत हुमायूनच्या घोरसंगीताला साथ देत होते. सारा दिवसभर गर्जून कंटाळलेला त्यांचा ट्रॅन्झिस्टर त्यांच्या उशालगतच्या टेबलावर विसावला होता. सदानंदाला कांहीं केल्या झोप येत नव्हती. बिछान्यातून उठून व पायांत सपाता अडकवून तो हलकेच केबिनबाहेर आला. बोटीवर कमालीची स्तब्धता होती. मंद गतीने पाणी कापीत जहाज पुढें सरकत होते, त्यामुळें लाटांचा हिस्स् असा आवाज होत होता तेवढाच. आकाशांत चंद्र नव्हता. रात्र अंधेरी होती. जहाजाच्या दिव्यांचे प्रतिबिंब पाण्यावर पडून समुद्राचा तेवढाच भाग उजळला होता. त्यानें वर पाहिलें. आकाशांत तारकांचा व नक्षत्रांचा खच होता. त्याला वाटलें, समुद्रमंथनाचे वेळी नुसता चंद्रच काय, पण चांदण्यांचे हे हिरे मोती पाण्यांतून उसळून वरती आकाशाच्या छताला चिकटले असावे. आकाशांत इतक्या चांदण्या असूं शकतात हे प्रथमच त्याला जाणवले. त्या शांत, निःशब्द वातावरणात गतायुष्याचा चित्रपट त्याच्या मनापुढून सरकत होता.

त्याला जन्म देतांनाच त्याची आई जग सोडून गेली होती. तिच्या फोटोवरूनच तो तिची कल्पना मनाने करी. आईवेगळा हा मुलगा, पिता असूनही, त्याला दुरावला होता. त्याचे सगळे बाळपण नाशिकला त्याच्या आजोळी गेले होते. सुट्टीचा तो वडिलाकडे मुंबईस जाई. माहीमला लेडी जमशेटजी रोडवरील एका मोठ्या पांच मजली इमारतीत त्याच्या वडिलांचा तीन खोल्यांचा ब्लॉक होता. त्या छोटच्या जागेत त्याचे वडील, त्याची नवी आई व त्याची दोन तीन सावत्र भावंडे रहात. तो सुट्टीचा तेथें गेला कीं सारे त्याला पाव्हण्यासारखे वागवीत. सावत्र आई नीट वागविणार नाही म्हणून त्याची आजी त्याला फारसा मुंबईला पाठवीत नसे, व तो मुंबईहून आला कीं नव्या आईनें कसें वागविले, काय खाऊ घातले, या सगळ्याचा पाढा आजी त्याचेकडून विचारून घेई. सावत्र आई म्हणजे कांहींतरी वाईट व दुष्ट असें लहानपणापासून त्याचे मनावर बिंबविले गेले होते. आईविना पोर म्हणून केविलवाण्या नजरेनें इतरांनी पाहिले कीं खरोखरच कीव करण्यासारखे कांहीतरी आपल्यात आहे या जाणिवेने त्याचे बालमन बुजून जात असे. वास्तविक पहाता

त्याची नवी आई भयंकर व दुष्ट अशी त्याला कधीच वाटली नव्हती. तिनें त्याच्या अंगाला कधी हातच लावला नव्हता—रागाने नव्हे व मायेने पण नव्हे. त्याच्याशी ती कधी फारशी बोलतच नसे. तिच्या वागण्यात द्वेषही नव्हता आणि लडिवाळपणाही नव्हता, पण त्यामुळे ती त्याला नेहमी परकीच वाटली होती. बेताच्या पगारात चारपाच माणसांचा संसार करणाऱ्या त्याच्या वडिलांना, मुलाच्या भरणपोषणाचा भार परस्पर उचलला जात आहे हें ठीकच आहे असे वाटून त्यांनी त्याला आपल्याजवळ आणण्याची कधीं घाई केली नव्हती.

तो मॅट्रिकला होता त्याच वर्षी त्याची आजी वारली. आजी होती तोंवर आईविना असलेल्या या पोरक्या पोरावर सगळे माया दाखवीत, पण तिच्या मृत्यूनंतर मात्र तो मायेचा आभास हळुहळु विरूं लागला. दुसऱ्या महायुद्धाची झळ सर्वत्र जाणवत होती, त्यातच स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे अशांतता व अस्थिरता या वावटळीत सर्वजण बावरले होते. वाढत्या महागाईने लोकांची मनें स्वार्थी व तुसडी बनू लागली होती. प्रत्येकाला आपल्या संसारचा गाडा रेटतांना नाकी नऊ येत असत, मग कोणाचा भार कोण उगाच सहन करणार !

"दुसरें लग्न केलं म्हणून काय झालं, पोटच्या पोराला दुसऱ्याच्या का गळ्यांत घालायचं ? ज्यांचे त्याना संभाळायला काय होतं ?"—असें मधली मामी मोठ्या मामीला म्हणे. ही कुरबुर त्याचे कानावर येई, व नुकताच समज येऊ लागलेल्या त्याच्या मनांत कसली तरी गलबल उठे. सावत्र आईच्या जाचाच्या भीतीमुळें आजीने त्याला स्वतः जवळ ठेऊन घेतला व वाढविला खरा, पण ती गेल्यामुळे त्याला खऱ्या अर्थाने कुठेच घर उरले नव्हते. मामामामींना तो भार वाटू लागला होता. लहानपणापासून दूर राहिल्यामुळे त्याचे वडील, आई व भावंडे त्याला परके वाटत होते. सोळाव्या वर्षाच्या कोळ्या वयांत दुःख म्हणजे काय याची पहिली जाणीव त्याचे मनाला होऊन त्याची दृष्टि अंतर्मुख व विचारी झाली. घरांतल्या कुरकुरीनें त्याचे मन गोंधळे.

कित्येक वेळा अभ्यास करताना मधूनच पुस्तक मिटून तो शून्यपणे कुठेतरी पहात राही. कितीतरी विचार मनांत येत, पण त्यांत सुसूत्रपणा नसे. मुळांतच त्याची वृत्ति संकोची होती, त्यामुळे तर तो अधिकच

अबोल बनला होता. नेटाने अभ्यास करून वर आलो तरच या जगांत आपली धडगत आहे हें कळण्याइतकी विचारांची झेप त्याच्या मनाची होती. वयाचे मानाने समवयस्क मुलांपेक्षा तो जास्त सुविचारी व गंभीर होता. त्याच्या गंभीर वर्तनाचा अर्थ, त्याच्या अशिक्षित मामी व त्यांची अर्धशिक्षित मुलें 'बावळट' असा घेत, व त्याचेवर उघड अन्याय करण्यासही धजावत. त्याचे मन चिडून बंड करू पाही, पण या बंडांत कांहीं अर्थ नाहीं, उलट त्यांत आपलेंच नुकसान आहे हें त्याच्या मनास पटे व तो गप्प राही. पाखराच्या पिलानें स्वतःच्या पंखात जोर नसताना उडून जाण्याचा आव आणला तर तें खाली पडून घायाळ होणार नाहीं काय? आपल्या कर्तबगारीचे पंख जोरदार व्हावयास अजून अवकाश आहे. शिक्षण पुरे करून आयुष्य मार्गी लागेपर्यंत धीर सोडला तर त्यांत स्वतःचेंच नुकसान आहे, असे तो आपल्या मनास शिकवी.

या प्रतिकूल वातावरणांत नेटानें अभ्यास करून मॅट्रिकची परीक्षा दिल्यावर मात्र तो मुंबईला वडिलांचेकडे गेला, तो पुनः नाशिकला यायचे नाही असें मनाने ठरवूनच.

मुंबईला गेल्यावर आपल्या भावंडांशी व आईशी शक्य तितक्या आपुलकीने वागण्यासाठीं तो झटला होता. त्याच्या वागण्याला यश येत होते. कॅरम, पत्ते, चित्रकला, सगळ्यांतच त्याची प्रगति बरी होती. आपल्या भावंडांना तो पत्त्याचे नवे डाव शिकवी, त्यांना चित्रें काढून देई, नकला करून दाखवी. चाळींतील इतर मुलांपेक्षा आपला नाशिकचा दादा हुशार आहे याचा त्याच्या भावंडांना अभिमान वाटे. दादापाशी रमल्यामुळे आपल्याला मुले कमी त्रास देतात या जाणीवेनें आई पण खूष होती.

"सदा, कॉलेजांत जायचे म्हणजे तुला आता नाशिकला राहून चालणार नाहीं. तुझा पुढें काय विचार आहे?" अप्पांनी—त्याच्या वडिलांनी—आपण होऊनच त्याचेजवळ हा विषय काढला. नाशिक सुटले एकदाचे, या विचाराने त्याला समाधान वाटले. आपण चांगले मार्क मिळवून पास होऊ याची त्याला खात्री होती. त्याने कॉलेजात जायचे ते मुंबईलाच कीं दुसरीकडे याचा बापलेकात खल झाला. तीन खोल्यांच्या त्या लहान जागेत ते सारे अडचणीतच रहात होते. तेथे राहुन अभ्यास नीटपणे होईल की नाही याची शंकाच होती म्हणून त्याला स्वतःला कॉलेजच्या

हॉस्टेलात रहावे असे वाटत होते. प्रत्यक्ष पिता असूनही त्याने अप्पांच्या-जवळ कुठलीच गोष्ट हक्काने किंवा हट्टाने कधीच मागून न घेतल्यामुळे आता हा हॉस्टेलमधे राहण्याचा आग्रह त्यांचेपाशी कसा धरावा याचा त्याला पेच पडला. पण आपोआपच तो प्रश्न सुटला.

उत्तम मार्क मिळवून तो पास झाला इतकेच नव्हे तर नाशिकच्या शाळेत तो पहिला आल्यामुळे शाळेची शिष्यवृत्ति त्याला मिळाली होती. फीचा प्रश्न असा सुटल्यामुळे हॉस्टेलच्या रहाण्याचा खर्च करण्यास अप्पा खुषीने तयार झाले, व पुण्याचे कॉलेजात त्याने जावे असे ठरले.

सदानंदाच्या सुयशाचे सगळे श्रेय आपल्याला असल्याचे, व आमचेमुळे तुमचा मुलगा इतका पुढे आला असे अहंकाराने व तुच्छतेने भरलेले मामांचे पत्र अप्पाना आले. मुलाच्या यशाच्या आनंदांत त्या पत्राचे मजकुरातील अवहेलना त्यांनी मनाला लावून घेतली नाही. आपल्या मुलाकडे इतके दिवस आपण दुर्लक्ष केले याची जाणीव मात्र त्यांचे मनाला डाचत होती.

२

शामरावांचा—त्याच्या सावत्र आईच्या चुलत भावाचा—बंगला घोले रोडवर होता. कॉलेजांत दाखल होण्यापूर्वी दोन दिवस तो त्यांचेकडे आईच्या आग्रहाखातर उतरणार होता. नाशिकला सख्खे मामा आणि पुण्याला सावत्रमामा! एकूण आपल्यामागचा मामांचा त्रास अजून चुकलेला नाही. स्वतःच्या या विनोदावर तो मनांतल्या मनात हासला. त्याला कॉलेजांत दाखल करण्यासाठीं स्वतः त्याचेबरोबर जाण्याची अप्पांची इच्छा होती, पण त्यांना रजाच मिळूं शकली नाही.

युद्धकालात इमारतींचे कंत्राटावर अफाट पैसा मिळाल्यामुळे शामरावांचे स्थितीत मोठेच स्थित्यंतर झाले होते. त्यांच्या गर्विष्ठ पत्नी सुधाबाई आपल्याशी कशा वागतील, लाडामुळे शेफारलेली त्यांची एकुलती एक कन्या, माया, हिचे व आपले कितपत जुळेल याचा विचार करीत काहीशा नाखुषीने त्याने त्यांच्या घरांत प्रवेश केला.

पूर्वी एकदा दोनदा तो सुट्टीचा मुंबईला आलेला असतांना माया पण तेथे पाहुणी आलेली होती. श्रीमंत भावाच्या लाडक्या लेकीच्या तैनातींत उणीव न पडू देण्यासाठी त्याची आई झटत होती. माया त्याचेपेक्षा दोनतीन वर्षांनी लहान होती, पण वयाला न शोभणारा भोचकपणा व अरेरावी तिच्यात भरलेली होती. रूपाने व गुणाने सामान्य असूनही आईबापांचे सुस्थितीचे जोरावर तिने प्रत्येक बाबतीत आपले ते खरे करावे आणि इतरानी तिचा अचरटपणा मुकाटयाने खपवून घ्यावा, हें त्याला मुळीच खपत नसे, पण त्याला बोलण्याची चोरी वाटे. तो कोण तिला विरोध करणार ? त्याचा या घरांतील व्यवहारांशी काय संबंध, असे त्याला वाटे. आपल्या मनाला विवेक न राहून आपण अधिकउणे बोलून जाऊ, या भीतीने तो तिला शक्यतों टाळीत असे.

मोहन गुप्तेचं नि मायाचं सूत जुळत आहे हें लक्षात आल्यावर आपल्या-मागची नको असलेली तिची पिडा परस्पर टळते आहे, या विचाराने त्याने सुटकेचा निश्वास टाकला होता— पण त्यानंतर मामामामींच्या रोषांतून स्वतःची सुटका करतांना त्याची उडालेली धांदल— त्यामुळे त्याचे घरांत उठलेले अशांतीचे वादळ— हे सारे प्रसंग आठवून तो स्वतःशीच हासला. त्या साऱ्या घटना अगदी कालपरवा घडल्यासारख्या त्याच्या डोळ्यापुढून सरकू लागल्या.

" सदा, आमच्या मायाचा जरा अभ्यास घेशील का ? यंदा तरी ती मॅट्रिक पास व्हायला हवी," सुधामामीनी त्याला म्हटले. मेडिकलच्या दुसऱ्या वर्षात त्यानें पदार्पण केले होते. त्याच्यापेक्षा थोडीच लहान असलेली माया एव्हाना इंटर पास व्हायला हवी होती, पण अभ्यासापेक्षा नटणे, मुरडणे आणि मिरवणे एवढेच मन देऊन शिकलेली माया अजून मॅट्रिकचा उंबरठा ओलांडू शकली नव्हती.

" मामी, मला कसा वेळ मिळणार ? मला स्वतःलाच किती अभ्यास असतो," कांहीतरी करून टाळाटाळ करण्यासाठी तो म्हणाला. मायाच्या लाडंलाडं वागण्याची त्याला मनांतून भीति वाटे. कधीकधी मामामामींचे वागणे पाहून मायाला आपले गळ्यात अडकवण्याचा त्या दोघांचा विचार असावा, अशी शंका त्याला येई. मायाचा नवरा बनून, येथें घरजावई होऊन स्वतःचें स्वत्व विकून ओशाळे जिणे जगावे, ही त्याची मुळीच

इच्छा नव्हती. लहानपणापासून पोरकेपणाचा शिक्का माथीं बसल्यामुळे कधी एकदा स्वतःचे जिवावर स्वतंत्र जीवन जगून या परावलंबी वातावरणातून बाहेर पडेन, असे त्याला झाले होते. स्वतंत्र होण्यासाठी त्याचे प्राण तडफडत होते आणि परिस्थिति जणू काही त्याच्या मनाला स्वातंत्र्याची हवा न लागू देण्यासाठी असल्या संकटांच्या भिंतीचा तट त्याचेभोवती बांधीत होती. जरा बेसावध राहिले तर तो तट पक्का होईल आणि त्यांतून बाहेर पडणें शक्य होणार नाही हें त्याला कळत होते. म्हणूनच मायाशी वागताना आपल्या हातून चुकूनही ढिलाई होता कामा नये यासाठी तो जपत असे.

'हें रे काय, सदा' असे वाक्यागणिक माना वेळावीत ती त्याच्याशी तिच्या आईबापासमोरही खुशाल बोले, आणि ते दोघेही तिच्या वागण्याला उत्तेजन देत. "सदा, मायाबरोबर जाऊन कॅम्पातून तिला लोकर घेऊन देतोस का?"—"कॅम्पात नव पिक्चर आल आहे असं माया म्हणते, पण इतक्या दूर तिला कोणाबरोबर धाडायचे? तू जाशील का तिला घेऊन?"—ही प्रलोभने आपल्या तरुण मनाला पिंजऱ्यांत अडकवण्यासाठी मुद्दामच तर पेरलेली नाहीत, असे त्याला वाटे.

"सदानंद डॉक्टर झाला कीं शामदादा त्याला घरजावई करून घेईल असं वाटतं. वहिनी मजजवळ तस सूचक बोलत होत्या. असं झालं तर त्याच नशिबच उघडेल, नाहीं का?"

"माया आपली सून! ह्यः, काहीतरीच. सदाला ती मुळीच शोभणार नाही."

"न शोभायला काय झाल? ती काय कुरूप आहे?"

"मला तिच वागणं मुळीच पसंत नाही."

"आपल्याला थोडीच नांदवायची आहे तिला! लग्न झाल तर सदालाच त्यांचे घरी रहावे लागेल. दादाला तरी मायावाचून दुसर कोण आहे? एकुलती एक म्हणून जरा लाडावलेली आहे खरी, पण मनाने तशी कांहीं ती वाईट नाही. दादाच्या पैशाने सदानंदाला स्वतःचे नर्सिंगहोमसुद्धां काढता येईल, यांत त्याचा फायदाच नाहीं का?"

"तें खरं ग, पण तें त्याला पटल पाहिजे ना?"

—वरील संवाद माहीमच्या ब्लॉकमधील गॅलरींत पडल्यापडल्या सदानंदाचे कानावर आला. आतंल्या खोलीत त्याचे आईवडील आपसात बोलत होते. नुकतीच परीक्षा संपवून सुट्टीचा तो तिकडे आलेला होता. त्याला वाटलें, आपल्या मनाला आलेला संशय खराच होता तर! आता पुण्याला परत गेले की मायाचे घरी अजिबात जायचे नाही, असे त्याने मनाशी ठरविले.

"सदा, हा फराळाचा डबा सुधावहिनीकडे शक्यतो लवकर पोहोचव हं," निघतांना त्याच्या आईनें त्याला बजाऊन सांगितले. मायाचे घरीं अजिबात न जाण्याचा बेत प्रथमच असा हुकला याचा त्याला विशाद वाटला. स्वतः न जाता हा डबा दुसऱ्या कोणाकडून पोहोचविता येईल का, याचा तो विचार करू लागला.

—मोहन गुप्ते—त्याचा रूम-मेट्—वडे बाप का बेटा होता. इन्टरला एक गचका खाऊन व बी.एस्.सी. कसाबसा पास होऊनही बापाचे वशिल्यानें त्याचा प्रवेश मेडिकल कॉलेजात झाला होता. तो सदानंदपेक्षा तीनचार वर्षांनी मोठा असूनही त्याचेच वर्गात होता. बुद्धीची देणगी बेताची मिळूनही रूपानें मात्र ती जागा पुष्कळच सावरली होती. ऐटबाज पोशाखानें तो आपल्या देखणेपणांत आणखीच भर टाकीत असे. त्याच्या थाटबाज रहाणीनें व बोलण्याचालण्याने तो मुलांपेक्षा मुलींतच अधिक प्रिय होता. मुलींची मैत्री हें आपल्यासारख्या मुलांचे काम नव्हे, असें वाटून सदानंद त्या फंदात शक्यतों पडत नसे. पुष्कळशा मुलींसुद्धा चाणाक्षच असतात—ज्याच्या मैत्रीपासून सिनेमा, हॉटेल, प्रेझेन्ट्स्, असले षोक पुरविले जाणार नाहींत व जो आपल्यावर स्तुतिपर गोड वचनांची उधळण करणार नाही, अशा तुसड्या न् दरिद्री सदानंदाचे वाटेला त्या तरी कशाला जातील? त्याच्याशीं लाडात येणारी—आपला सहवास त्याचेवर लादणारी एकच मुलगी त्याचे आयुष्यात आली होती—ती म्हणजे माया! पण ती त्यालाच नको होती. तिच्याकडे जाण्याचे कसे टाळावे याचा तो विचार करीत होता.

"काय नसती कामं बुवा! आमच्या दादांचे एक मित्र काँग्रेस-हाऊसजवळ रहातात. त्यांना ज्ञानेश्वरीची ही प्रत पोहोचवण्याचे नसते काम माझ्या गळ्यात आलं आहे. म्हातारा असा वेल्हाळ आणि चौकस

आहे कीं काय सांगू ? आता त्याची चर्पटपंजरी ऐकणे आलं कपाळीं ! असो. आलीया भोगासी असावे सादर," मोहन त्याला म्हणत होता. मोहनच्या हावभावाचे त्याला मनापासून हसू आलें. एकदम त्याचे मनात विचार आला, काँग्रेसहाऊसपासून घोलेरोड तर अगदीच जवळ आहे. हें डबा पोहोचविण्याचे काम मोहनलाच सांगावे असे मनात येऊन तो म्हणाला, "मोहन, प्लीज माझे एक काम करशील का ? अगदी तुझ्या वाटेवर सहज जाताजाता होण्यासारखे आहे."

"आता काय रे बाबा ! मला वेळ कोठे आहे ?"

"अरे, ती माझी मामेबहीण माया तू ओळखतोस ना ? ती घोलेरोडवर रहाते. तिच्याकडे हा डबा पोहोचवायचा आहे. तू जातोच आहेस त्या बाजूला तर कर ना माझ एवढ काम. आज माझ इतक डोकं दुखतय् कीं वाहेर कुठं जावसंच वाटत नाहीं."

"बरं, दे"—असे म्हणतांना मोहनचे चेहऱ्यावरची त्रासिक छटा जाऊन हळुहळु त्याचा चेहरा खुलला, हें सदानंदाच्या नजरेतून सुटले नाही. आपली आपत्ति ही मोहनला इष्टापत्ति वाटावी याची त्याला मजा वाटली.

३

मोहनच्या व मायाच्या ओळखीचे रूपांतर दाट प्रेमसंबंधात झाले आहे, हें सुद्धा त्याला कळले तें एका अकल्पित प्रसंगानेच. मोहनच्या मिठ्ठास भाषणाने आत्मस्तुतीला भाळणारी माया त्याचेवर खूष आहे हें त्याच्या पूर्वीच लक्षात आले होते, पण त्या दोघांच्या चोरट्या गाठीभेटी होऊन प्रीतीच्या आणाशपथा झाल्या असतील याची मात्र त्याला कल्पना नव्हती.

"सदा, ए सदा," तो एका रविवारी संध्याकाळचा सायकलवरून लक्ष्मी रोडने चालला असतांना शाममामांनी त्याला हटकले. "हे काय, तू दुपारी आला नाहीस ? मी तुझी किती वाट पाहिली."

"पण तुम्ही मला कधी बोलावल होत ?" तो म्हणाला.

"आज एकाळी तुला मायाने नाही का सांगितला निरोप? तिला तर मी मुद्दाम तुझ्याकडे पाठविलं होतं."

"सकाळी मी खोलीवर नव्हतोच. माझ्या मित्रावरोबर मी सिनेमाला गेलो होतो, मग ती मला कशी भेटणार?"

"पण ती तर म्हणाली तुला निरोप सांगितला म्हणून."

"कदाचित माझ्या रूम-मेटजवळ तिनें निरोप ठेवला असेल, पण मी आज दिवसभर खोलीवर गेलोच नाहीं त्यामुळे तुमचा निरोप कळू शकला नाही."

मामांचा चेहरा एकदम गंभीर झाला. ते म्हणाले, "जरा घरी चल. माझ काम आहे थोड. तू सायकलवरून पुढे हो. मी बसने येतो."

तो काही बोलण्यापूर्वीच मामा ७ नंबरची बस पकडायला स्टॉपकडे वळले आणि नाइलाजाने त्याला त्यांचे घरी जाणे भाग पडले.

तोच मामांचे आधी त्यांचे घरी पोहोचला. जिमखान्यावर बसमधून उतरून ते पायाने घरी येईपर्यंत त्याने सायकलवरून केव्हाच रस्ता संपविला होता. दारांत, पदराचे टोक कुरतडत आणि शेपट्याचे टोकाशी एका हाताने चाळा करीत माया उभी होती. त्याला पहाताच ती लगबगीने पुढे आली. तिच्या चेहऱ्यावरून तिला काहीतरी महत्त्वाचें त्याला सांगायचे आहे हें त्याने ओळखले.

"सदा, बाबांना नि आईला मी तुला खोलीवर भेटले होते म्हणून सांग हं. तुला आज त्यांनी इकडे बोलावलं होतं. तू खोलीवर नव्हतास म्हणून मी मोहनजवळ निरोप ठेवला होता, पण तो तुला सांगायला विसरला की काय कोण जाणे? आता बाबांनी तू दुपारी का आला नाहीस म्हणून विचारल तर वेळ झाला नाही म्हणून सांग त्यांना. ए, प्लीज सांगशील ना असं? मोहनने आग्रह केला म्हणून मी त्याच्याबरोबर बाहेर गेले होते. घरी यायला उशीर झाला. आई रागावेल म्हणून तुझ्याचबरोबर बाहेर गेले होते असं मी तिला सांगितलं." माया मोठ्या आर्जवाने त्याला म्हणाली.

"कमाल आहे तुझी! चांगलाच घोटाळा झालाय. मामा आताच मला रस्त्यात भेटले होते. दिवसभर मी खोलीवर नव्हतो आणि मला त्यांचा निरोप कळलाच नाहीं अस मी आताच सांगितल त्यांना. ते

बसने घरी येत आहेत, मी सायकलवरून पुढे आलो आहे.—हे काय, मामा वळलेच की इकडे !"

"अरे देवा !" असे म्हणत माया घाबरून आत पळाली.

त्या दिवशी खोलीवर परत जायला त्याला बराच उशीर झाला. मामामामींचा आरडाओरडा—मायाचे रडणे—त्याच्या मनाचा गोंधळ—या सगळ्यानी त्याचें मस्तक विलक्षण जड झाले होते. जिन्यातूनच मोहनच्या गण्याचे सूर ऐकू येत होते,—"पतलि कमर है, तिरछि नजर है."—संतापाने त्याचे मस्तकात जोराची कळ उठली.

मायाने आणि मोहनने एकमेकांवर आसक्त व्हावे यात त्याला वाईट वाटण्याचे किंवा राग येण्याचे काहीच कारण नव्हते, परंतु त्यांच्या या चोरट्या संबंधात त्याचे कसलेही साहाय्य नसतांना तो विनाकारणच या प्रकरणात गोवला गेला होता याची मात्र त्याला फार चीड आली.

काही ना काही निमित्त काढून माया वरचेवर त्याचे खोलीवर येई. ती येण्याचे सुमारास पुष्कळ वेळा मोहन खोलीवर असे. त्याचेपेक्षा मोहनशीच ती खुल्या दिलाने गप्पागोष्टी करी. कधीकधी तो नसतांनाही ती मोहनकडे येते असे त्याला कळले होते. पण तिला तो आवडत असला आणि त्या दोघांची मैत्री जमत असली तर त्यांत आपला काय संबंध, अशी त्रयस्थाची भूमिका त्याने स्वीकारली होती.

सदानंदाचे मायाशी लग्न होणार ही गोष्ट मामामामींनी गृहीतच धरली होती. त्याची नापसंती असूं शकेल हें पैशाच्या मस्तीत त्यांचे ध्यानीं आलेच नव्हते. मायाशी त्याचे संकोची वागणे पाहिले कीं तो लाजाळू आहे असें त्यांना वाटे. म्हणूनच आपल्या धिटुकल्या कन्येने त्याच्याशी हवेतितके मोकळेपणानें वागले तरी त्यांना तें गैर वाटत नसे. बरेच दिवसांत तो त्यांचेकडे आला नाहीं तर मामीच मायाला त्याचे खोलीवर चौकशीला पाठवीत. त्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन ती वरचेवरच त्याचेकडे येऊं लागली होती. तिचे येणे वाढलेले पाहून तिला टाळण्यासाठीं अपेक्षित वेळीं तो शक्यतों खोलीवर रहात नसे. त्याला वाटले होते आपण नाहीं असे पाहून ती परत जाईल. पण उलट अलीकडे एकट्या मोहनलाच भेटण्यासाठीं ती त्यांच्या खोलीवर येते हें त्याच्या हळुहळु नजरेस आले होते. स्वतःला प्रिय नसलेल्या व्यक्तीच्या

वागण्याचा बरा वाईट विचार करण्याची आपल्याला गरज काय? ज्याचा तो पाहून घेईल, अशा बेफिकीरीने मायामोहनच्या मैत्रीकडे त्यानें पूर्ण दुर्लक्ष केलें होतें. हा प्रकार आपल्या अंगाशी येईल आणि त्यांतून मामामामी, आपले आईवडील, या सर्वांचा रोष आपल्यावर होईल याची मात्र त्याला कल्पना नव्हती.

मामामामींची प्रामाणिक समजूत होती कीं माया त्यालाच वरचेवर भेटते, दोघे परस्पर फिरायला व सिनेमाला जातात व आता तो डॉक्टर झाला कीं लग्न होईलच. पण तो त्यांचा भ्रम या अकल्पित प्रसंगाने दूर झाल्याने ती दोघे गडबडून गेली. जुन्या संस्कारामुळे आपल्या लेकीने जातीबाहेर लग्न करावे हें त्यांना बरें वाटत नव्हते. इतके करून त्यांनी लग्नाला परवानगी दिली तरीसुद्धा हा गुलहौशी मोहन आपल्या मुलीशी लग्न करतो, की नुसतीच तिला झुलवून वाटेला लावतो ही भीति होतीच. मामींना वाटत होते सदानंदाचे उत्तेजनामुळे आपली लेक इतकी पुढे गेली. एरवी तिचे काय वय आहे बरेवाईट कळण्याचे? आपला मित्र कसाकाय आहे हें ओळखून सदानंदानेच तिला आवरायला नको होतें का? आपल्या लेकीचा अचरटपणा व खोटेपणा उघड करायला त्यांना लाज वाटत होती, त्यामुळे आपल्या मनःक्षोभाचे खापर सदानंदावर फोडून त्यानी त्याचेवर आग पाखडली होती. त्यांना वाटले होते, त्याला घरजावई करून त्याचे जन्माचे कल्याण करण्यास तयार झालेल्या उपकारकर्त्याशी तो कृतघ्नपणे वागला होता आणि त्याच्यामुळेच मोहनचा प्रवेश त्यांचे घरात होऊन ही आपत्ति त्यांचेवर ओढवली होती.

आणि माया?—ती पण त्याचेवरच जळफळली होती. तो त्या दिवशीं खोलीवर गेला नाही, हा तिचे दृष्टिने त्याचा अपराधच नव्हता का? तो खोलीवर गेला असता आणि मोहनकडून घरचा निरोप त्याला समजला असता तर हा समरप्रसंग टळला असता!—"मायाला घेऊन तू पुष्कळवेळा सिनेमाला व फिरायला जातोस हें तरी खरें, का ही बया त्या मोहनबरोबरच जाते?"—या प्रश्नाला तरी त्याने तिच्या नजरेची खूण ओळखून उत्तर द्यायचे होते, पण तसे न करता—"मी कधीच तिला सिनेमाला घेऊन जात नाहीं"—असे त्याने सरळ सांगून टाकले होते. त्याचा तो सत्याचा प्रयोग तिचे दृष्टीनें त्याचा मोठाच अपराध होता!

तिच्या प्रिय मोहनने तिला लग्नाचे वचन दिले होते खरे, पण त्याचा कोर्स पुरा होईतों त्याचे वडील, सर रघुनाथराव गुप्ते, यांची त्याला लग्न करण्यास संमति मिळणें कठीण होते. सरसाहेब फार लहरी स्वभावाचे होते. त्यांच्या कलाने वागून त्यांची संमती मिळविणे जरुरीचे होते. त्यासाठी आणखी काही वर्षे तरी हा प्रेमसंबंध गुप्त ठेवणें भाग होते. —"पपांचा जुलूम लग्नाचे बाबतीत मी मुळीच चालू देणार नाही"— असें तो पुष्कळवेळा तिला म्हणाला होता. पण इतक्यांतच त्याना दुखविले तर त्यांचेकडून येणारा पैशाचा ओघ बंद पडेल. मग चैन तर सोडाच, पण शिक्षणही बंद करून त्याला घरीं परत जावे लागेल, आणि मायाच्या सहवासाला अंतरावे लागेल, हें त्यानें तिला पटवून दिले होते म्हणून तिने या गुप्त संबंधाला हरकत घेतली नव्हती. तिला वाटत होते, एकदा तो डॉक्टर झाला कीं मग तो तिचा होईलच !

मोहनचा उथळ स्वभाव व भ्रमरवृत्ति याची जाणीव सदानंदाला होती, त्यामुळें मायाला हा फसविणार तर नाहीना, अशी शंका त्याला वाटू लागली. मोहनची मैत्री कितीतरी मुलींशी होती. पुष्कळजणी-बरोबर तो फिरायला, सिनेमाला व हॉटेलांत जात असे. त्यामुळे मायाला त्याने प्रेमाची वचनें दिली असूनही तो तीं कितपत पाळेल याविषयी शंकाच होती.

मूर्ख व अल्लड मायाबद्दल, का कुणास ठाऊक, पण आजमात्र त्याला मनापासून दया वाटली होती. मोहनच्या नादीं लागल्याने तिचे कसे होईल अशी काळजी त्याचे मन एखाद्या जिव्हाळ्याच्या माणसाप्रमाणे करीत होते. 'टळो ही पीडा' असा जिचा तिरस्कार ज्याने केला होता, तोच आज तिच्याविषयीं काळजी करीत होता. काय हे मनुष्यांच्या मनाचे गुंतागुतीचे व्यापार ?

सदानंदाला वाटत होते, मनुष्य एखाद्याचा मित्र होऊं शकला नाहो तर त्याने त्याचे शत्रूच व्हायला पाहिजे असें थोडेच आहे ? मामामामींचा जावई होण्याइतका आपलेपणा त्यांचेविषयी आपल्याला वाटत नसला, तरी त्यांचे अकल्याण व्हावे असे आपल्याला वाटण्याचे कारण काय ? या बाबतीत मामामामींना शक्य तितक्या सहानुभूतीने मदत करण्यास तो तयार होता. ही झाली त्याची बाजू, पण उलटपक्षीं त्या दोघानी

चमत्कारिक हट्टी भूमिका घेतली होती. आमचा जावई होणार नसशील तर आम्हाला तुझी काय गरज ? उगाच आमच्या दुःखावर खोट्या सहानुभूतीचे मीठ चोळू नको. आमची फजिती व्हावी म्हणून मुद्दामच तू आमच्या मुलीला तुझ्या वाह्यात मित्राचे नादी लावलीस. त्या दोघांच्या या दुराग्रहापुढे काय बोलावे, हे त्याला कळेना.

मोहन तर काय निर्लज्जच होता. "मी खूप नादी लावली तुझ्या बहिणीला, पण ती काय लहान बाळ आहे ? ती आपण होऊनच माझे गळ्यात पडली आहे. सध्या मला लग्नाचा विचार करताच येत नाही. पुढचे पुढे बघू," असें त्याने उडवाउडवी करून सांगितले. त्याच्या या बेजबाबदार वागण्याने सदानंदाला मनस्वी संताप आला. रागाचे भरात त्याने मोहनच्या काडकन् तोंडात लगावली. अपमानाने फण-फणणाऱ्या मोहनने पण उलट त्याला ठोसा लगावण्यास हात उचलला. शेजारच्या खोलीत रहाणारा श्रीनिवासन् मधे पडला आणि कशीबशी त्यांची मारामारी थांबली. त्याच्या बहिणीवरून झालेले त्या दोघांचे भांडण साऱ्या हॉस्टेलभर गाजले. मोहन निगरगट्टासारखा वागला होता. त्याच्या सढळ हाताने सिनेमा हॉटेलची चैन चालविणारे त्याचे त्याच्याच जातीचे मित्र, त्याची तळी उचलून सदानंदाची टिंगल करीत होते. आणि सदानंद कारण नसतांनाही ओशाळा झाला होता.

४

या सगळ्या मनस्तापात एकटा श्रीनिवासन् त्याचा पाठीराखा झाला होता. कुठला तो अन् कुठला श्रीनिवासन् ? भाषा, प्रांत, आचार-विचार, रंग, रूप, कशातच साधर्म्य नव्हते, पण मनांत सहानुभूति असली की वरवरच्या या फरकांचे काय महत्त्व ? त्याचे स्वतःचे जातभाई त्याच्या हुषारीचा मनांतून द्वेष करीत असत. त्याच्या सद्वर्तनामुळेच तो त्यांना अप्रिय होता. व्यसनी माणसांना व्यसनी माणसांचीच संगत प्रिय असते, तसे अचरट व उडाणटप्पू मुलानांही 'समानशीलव्यसनेषु सख्यं' या न्यायानें तशीच मुले टोळके जमवायला हवी असतात. सदाचारी आणि सरळमार्गी मुलांची त्यांना अडगळ

वाटते. यामुळे ही मुले सदानंदाशी फारशी खेळीमेळीने वागत नसत व तोही त्यांच्यात कधी मिसळत नसे.

सर्वस्वी परक्या मुलखात आणि वेगळ्या वातावरणात. रहाणाऱ्या श्रीनिवासन्‌लाही या कंपूबाज मुलांत अगदीं बुजल्यासारखे वाटे. त्या मुलांचे वाह्यात विनोद, अचरट कोटच्या व खिदळणे याचा नीटसा अर्थ भोषेचे फरकामुळे त्याला कळत नसे, तरीपण त्यांचेपासून तो दूरच राही. साहजिकच सदानंद व तो मनाने जवळ आले आणि दोघांच्यात परस्परा-विषयी मैत्रीचा जिव्हाळा उत्पन्न झाला.

श्रीनिवासन् काळासावळा खराच, पण दिसण्यात तरतरीत होता. कांहीं व्यक्ति अशा असतात की प्रथमदर्शनीं त्यांचेविषयीं पहाणाऱ्याचे मत फारसे अनुकूळ होत नाहीं, पण सहवासाने त्यांचे गुण दिसू लागले, की नकळत आपण त्यांचे रूपातील चांगलेपणा शोधू लागतो. उलटपक्षी, प्रथम दर्शनी ऐटबाज व सुंदर वाटणारीं माणसें आपल्या जास्त सहवासांत आली आणि त्यांच्या मनाचा उथळपणा कळूं लागला, कीं वरकरणीं सुंदर वाटणाऱ्या त्यांच्या रूपातही आपणास कांहीं ना कांहीं दोष दिसू लागतात. श्रीनिवासन् आणि मोहन या दोघांचे बाबतींत सदानंदाचे मनावर हाच परिणाम झाला. सहवासाने श्रीनिवासन्‌च्या काळ्या-सावळ्या रूपाचेही त्याला आकर्षण वाटू लागले, व देखणा मोहन डोळ्यापुढेही नकोसा झाला.

श्रीनिवासन्‌चे वडील आर्मीत होते. त्यांच्या वरचेवर बदल्या होत असल्यामुळे त्याचे शिक्षण बोर्डिगातूनच चालले होते. दर सुट्टीला तो आईवडिलांकडे जाई. त्या निमित्ताने त्याचा पुष्कळच प्रवास झालेला होता. विविध अनुभवांमुळे त्याच्या व्यक्तिमत्वाला बहुश्रुतपणाचा ठसा आलेला होता. त्याला वाचनाचा खूप नाद होता. इंग्रजी भाषेवरील त्याचे प्रभुत्व वाखाणण्यासारखे होते, पण बोलतांना गुड्ड्, बट्ट्, असे हेल काढीत व यम् यन् करीत तो बोले तें मात्र कानाला कसेसेच वाटे.

मायाप्रकरणात त्याच्या घरूनही त्याला वडिलांचे खरमरीत पत्र आले होते. त्याच्या आईचा त्याचेवर बराच रोष झाला होता. या विषयीं वास्तविक त्याने आपण होऊन घरी कांहींच कळविले नव्हते, पण सुधामामीनी त्याचे आईला ही हकीकत पत्राने कळविली होती. "ज्याचे करावे बरे

तो म्हणे माझेच खरें" अशा तऱ्हेची टीका त्याचेविषयी करून, "तुमच्या चिरंजिवांचे तोंडही पहाण्याची आम्हास गरज नाही" असे त्यांनी लिहिले होते. घरच्या लोकांनीं त्याची बाजू समजाऊन घेण्याचा प्रयत्न न करता निष्कारणच त्याचेवर आग पाखडली होती.

सुट्टीत श्रीनिवासन् बंगलोरला त्याचे आईवडिलांकडे जायला निघाला तेव्हां "तू पण येतोस का आमच्याकडे ?" असें सहजच त्याने विचारताच, जावे की नाही याचा पुरता विचारही न करता तो चटकन् 'हो' म्हणाला. या मनःक्षोभात घरी जाण्याची इच्छा त्याला नव्हती. "मी सुट्टीचा बंगलोरला माझ्या मित्राकडे जात आहे," असे मोघम पत्र वडिलांना लिहून तो श्रीनिवासन्‌बरोबर निघाला. मात्र प्रवास सुरू होताच आपण असे एकदम एखाद्या अनोळखी कुटुंबात रहायला चाललो आहोत हें बरें केले नाही, अशी हुरहुर त्याला वाटू लागली. त्याचे आईवडिलांना काय वाटेल, ते कितपत प्रेमाने आपले स्वागत करतील, असे अनेक प्रश्न त्याच्या मनाला त्रास देऊ लागले.

वाटेने जाताजाता, आपली आई किती वाट पहात असेल, लहान बहिणीने पुण्याहून काय आणायचे याची लांबलचक यादी कळविली होती—त्या साऱ्या वस्तु मिळेपर्यंत ती कशी हैराण करेल—महिनाभर गप्पागोष्टी, वनभोजने, त्याच्या आवडत्या पदार्थांचा फराळ, याची कशी रेलचेल उडेल, याचे वर्णन श्रीनिवासन् मोठ्या उत्साहाने सदानंदाला ऐकवीत होता. वरकरणी हसून हे सारे ऐकताना सदानंदाला वाटत होते, उलटपक्षीं आपण त्याला काय ऐकवायचे ? आपल्या घरात आपल्याविषयी कोणालाही विशेष आस्था नाहीं, हेंच की काय ?

अलीकडे दोन वर्षांपूर्वी कलकत्त्याजवळ नऊ दहा मैलावर असलेल्या बेलघुरिया या गावात भुवनेश्वरी ज्यूट मिलमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून तो राहू लागला होता. त्यापूर्वी तो किती ठिकाणी हिंडला होता बरं ? नागपूर, पाटणा, असनसोल—कुठे वर्ष, कुठे दीड वर्ष ! त्याचा जीवनप्रवास अखंड चालू होता. अजूनही त्याच्या जीवनाला स्थिरता येण्याची लक्षणें दिसत नव्हती. वयाची पस्तिशी जवळ आली तरी एकटाच ! त्याच्या एकाकी जीवनप्रवाहाला दुसरा ओघ येऊन मिळण्याची शक्यता अजून तरी दिसत नव्हती.

आपण कांहींसे जगावेगळेच आहोत असे कित्येकदा त्याला वाटे. त्याच्यासारख्या परिस्थितींत कितीतरी लोक वाढलेले असतील, त्यांतच राहून, लग्न करून, संसार थाटून,—सख्ख्या, सावत्र, मावस, मामे—सगळ्या नातेवाइकांशी धुसफुस, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या गुणदोषांवर टीका करीत, ठराविक चाकोरींतले आयुष्य सगळे जगतच नव्हते का ? त्यांचा जीवनप्रवाह अडून का बसला होता ? पण लहानपणापासून जगाचे बरेवाईट अनुभव घेतांना अतिविचार करायची सवय त्याला जडली होती. त्यामुळे ठराविक चाकोरीत प्रवाहपतिताप्रमाणे वहात जाणे त्याला पटत नव्हते. स्वतःच्या एकटेपणाबद्दल कधीकधी कंटाळवाणा विचार त्याचे मनात डोकवे. मनातल्या मनात एखादेवेळी कुठल्यातरी काल्पनिक कुमारीशी तो प्रियाराधन करी. अशी कोणी मनाजोगी मुलगी येईल का आपले आयुष्यात ? असें प्रश्नचिन्ह त्याच्या मनाच्या तारा मधूनच छेडून जात असे, पण म्हणून तो एकटेपणा घालविण्यासाठी कुठल्यातरी मुलीशी ठराविक पद्धतीने आपण विवाहबद्ध व्हावे हें मात्र त्याला पटत नव्हतें.

तसे पाहिले तर या एकटेपणातही एक वेगळा आनंद होता. त्याचे पाय संसाराच्या खोडचात अडकले नसल्यामुळे त्याने कितीतरी प्रवास केला होता. पैशाच्या फिकिरीने कुठेतरी स्वतःला अडकवून घेण्याची गरज त्याला भासली नव्हती. एखाद्या स्वतंत्र, स्वच्छंदी पक्ष्याप्रमाणे त्याचे आयुष्य चालले होते. या एकटेपणामुळे वाईट संगतीला लागून आणि व्यसनांच्या आधीन होऊन त्याने स्वतःच्या शरीराची नि मनाची खराबी केली असती तर तें निःसंशय गैर होते, पण त्याच्या अबोल स्वभावामुळे त्याच्याशी दोस्ती करायला कोणी फारसे धजावतच नसे. त्यामुळे व्यसनांच्या प्रलोभनांतून तो आपोआपच बचावला होता. लहानपणापासून डिवचली गेलेली त्याची आत्मनिष्ठा इतकी तीव्र होती कीं ती दुखावली जाईल या भीतीने तो आपण होऊन कोणाशीही मिसळत नसे, तो सगळ्या जगाला दूर अंतरावर ठेवी. साहजिकच जगाने पण त्याची दखल घेण्याचे सोडले होते.

पदवी पदरांत पडल्यानंतर काही दिवसांनी त्याने नागपूरला एका हॉस्पिटलमधे नोकरी पत्करली होती व त्याचेच जोडीला सर्जरीचा अभ्यास

करून वरची परीक्षाही दिली होती. स्वतंत्र दवाखाना काढून देण्याइतके भांडवल त्याच्या वडिलाजवळ नव्हते. शाममामांची निराशा त्याने केल्यामुळे आई त्याचेवर रुष्ट झालेली होती. आपल्याविषयी घरांत कोणालाही फारसा जिव्हाळा नाही, हे समजत असल्यामुळे येईल ती संधि पत्करून स्वतंत्र जगण्याचा मार्ग त्याने स्वीकारला होता. केव्हातरी वर्षभराने तो कर्तव्य म्हणून घरी जाई आणि एखादा आठवडा तेथे राहून परत येई. तो घरी आला की गरजू मुलींचे बाप त्याचे घरीं घिरट्या घालीत. पण इतक्यातच स्वतःचा चांगला जम बसेतों लग्नाची जबाबदारी उचलण्याची त्याच्या मनाची तयारी नव्हती. तसे त्याने अप्पांना स्पष्टच सांगितले होते, त्यामुळे ते त्याचे भानगडीत पडत नसत.

गेल्याच वर्षी त्याच्या धाकट्या भावाच्या लग्नासाठी तो चार दिवस मुंबईस गेला होता. मुलीकडच्या वऱ्हाडी मंडळीतील एका वधूपित्याने त्याला हेरले. मुलगी बी.ए.बी.टी. मास्तरीण, गोरी, उंच, कर्तबगार, वगैरे वर्णन ऐकवून, एकदा आमचे घरी याच अशी गळ त्याने सदानंदाला घातली. तो गृहस्थ सुस्थितीत होता. लग्नाप्रीत्यर्थ पाचसात हजार रुपये खुषीने खर्चण्याची त्याची तयारी होती. घरातल्या सर्वांना वाटले, आणखी काय हवं ? त्याने मुलगी पहावी अशी अप्पांची इच्छा दिसली. सुविद्य व सुरूप जोडीदारीण मिळत असेल तर संपवून टाकावा हा एकटेपणा असा विचार त्याचे मनात आला, आणि तो या प्रसंगास कबूल झाला.

निस्तेज गोऱ्या रंगाची, हडकुळी, किंचित् दात पुढे असलेली व चष्मा लावणारी, ती तिशीच्या आसपासची प्रौढ कुमारी पाहून मात्र त्याचे मन बधिरच झाले. रूपापेक्षा गुणांनाच अधिक महत्त्व द्यावे असे तो प्रतिपादत असे, पण या मुलीला पाहून, आकर्षण वाटण्यास रूपाचीसुद्धा आवश्यकता आहे असे त्याला वाटू लागले.—रूप म्हणजे तरी काय ? नुसता नाकडोळ्यांचा रेखीवपणा आणि कातडीचा गोरा रंग कीं काय ? खचितच नव्हे ! पहाताक्षणीं हुषारीची जाणीव येईल असा तरतरीतपणा, हसण्याबोलण्यातला मधुर भाव, चालण्यात बसण्यात व उभे राहण्यात दिसणारा डौल, हे सगळे असेल तर सामान्य रंगरूप वाटण्याला आलेले माणूससुद्धा मोहक वाटत नाहीं का ? पण इतके शिक्षण घेऊनही ज्या

मुलीच्या चेहऱ्यांत हुषारीचे तेज नाहीं, कंटाळवाणा भाव साऱ्याच गात्रांत भरलेला आहे, अपेक्षाभंगाचे खोल असमाधान डोळ्यात तरळतें आहे, अशी ही मुलगी आपल्या एकलकोंड्या जिवाला कितीसा दिलासा देईल ? आपल्या विचारांशी समरस होण्याचा ही प्रयत्न तरी करील काय ? लग्न करायचे म्हणून मिळेल त्या मुलीशी स्वतःला जन्माचे जखडून घ्यायचे की काय ? त्यापेक्षा आहे ही स्थिति काय वाईट ?

त्याच्या नकारामुळे घरात पुनश्च वादळ झाले.—"तुला कोणी अप्सरा का हवी आहे ? पस्तिशी उलटत चालली तुझी, त्यांतून तू असा परमुलुखात सडक्याफटिंगासारखा राहतोस. यापेक्षा कुठली चांगली मुलगी मिळणार तुला ?" अशी टीका घरच्या मंडळीनी केली. "उगाच याच्या भानगडीत पडलो," असे अप्पा त्रासून म्हणाले.

त्यानंतर आता घरी फारसे जायचे नाही असे त्याने ठरविले. त्याला वाटले, असेच एकटे भटके आयुष्य आपल्या नशिबी आहे. कथाकादंबऱ्यात नायकांना जशी एखादी नायिका अवचित भेटते तसाच नाट्यपूर्ण प्रसंग आपले बाबतीत घडला तरच हा एकटेपणा नष्ट होण्याचा योग ! पण त्याला त्याची फारशी खंत नव्हती. भरपूर काम करावे, खूप वाचन करावे, लांब फिरायला जाऊन कुठेतरी विचार करीत वेळ काढावा, असे त्याचे आयुष्य चालले होते. आजुबाजूच्या व्यक्तींचे वागणे व स्वभाव याचे निरीक्षण त्याला नाटक सिनेमा पहाण्याइतके करमणुकीचे वाटे. तो मनाशी विचार करी, काय वाईट आहे आपलं हे जीवन ? एका ठराविक चाकोरीतून सर्वानी गेले पाहिजे असे थोडेच आहे ?

५

सकाळीं हुमायूनने त्याला घुसळिले तेव्हां त्याला जाग आली. दिवस चांगला वर आला होता. केबिनबाहेर लोकांची बोलणी व गडबड ऐकू येत होती. हाताने धरून त्याला बिछान्यातून ओढीत हुमायून म्हणाला, "अरे भाई, देखो जमीन देखा जाता है." ते दोघे वरच्या डेकवर गेले. नैऋत्येस क्षितिजरेषेवर कांहीं तरी धूसर, एखाद्या मातीच्या ढेकळासारखे दिसत होते.

"ओ हो, कोको आयलंड देखा ? "

"अरे, किधर ? "

"देखो ना यहाँसे."

वरच्या डेकवर प्रवाशांची भूपृष्ठ पहाण्याची उत्सुकता व धांदल पाहून त्याला गंमत वाटली. कलकत्ता सोडून अंदमानचे वाटेवर निघाल्याला अवघे तीनच दिवस लोटले होते. पण या तीन दिवसांत सतत पाणी आणि आकाश या पलीकडे काहीच न दिसल्यामुळे तो जमिनीचा लहानसा पुसट तुकडासुद्धा सगळ्यांना प्रेक्षणीय वाटत होता. एखाद्या उंची वस्त्राचे काठाला चुकून चिखल लागावा, आणि तो तसाच वाळून करवडून जावा तसे ते भूपृष्ठ चमकत्या पाण्याचे कडेवर दिसत होते. काल डेकवर फिरत असताना सगळीकडे नुसते पाणीच पाणी पाहून त्याला वाटले होते, आपले जहाज पाण्याच्या एका गोल तबकडीवरून जात आहे. तें पुढेपुढे चालले आहे खरे, पण त्या तबकडीची कड काही त्याला गाठता येत नाही. पुनः तें आपले मधेच !

वरच्या डेकवरून समुद्राची नि आकाशाची शोभा पहातच रहावी असे वाटे. आकाशात विविध रंगांची कलाकुसर क्षणाक्षणाला बदलती दिसे. दुपारच्या वेळी पांढऱ्या ढगांच्या मोठमोठ्या सावल्या निळ्या जलपृष्ठावर पडत, आणि त्या चमकत्या पाण्यावर कोणीतरी मोठे काळपट पट्टे ओढले आहेत असे वाटे. सूर्य उगवतांना नि मावळतांना आकाशाच्या कडेला दिसणारी ढगांची रंगीबेरंगी वेलबुट्टी अवर्णनीय वाटे. या निसर्गचित्राच्याजवळ रंगाच्या कल्पकतेचे कधी न संपणारे भांडार आहे, व तो सर्वांना आपली रंगाची जादू मनसोक्त लुटू देत आहे असे वाटे. कितीतरी वेळ तो या दृश्यांकडे पहातच राही.

संबंध प्रवासभर सुदैवाने समुद्र अगदी शांत होता. इतका शांत, की ती स्तब्धता गमतीची वाटावी. चकचकीत नायलॉनचे कापड किंचित् चुरगळून अंथरले व त्याचेवर प्रकाशाचा झोत टाकला तर ते कसे दिसेल, तसे हे जलपृष्ठ दिसत होते. जहाज वेगाने पाणी कापीत पुढे जात होते, त्यामुळे त्या जागी तेवढी खळबळ होत होती ! जहाजाचे आघाताने पाण्याची फेसाळ लाट उसळून उठे व हिस्स् असा आवाज होई. त्या आवाजामुळे आपल्या शांततेत व्यत्यय येत आहे असे वाटून

तो शांत, गंभीर समुद्र आपल्या अदृश्य हाताने उगाच दंगा करणाऱ्या या लाटेला गप्प करीत होता. ती उसळणारी लाट हळुहळु दूर होत असतां त्यावरील फेस विरून जाई, आणि जलपृष्ठावर बारीकबारीक बुडबुडे उठत. पुनश्च नवी लाट उसळे आणि शांत होई. उडते मासे उंच सुरकांडी मारून पुनः पाण्यांत बुडी मारीत, अन् या शांततेत तरंगांची गडबड उडवीत.

समुद्राच्या पाण्याचा रंग काळसर निळा दिसे. लोक म्हणत, म्हणून तर याला 'कालापाणी' म्हणतात. पंधरा वीस वर्षापूर्वी खून, दरवडा वगैरे गुन्हे करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांना व त्यापूर्वी काही वर्षे त्यांचेच जोडीला क्रांतिकारक अभागी देशभक्तांना हा काळचा पाण्याचा प्रवास घडे. ते सारे हताश मनाने हा मार्ग आक्रमीत. पण आता नव्या उद्योगधंद्यांचे आमिष मिळाल्यामुळे स्वखुषीने व उत्सुकतेने लोक तिकडे निघाले आहेत. काय हा काळाचा महिमा! त्या काळचा पाण्याच्या दर्शनाने क्रूरातल्या क्रूर गुन्हेगाराचे चित्तही थरारून जात असे, आणि आज तो या पाण्याच्या अवलोकनाने पुलकित होत होता. दृश्य तेंच, पण बघणाऱ्याच्या मनोव्यापारात फरक असल्यामुळे त्याच दृश्यांत जमीन-अस्मानाइतके अंतर होते.

या मनोवेधक सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेत असतांनाही त्याची नजर हळूच एका व्यक्तीला शोधत होती. ही मणि कोण, हें अजूनही त्याला कळले नव्हते. आणि कळले नव्हते म्हणूनच त्याच्या मनाची उत्सुकता वाढून तिला एकदा पहावे हा हट्टी चाळा त्याच्या मनाला जडला होता.

दुलालभाई व लल्लूभाईबरोबर कधीकधी कोकाकोला पिण्यास अगदी वरच्या डेकवरील बारमधे तो जाई, तें सुद्धा याच आशेने कीं कदाचित तेथे मणि दिसेल. बारमधे ती थाटबाज बंगाली स्त्री व तो तरुण मद्याचे घोट चाखत असतांना त्याने पाहिले होते, पण त्या दोघांत तिसरे कोणी नव्हते. जेवणघरातसुद्धा त्यांच्या राखीव टेबलावर ती दोघेच जेवतांना आढळत.

कोको आयलंड दिसू लागले तरी अजून एक रात्रीचा प्रवास बाकी होता. सकाळी दहा साडेदहाचे सुमारास जहाज चट्टम आयलंडचे धक्क्याला लागले. लाँग आयलंडचा चंद्राकृती किनारा व त्याच्या दक्षिण टोकाकडे

विखुरलेले पोर्टब्लेअर शहर दुरून दिसू लागले तेव्हापासून आपापले सामान आवरून डेकच्या कठड्यापाशी गर्दी करून कित्येक प्रवासी उभे राहिले होते. तो पाचसहा दिवसच तेथे राहणार असल्यामुळे त्याचेपाशी फारसे सामान नव्हते. लाँग आयलंडच्या उत्तर किनाऱ्याला वळसा घालून जहाज पुढे निघाले तेव्हां या अर्धचंद्राकृति किनाऱ्याचे पुढे एक छोटेसें बेट दिसू लागले. हेच चट्टम आयलंड. येथें बोट धक्क्याला लागते. हें बेट खाडीवर बांधलेल्या मोठ्या पुलाने पोर्टब्लेअरला जोडलेले आहे.

बोटीचा धक्का मोठमोठ्या लाकडी ओंडक्यांचा बांधलेला असून त्यावर लाकडी फळचा ठोकून प्लॅटफॉर्मसारखे केलेले होते. आजुबाजूची घरें, इमारती, सगळे लाकडाचेच. धक्क्याला लागूनच एक कारखानेवजा इमारत व त्याबाहेर लहानमोठ्या आकारात सारखे कापलेले लाकडाचे ओंडके आणि अगदी पातळ पत्र्यासारख्या कापलेल्या लाकडाच्या पट्ट्या, वगैरेचा ढीग दिसला. कोणीतरी म्हणाले हा विम्कोचा काडचापेटचाच्या काड्या तयार करण्याचा कारखाना. आजुबाजूला घनदाट झाडीतून चढण घेत वळणे घेणारे रस्ते व झाडातून डोकावणारी टुमदार बंगल्याची कौलारे दिसत होती. सगळीकडे कसे हिरवेगार. ही वनश्री आल्हादकारक वाटत होती. दाट नारळाची झाडेच मुख्यत्वेकरून सर्वत्र दिसत होती.

जहाज धक्क्याला लागून शिडी टाकली गेली तेव्हां खाली जाणारे प्रवासी व वर चढून जहाजातून आलेल्या आपल्या इष्टमित्रांना उतरवून घ्यावयास आलेली मंडळी, यांची एकच खेचाखेच झाली. त्याला उतरवून घेण्यास कोणीच येणार नव्हते. येथील सिव्हिल हॉस्पिटलमधील नोकरीसाठी कमिशनरसाहेबांच्या मुलाखतीला तो चालला होता. साउथ पॉइन्ट गेस्ट हाऊसमधे त्याची उतरण्याची सोय केलेली होती. डॉक हमालाचे डोक्यावर सामान चढवून तो या रेटारेटीतून वाट काढीत कसाबसा खाली उतरला. मागे वळून De Luxe केबिनच्या बाजूला त्याने मान वर करून पाहिले. कठड्याला टेकून ती ऐटबाज बंगाली स्त्री पाठमोरी उभी होती. तिचे खांद्यावर हाताचा विळखा घालून डोक्याला टक्कल पडलेला एक गोरटेला जाडसर गृहस्थ तोंडातून चिरुटाचा

धूर सोडीत तिच्याकडे पाहून बोलत व गदागदा हासत होता. ती पण त्या हास्याला खदखदून साथ देत होती. तिच्या बरोबरचा तो तरुण मुलगा सामान हमालाचे स्वाधीन करण्यांत गुंतला होता. पांढरी शुभ्र साडी नेसलेली एक पाठमोरी तरुण मुलगी त्या जाडजूड गृहस्थाचे आड त्याला ओझरती दिसली. तीच मणि असावी, पण तिचा तोंडावळा त्याला दिसू शकला नाही.

त्याचे दोन दिवस फार गडबडीत गेले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मुलाखत, हॉस्पिटलची पाहणी व इतर डॉक्टरांबरोबर बातचीत व नवीन कांहीं ओळखी, या सगळ्याने तो अगदी दमून गेला होता. एक नवा अनुभव व नवी रहाणी या दृष्टीने तेथील नोकरी पत्करण्याचे त्याने ठरविले होते. पूर्वी जेथें जेल होता त्याचाच कांहीं पडीक भाग पुनः बांधून त्याचे रूपांतर हॉस्पिटलमध्ये करण्यात आले होते. जेलच्या प्रवेशद्वारालगत पूर्वी जेथे यूरोपिअन जेलर रहात असत तेथेच त्याला रहाण्यास क्वार्टर मिळणार होते. हॉस्पिटलला लागूनच जेलच्या दोनतीन जुन्या बिल्डिंग्ज होत्या. तेथे स्थानिक कैदीच ठेवलेले होते. सध्याचे जेलरसाहेब जेलच्या खालच्या अंगाला एका छोट्या बंगलीत रहात असत.

तो उतरला होता ते गेस्ट हाऊस एका उंच ठिकाणी होते. गेस्ट हाऊसचे दर्शनी भागातून खळाळणाऱ्या समुद्राचे सुंदर दृश्य दिसे. एका बाजूने पोर्टब्लेअर शहराचा वळणदार किनारा, दुसऱ्या बाजूस दुरून दिसणारी इतर लहान बेटें व त्यामधून दिसणारा तो निळा समुद्र हें दृश्य गेस्ट हाऊसच्या दाराच्या चौकटीतून सुंदर चित्रासारखे वाटे. समोरच एक छोटेसे बेट होते त्याचे नाव रॉस आयलंड. त्याच्या एका टोकाला टुमदार बंगला होता, व वरचे टेकडीवजा भागावर एक दोन लहान इमारती दिसत होत्या. त्या बंगल्यापुढील किनाऱ्याचा तुटका भाग व जवळची नारळाची झाडे दुरून चित्रात काढल्याइतकी स्तब्ध वाटत होती. समुद्रांतून क्वचितच एखादी लहानशी शिडाची होडी किंवा छोटीशी मोटर लाँच जातांना दिसे. रॉस आयलंडच्या त्या बंगल्यात पूर्वी युरोपिअन कमिशनर रहात असे. त्यावेळी पोर्टब्लेअरला फक्त गुन्हेगारच आणले जात. गुन्हेगारांनी बदमाषी करून तुरुंग फोडला तर आपल्याला धोका नसावा, या हेतूने कमिशनर वेगळ्या बेटावर राहून पोर्टब्लेअरवर नजर ठेवी.

त्याच्या बंगल्याच्या सरळ रेषेत जेलच्या टॉवरचा भाग होता. जेलमधील हालचालीचीं गुप्त बातमी त्याला तेथून संकेताने कळविली जाई. आता मात्र तो बंगला आणि तें बेट अगदीं ओसाड पडले होते. कांहीं भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतें तें बेट हळुहळु समुद्रांत खचत चालले आहे असे त्याला कळले.

लाटांच्या खळखळाटाचा आवाज वरपर्यंत ऐकू येई. एखादी लाट एकदम वर उसळून वेगाने पुढे धावते न धावते तोंच मागोमाग आणखी एखादी मोठी लाट धाव घेई, व त्या दोघी एकमेकीना रेटीत किनाऱ्यावर आपटून फुटत, आणि दुधासारखा फेस उसळून उठे. खेळात दंग झालेल्या एखाद्या मुलाला तो बेसावध असतांना त्याच्या खोडकर संवगड्याने मागून ढकलावे, व तो खाली पडलेला पाहून खदखदून हासता हासता त्याने पण त्याचे अंगावर लोळण घ्यावी, असा हा लाटांचा पाठशिवणीचा खेळ वाटे. नारळीच्या झाडांच्या ओळीला लगटून जाणारा रस्ता किनाऱ्या-किनाऱ्याने नागमोडी वळणे घेत एकदम चढण चढून त्या गेस्ट हाऊसचे बाजूने पुढे आणखी वरचे भागाकडे गेलेला होता. एखाद्या सुस्त अजगराने मंद गतीने जाताजाता एकदम फणा उचलून एखाद्या वृक्षावर आरूढ होण्यासाठी आपली गति बदलावी तसा हा रस्ता वाटत होता. थंडगार मधुर सरबत सावकाश चवीने प्यावे तसे हे समोरचे निसर्गदृश्य अंगणातील आरामखुर्चीवर पडल्यापडल्या तो पहात होता.

मोटारीच्या हॉर्नच्या आवाजाने त्याने एकदम दचकून मान वळवून पाहिले, क्रीमकलरची फिआट गाडी वेगानें वळण घेऊन गेस्ट हाऊसचे वरील बाजूला असलेल्या एका टुमदार बंगल्याचे आवारांत शिरली. De Luxe केबिनसमोर दिसलेला तो बंगाली तरुण गाडी चालवीत होता. मागे ती बंगाली स्त्री व टक्कल पडलेला तो जाडसर गृहस्थ बसलेले होते. न कळत त्याचे कुतूहल जागे झाले. त्याला वाटले एका हाकेच्या अंतरावर ही मंडळी असून आपल्या हे आधीच कसे लक्षात आले नाहीं. आराम-खुर्चीवरून उठून ड्रेसिंग गाऊनचा बंद कमरेभोवती बांधीत तो गेटकडे वळला. तेथून तो बंगला बराच स्पष्ट दिसत होता. अल्सेशिअन कुत्र्याला पट्ट्याने खेचीत एक नोकर दर्शनी व्हरांड्यातून पुढे आला व त्याने तामीळ भाषेत कोणाला तरी हाक मारली. पोर्चमध्ये फिआट

मराठा ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्वाधीन
क्रमांक ...5...6... दिः ...
क्रमांक ...5...6... दिः ...

गाडी उभी होती. हॉलमधून रेडिओग्रॅमवर चाललेले इंग्लिश ट्विस्टच्या धर्तीचे हिंदी गाणे ऐकू येत होते, पण बाकी सर्वत्र सामसूम होती. पुढील बागेतील वृक्षांनी व फुलझाडांनी बंगल्याचा बराचसा भाग झांकला गेला होता. बराच वेळ उभे राहूनही त्याचे कुतूहल पुरे होण्याची लक्षणे दिसेनात. शेवटी कंटाळून तो आत आला.

तो ज्या जहाजाने आला होता ते 'M.V. अंदमान' हे जहाज आणखी दोनच दिवसानी कलकत्त्याला परत जाणार होते. त्या जहाजाने तो परत जाणार होता. मग ज्यूटमिलमधील नोकरीचा राजीनामा देऊन, व तेथील सामान हालवून महिन्याभराने त्याला पुनः इकडे यायचे होते. या दोन दिवसात इतर काहीच उद्योग नसल्यामुळे खूप भटकायचे व पाहता येईल तितके निसर्गसौंदर्य पाहून घ्यायचे असे त्याने ठरविले. त्यां दिवशी कारबाइंस्कोच्या बीचपर्यंत बरीच लांब पायी रपेट करून परत यायला त्याला रात्र झाली. अष्टमीच्या चंद्राच्या मंद प्रकाशाने रस्त्यातील मिणमिणत्या दिव्यांच्या उजेडात फारशी भर टाकलेली नव्हती. सगळीकडे कसें शांत होते. रातकिड्यांची किरकिर व लाटांचे खळाळणे याखेरीज कसलाही आवाज नव्हता. विखुरलेल्या बंगलेवजा घरांतूनसुद्धा बहुतेक सर्व दिवे मालवले गेले होते. चढण चढून तो गेस्ट हाऊसकडे वळला. तो गेटमधून आत शिरणार इतक्यात वरच्या भागातील त्या बंगल्यातून स्त्रीच्या आवाजाची किंकाळी, खळकन कांहीतरी काचेची वस्तु फुटल्याचा आवाज व घाईने व्हरांड्यातून नोकर धावत आंत गेला त्याच्या पायांचा आवाज आला, व थोड्या वेळाने सगळेच शांत झाले. बाहेरच्या व्हरांड्यांतील दिवा पण मालवला गेला.

रात्री कितीतरी वेळ या विलक्षण रहस्याशी तो कल्पनेनेच गुंगला होता. त्या घटनेशी मणीचा नक्कीच कांही तरी संबंध असणार असें त्याला वाटलें, पण तें रहस्य काय असावे हे त्याला कळेना.

बराच वेळ त्याला झोप आली नव्हती तरीसुद्धा पहाटे त्याला लवकर जाग आली. तेथील तामीळी नोकराला उठवून चहा प्यावा असे एकदा त्याला वाटले, पण तो विचार दूर सारून घाईने कपडे करून तो बाहेर पडला. नेहमी तो खाली समुद्रकिनाऱ्याने फिरून येई, पण आज वरच्या अंगाने वळण घेत त्या बंगल्यावरून जाणाऱ्या रस्त्याने जावे असा विचार

करून तो निघाला. गेटच्या दगडी खांबावर पी. बॅनर्जी असे नाव कोरलेले होते. गेटच्या दोन्ही खांबावरून जांभळट व गुलाबी अशा दोन रंगांच्या बोगनव्हिलाचे तुरे एकमेकांस जोडले जाऊन कमान तयार झाली होती. पोर्चकडे चढत गेलेल्या रस्त्यावर बारीक खडी टाकलेली होती व त्याच्या दुतर्फा लालसर रंगाचे बुटके हेज् लावलेले होते. बागेची मांडणी व स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. मुख्य रस्ता बंगल्यावरून तसाच चढण घेऊन आणखी वरचे भागाकडे गेलेला होता, व एक लहान रस्ता बंगल्याच्या डाव्या अंगाने खालचे बाजूकडे उतरला होता. असेच पुढे जावे की डावीकडे वळावे याचा विचार करीत त्याने कोपऱ्यावरूनच बंगल्याचे निरीक्षण केले. मग डावीकडूनच जावे असे ठरवून तो बंगल्याचे कंपौंडला लागून असलेल्या डाव्या रस्त्याकडे वळला. त्या बाजूला बंगल्याचा भाग कंपौंडला बराच चिकटून होता. रस्त्याकडच्या एका खिडकीत चौकटीला डोकें टेकून एक तरुण मुलगी उभी होती. गालावरून ओघळणारा अश्रु डाव्या हाताच्या पंजाने पुसून तिने मान वर करून पाहिले. तिची नि त्याची नजरानजर झाली.—'अरे! या मुलीला तर आपण ओळखतो—पण हिच नाव मणि नाही, दुसरच काही तरी नव्हते का? कुठे बरे हिला आपण पाहिली?'—असे सदानंदाला वाटलें. त्या मुलीचे नजरेत पण ओळखीचा व आश्चर्याचा भाव दिसला. आपण हिला कोठे पाहिले या विचारात तो गढला असता, नकळत त्याची नजर दुसरीकडे वळली होती. परत त्याने खिडकीकडे पाहिले तेव्हां खिडकीची चौकट रिकामी होती. केसरी रंगाचा मोठमोठ्या फुलांचा पडदा झुलत होता, पण तेथे कोणीच नव्हते.

६

भुवनेश्वरी ज्यूटमिलचे क्वार्टर्सच्या गेटमधून टॅक्सी उजव्या हाताच्या छोट्या रस्त्याने वळण घेऊन एका बैठ्या बंगलीजवळ थांबली. भाड्याचे पैसे चुकते करून, "शिवपूजन" अशी नोकराला हाक मारीत सदानंद आंत शिरला. "आता है बाबू," असे म्हणत शिवपूजन बाहेर आला व टॅक्सीवाल्याने खाली उतरवलेले सामान घेऊन येण्यास वळला.

आतल्या खोलीत पंख्याचा स्विच दाबत असता त्याचे लक्ष टेबलावरील काचेच्या पेपरवेटखाली ठेवलेल्या व्हिजिटिंग कार्डकडे गेले. 'बी. श्रीनिवासन्' अशीं त्यावरील अक्षरें वाचून त्याने शिवपूजनला हाक मारून विचारलें, "कायरे, हे साहेब कधी आले होते ?"

"परवा संध्याकाळीं. मी त्याना तुम्ही आज येणार असे सांगितले होते, पण ते कालच परगावी गेले. माझ्या लक्षात रहाणार नाही म्हणून त्यांनी हे कार्ड देऊन ठेवल आहे."

खुर्चीवर बसल्याबसल्या बुटाचे बंद सोडीत असतांना त्याला एकदम एक गोष्ट आठवली—जी आठवावी म्हणून पोर्टब्लेअर सोडतांना त्याने स्वतःच्या स्मरणशक्तीला खूप ताण देण्याचा प्रयत्न केला होता, ती ! आपल्या आधीच कसें हें ध्यानात आले नाही असे त्याला वाटले.

चार वर्षापूर्वी असनसोलची नोकरी पत्करून तो बंगालमध्ये आला होता. येथे सगळेच वातावरण त्याला परके होते. एक दिवस स्टेशनवर रेल्वेच्या पार्सल ऑफिसमधून त्याने मागवलेला माल आणण्यासाठी तो गेला होता. रेलवे रेस्टॉरंटमध्ये तो कॉफी पीत बसला असताना दोन तीन ऐटबाज युनिफॉर्ममधील आर्मी ऑफिसर त्याच्या समोरच्या टेबलावर येऊन बसले.

"ओ हो ! सदानंद ! काय अनपेक्षित हें भेटीचें सुख !" श्रीनिवासन् त्याचे जागेवरून उठून सदानंदकडे येत म्हणाला. सदानंदाला पण खूप आश्चर्य वाटलें. आर्मी वेषात श्रीनिवासन् फार स्मार्ट दिसत होता. मोठ्या प्रेमाने सदानंदाचा हात हालवीत तो म्हणाला, "तू इकडे कोठें ?" सदानंदसारख्या हुशार मुलाने स्वतंत्र प्रॅक्टिस न करता असे नोकरीत स्वतःला गुंतवावे याचे त्याला आश्चर्य वाटलें. अजूनही विवाहबंधनात तो गुंतलेला नसावा याचे पण त्याला नवल वाटले.

चार वर्षापूर्वी श्रीनिवासन्ने आर्मी मेडिकल यूनिटमध्ये प्रवेश केला होता. गेली दोन वर्षे तो असनसोललाच रहात होता. तीन वर्षापूर्वी तो विवाहबद्ध होऊन त्याला एक मुलगा पण होता. त्याची बायको चिदंबरंला माहेरी गेली होती. आणखी आठ दिवसानी तो पण दोन महिन्याची रजा घेऊन प्रथम मद्रासला आईवडिलांकडे, व मग सासुरवाडीला जाणार होता. सुट्टीवरून परत आल्यावर त्याची बदली होण्याचा संभव होता. त्याचे वडील आर्मीतून सेवानिवृत्त होऊन मद्रासजवळ अड्यारला त्यांचे

घरी रहात होते. त्याची धाकटी बहीण वर्षापूर्वी एका एअर्फोर्स ऑफिसरशी विवाहबद्ध झाली होती. गप्पाचे ओघात श्रीनिवासन्‌ने आपली सारी हकीकत सदानंदाला सांगितली.

नंतर दोन चार दिवस तो आणि श्रीनिवासन् पुष्कळच एकत्र हिंडले फिरले होते. इतक्या दिवसानंतर जुना मित्र भेटूनही त्याच्या भेटीचे सुख फार दिवस लाभणार नाही असे वाटून त्याने सदानंदाला आग्रह केला, "तू पण चलतोस का थोडे दिवस आमचे घरीं? अम्मा आणि पपा तुझी खूपवेळा आठवण काढतात. तुला फार दिवसानी पाहून त्याना फार आनंद वाटेल."—त्याच्या या सांगण्यात अतिशयोक्ति नव्हती. मागे कॉलेजात असतांना सदानंद त्यांचे घरी गेला होता त्यावेळी त्याच्या घरच्या सर्व मंडळीनी त्याला फारच आपुलकीने वागविले होते. सदानंदाला इथे अगदी कंटाळवाणे वाटत होते म्हणून त्याने एक आठवड्याच्या रजेची खटपट करून मद्रासला जायचे ठरविले. रजा फार नसल्यामुळे रेल्वे प्रवासात वेळ न घालविता विमानानेच जावे असे दोघानी ठरविले.

मीनांबकंचे विमानतळावरून टॅक्सीने ते अड्यारला आले. रस्ता सुंदर व स्वच्छ होता. सदानंदचे मनात आले, डमडमपासून कलकत्त्याचा रस्ता पाहून घ्यावा! त्या रस्त्यावरील दारिद्र्य व गलिच्छता पाहून प्रथम परदेशातून इकडे येणाऱ्यांची आपल्या देशाविषयीं काय समजूत होत असेल?

अड्यारला त्यांचे घर छोटेसेच पण टुमदार होते. मागेपुढे मोकळे अंगण, पुढे थोडी फुलझाडांची बाग, मागे केळी, नारळ, आंबा वगैरे झाडें, यामुळें बंगल्याच्या साधेपणांत सुंदरतेची भर पडली होती. आजुबाजूचे वातावरणसुद्धां शांत व स्वच्छ होते. त्या आठ दिवसात त्याने मद्रासच्या जवळपासचे बरेचसे पाहून घेतले. येथील माणसें दिसण्यात कळकट असली तरी त्यांची रहाणी त्या मानाने स्वच्छ आहे व महागाईची झळ देशांतील इतर भागांचे मानाने येथें अजूनही तितकी पोहोंचलेली नाही असे त्याला वाटलें. मात्र त्यांच्या भाषेविषयीं त्याचे मत विशेष अनुकूळ झाले नाही. बसमधून जातायेता मद्रासी स्त्रीपुरुषांचे घडाघडा बोलणे ऐकले कीं त्याला वाटे, काय ही खरखरीत भाषा! गुजराथी, हिंदी,

बंगाली, कुठल्याही भाषा कानावर पडल्या तर त्यांतील दोनचार शब्द तरी ओळखता येतील, पण या भाषेतील एक अक्षर कळेल तर शपथ ! मद्रासीलोकांना बोलण्याचा सोसही फार. आपापसात एकसारखे नि भरभर बोलतांना त्यांना ऐकले कीं सदानंदाला वाटे, तोंडें कशी दुखून येत नाहीत बेटचांची ! चिनी भाषा एकाक्षरी आहे, चिनी भाषेंतील एकाक्षरांत बराच विस्तृत अर्थ गोवलेला असावा, पण या भाषेंतील लांबलचक व ओबडधोबड वाक्यांतून एका अक्षराइतका तरी अर्थ निघत असेल की नाही, कोण जाणे !

"तामिळ तेरिमा" या वाक्याचा अर्थ तुझी आई तामिळी आहे असा नसून, तुला तामिळ येते का, असा आहे, असें कळलें तेव्हा त्याला खूप हसू आलें. मग असा प्रश्न कोणी विचारला कीं, "इल्ले, इल्ले" असें तो म्हणे. कांहीं नको असलें तरी 'इल्ले,' कांहीं ठाऊक नसलें तरीपण 'इल्ले' एवढेच त्याला माहीत झाले होते. खूप हिंडूनफिरून घरीं परतण्यापूर्वी ते दोघे कुठल्यातरी रेस्टॉरन्टमध्ये शिरत. श्रीनिवासन् त्या दोघासाठीं 'रंडुकॉफी' मागवे. त्यामुळें 'रंडु' म्हणजे दोन, हा शब्द पण 'इल्ले'च्या जोडीला त्याला माहीत झाला. कुठेही गेले कीं दुकानदार, टॅक्सीवाले, बसकन्डक्टर वगैरे लोक त्या दोघांना 'स्वामी' म्हणत.—बंगालमधे राहून तो 'बाबू' बनला होता, आणि येथें 'स्वामी,' याची त्याला गंमत वाटली.

एका रविवारी स्टेट ट्रॅन्सपोर्ट बस्ने कांचीपुरम्—महाबलीपुरम्ची सहल करण्याचें त्या दोघानी ठरविले. बस सुटण्यास चारपाच मिनिटांचा अवधि असतांना पॅरी कॉर्नरवर ते दोघे टॅक्सीतून उतरले. त्यांच्या राखीव जागेवर बसता बसता सदानंदने पाहिले तर त्यांच्यापुढची पाचसहा बाके अडवून बंगाली मुलामुलींचे टोळकें बसले होते. दोन मुलींच्या किनऱ्या आवाजातील बंगाली वाक्यें कानावर पडल्यामुळें प्रथम त्याचें लक्ष तिकडे वळले. त्या ग्रूपमधील मुली मोठ्या चलाख दिसत होत्या. मुलगे मात्र त्या मानानें मंदच दिसले. मुलांच्या वागण्यात कृत्रिम सौजन्य दिसत होते, तर मुलींच्या वागण्यात कमालीचा खेळकरपणा होता. त्यांचेबरोबर खांद्यावर घडी केलेली शाल, अंगांत पोकळ पंजाबी व पायघोळ धोतर, जास्त वाढवून मानेपर्यंत उलटे फिरवलेले मोठे केस, असे दोघे

मध्यम वयाचे गृहस्थ होते. हळुहळु त्या गृहस्थांशी परिचय झाल्यामुळे हा ग्रूप शांतिनिकेतनच्या विश्वभारतीमधील मुलामुलींचा आहे व ते गृहस्थ त्यांचे अध्यापक आहेत हें त्याला कळलें. वाटेने जातांना मुलमुली मिळून खुल्या आवाजांत एक रवीन्द्रसंगीत गात होते——

"हारे रेरे रेरे, आमाय छेडे देरे देरे—
जेमन छाडा बनेर पाखि, मनेर आनंदे रे—"

अरे, मला सोड, सोड. मनमुराद संचार करणारा जसा मी वनांतला एक पक्षीच—तसाच मला स्वैर सोड.—अशा अर्थाचे उत्साही गीत ते सारे मोठ्या ठेक्यांत म्हणत होते. एक बाक सोडून पलीकडच्या बाकावर त्याचेकडे तोंड करून खिडकीपाशीं एक मुलगी बसलेली होती. हें गाणें म्हणत असतांना स्वच्छंदाचे तेज तिच्या मुखावर विलसत होतें. तिचा देखणा चेहरा आनंदाने उजळला होता. रूपाचे जोडीला आरोग्याची देणगी तिला मिळाली असल्यानें तिचा तरतरीतपणा नजरेंत भरण्यासारखा होता. तो हसरा उत्साही चेहरा त्याला आठवला.—तीच मणि नव्हे काय? पण मग तिच्यात एवढा फरक कसा पडला? कुणी त्या हसतमुख तेजस्वी मुलीचे रूपांतर निराश आणि कष्टी अशा स्त्रींत केले? त्या उल्हसित चेहेऱ्यावर औदासीन्याची छाया कुणी टाकली?

—पण त्यावेळीं तिचे नांव 'झुमी' असे त्याने एकले नव्हते काय? का त्याच्या ऐकण्यात काही चूक झाली होती? पण चूक कशी होईल?——

—महबलीपुरम्‌च्या समुद्रकाठी सूर्यास्ताचे वेळीं दमून ते सगळे बसले होते. दिवसभराच्या एकत्र प्रवासात त्या लोकांची, त्याची व श्रीनिवासन्‌ची बरीच गट्टी जमली होती. त्यांनीं बरोबर आणलेल्या डाळमूठ आणि मिठाईंत सहभागी होण्यांत त्या सर्वांनी या दोघांना भाग पाडले होते. समोर उसळणारा गडद निळा समुद्र, अणि मागे 'शोअरटेंपल' या नावाने प्रसिद्ध असलेले प्राचीन भग्नावस्थेतील मंदीर या वातावरणात सर्वांनाच उत्साहाचे भरतें आले होते. दलातील मुलमुली आळीपाळीने गाणीं म्हणत होती.

"ए झुमी, तू म्हण ना ग गाणं. अहो साधनदा, तुम्ही सांगा ना तिला. आम्ही सगळ्यानी म्हटलं, पण ही बघा ना ऐकतच नाहीं."

विश्वभारतीत अध्यापकांना 'दादा' अशी आपुलकीने हाक मारण्याची पद्धत आहे. पण दादा किंवा दिदी असें पुरे न म्हणता, नावापुढे 'दा' किंवा 'दी' जोडून हाक मारण्याची बंगाली पद्धत सदानंदाला माहीत होती. त्या पद्धतीनुसार आपल्या अध्यापकाला हीं मुलें 'साधनदा' असें म्हणत होती.

साधनदांच्या आग्रहानें ती गाणें म्हणून लागली. गाणें म्हणतांना हळूच त्याच्याकडे पाहिल्यासारखे करून तिने मान फिरविली त्यावेळी तिचा चेहरा किंचित् आरक्त झाला होता. थोड्याच वेळापूर्वी घाईने बसमधून उतरतांना तिचा पदर खिळ्याला अडकला, व ती अडखळली. तो तिचे पाठीशीच होता. तिने खिळ्याकडे हात नेण्यापूर्वीच त्याने तिचा पदर सोडविण्याची खटपट सुरू केली होती. दोघांचा अवचित हस्तस्पर्श झाला, व तिनें चटकन हात मागें घेतला. पदराचे टोक मोकळे होताच "थँक् यू" असें हलक्या आवाजात पुटपुटून ती लगबगीनें तिच्या मैत्रिणींत सामील झाली. ती कोणतें गाणें म्हणाली होती बरें ?—

"आमि पथ भोला एक पथिक एशेछि,
संध्याबेलार चामेली गो— सकालबेलार मल्लिका,
आमाय चेनो की ?—"

—मी वाट चुकलेला वाटसरू येथें आलो आहे !
संध्याकाळी फुलणाऱ्या चमेली, प्रातःकाली उमलणाऱ्या मल्लिके,
तुम्ही कोणी ओळखता का मला ?

त्याला वाटलें अंतर्ज्ञानाने त्याचे वाटसरूसारखें एकाकी जीवन जाणून, जशीकाही त्यालाच उद्देशून ती गात होती. किती गोड होता तिचा आवाज ! त्यानंतर कित्येक दिवस तिचा मधुर स्वर त्याच्या मनात तरळत राहिला होता. तिच्या गाण्यांत ध्वनीत होणाऱ्या अर्थाप्रमाणें तो एक 'पथिक' होता, आणि त्याचा पथ कधीं न संपणारा होता.

पोर्टब्लेअरच्या त्या बंगल्याचे खिडकींत दिसलेला तिचा म्लान चेहरा त्याला आठवला. ही झुमी कीं मणि, त्याला कळेना. कदाचित मणि ही झुमीची बहीण असेल, व त्या दोघींचे चेहऱ्यात विलक्षण साम्य असेल अशी कल्पना त्याचे मनात डोकावली. पण नजरानजर होताच त्याला

पाहून ओळखीचा व आश्चर्याचा स्पष्ट भाव तिच्या डोळ्यात दिसला होता हें कसें ?

——आपल्याला करायचे काय हें नसतें कुतूहल ! आपला काय संबंध तिच्याशीं ? या पुढें उगाच मणीचा विचार करून तिच्या अज्ञात दुःखाचे कारण कल्पनेनें शोधण्याचा चाळा बंद करायचा असें त्यानें ठरविलें, पण त्याचें मन तो हट्ट सोडीत नव्हते.

लवकरच येथील कामाचा राजीनामा देऊन तो पोर्टब्लेअरला जाणार होता. मग कदाचित मणीची भेट होण्याचा व तिच्या दुःखाचें रहस्य समजण्याचा संभव होता. त्यासाठी त्वरित तिकडे जावे अशी ओढ त्याचे मनाला वाटत होती.

७

दक्षिणेश्वरच्या प्रसिद्ध कालिमंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याने न वळता बॅरॅकपुर ट्रंक रोडने उत्तरेस आणखी असेच अर्धा मैल गेले कीं नवीन-बाबुंची 'बागानबाडी' लागत असे. मुख्य रस्त्यावरील मोठ्या गेटमधून आंत गोल वळण घेऊन पोर्चपर्यंत गेलेला रस्ता, पोर्चसमोरील अर्धनग्न स्त्रीचा इटालियन पुतळा व त्यापुढील कारंजाचा मोडका खांब व दुमजली भव्य वाडा याचें बाहेरूनच दर्शन होई त्यावरून या वाड्याने एके काळीं खूप वैभव पाहिले असावे, पण आता मात्र दुर्दैवाने दैन्यावस्था आली असावी असे वाटे. वाड्याभोवती भोठी उंच तटासारखी असलेली भिंत दहा ठिकाणी पडझड झाल्यामुळे वाड्याचे आवारात कोणासही कुठूनही शिरायला उत्तम सोय झाली होती. आवार अफाट मोठे होते व त्यांत आंबे, फणस, लिची, शेवगा, नारळी वगैरे पुष्कळ झाडें होतीं, आणि त्यांच्या वाळलेल्या पालापाचोळ्याने जिकडेतिकडे कचरा जमलेला होता. पोर्चच्या दुतर्फा लावलेली पामची झाडें अजूनही आपला रुबाब कायम ठेऊन होती. पण तुटक्या कारंजाभोवती लावलेली सुरूचीं झाडें मात्र वाळकी आणि कुरतडल्यासारखी दिसत होती.

सदानंदाने प्रथम या वास्तूंत पाय टाकला तेव्हां हें सारें पाहून त्याला उगाचच वाईट वाटलें. वाड्याच्या डाव्या अंगाच्या भागात पटलबाबू

नावाचा एक हडकुळा नि तिरसट चेहऱ्याचा गृहस्थ व त्याचे कुटुंब रहात होते. पटलबाबूचा आठदहा वर्षाचा त्राट्य मुलगा बिरू आवारातल्या पुष्करणीत डुंबत असतांना तळांत साचलेल्या वेलीत पाय अडखळून बुडला होता. आजुबाजूच्या लोकांनी बेशुद्ध अवस्थेतच त्याला बाहेर काढले होते. ज्यूटमिलमधे नोकरी करणारा पटलबाबूचा मेव्हणा घाईनेच डॉक्टर सदानंदाला सायकल-रिक्षा घेऊन बोलवायला आला होता.

बेलघुरियात सदानंदाखेरीज मोहिनीडॉक्टर या नावाने ओळखले जाणारे एक म्हतारेसे डॉक्टर, एक ढाक्क्याची 'श्री वैद्यनाथजी की दवाएँ' विकणारा खेडवळ कविराज व ट्रंक रोडवर स्टेशनजवळील कोपऱ्यावर छोटे दुकान थाटलेला एक होमिओपॅथ, असे इतरही डॉक्टर होते, पण पटलबाबूचे गांवात कोणाशी फारसे पटत नसल्यामळे हा मुंबईकर नवा डॉक्टर त्याला बरा वाटला असावा.

बायकामंडळींचें रडणें, पुरुषांची धावपळ, लहानमुलांचा गलका, या सर्वातून वाट काढीत त्याला पेशंटकडे जावे लागले. या सर्वांना बाजूला हटायला लावून त्यांतीलच एका चलाख तरुण मुलाला त्यानें आपल्या मदतीस निवडलें, व त्याचे सहाय्यानें बिरूला कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्यास सुरवात केली. बऱ्याच वेळाचे प्रयत्नानंतर बिरूने जड निःश्वास टाकला, व किंचित कण्हल्यासारखा आवाज केला. तो शुद्धीवर आल्यावर त्याला योग्य तो औषधोपचार करून, "आता याला थोडी कॉफी पाजा," असे, त्याने सांगितले—'कॉफी,' 'कॉफी,' असे एकदोघे आपापसात पुटपुटलेले त्याने ऐकले. पटलबाबू ओशाळवाणा होऊन म्हणाला, "डॉक्टरबाबू आमच्या या खेडचात कॉफी कुठे मिळणार? आम्ही तर सगळे चहाच पितो." बंगाली लोकात, विशेषतः खेडचापाडचात कॉफी हें पेय प्रचारात नाहीं हें त्याच्या ध्यानात आले. "मग त्याला चहा तरी द्या थोडा," असे म्हणत आपले सामान आवरीत असतांना, एकदोन दिवस बिरूची काय काळजी घ्यावी लागेल ते त्यानें समजाऊन सांगितले, व तो उठला.

"आता माझ्या हाताशी पैसे नाहीत, पण मी सवडीने देईन," असे पटलबाबू अडखळत व लाचारीने म्हणत होता. "असू दे, द्या सावकाश," असे आश्वासन त्याला देऊन सदानंद परतला.

सदानंदाला वाटले, हा पटलबाबू का या वाड्याचा मालक? छे! कितीही दारिद्र्य आले तरी घरंदाजपणाचे तेज लोपत नसते. हा माणूस तर अगदीच अशिक्षित व असंस्कृत वाटतो. कदाचित तो येथील भाडेकरी असेल. मग वाड्याचे मालक कोण? सगळा वाडा तर निर्मनुष्यच दिसत होता.

पटलबाबू या नावाचे त्याला हसू आले. पण त्या गांवात 'घंटाबाबू' 'नेडाबाबू,' 'लिचुबाबू,' वगैरेही कांहीं बाबूलोक होते. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांची नावे मोठी काव्यमय व अर्थपूर्ण अशी ठेवली असतीलच, पण ते मात्र या विक्षिप्त टोपणनावानी ओळखले जात होते. आपल्याकडे जसे मुलांना लहानपणी बंडू, गुंडू वगैरे नावानी हाक मारतात, पुढे मोठेपणी हीच माणसे बंडोपंत, गुंडोपंत या नावानी ओळखली जातात तसाच होता हा प्रकार.

तो प्रथम येथे रहायला आला तेव्हां त्याच्या बैठ्या बंगल्याच्या मागील बाजूस समोर रस्त्यालगत एक छोटे घर होते. ते घर मोहिनीडॉक्टरांचे, असे त्याचा नोकर, शिवपूजन, त्याला म्हणाला तेव्हा या खेड्यात एक लेडी डॉक्टर आहे याची त्याला गंमत वाटली होती. घरासमोर खाकरा थुंकायला आलेला एक वयस्कर, कळकट माणूस त्याचेकडे रोखून पहात होता. "हाच मोहिनीडॉक्टर," असे शिवपूजनने सांगितले तेव्हा त्याला हसू आवरेना. आणि समोरच्या मोहिनीडॉक्टरला ते दिसू नये म्हणून तो आंत वळला.

त्याच्या तेथील वास्तव्यात, मोहिनीमोहन नाव असले कीं मोहिनीबाबू, नलिनीरंजन नाव असले कीं नलिनीबाबू, कालीचरण, राधापद, तारापद वगैरे नांवे असली की कालीबाबू, राधाबाबू, ताराबाबू, असे म्हटले जाई याची त्याला फार मजा वाटे.

हा मोहिनीडॉक्टर पूर्वी या ज्यूटमिलमध्ये मेडिकल ऑफिसर होता. औषधें चोरून काळ्या बाजारात विकून व इतरही मार्गानी खाता येईल तितका पैसा खाऊन त्याने हे लहानसे घर बांधले होते. वरिष्ठांच्या हे नजरेस आल्यामुळे, किंबहुना पैसे खाण्यातल्या त्याच्या भागीदाराने चुगली केल्यामुळे त्याची नोकरी गेली होती. आता त्याचे जागेवर नोकरीला लागलेल्या सदानंदाकडे हा कोण परदेशी उपटसुंभ, अशा अकारण रागाने

तो जळफळत असे. या तरण्या डॉक्टरला माझ्यासारख्या अनुभवाचे ज्ञान असणार थोडेंच ? लोकांना नवीनवी महागडी विलायती औषधें पाजून हा त्यांना मारीलही असे खुशाल त्याचेविरुद्ध तो बडबडत असे. त्या म्हाताऱ्याचा आपल्यावरील हा अकारण कोप कळूनही त्याविषयीं राग येण्याऐवजी त्याला त्याची कीवच आली होती. त्याच्याकडे येणाऱ्या दरिद्री रोग्यांचेवर तो खेकसत असे, ते पण कित्येकदा सदानंदाचे कानावर येई. पैशाचीच तक्रार आणि वांधा असे, आणि त्यावरूनच रागवारागवी होत असे.

—"साल्यांना औषधे हवीत, पण पैसे द्यायचे नाव नको. औषधे फुकटची ठेवली आहेत तुमच्या काकोबांनी," असे तो रागारागाने बोले.

त्यावर त्याचे दीनदुबळे पेशन्ट हातीपायी पडून म्हणत, "डॉक्टरबाबू, दया करा, विश्वास ठेवा, आठ दिवसात सगळे पैसे चुकते करू पण आता चलाच घरीं."

"घरी ?" मोहिनीडॉक्टर गर्जून म्हणे, "आणि माझी व्हिजिट फी कोण देणार, तुझा बाप ? जरूर असेल तर पेशंटला इथे आणून दाखव. मागील पैसे चार दिवसात नाही मिळाले तर बघ."

या साऱ्या घटनांचे मागे कमालीचे दारिद्र्य, अज्ञान आणि माणुसकीचा अभाव होता हे त्याला कळत होते. सगळेच गांजलेले आणि त्रासलेले होते पण त्यातल्यात्यात आपल्यापेक्षा दुसरा जास्त पिडलेला आहे हे बघण्याचे समाधान जसे काही त्यांना हवे होते. सहानुभूति व दया वाटायला आपल्या स्वतःला दुःखाची थोडी तरी आच असावी लागते असे तत्त्वज्ञानी म्हणतात. पण इथे तर हा सिद्धांत धडधडीत खोटा ठरत होता. एक पीडितच दुसऱ्या पीडिताचा अकारण द्वेष करून पाण्यात पहात असे. एकमेकांना सहाय्य करण्याऐवजी दुसऱ्याचे पाय ओढण्याचीच चढाओढ दिसत असे.

त्याचा बिहारी नोकर शिवपूजन आणि दवाखान्यातील त्याचा पूर्व बंगालचा निर्वासित असिस्टंट धीरेन् या दोघांचे असेच होते. दोघेही या गांवात परके होते, दोघांचे काम करण्याचे क्षेत्र वेगवेगळे, दोघांची भाषा, रहाणी, सगळेच भिन्न, फक्त साधर्म्य होते तें अशिक्षितपणात व गरिबीत. शिवपूजन, "बड़ा बदमाष" असा धीरेन्विषयी उल्लेख करून,

तो वरकरणी गोडबोल्या असला तरी आंतून हलकट आहे असे म्हणे. तो चोरूनमारून दवाखान्यातील औषधें विकेल व येथे नव्या आलेल्या सरळ मनाच्या डॉक्टरबाबूवर बालंट आणेल, तरी सदानंदाने त्याचेपासून सावध रहावे असे सुचवी. उलटपक्षी धीरेन् त्याला शिवपूजन 'भीषण पाजी' आहे असें सांगे. तो बाजारांत पैसे खातो, तुमच्या घरातील शिधासामान पळवितो, तो मोठा हताळ आहे तरी त्याचेपासून जपून असा असे सदानंदाला बजावत असे. त्याला मात्र मनातून वाटे या दोघांना 'बडा बदमाष' किंवा 'भीषण पाजी' या विशेषणांपेक्षा अडाणी आणि मूर्ख ही विशेषणें जास्त शोभून दिसतील.

दोनचार आण्यासाठी मालकाला लुबाडणारे नोकर, एरव्ही कामचुकार पण बक्षिशीचे आमिष दाखविलें कीं लाळ घोटणारे हाताखालचे कामगार बगैरे पहिले कीं त्यांच्या या वागण्याचा त्याला मनस्वी राग येत असे. कित्येक ठिकाणच्या नोकरीतील अनुभवांवरून काही शिकले सवरलेले लोकसुद्धां इतकेच बदमाष असतात हें त्याच्या निदर्शनास आलेले होते. त्या लोकांच्या गैर वर्तनास बुद्धिमत्तेची जोड मिळाल्यामुळे त्यांचेपासून समाजाला अधिकच धोका होता. शिवपूजन किंवा धीरेन् यांची उडी चारआठ आणे, फारतर रुपया, दोन रुपये इतकी असे, तर या सुशिक्षित गुंडांची उडी चार आकडयांची असे. वरपासून खालपर्यंत समाजाचे थरांत भिनत असलेली ही लाचलुचपतीची चटक, शिस्तीचा व सद्वर्तनाचा अभाव पाहिला कीं त्याला वाटे, आपला देश विनाशाकडे वेगाने धावत आहे.. जबाबदार राज्यशासक याविषयी पूर्ण उदासीन आहेत. त्यांची बेजबाबदार वृत्ति दूर होईपर्यंत देशाची कष्टदशा संपण्याची आशा नाहीं.

मोहिनीडॉक्टरांच्या कुटुंबातील इतर कोणा व्यक्तीशी परिचय होण्यापूर्वी त्यांचे कुटुंबातील एकच व्यक्ति त्याला माहीत झाली होती—ती म्हणजे त्यांची नऊदहा वर्षांची द्वाड मुलगी टेपी. तिचे खरें नांव काय होते कोण जाणे, पण तें कळून घेण्याची उत्सुकता त्याला नव्हती. आपल्या बापाचा राग या नव्या बाबूवर आहे, तेव्हा त्याला शक्यतों सतावणें हें आपले पवित्र कर्तव्य आहे अशा समजुतीने ती त्याच्याशीं वागे. त्याच्या घरामागील काटेरी तारांचे कुंपणातून बेडकुळचा किंवा गोमा आत सोडणें, बोरें, संत्री, केळी वगैरे खाऊन बियांचा नि सालपटांचा ढीग आंत फेकून

देणें अशा नाना तऱ्हेच्या बालिश खोड्या ती करीत राही. शिवपूजनच्या हें लक्षात आले व तो ओरडला कीं जीभ बाहेर काढून त्याला वेडावून ती पळून जाई. तो सदानंदकडे तक्रार नेई, "तुम्ही काहीच बोलत नाहीं म्हणून शेफारत चालली आहे कारटी. तुम्ही रागवाल म्हणून नाहीतर तिला पकडून तिच्या कानफटात लगावणे कठीण का आहे?" असें तो म्हणे. पण त्या अवखळ मुलीचे नादीं आपण काय लागायचे असे त्याला वाटे आणि तो तिच्या खोड्यांकडे दुर्लक्ष करी.

टेपी दिवसभर गांवात खोडकरपणा करीत भटकत असे. तिच्या वाढत्या वयाला हा दांडगेपणा आता शोभत नाहीं असें तिच्या आईस वाटे, आणि ती उनाड पोर जास्त वेळ नजरेआड झाली कीं तिची आई, 'ओ पोडामुखी,' 'ओ प्याचामुखी,'—(ए जळतोंडे, ए घुबडतोंडे)— अशा अनेक विशेषणानी तिचा उद्धार करून तिला पाचारण करीत असे. पण या शेलक्या नावांची टेपीला खंत नसे. तिचा उनाडपणा चालूच राही. मोहिनीडॉक्टरची बायको मोठी जहांबाज व भांडकुदळ बाई होती. पुष्करणीवर भांडी घासायला नि धुणे धुवायला जमलेल्या शेजारणींशी तिचें तोंड चालू असलेले कितीदा तरी ऐकू येई. पण टेपी आईच्या सवाई होती. अशा कजाग बाईला दाद न देणारी लेक म्हणजे खमंगच असली पाहिजे!

८

बिरू जिवावरच्या संकटातून वाचला म्हणून पटलबाबूने सत्यनारायण केला. रात्रीं सदानंदाला प्रसादाचे बोलावणे होते. त्या दिवशी तो कलकत्त्याला काही कामानिमित्त गेला होता. परतायला रात्र झाली. पटलबाबू वाट पाहील तेव्हां परस्पर तिकडे जाऊनच घरी जावे असा विचार करून तो त्या बागानबाडीचे रस्त्याने चालू लागला. पौर्णिमेची रात्र होती. ट्रंक रोडवरची रहदारी जरा कमी झाली होती, तरी पण मधूनच एखादी ट्रक जोराने पोंगा वाजवीत वेगाने जात होती, व त्या वेगापुढे हार खाऊन रस्त्यावरून मंद गतीने चालणारी एखादी सायकल-रिक्षा

कडेच्या कच्च्या वाटेकडे सरकत होती. चहापानाची आणि पानवाल्यांची दुकाने वगळली तर बहुतेक सर्व दुकाने बंद झालेली होती.

त्या भव्य वाड्याचे आवारात मोठीच गडबड दिसली. दक्षिणेकडच्या प्रशस्त व्हरांड्यात गॅसबत्त्या टांगून व लाकडी चौक्या एकाला एक जोडून स्टेजसारखे केले होते, आणि त्यावर राधाकृष्ण, गोपी, गवळी वगैरे सोंगे भडक रंग तोंडाला फासून गात व नाचून हावभाव करीत होते. मृदुंग ढोल, झांजा वगैरेच्या नादातच कर्कश पेटीचा सूर मिसळला होता, व बघायला जमलेल्या लोकांच्या प्रशंसात्मक उद्‌गारांची पण त्यात भर पडली होती. "सत्यनारायणानिमित्त आज गावातल्या प्रसिद्ध जात्रा-दलचा कार्यक्रम ठेविला आहे" असे पटलबाबू म्हणाला. आपल्याकडे खेड्यापाड्यात लळिताची सोंगे नाचवितात तसाच काहीसा हा प्रकार होता. पटलबाबूनें पुढे केलेल्या खुर्चीवर बसताबसता तो म्हणाला, "मला फार वेळ नाही, लवकर प्रसाद दिलात तर बरें होईल."

"जरा बसा हं, आणतोच आता," असे म्हणत पटलबाबू लगबगीने आत गेला.

तोंडभर निळा रंग फासलेला व लाल रंगाचे सिल्कचे धोतर नेसलेला, गळ्यात झेंडूची माळ, डोक्यावरील फुलांच्या मुकुटात मोराचे पीस खोचलेलें असा हडकुळा व काळाकुट्ट कृष्ण; पोरसवदा मुलांना रेशमी रंगीबेरंगी साड्या नेसवलेल्या, खूप पावडर फासून पांढऱ्याफट्ट केलेल्या तोंडावर कुंकुमतिलक आणि गंधाच्या ठिबक्यांची नकशी काढलेली, गळ्यात मण्यांच्या व फुलांच्या माळा, हातात व डोक्यात फुलांचे गजरे माळलेले अशा वेषातील राधा व इतर गोपी यांचा प्रेमसंवाद चालू होता. कृष्ण खोडकरपणाचा अभिनय करीत होता आणि रूसलेल्या राधेची गोपगोपी थट्टा करीत होते. कृष्ण म्हणजे भवसागर पार करणारा एक नावाडी असे कल्पून गोपी गात होत्या—

"कनाई ओ—ओ कनाई, पार करे दे आमारे—"

कृष्णकन्हैया, आम्हाला पैलतीरी ने, असे गोपीनी विनवल्यावर कृष्ण खट्याळपणाने म्हणत होता—

"सर्व गोपी पार कराइबो, नेबो एक एक आना,
श्रीराधिकारे पार कराइबो, नेबो कानेर सोना,"

—सर्व गोपींना पैलतीरी पोहोचवायचे एकेक आणा भाडे घेईन, पण राधिकेला मात्र कानातील सुवर्णकुंडले द्यावी लागतील!—असे म्हणताना कृष्णाने केलेला ढंगदार अभिनय, राधेने मारलेला मुरका, मृदुंगाची जोरदार थाप, व लोकांनी खुषीने केलेली वाहवा, हें सारें पाहून त्याला हसू आले.

खापराच्या थाळीत कसलीतरी मिठाई व प्रसादाची वाटी घेऊन पटलबाबू बाहेर आला. "इतर कांहीं नको, फक्त प्रसाद तेवढा द्या," असे तो म्हणाला. बंगाली लोक कच्च्या आटचातच तूप, दूध, केळे मिसळून प्रसाद करतात हे त्याला माहीत नव्हते. काशाच्या वाटीत त्याने पुढे केलेला प्रसाद चाखल्यावर मात्र हे खाणे आपल्याला कसे जमणार असे त्याला वाटले. "पटलबाबू, आज माझं पोट बिघडल आहे, इतकेंच पुरे" असे म्हणत त्याने वाटी दूर सारली. सत्यनारायणाचा प्रसाद अव्हेर करणे हे मोठे पाप आहे व ते केले असता संकटपरंपरा मागे लागते वगैरे कथेतील भाग आठवून तो मनाशीच हासला. देव खरोखरच असेल तर त्याचा प्रसाद पोटात न ढकलण्याचा हा अपराध तो बहुतेक पोटांत घालील असे त्याला वाटले.

घरी परत येताना बंगाली लोकांच्या गुणदोषांबद्दल तो मनाशीच विचार करीत होता. आळशीपणा, कामचुकारपणा आणि तोंडपाटीलकी या दुर्गुणांचे जोडीला काव्य, नाटच, गायनवादन वगैरे ललितकलांची उपजत आवड आणि रसिकता हे गुण येथील पुष्कळांच्यात आढळत. त्याला वाटे ही माणसे भलतीच भावनावश व मनाचा समतोलपणा नसलेली अशी आहेत. भावनेचे भरात मागचा पुढचा विचार न करता वहात जाण्याची विचित्र खोड असल्यामुळे हरताळ, दंगेधोपे यांचे प्रमाण येथे जास्त आहे. प्रसिद्ध बंगाली लेखकांच्या कथाकादंबऱ्यातूनसुद्धा सुष्ठ माणसे जगावेगळीच सोशिक, प्रेमळ, दुसऱ्यासाठी वाटेल तितके आत्म-समर्पण करणारी—तर दुष्ट माणसे टोकाची हलकट, कुठलेही दुष्कृत्य करण्यास न कचरणारी अशी भडकपणाने रंगवलेली असतात. चांगल्या-च्या किंवा वाईटाच्या टोकाला भावनेचे वेगात जाण्याची असमतोल खोड त्या लोकात दिसत असे. कदाचित यामुळेच नाटकातील पात्रांचे स्वभावाशीसुद्धा चटकन समरस होण्याची कला उपजत या लोकात

असावी. हेच यांच्या अभिनयकलेच्या यशाचे मूळकारण असावे असे त्याला वाटले.

त्याला एकदम सुशान्तची आठवण झाली. त्याच्याच ज्यूटमिलमधे काम करणारा, पंचविशीतला, नावाप्रमाणेच शान्त व सुविचारी असलेला सुशान्त गेल्या काही दिवसात त्याच्या विशेष परिचयाचा झाला होता. ज्यूटमिलमधील कामगारांच्या सांस्कृतिक मंडळाने 'कृष्णचुडा' नावाचे नाटक बसविले होते. त्यांत सुशान्तने नायकाची भूमिका केली होती. सर्व ऑफिसरांप्रमाणे डॉ. सदानंदला नाटकाचे आमंत्रण होते. आपल्याला ही भाषा कामचलाऊ येते त्यामुळे नाटक आपल्याला विशेष समजणार नाही तेव्हा जाऊच नये असा विचार तो करीत होता.

एक दिवस दवाखान्याचे काम संपवून तो घराकडे निघाला असतांना, "डॉक्टरबाबू," अशी हाक मारीत सुशान्त त्याचेजवळ सायकलवरून उतरला. "नाटकाचे आमंत्रण पोहोचले ना? तुम्ही जरूर यायला हवे," असे त्याने म्हणताच सदानंदाने भाषेची अडचण पुढे केली.

त्या दिवशी संध्याकाळी त्याचे घरी येऊन सुशान्तने नाटकाचे कथानक त्याला नीट समजावून दिले. नाटक उत्तमच वठले होते. सतत आठदहा तास यंत्रावर चोपून काम करणाऱ्या, नाहीतर कारखान्याच्या ऑफिसात खर्डेघाशी करणाऱ्या या दुबळ्या तरुणांच्यात इतका कलागुण असावा याचे त्याला नवल वाटले. त्याबद्दल सुशान्तची आणि त्याच्या जोडीदारांची त्याने मनापासून प्रशंसा केली होती. त्या प्रसंगापासून तो मिल्‌मधील तरुण मंडळींचा आवडता झाला होता. विशेषतः तेव्हापासून त्याची व सुशान्तची विशेष दाट ओळख झाली होती. सुशान्त रोज वेळ काढून कधी सकाळी तर कधी सायंकाळी स्वतःची शिफ्टडच्युटी संभाळून त्याचेकडे येऊन मोठ्या हौसेने त्याला बंगाली भाषा शिकवू लागला होता.

बंगाली भाषा समजायला सोपी असल्यामुळे आणि त्या भाषेत लिंगाप्रमाणे क्रियापद बदलण्याची भानगड नसल्यामुळे सदानंदाची प्रगति झपाट्याने झाली. मराठी भाषेत, तो पलंग, ती खुर्ची, ते कपाट, असले निरर्थक लिंगभेदसुद्धा लक्षात ठेवावे लागत असल्यामुळे परक्या माणसाला ही भाषा शिकणे व बोलणे अवघड वाटते. मात्र बंगाली भाषेतील अनेक क्रियांच्या निदर्शनासाठी एकच क्रियापद वापरण्याची पद्धत त्याला

चमत्कारिक वाटे. खाणे, पिणे, इतकेच काय, पण-विडी-सिगारेट वगैरे ओढणें या सर्व क्रियांसाठी एकच क्रियापद वापरले जाते.—चहा घेणार का? भात खाणार का? सिगारेट ओढणार का?—सगळ्यांना एकच क्रियापद, खावेन! चा खावेन, भात खावेन, सिग्रेट खावेन—तो विनोदानें सुशान्तला म्हणे, "सगळेच खावेन, मग पिवेन नाही का काही?" या त्याच्या विनोदावर सुशान्तही मनापासून हसे. तसेच वस्त्र नेसणे, दागिने घालणे, काजळ-कुंकू-पावडर वगैरे लावणे या सगळ्याला एकच क्रियापद—परवे!—त्याला वाटे, एरव्ही शब्दसंपत्तीने समृद्ध असलेल्या ह्या भाषेने अश्या कांही क्रियापदांचे बाबतीतच असा चिक्कूपणा का करावा?

या निमित्ताने रोजच सुशान्तशी गप्पागोष्टी होत असत, आणि त्यांतूनच ओघाने त्याच्या घरची हकीकत सदानंदाला कळून त्याचे मनात सुशान्तविषयी जिव्हाळा उत्पन्न झाला होता.

ज्यूटमिलपासून गावात बरेच आत गांगुलीपाडा नावाच्या भागात सुशान्तचे वडिलोपार्जित छोटेसे घर होते. घराभोवती लहानसेच आवार व मागे एक छोटी पुष्करणी पण होती. त्याचे वडील कलकत्ता कॉर्पोरेशनमधे कारकून होते. आता ते फार थकले होते, पण नाइलाजाने इतक्या लांब लोकल गाडीच्या धक्काबुक्कीतून त्याना कामाला जावे लागे. आणखी वर्षाभराने त्यांना पेन्शन घ्यावे लागणार होते. मग मात्र कुटुंबाचा भरणपोषणाचा भार त्याचेच शिरावर पडणार होता, कारण मुलगा तो एकटाच होता. त्याच्यापेक्षा वडील दोन बहिणी लग्ने होऊन सासरी नांदत होत्या. पण त्याच्या पाठच्या आणखी चार बहिणी होत्या. त्याची आई दमेकरी होती व अलीकडे तिचीही प्रकृति झपाट्याने ढासळू लागली होती. मोठ्या दोन मुलींना उजवताना त्याचे वडील कर्जबाजारी झाले होते, त्यामुळे त्याची पाठची बहीण आता बावीस-तेवीस वर्षांची झाली तरी तिच्या लग्नाचे पैशाअभावी कुठे जुळत नव्हते. आणखी लहान तीन बहिणी पण झपाट्याने वाढत होत्या. या सगळ्यांचा भार उचलण्याची जबाबदारी शिरावर असूनही तो कितीतरी उमेदीने व हसूनखेळून वागे. तो बहुगुणी होता. सतार वाजविण्याचा त्याला नाद होता. तबल्यात तर त्याचा हात धरणारा त्या खेड्यात कोणी नव्हता.

त्याच्या आवाजाला गोडवा व धार होती. गंभीर पण मधुर आवाजात तो भक्तिपूर्ण श्यामासंगीत किंवा रवींद्रसंगीत गाई तेव्हा त्या गाण्याचा अर्थ नीटसा न कळला तरी ते स्वर ऐकतच रहावे असे वाटे. परिस्थिति अनुकूल नसल्यामुळे इतके गूण असूनही हा मुलगा असा या खेडचांतील कानाकोपऱ्यात पडून रहावा याचे सदानंदाला दुःख होई.

सुशान्तची पाठची बहीण, सुतपा, नावाप्रमाणेच एक तपस्विनी होती. सुशान्तला तिच्याविषयी कमालीचा आदर होता. ती त्याचेपेक्षा दोन वर्षानी लहान असूनही तिचा उल्लेख तो एखाद्या पूजनीय वडील माणसासारखा करी. सदानंदाने प्रत्यक्ष तिला पाहिल्यावर, आदराने नतमस्तक व्हावे अशी ही त्यागमूर्ति देवता आहे असेच त्याचे मत झाले.

सुशान्तच्या आईच्या दम्याचा जोर वाढून एक दिवस ती फारच कासावीस झाली म्हणून तो तिला तपासण्यासाठी त्यांचे घरी गेला होता. ज्यूटमिलची वैद्यकीय मदत सुशान्तला फुकट असली तरी त्याच्या घरच्या लोकांना ती सवलत नव्हती. सदानंदसारख्या उच्चशिक्षित डॉक्टरला दोनचार रुपयांची तोकडी फी हातावर टिकवून आपण कसे घरी आणावे असा संकोच वाटून तो कधी आपण होऊन त्याबद्दल बोलला नव्हता. इतर सगळचांच्या कामापुरते पुढे पुढे करण्याच्या वृत्तीपुढे सुशान्तचा हा संकोचीपणा त्याला फारच आकर्षक वाटला होता, व त्याला होईल तितकी मदत करायची असे त्याने ठरविले होते.

अरुंद वेडीवाकडी वळणे घेत गेलेली कच्ची वाट, दुतर्फा उघडी गटारे, त्यातच विधि करायला बसलेली उघडीनागडी पोरें, रोडकी मुले कडेवर घेऊन मळकट फाटक्या वस्त्रांनी लज्जा रक्षण केलेल्या बाया, लूत लागलेलीं कुत्रीं, मरतुकडचा गाई, उगीचच बें बें करून ओरडणारी छोटी कोंकरें, असे सगळे मागे टाकीत तो सुशान्तचे घरात शिरला. बाहेरचा मोडका दरवाजा लोटून अंगणातील ठिकठिकाणी खपले निघालेल्या सिमेंटच्या पायवाटेने तो मुख्य घराचे भागाकडे वळला. अंगणात एक रोडकी गाय व दोन बकरी दोरीने खुंटाला बांधलेली होती. परसात भोंपळा घोसाळी काकडचा वगैरेचे वेल, तसेच एक आंब्याचे व दोन नारळाची झाडे होती. दोन पायऱ्या चढून गेले की लागणाऱ्या कट्ट्याला लागूनच ओळीने तीन खोल्या होत्या. त्याचे खालचे अंगाला अंगणातच एक

झोपडीवजा स्वतंत्र खोली होती. त्यातून येणाऱ्या धुरावरून तें स्वयं-पाकघर असावें असे वाटत होते. पुढच्या खोलीच्या दारातून "आशून, आशून" असे म्हणत एक थकेल गृहस्थ बाहेर आले. नाकावर ठेवलेला त्यांचा तुटक्या काडीचा चष्मा वरचेवर खाली घसरत होता व त्यामुळे ते चष्म्याचे वरूनच इकडेतिकडे बघत होते. "हे माझे बाबा," अशी त्यांची ओळख सुशान्तने करून दिली.

त्यांचे नाव विश्वेश्वर घोष असे होते, पण गावात सगळे त्याना बिशुबाबू म्हणत. बिशुबाबूंचे अठराविश्वे दारिद्र्य घरातील कानाकोपऱ्यातून डोकावत होते. दोन हाततुटक्या वेत फाटलेल्या खुर्च्या, एक भला मोठा जुनाट छप्परपलंग व एक दार तुटलेले कपाट येवढेच सामान बाहेरच्या खोलीत होते. फाटलेला वेत झाकण्यासाठी त्यावर जुन्या सतरंजीचे तुकडे घडी करून टाकलेले होते. पलंगावरची मच्छरदाणी जुनी आणि फाटकी असली तरी स्वच्छ होती. पलंगावरच्या जाड गादीवर घरीच धुतलेला, पण साफसफाईने अंथरलेला जुना पलंगपोस होता. मध्यावर अंथरलेली छोटी सतरंजी विटक्या रंगाची होती. हे सारे बघत असताना त्याला वाटलें, गरिबी खरी, पण त्यातल्यात्यात हें दैन्य झाकण्यासाठी कुणाचा तरी कष्टाळू हात या सगळ्यावरून फिरला आहे.

पेशंटला तपासण्यासाठी त्याला आत नेण्यापूर्वी, एक छोटी मुलगी बाहेर आली. एका हातातून चहाची विजोड कपबशी व दुसऱ्या हातातल्या बशीत एक शिंगाडा व दोन रसगुल्ले आणून त्या बशा तिने सुशान्तच्या हातात दिल्या. "दिदीनं दिलं आहे" असे सदानंदकडे पहात ती म्हणाली. आतल्या खोलीचे दाराआड एक तरुण मुलगी उभी होती. हीच बहुतेक सुतपा असावी असे त्याला वाटले.

तिला बघून, "एखाने एशो मा," असे म्हणून सुशान्तच्या वडिलानी तिला हाक मारली. आपल्या घरी आलेले डॉक्टरबाबू फार सज्जन व सभ्य आहेत तेव्हा निःसंकोचपणे त्यांच्याशी आपल्या तरुण मुलीची ओळख करून द्यायला कसली हरकत असेच बहुतेक त्याना वाटले असावे. पुढे वाकून त्याच्या पायाला हात लावून प्रणाम करायला ती वाकली तेव्हां, "असू दे, असू दे" असे पुटपुटत त्याने संकोचाने पाय मागे घेतले. तिने इतक्या नम्रतेने आपल्याला नमस्कार करावा हे त्याला कसेसेच

वाटले. वयाने लहान असली म्हणून काय झाले, पण तिची योग्यता मोठी होती. तिचे पाठीवर मोकळे सोडलेले लांबसडक काळेभोर केस, किंचित उभट पण शांत व विचारी चेहरा, साधीच सुती साडी, हे सारे पहाताना त्याला वाटले हिच्या अलंकारविहीन व साध्या वेषातही कित्येक नटव्या आधुनिक तरुणींपेक्षा ही चांगली दिसत आहे. तिच्या मुखावर असा काही गंभीर भाव होता की सामान्यपणे तिच्या नाकडोळ्यांचे आणि तिच्या तरुण शरीराचे निरीक्षण करायला मनाची इच्छाच होऊ नये. युवतींचे अल्लड लाजणे, मुरडणे याचा मागमूसही तिच्यात नव्हता. तिच्या वागण्यात इतकी मर्यादा होती की वाजवीपेक्षा अधिक उणे कोण बोलू धजणार ?

पुढे जास्त परिचय वाढल्यानंतर त्याचे आणखी कांहीं वेळा त्यांच्या घरी जाणें झालें तेव्हा त्याच्यातील चिकित्सक डॉक्टर जागा होऊन, वयाचे मानानी सुतपाची वाढ थोडी खुरटलेली आहे व ती फिकट आणि अशक्त दिसते असे त्याला वाटले. त्याने आपले हे मत सुशान्तला बोलूनही दाखविले. घरातल्या सगळ्यांचे करताकरता त्या बिचारीला स्वतःकडे पहाण्यास सवडच नव्हती. आई दमेकरी व वडील थकलले. त्यांच्या व भावाच्या तुटपुंज्या पगारातून कर्जाची थोडीफार फेड करून उरलेल्या पैशातून घरखर्च भागविणे, लहान बहिणीना संभाळणे, स्वयंपाक करणे, लांबच्या विहिरीवरून प्यायचे पाणी आणणे, गाईची धार काढणे, भाजी-पाल्याच्या रोपांना जपणे, दारामागच्या पुष्करणीतून मासळी पकडून आणणे—पहाटेपासून रात्रीपर्यंत सुतपाच्या दोन हातांना विश्रांति नसे. खेडचात, वाढलेल्या वयाची अविवाहित मुलगी म्हणून कुणी कुत्सितपणे तर कुणी चटोरपणे पाहील यासाठी कामाव्यतिरिक्त ती बाहेर कुठे जात नसे. हे सारे कष्ट व मनस्ताप, शंकराने हलाहल पचविले इतक्या सहजपणे पचवून पुनः त्याबद्दल अक्षरानेही कुरकुर न करता गुपचुप सगळ्यांसाठी कष्ट उपसणारी सुतपा म्हणजे साक्षात देवताच होती. बिशुबाबू तर तिला नेहमीं 'मा' अशी आदरपूर्वक हाक मारीत.

स्त्रीला मान देण्याची पद्धत देवीपूजेची उपासना करणाऱ्या बंगाली लोकात जागोजागी दिसून येई. गुडघ्याएवढचा लहान पोरींना सुद्धा वडीलधारी माणसे कौतुकाने "मा लख्खी," "छोटो मा" असे म्हणत.

सुनेलासुद्धा 'वहु मा' असे म्हणत.—काकीला काकिमा, मावशीला माशीमा, आत्याला पिशिमा—सगळ्याच मा जननी! कलकत्त्याला बसट्रॅममधे जवळजवळ अर्धी जागा 'महिलादेर जन्य' (खास स्त्रियासाठीं) राखून ठेवलेली असे. बसमधून ताटकळत उभे राहून प्रवास करताना त्याला या महिलांचा फार हेवा वाटे. स्टॉपवर स्त्रिया उतरणार असल्या की कन्डक्टर ड्रायव्हरला ओरडून सांगे, "आस्ते भाई, बाईमाणूस उतरत आहे." त्याला या स्त्रीदाक्षिण्याची गंमत वाटे. मुंबईला हा प्रकार कधीच दिसत नसे. तुम्हाला समान हक्क हवेत ना, मग पुरुषासारखेच कष्ट करा, आणि रहा धक्के खात उभ्या, असा महाराष्ट्रातील पुरुषवर्ग पुरोगामी स्त्रीवर्गाला म्हणत आहे असे वाटे. पण येथे मात्र ह्या सुधारणेचे वारे अजून आलेले नव्हते. मेडिकलसारखे काही कोर्स वगळले तर मुलामुलींचे सहशिक्षण असलेल्या शाळा किंवा कॉलेज अजूनही कलकत्त्याला नाहीत.

खेड्यापाड्यात खालच्या जातीतील मुलींची लग्ने, वरपक्षाकडूनच मुलीचे पैसे घेऊन होत असल्यामुळे त्या थरातील मुलींच्या लग्नाची पंचाईत नव्हती. पण आपल्याकडील पांढरपेशा जातीचा 'बाबू' किंवा 'भद्रलोक' यांचा जो थर होता त्यात मात्र मुलाचे आईबाप त्याचे लग्न म्हणजे पैसे कमावण्याची संधि समजून मुलीच्या बापाला अक्षरशः पिळत असत. दहाबारा तोळे तरी सोनें, काशापितळेची भांडी, उंची वस्त्रे व निदान पलंग व कपाट एवढे तरी फर्निचर आणि गाद्यागिरद्या इतके कमीतकमी देण्याची ऐपत असल्याशिवाय मुलीला उजवणे महाकठिण असे. मुलीचे लग्नात वरपक्षाकडून रंजीस आलेला गृहस्थ स्वतः मुलाचा बाप बनला की वधूपक्षावर सूड उगवण्याच्या आसुरी आनंदाने सरसावत असे. अशा या वातावरणात सुतपासारखी गुणी मुलगी लग्नावाचून राहिली तर नवल काय?—त्यातूनही काही धिटुकल्या मुली वडील मंडळींच्या हातावर तुरी देऊन आपापला मार्ग शोधीत. गावभर अशा प्रेमविवाहावर टीका होई. सासूसासरे काहीच लग्गा हाती लागला नाही म्हणून सुनेशी धुसफुसत. मग हळुहळु काळाचे ओघात सगळे ठीक होऊन जाई. पण तो धीटपणा सुतपामधे नव्हता. शिवाय, आपण खरोखरच लग्न करून

गेलो तर या घराचे कसे होईल या काळजीमुळे खऱ्या अर्थाने ती या घराची 'मा' बनली होती.

वास्तविक या वयात मुलींना उपजतच नटण्याची आवड असते. पण सुतपा याला पूर्ण अपवाद होती. फार कामात असली तर, आपला विपुल केशसंभार डाव्या हातात पकडून त्याची घट्टशी गाठ बुचडाप्रमाणे ती बांधीत असे. नाहीतर इतर वेळी तिचे केस मोकळे पाठीवर रुळत असत. हौसेने तऱ्हेतऱ्हेच्या केशरचना कराव्या अशी केसांची देणगी मिळूनही तिला त्याची क्षिती नव्हती. त्यामुळे ती पाठीवर केशभार मोकळा सोडलेल्या देवीमूर्तीसारखी वाटे.

खेडचात किंवा कलकत्त्यात पुष्कळ गृहिणींच्या पदराला भलामोठा किल्लयांचा जुडगा बांधलेला त्याने पाहिला होता. बंगाली स्त्रिया उजवीकडूनच पदर घेत, पण तो पुनः उजव्या हाताखालून पुढे आणून परत डाव्या खांद्यावरून पाठीमागे सोडीत. आणि याच पदराचे टोकाला चाव्यांचा जुडगा अडकवलेला असे. सुतपाच्या पदराला पण तसाच जुडगा त्याने पाहिला होता. इतक्या गरिबीत, घरात फारसे सामानसुमान नसताना एवढचा चाव्या कशाकरता बाळगल्या आहेत याचे नवल वाटून त्याने कुतूहलाने त्याबद्दल सुशान्तला विचारले तेव्हा तो मनापासून हसला. चाव्यांचे वजनामुळे खांद्यावर पदर नीट रहातो. तो वरचेवर ढळू नये यासाठी लावण्याचा खोटचाच पितळी चाव्यांचा जुडगा बाजारात विकत मिळतो, हें ऐकून मग सदानंदालाही खूप हसू आले.

एरव्ही जीर्ण वस्त्राने कसेबसे शरीर झाकणाऱ्या बाया सणावारी, पूजा वगैरे उत्सवप्रसंगी, किंवा लग्नमुंजीत ठेवणीतील वस्त्रे, भरगच्च सुवर्णालंकार (खरे नसले तर गिलिटाचे सुद्धा), ऐटीची केशरचना, आळत्याच्या लाल रंगाने रेखलेली पावलें, अशा थाटात बाहेर पडताना आढळत. खेडचात पतिपत्नींनी एकत्र बाहेर पडण्याची पद्धत औरच असे. धोतराचा सोगा डाव्या हातात किंवा पंजाबीच्या डावीकडील खिशात अडकवून, चकचकीत पॉलिशच्या पंपशूचा करकर आवाज करीत नि पान चघळीत पतीने ऐटीत पुढे चालायचे, आणि पत्नीने घुंगट घेऊन आपल्या पाया-खालच्या वाटेकडे बघत पतीचे मागून चारपाच हातांचे अंतर ठेऊन मंदगतीने जायचे. त्याला वाटे या बाईला मागच्यामागे कोणी पळविले

तरी त्याची दाद या नवरोजीला लागणार नाही. परपुरुषाला लाजण्याची पण जगावेगळी तऱ्हा खेड्यांतून दिसे. कोणी अनोळखी माणूस आला, आणि त्याने काही विचारपूस केली तर त्याची काहीच दाद न घेता या बाया घरात पसार होत. मग त्या माणसाला कांहीं चौकशी करायची असली किंवा निरोप सांगायचा असला तर रस्त्यातील अनोळखी लहान मुलांची मदत घ्यावी लागे. परंतु याच लाजवती गंगेवर स्नान करून, धुण्याचे पिळे हातांवर टाकून ओलेत्याने आपल्या घराकडे परतत तेव्हां सगळ्या गांवाने त्यांचे अर्धनग्न शरीर खुशाल डोळे भरून पाहिले तरी त्यांना त्याची दखल नसे. आपण मान वर करून कोणाकडे न पाहता रस्त्याने गेलो तर लोकही आपल्याला पहात नसतील अशी त्यांची कल्पना असल्यास न कळे !

९

नवीनबाबूच्या बागानबाडीतील ग्रंथालयाच्या दालनासमोरील व्हरांड्यात आरामखुर्चीवर रेलून नवेनवे ग्रंथ वाचण्याची गोडी त्याला लागली ती पण एका विचित्र घटनेमुळेच.

—ज्यूटमिलमधे मेडिकल ऑफिसरला फारसे काम नसे. मिलमधे बरेच कामगार नोकरीवर होते. त्यांचेसाठी वेल्फेअर सेंटर, फ्री मेडिकल एड, वगैरे सर्व कांहीं देखावा होता, आणि मालकाचा पैसा त्याप्रीत्यर्थ पुष्कळच खरचला जात होता. खुद्द मजुरांना त्याचा फायदा कितपत मिळतो याची कोणीच दखल घेत नसे. मिलचे हेडऑफिस कलकत्त्यास होते. चीफ इंजिनीअर, वर्क्स मॅनेजर, लेबर ऑफिसर, असे कांहीं अधिकारी वगळले तर बाकीचे सगळे ऑफिसर कलकत्त्याला बालीगंज, न्यू अलिपूर वगैरे भागात मोठ्या फ्लॅटमधून रहात होते. अलिपूरच्या बरद्वान रोडवर मिलच्या मारवाडी मालकाचा मोठा अलीशान बंगला होता. हेडऑफिसमधे डॉ. सुकुमार सेन नावाचे एक डॉक्टर मेडिकल ऑफिसर म्हणून होते. ते कलकत्त्यांतील ऑफिसरांसाठी होते, व सदानंदाची नेमणूक मिलमधे राहणाऱ्या कामगारांसाठी होती.

मिलचे आवाराला लागून असलेली कामगार व ऑफिसर लोकांची जी कॉलनी होती तेथेच एक स्वतंत्र बैठा बंगला त्याला रहायला मिळाला होता. मिलच्या आवारातच एका इमारतीत त्याचे ऑफिस व कामगारांसाठी दवाखाना होता. सकाळी आठ ते बारा या वेळात रुग्ण कामगार व त्यांची बायकामुले यांना तपासून तो औषधपाणी लिहून देई. दवाखान्याचा कंपौंडर फणीबाबू, व हाताखालचा नोकर धीरेन् या रोग्यांशी अरेरावीने वागत. कामगारांच्या बायकांसाठी त्याचे हाताखाली आरती नांवाची तरुण विधवा नर्स होती. तिला सगळे 'आरतीदी' म्हणत. आरती हा एक मनुष्यस्वभावाचा औरच नमुना होता. वैधव्य आल्यावर आपल्या दोन मुलांना घेऊन ती भावाचे आश्रयाला आली होती. तिचा भाऊ कलकत्त्याच्या पैकपाडा या भागात रहात होता, व तो आर. जी. कर मेडिकल कॉलेजचे ऑफिसात कारकून होता. त्याचे वशिल्याने तिने तेथे नर्सिंगचा कोर्स पुरा केला होता. येथे दवाखान्याजवळच दोन खोल्यांची लहान जागा तिला रहायला देण्यात आली होती. तेथेच तिची म्हातारी आई व मुले रहात. केवळ पैसा मिळतो म्हणून काम करायचे, नाहीतर तिचे लक्ष सदा घराकडेच असे. कामाची करता येईल तितकी टाळाटाळ, मऊ दिसेल त्या माणसाशी अरेरावीने आणि तुसडेपणाने वागणे, वरिष्ठांच्या मागे त्यांचे हुकूम खुशाल धाब्यावर बसविणे हे तिचे दुर्गण सर्वांना माहीत होते. फणीबाबूकडे कोणी आरतीचे विरुद्ध तक्रार केली की, "फुकटात डॉक्टरी मदत मिळत आहे ते नाही, म्हणतात ना भिकाराल्या ओकारी तशातली गत," असे म्हणून त्याना तो धुडकावीत असे. या कंपौंडरबाबूचे व तिचे सूत आहे असे धीरेन् म्हणे.

अंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते, अशा या वातावरणात आपल्याला हात मारून घेता येईल तितका घ्यावा असेच त्या दोघांचे धोरण असे. पण सदानंदाचा तसा स्वार्थी हेतु असण्याचे कांहींच कारण नव्हते. एकतर तो संसारी नसल्यामुळे जास्त संपत्तीची त्याला गरज व हाव नव्हती. आणि एकटेपणामुळे काम करणे हाच त्याच्या मनाचा विरंगुळा होता. त्यामुळे तो आपल्या कामात मन ओतीत असे. इतक्या सचोटीने वागणारा—विशेषतः रुग्णांकडे जिव्हाळ्याने व आस्थेने पाहणारा हा

नवा डॉक्टरबाबू कामगारवर्गात लोकप्रिय झाला असला तरी आरती व फणीबाबू यांना मात्र कुठून ही पीडा येथे आली असे झाले होते. त्याच्या आधीचे डॉक्टर ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या वेळातच तपासणी करायचा फार्स उरकून दवाखान्यातून पसार होत. मग त्या दोघांचेच तेथे राज्य असे. हा नवा डॉक्टर मात्र दवाखाना उघडण्यापासून बंद होईपर्यंत आपल्या जागेवरून हालत नसे. फार पेशंट नसतील तेव्हाही तेथेच बसून, कलकत्त्याच्या ऑफिसमधून मागवलेली औषधें आली की नाही, ती कुठे आहेत, ती नीट ठेवली की नाही, त्यातली किती व केव्हा खर्च झाली, अमुक एका पेशंटला लिहून दिलेले औषध अजून त्याला का मिळाले नाही, वगैरेचा काटेकोर हिशेब तो विचारी. तसेच तेथील स्वच्छतेकडे व टापटिपीकडे तो जातीनें लक्ष देई. त्यामुळे हाताखालच्या या लोकांची फार कुचंबणा झाली होती. चुकारपणा व पैसे खाणे या त्यांच्या आवडत्या छंदाना सदानंद हा मोठाच अडथळा होता.

ह्या साऱ्यामुळे फणीबाबूच्या मनाचा फार जळफळाट होई. त्याला वाटे, पैसे खाण्याच्या भागीदारीत मनाजोगा हात मारू दिला नाही म्हणून मोहिनीडॉक्टरविरुद्ध चुगली करून, हे नसतेच पाप आपण स्वतःवर ओढून आणले आहे. सदानंदकडून त्याला वरचेवर तंबी मिळते हें धीरेन्‌कडून गांवात कर्णोपकर्णी झाले होते. ही संधि साधून मोहिनीडॉक्टर त्याला डिवचण्यासाठी बोले, "छान झाले. रांडलेकाने माझे अन्नात माती कालवली नाहीं का! आता स्वतःच्या घशांतील घास ओकावा लागेल तेव्हां समजेल सुख!"

फणीबाबू फारसा सुसंस्कृत व सधन नव्हता, तेव्हा स्वार्थापलीकडे त्याला काही दिसले नाही तर त्यात नवल नव्हते. पण मिलच्या हेड-ऑफिसातील डॉ. सेनचे वागणे पाहिले की सदानंदाला खरोखरच राग येई. त्याला लागणारी औषधे व हत्यारे वगैरे पाठविण्याचे काम हेडऑफिसचे डॉक्टर या नात्याने डॉ. सेन यांचे हाती होते. त्याने मालाची यादी लिहून पाठवली की कित्येक दिवस त्याची दखलच घेतली जात नसे.

एकदा अशाच काही कारणासाठी मागवलेला माल का आला नाही हे स्वतः बघावे म्हणून वेळ काढून तो हेडऑफिसात गेला. त्यावेळी डॉ. सेनने त्याला चमत्कारिक लेक्चर ऐकवलें—"हे कामगार म्हणजे

१९५३

निवळ पशु असतात. त्यांना कशाला इतकी महागडी औषधे द्यायची ? त्या अडाण्यांना कुठल्या तरी रंगीत सिरपमध्ये ॲस्पिरिनची पूड कालवून दिली तरी ते खूष असतात. फारच कुणी कुरकुर केली तर व्हिटॅमिन्चे नाहीतर लिव्हर-एक्स्ट्रॅक्ट्चे बिनधोक इंजेक्शन दिले की बास ! सुई लावली की डॉक्टरबाबूने आपल्यासाठी विशेष कांहीतरी केले या कल्पनेने त्याना बरे वाटे. फणीबाबू खूप वर्षाचा जुना आणि माहितगार माणूस आहे. तेथील लोकांशी कसे वागावे हे त्याला छान कळते. औषधे देण्याचे काम त्याचेवर सोपवून बेफिकीर रहायला काहीच हरकत नाही."

डॉ. सेनशी जास्तकमी वाद घालण्यात वेळ न खर्च करता, "मी मागितलेली औषधे वेळेवर मिळाली नाहीत तर मी वरिष्ठाना कळवीन," असे तुटक उत्तर देऊन तो रागानेच परतला. घरी परत जावे असे त्याला वाटेना. अनेक कष्टी विचारांची गर्दी मनात उसळत होती. कोठेतरी शांत निर्जन जागी एकटे विचार करीत बसावे असे त्याला वाटले.

मिल्च्या मोठ्या मोठ्या ऑफिसरांना व त्यांच्या बायकामुलांना कुठे एवढे ठुसफुस झाले तरी मिल्चा अफाट पैसा खर्च होत होता. हार्टचे, हाडांचे, स्किनचे वगैरे सर्व तऱ्हेचे स्पेशॅलिस्ट आणि पॅथॉलॉजिस्ट यांची लठ्ठ बिलें व नर्सिंगहोमचा खर्च त्यांचेप्रीत्यर्थ चालला होता. डॉ. सेन मोठे दयाळू म्हणून या लोकांसाठी ते हे सगळे करीत होते असे मात्र मुळीच नाही. या लोकांच्या फुसक्या आजारालाही अवास्तव महत्त्व देऊन धावाधाव करण्यात त्यांचा स्वतःचाच फायदा होता. सर्व स्पेशॅलिस्टांकडून, नर्सिंगहोममधून, इतकेच काय, औषधे विकणाऱ्या कंपन्यातून त्यांना कमिशन मिळत असे. पगाराव्यतिरिक्त हा मोठा लग्गा साधावा म्हणून कंपनीचे जिवावर महागड्या औषधांचा व ट्रीटमेंटचा भडिमार ते या लोकांवर करीत असत. त्यामुळे त्यांना पण डॉ. सेन हा मोठा हुशार व आस्थेवाईक आहे असे वाटे. अशा डॉक्टरविरुद्ध वरिष्ठांकडे तक्रार करूनही त्याचा फारसा उपयोग होणार नाही हे सदानंदाला उघड दिसत होते. या वातावरणात आपण फार दिवस राहू असे त्याला वाटत नव्हते. आता यापुढे कुठे जावे लागणार असा विचार तो स्वतःशी करीत होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थलांक
अनुक्रम ७४७६ ५१ दिः ...
वर्ग ... दिः ...

१०

नदीकाठी काही वेळ विचार करीत बसून आपल्या वैतागलेल्या मनाला शांत करावे असे त्याला वाटले. दक्षिणेश्वरच्या कालिमंदिरापुढील घाट सुंदर होता. समोर नदीचे भव्य दृश्य, घाटाच्या जवळूनच गेलेला वाली-ब्रिज, व त्यावरून मधूनमधून मंद गतीने जाणारी लांबलचक आगगाडी, पुलाचे कमानीखालून दिसणारा पैलतीरावरचा बेलूरमठाचा भाग हे सारे पहातच रहावे असे वाटे. एके काळीं श्रीरामकृष्ण परमहंसांनी येथे निवांत साधना केली होती खरी, पण आता भक्तगणाने या पवित्र स्थानाला बजबजपुरीचे स्वरूप आणले होते. नेहमीच येथे लोकांची इतकी गर्दी असे की निवांत बसायला ते स्थान योग्य नव्हते. घाटावर गंगास्नान, तर्पण, वगैरे करण्यास भाविक स्त्रीपुरुषांची गर्दी असे. जवळच इकडुन-तिकडे गंगेतून ये जा करणारा छोट्या होड्यांचा घाट होता. या सर्व माणसांच्या रहदारीने घाटाच्या पायऱ्या मातीने व चिखलाने भरलेल्या असत. मुख्य देवळाचे प्रांगण खूपच मोठें असले तरी भजनीमंडळे, भविष्यवादी व पंडे यांची टोळकी भक्तजनांचे आसपास घोटाळीत त्या गर्दीत भरच टाकीत असत. बाहेरच्या मोकळ्या आवारातही जात्रेसारखी गर्दी नेहमीच असे. फुलांची, मिठाईची दुकाने तर बरीच होती. त्याचेच जोडीला देवांच्या तसबिरा, खेळणी, ॲल्युमिनियमची भांडी, वगैरेची दुकाने, तसेच, पाच मिनिटांत झटपट फोटो काढून हाती देणारे फोटोग्राफर, यांतून वाट काढून मंदिराकडे जावे लागे.

घाटाच्या पायरीवर उभे राहून या सगळ्या कोलाहलाकडे बघत असतांना एकदम सदानंदाचे मनात आले, पटलबाबू रहातो त्या बागान-बाडीचे मागील बाजूने गंगाकाठ आहे, तेथें जाऊन बसलें तर ?

पटलबाबूच्या मुलाला वाचविल्याबद्दल फीचे पैसे देण्याचे तोंड भरून दिलेले आश्वासन त्याने अजूनही पुरे केले नव्हते. कधीं समोरासमोर गाठ पडली तर लाचारीने हसून तो वरकरणी गोड बोलत राही. एकदा-दोनदा बीरूचे हाती नारळाची कोळी शहाळी, केळी, पपनस वगैरे भेटी त्याने सदानंदाला पाठविल्या होत्या.

बागानबाडीचे रस्त्याने तो चालला असताना हातात मळकी झोळी घेऊन समोरून येत असलेला पटलबाबू त्याला दिसला. "कुठं निघाला डॉक्टरबाबू, कोणा पेशंटकडे की काय?" असें त्याने विचारले व सदानंद सहजच फिरायला चालला आहे असे कळले तेव्हां तो म्हणाला, "मग पायधूळ झाडा कीं गरिबाकडे. एखादा कप चहा तरी घ्या." एरव्ही पटलबाबूकडचा चहा पिणे म्हणजे त्याला संकटच वाटले असते, पण त्या वाड्याचेमागील बखळीतून नदीकाठी जाऊन बसावे असे वाटत असल्यामुळे त्याने लगेच हे आमंत्रण स्वीकारले.

नवीनचंद्र बॅनर्जींचा हा बागेतील वाडा त्यांचा मोठा मुलगा अशुतोषबाबू याचे वाटणीस आला होता, आणि त्यांचे कलकत्त्यांतील मोठे घर त्यांचा धाकटा मुलगा परितोषबाबू याच्या मालकीचे होते. नवीनबाबूंची मुलगी हेमांगिनी हिचे सासर पण कलकत्त्यासच होते. नवीनबाबू व त्यांचे कुटुंब, तसेच अशुतोषबाबू व त्यांचे कुटुंब हयात नव्हते. अशुतोषबाबूंची एकुलती एक कन्या काकाकाकीजवळ रहात होती. तिचे काका परितोषबाबू यांना संतान नसल्यामुळे पुढे मागे या अफाट संपत्तीची ती एकटीच मालकीण होती. परितोषबाबू आसामात रहात. सासऱ्याचे मागे त्याच्या चहाच्या मळ्यांचा व्याप तेच पहात असल्यामुळे ते इकडे फारसे येत नसत.

या जमीनदार कुटुंबाची माहिती सदानंदला पटलबाबूकडून कळली. त्या भव्य वाड्यांतील मोठीमोठी दालने, उंची पण निष्काळजीपणाने विखुरलेले सामान वगैरे पाहून त्याला हळहळ वाटली. पटलबाबूला अशुतोषबाबूनी मॅनेजर म्हणून दहाबारा वर्षापूर्वीच येथें आणले होते, आणि आतां तो या वास्तूचा राखणदार म्हणून रहात होता. वाड्याच्या डाव्या अंगच्या भागातील तीनचार खोल्या तो वापरीत होता. बाकीचा सर्वभाग नेहमी बंदच असे.

अशुतोषबाबूनी मृत्यूपूर्वी आपले सॉलिसिटर मित्र, श्री तारकनाथ सन्याल, यांचे सल्ल्याने विल् करून आपल्या मुलीचे नावे स्वतःची इस्टेट केली होती, व ती वयात येईपर्यंत तारकबाबूच इस्टेटीचे ट्रस्टी होते. अजूनही ती येथे रहात नसल्यामुळे इस्टेटीकडे पहाण्याचे काम तेच करीत. पूर्वी ते आठवड्यातून एकदा तरी नियमाने इकडे येऊन वाड्याच्या

व्यवस्थेची दखल घेन असत. पण आताशा आजारपणामुळे त्यांना ही दगदग होत नसे. कधीतरी महिन्या दोन महिन्यांनी त्यांचा मुलगा एखादी खेप घालून जाई. पटलबाबू दर महिन्याला त्यांचे घरी जाऊन आपले वेतन घेऊन येत असे, व ते कोणी इकडे येणार असा सुगावा लागला की कोणाकडून तरी घराची व बागेची कामचलाऊ साफसफाई करून घेत असे.

अशुतोषबाबू वकील होते. त्यांच्या ग्रंथालयाचा वराचसा भाग कायद्याच्या जाडजूड ग्रंथानी भरलेला होता. तरी कांहीं कपाटातून श्रीअरविंदांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे ग्रंथ, हिंदुधर्म आणि गीतेचे तत्त्व यांचे विवेचन करणारे स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ, ब्रह्मोसमाजाची मते प्रतिपादणारी राजा राममोहन रायांची पुस्तके, रवीन्द्रनाथ, बंकिमचंद्र, शरच्चंद्र, वगैरेंचे साहित्य, तसेच, शेक्सपिअर, शॉ, कीट्स्, बायरन् वगैरे इंग्रजी वाङ्मय याचा विपुल संग्रह होता.

आपण फी दिलेली नसूनही त्याबद्दल निकड न दाखवता, उलट आस्थेने त्याच्याशी वागणाऱ्या या डॉक्टरला खूष करायला फारसे काही करण्याची गरज नाही, मन मानेल तेव्हां तो इकडे आला की अशुतोषबाबूंचे ग्रंथालय उघडून त्याला तेथे निवांतपणे वाचू दिले, व मागील बखळीत गंगेकाठी हिंडू फिरू दिले की हा माणूस खूष होतो.—मग फुकटात हा मोठेपणा का न घ्या, अशा विचाराने पटलबाबू तो तेथे गेला की त्याला अगत्याने वागवी.

दुपारचे जेवण झाले की घरीच आळसाने पडून न राहता तो पुष्कळदा इकडे येई. मनमुराद वाचन, बागेत गंगेकाठी फिरणे आणि कांहीतरी विचार करीत वेळ घालविणे हा त्याचा आवडता छंद झाला होता. कधीकधी गमतीने या जमीनदार कुटुंबाचे तो कल्पनेने चित्र रंगवी. या वास्तूविषयी आपल्याला काहीतरी गूढ अशी ओढ आहे असे मनात आले की त्याला चमत्कारिक वाटे.

डॉक्टर या नात्याने आपल्या शिक्षणाचा करावा तितका उपयोग आपण करीत नाहीं असा खेदाचा विचार मधूनच त्याच्या मनात डोकावे. आणि नोकरीचा बांधीलपणा न पत्करता स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू करावी असेही त्याला वाटे. पण मनुष्यांच्या शरीराइतकाच त्यांच्या मनाचा

अभ्यास महत्त्वाचा नव्हता का ? माणसांचे आचार विचार, समाजातील विविध थरात आढळणारी भिन्नता, हे अनुभव पण मोलाचे होते. तो स्वतंत्र प्रॅक्टिसच्या मागे लागला असता तर आजुबाजूच्या व्यक्तींचे स्वभावधर्म चिकित्सक बुद्धीने पहाण्यास त्याला सवड झाली नसती. इतरांचे दृष्टिकोनातून पाहिले तर तो वेळ फुकट दवडीत होता, असे पुष्कळांचे मत झाले असते. पण त्याच्या बुद्धीला पुष्ट करणारे, मनाला गांभीर्य आणणारे, व्यक्तिमत्वाला भरघोस स्वरूप देणारे विचार तो मनात जोपासत होता. त्याचा हा आत्मोद्धार वरकरणी कोणास कळण्यासारखा नव्हता. पण त्याची जाणीव त्याचे मनाला असल्यामुळे, आपला हा वेळ फुकट गेला असे मानायला तो तयार नव्हता.

एक दिवस वाचन व फिरणे आटोपून तो घरी परत निघाला तेव्हा वाडचाच्या गेटबाहेर उभा असलेला एक म्हातारा माणूस आपल्याकडे विशेष कुतूहलाने पहात आहे असे त्याला आढळले.—

"बाबू, आपण तारकबाबूंच्या नात्यांतले आहात काय ?" असा प्रश्न त्यानें केला.

"नाहीं. मी भुवनेश्वरी ज्यूटमिलचा डॉक्टर आहे."

"ओ हो. तुम्हीच का नवे डॉक्टरबाबू ? मी जमीनदार बाबूंच्या घरचा फार जुना नोकर आहे. बाबूंचे सर्व मित्र व नातलग मला माहीत आहेत. अलिकडे पुष्कळ वेळा मी तुम्हाला इकडे येताना पाहतो. परवा तुम्हाला किताबघराच्या पुढच्या व्हरांडचात बसलेले मी दुरूनच पाहिले आणि मला वाटले, तारकबाबूंनी वाडचाला नवा मालक आणला कीं काय ?"

तो म्हातारा बराच बोलका व वेल्हाळ दिसला. मनातले खूप कांही तरी त्याला बोलायचे होते हें त्याच्या चर्येवरून सदानंदाने ओळखले. सदानंद रेंगाळत चालू लागला तेव्हा तो म्हातारा पण त्याचे जोडीने गोष्टी करत निघाला. त्याचे नांव दुर्गादास होते. नवीनबाबूंच्या खास तैनातीतील तो नोकर होता. अशुतोषबाबू, परितोषबाबू आणि त्यांची बहीण या तिघांनाही त्याने लहानपणी खेळवलेले होते. जमीनदार नवीनबाबू मोठा उमदा राजामाणूस होता. अशुतोषबाबूही प्रेमळ व सच्चा दिलाचे होते. या कलियुगांत परमेश्वर नाही, नाहीतर अशा

सज्जन माणसांचा वंश नामशेष होण्याची पाळी येती ना. पटलबाबू फार डांबिस माणूस आहे. इस्टेटीचा मॅनेजर म्हणताम्हणता आता मालकच बनला आहे. कोणी हडपता दडपता नसल्यामुळे त्याला चरायला रान मोकळे मिळाले आहे. स्वतःच्या गुंडपणाला बंधन नको म्हणून त्याच्यासारख्या जुन्या नोकराला त्याच्या कामाची गरज नसल्याचे तारकबाबूंना भासवून त्याने काढून टाकले होते. त्याचा मोठा मुलगा तेथीलच एका गंजीफ्राक तयार करण्याच्या कारखान्यात कामाला होता. कारखान्यालगत एका छोट्या खोपटात तो, त्याचा मुलगा, सून व एक अर्धवट वेडसर नातू, असे रहात असत, वगैरे हकीकत त्याने सदानंदाला ऐकवली.

अशुतोषबाबूंच्या एकुलत्या एक मुलीचा उल्लेख, 'आमादेर दिदिमणि' असा करून, कुठे बिचारी दिवस काढते आहे कोण जाणे, असे म्हणून तो हळहळत होता. हे सारे ऐकल्यापासून काळाचे ओघात नामशेष होऊ पहाणाऱ्या या वंशाबद्दल त्याला पण हुरहुर वाटली होती.

११

भुवनेश्वरी ज्यूटमिलमध्ये लेबर ऑफिसर शशिबाबू हे पूर्व पाकिस्तानच्या निर्वासितांपैकी होते. चित्तगांवला त्यांच्या मालकीचे वडिलोपार्जित घर, शेतीवाडी वगैरे सगळे सोडून कुटंबाला घेऊन ते इकडे आले होते. पूर्व वैभवाचे दिवस आठवून, आताच्या वाढत्या महागाईत निव्वळ पगाराच्या पैशांवर संसाराचा गाडा रेटणे किती कठीण आहे, ही कर्मकटकट ते वरचेवर सदानंदाला ऐकवीत. त्यांचे दोघांचे क्वार्टर्स एकमेकाला लागूनच होते. अंदमानमधे कांहीं निर्वासितांना शेतजमिनी देऊन वसाहतीसाठी सरकारने पाठवले होते. त्यांत त्यांचे सासरे होते. त्यांचा मेव्हणा सुबोध हा पदवीधर होता. त्याच्या खटपट्या स्वभावामुळे तेथील जंगलखात्यात त्याने चांगली हुद्याची जागा मिळविली होती. पोर्टब्लेअरला सिव्हिल हॉस्पिटल बरेच वाढविले जात असून कर्तबगार माणसाला सर्वदृष्टीने तेथे वाव आहे असे सुबोधकडून कळल्यामुळे सदानंदाने त्याचे ओळखीने तेथील नोकरीसाठी अर्ज धाडला होता.

फणीबाबूंच्या व डॉ. सेनच्या वागण्याने त्रासून त्याने वरिष्ठांकडे तक्रार केली होती. अफाट पैसा मिळत असला तरी बुद्धीने मंदच असलेले मारवाडी मालक वरिष्ठ ऑफिसरांचे हातात होते. भरपूर फायदा मिळवणे एवढा एकच त्यांचा उद्देश व आदर्श होता. असल्या तक्रारी ऐकायला आणि सचोटीचा विचार करीत बसायला त्यांना वेळ कुठे होता ? 'आंधळे दळते व कुत्रे पीठ खाते' असे जे चालत असे ते हे आंधळेपण जाणूनबुजून डोळ्यांवर कातडे ओढल्यामुळे होते. स्वतःच्या फायद्याची पिशवी पूर्ण भरून घेतल्यानंतर उरलेले हे पीठ सरकारने कररूपाने घेतले काय, किंवा हाताखालच्या माणसानी ते खाल्ले काय त्याचा फारसा खेद मालकांना नव्हता.

हे मारवाडी मालक स्वार्थी व निव्वळ फायद्यावर डोळा ठेवणारे म्हणून त्यांना दोष द्यावा, तर सरकारी अंमलाखाली राष्ट्रीयकरण झालेल्या उद्योगधंद्यांची रड तर यापेक्षा वाईट होती. हे खासगी मालक स्वतःच्या फायद्यासाठी तरी धंद्यात लक्ष देत होते. मजुरांनी संप केला तर आपले नुकसान होईल या भीतीने बोनस व इतर काही सवलती ते कामगारांना देत होते. सरकारी मालकीच्या धंद्यात फायदातोटचाची परवा नसल्यामुळे इतकी बेफिकिरी व अंदाधुंदी होती कीं त्याविषयी वर्णन करावे तितके थोडेच. धंदा भरभराटीला आला काय, किंवा तोटचात चालला काय, अधिकाऱ्यांना व कामगरांना ठरलेले वेतन मिळतच होते. वरचा अधिकारीवर्ग धंद्याच्या कागदी नियोजनांच्या चर्चेत, आणि त्या निमित्ताने परदेशगमनाची सुसंधि मिळाली तर बघण्यात गुंतलेला असे. धंदा तोटचात आला तर करवाढीचे रूपाने जनतेलाच त्याची झळ पोहोचत असे.

ह्या ज्यूटमिलमधेच काय, पण आपल्या देशात कुठेही गेले तरी सुविचारी माणसाला नको हे आयुष्य असा वैताग यावा असेच वातावरण होते. या वातावरणाची झळ लागून अनेकजण गांजलेले होते, पण तरीसुद्धा हे जीवन ते अगतिकपणे जगत होते. काहीं विचारवंत लोक, 'कुठं जाणार हें गाडें ?' असा प्रश्न कधीमधी आपापसात करीतही होते. पण ढासळलेला हा राष्ट्राच्या नीतिमत्तेचा डोलारा कुणी कसा व कुठून सावरायचा हा प्रश्न कोणाला सोडवता येत नव्हता.

येथील नोकरी सोडून पोर्टब्लेअरला गेले म्हणून तरी काय, तेथे मनःशांति लाभेल याची आशा सदानंदाला नव्हती. पण कर्मकटकट नेहमीचीच असली तरी त्यात वेगळा थारेपालट केला तर आणखी कांहीं वेगळ्या व्यक्तींचे नमुने पहायला मिळतील म्हणून त्याने तिकडे जायचे ठरविले होते. एक महिन्याच्या नोटिशीने राजीनामा देऊन हळुहळु तो आपली निघण्याची तयारी करीत होता. तो येथून जाणार म्हणून सुशान्तसारखे कांहीं त्याचे चहाते होते त्यांना फार हळहळ वाटत होती.

तेथून निघायला एक आठवडा बाकी असताना कामगारलोकांनी त्याला निरोप देण्याचा छोटा समारंभ मोठ्या प्रेमाने व कृतज्ञतेने साजरा केला होता. आपल्या अल्प वेतनातून वर्गणी गोळा करून एच्. एम्. टी. कंपनीचे 'जनता' रिस्टवॉच त्यांनी सदानंदाला भेटीदाखल दिले होते. काहीजणांनी भाषणे करून त्याचेविषयीची आस्था प्रकट केली होती. त्याच्याविषयीचा आदरभाव बोलून दाखवताना सुशान्त अगदी गहिवरला होता. या छोट्याच पण कळकळीच्या निरोपसमारंभाने त्याचे मन पण भरून आले होते. या सर्वांना सोडून जातांना विशेषतः नवीनबाबूंच्या बागानबाडीतील तें ग्रंथालय पुनः आपल्याला दिसणार नाही या कल्पनेने त्याला कसेसेच वाटत होते.

कलकत्त्याच्या एका दुकानात त्याने कांही कपडे शिवायला टाकले होते. ते घेऊन तो सायंकाळी टॅक्सीने घरी परतला. सामानाचे पुडके उजव्या हाताने पकडून दुसऱ्या हाताने टॅक्सीवाल्याला पैसे देत असतांना त्यानें पाहिले, त्याचे घराचे व्हरांड्यात मोहिनीडॉक्टरांचा मोठा मुलगा गणेश उभा होता. त्याला आश्चर्यच वाटले.

"डॉक्टरबाबू, जरा आमचे घरी यायची कृपा कराल काय? बाबांचा जीव घाबरा होऊन ते एकाएकी बेशुद्ध झाले आहेत," असे गणेश म्हणाला.

"असं एकाएकी झालं तरी काय?—बरं, चल, तू हो पुढे. मी औषधांची पेटी घेऊन येतोच," असे त्याला सांगून सदानंद घरात शिरला.

मोहिनीडॉक्टरांच्या पहिल्या कुटुंबाचा मुलगा महेश कलकत्त्यालाच कुठेसा रहात होता. बरेच दिवसापूर्वी तो बापाशी भांडून वेगळा झाला होता. आताच्या कुटंबापासून गणेश व कार्तिक हे दोन मुलगे, आणि टेपी ही मुलगी, अशी तीन अपत्ये त्यांना होती. याच ज्यूटमिलचे

हेडऑफिसात गणेश कारकून होता, कार्तिक शिकत होता. टेपी ही तर अर्वाच्य पोरटी म्हणून सगळ्या पाड्यात प्रसिद्ध होती.

स्वतःला डॉक्टर म्हणविणाऱ्या या बाबूला स्वच्छता कशाशी खातात हे माहीतच नसावे. त्यांच्या घरातील मळकट सामान, धूळ साचलेले कपडे आणि पुस्तके पाहून, तसेच त्यांच्या घरात येणाऱ्या कुबट वासाने सदानंदाला मळमळल्यासारखे वाटू लागले होते. दिव्यांच्या बटणांचा उपयोग शर्ट किंवा पिशव्या अडकवण्यासाठी करण्याचा अभिनव प्रकार पाहून त्याला हसूच आले.

मोहिनीडॉक्टरांना अर्धांगवायूचा झटका आलेला होता. घाम जास्त-प्रमाणात गेल्यामुळे त्यांचे हातपाय गार पडले होते व नाडी पण मंदावली होती. त्यांना कोरॅमिनचे इंजेक्शन देऊन व त्यांचे हातापायांना ब्रॅण्डी चोळून त्यांची गेलेली शुद्ध परत आणण्याचा प्रयत्न त्याने केला. तीन चार तासानी त्याच्या प्रयत्नांना यश आले. त्यानी डोळे उघडून कण्हल्या-सारखा आवाज केला. त्यांच्या उजव्या अंगाची बाजू लुळी पडली होती व तोंडातून खूप लाळ गळत होती. संवेदना बोथट झालेल्या अवस्थेतही आपण ज्याच्याशी इतके दिवस विनाकारण वैर केले तोच हा माणूस आपल्यासाठी मनापासून झटत आहे या जाणीवेचा पुसट धक्का मेंदूला बसल्यामुळे मोहिनीडॉक्टरांचे डोळ्यात कारुण्य ओसंडून वहात होते. तात्पुरती का होईना, पण जिभेची शक्ति लुप्त झालेली होती. त्यामुळे जिभेचे काम डोळे करीत होते. जन्मभर खोट्या अहंकाराचे तोऱ्यात आणि स्वार्थात गुरफटलेल्या माणसालासुद्धा सर्वग्रासी काळाचे उग्र स्वरूप जवळून दिसले की त्याच्या हृदयात दडलेल्या चित्स्वरूपी आत्म्याची त्याला जाणीव होत असावी. आणि परमेश्वरी अंश असलेला, व सर्वाभूती असलेला तो चैतन्यमय आत्मा या क्षणी तरी निखालस प्रामाणिकपणाचे चुटपुटते रूप हळूच दाखवीत असावा !

त्यानंतर दोनतीन दिवस तो नेमाने त्यांचे घरीं गेला होता. त्याच्या सूचना पाळण्याचे व त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याचे गणेशने कबूल केले होते. या प्रसंगाने गडबडून जाऊन डॉक्टरांची जहांबाज बायको अगदीच मवाळ झाली होती. टेपीपण आपला नेहमीचा व्रात्यपणा सोडून, एके काळीं शत्रु वाटलेल्या, पण आता उपकारकर्ता बनलेल्या

डॉ. सदानंदाकडे बावरलेल्या डोळ्यांनी पहात होती. मुख्य धोका टळला होता, पण यापुढचे आयुष्य मात्र मोहिनीडॉक्टरांना परावलंबी अवस्थेत काढावे लागणार होते. लवकरच डॉ. सदानंद हें गांव सोडून जाणार हें कळल्यावर एकेकाळी त्याचेवर अकारण जळफळलेला तो म्हातारा एखाद्या लहान मुलासारखा रडला होता. तें पाहून सदानंदाला वाटलें, मनुष्याच्या मनाचा हा काय विचित्र धर्म !

निघण्याच्या दिवशी सकाळीच तो बागानवाडीकडे आला. डोळे भरून तो भव्य वाडा, तीं दालनें, आणि बगीचा त्याने पाहून घेतला. येथील शांत वातावरणात त्याच्या मनाला केवढा विसावा लाभला होता हें आठवून कष्टी मनाने तो परतला.

१२

बाजाराचे मुख्य रस्त्याचे वरचे अंगाला अंबरडीन पोलिस स्टेशनचे उजव्या हाताने एक रस्ता सेक्रेटॅरियटकडे गेलेला होता. ती इमारत बरीच उंचावर होती. मोटरने तिकडे जायचे झाले तर फार मोठा वळसा घेऊन जावे लागे. पण पायी जाणारासाठी पायऱ्यांची सोय होती. गर्द झाडीतून डोकावणारी खालच्या अंगाची लाकडी घरे व दुरून दिसणारा बाजारपेठेचा गजबजलेला भाग बघत सदानंद मौंटबॅटन सिनेमागृहावरून चालला होता. त्याला पोर्टब्लेअरला आल्याला जवळ जवळ महिना होऊन गेला होता. या खेपेला प्रवासात समुद्राने आपले रौद्र स्वरूप दाखविल्यामुळे सगळ्याच प्रवाशांना खूप त्रास झाला होता. दोन दिवस प्रवासाचा शीण घालविण्यात व नंतरचे कांही दिवस कामाचा चार्ज घेण्याच्या गडबडीत गेले. थोडा वेळ मिळताच एक दिवस साऊथ-पॉइन्ट गेस्ट हाऊसच्या वरील बाजूला असलेल्या त्या ऐटबाज बंगल्याचे बाजूने त्याने चक्कर टाकली होती. सगळा बंगला बंद होता. मागील बाजूस नोकरांच्या खोलीत तेवढी जाग होती. त्याला गेटपाशी घुटमळलेला पाहून एका नोकराने पुढे येऊन, "काय पाहिजे" ? असे त्याला विचारले तेव्हां, "मला तुझ्या मालकांना भेटायचे होते," अशी थाप

नाइलाजाने त्याला द्यावीच लागली.—"मालक तर आसामला गेले आहेत. बहुतेक एकदोन महिने इकडे येतील असे वाटत नाही," असे नोकराने दिलेले उत्तर ऐकून त्याची निराशा झाली होती.

—तो रस्त्याने अगदी रेंगाळत चालला होता. त्या दिवशी त्याला सुबोधच्या आग्रहाखातर अतुल-समिति नांवाच्या बंगाली लोकांचे क्लबात नृत्यगायनाचे कार्यक्रमाला जायचे होते. मौंटबॅटन थिअेटरवरून असेच सरळ पुढे गेले की हॅन्डीक्राफ्ट सेंटरचे थोडे पुढे एका दुमजली इमारतीत अतुल-समिति होती. तिचे खरे नाव अतुल-स्मृति-समिति असे होते. बॅ. सावरकरांचा समकालीन अतुलचंद्र नावाचा एक बंगाली क्रांतिवीर येथील कारागृहांतील बंदी होता. तुरुंगातील अपमानास्पद वागणूक व अमानुष छळ सहन न होऊन त्याने बंदीगृहात गळफास लावून आत्महत्त्या केली होती. त्याचेच स्मृतिप्रीत्यर्थ हें नाव दिलेले होते. पण दर वेळी एवढे लांबलचक नाव म्हणण्यापेक्षा सगळे अतुल-समिति या सुटसुटीत नावानेच त्या संस्कृतिमंडळाला ओळखत.

हॅन्डीक्राफ्ट सेंटरचे गेट मधून एका छानदार अल्सेशिअन कुत्र्याला पट्ट्याने खेचत व, "स्टॉप, प्रिन्स," असे तोंडांतील चिरूटामुळे बोबड्या आवाजाने बोलत बाहेर पडलेले किंचित स्थूल शरीराचे, गोरटेले व डोक्याला टक्कल असलेले गृहस्थ पाहून हेच 'पी. बॅनर्जी' असावेत असे सदानंदाला वाटले. त्यांचा नोकर तर आणखी काही दिवस ते इकडे येणार नाहीत असे म्हणाला होता. अचानक ही मंडळी परत आलेली दिसतात, असा विचार मनात येऊन तो त्यांचेकडे निरखून पाहू लागला. त्यांनी खिशातून हातरुमाल काढला, पण त्याबरोबर एक कागदाचा लहानसा कपटा खिशातून खाली पडला हे त्यांच्या ध्यानातच आले नाही. त्यांच्याशी ओळख करून घ्यायला ही बरी संधि आहे असे वाटून त्याने तो कागदाचा कपटा उचलून त्या गृहस्थांचे पुढे केला.

"ओ ! थँक यू सो मच्," असे म्हणून व कांहीं वेळ त्याचेकडे रोखून पाहिल्यासारखे करून ते म्हणाले, "तुम्ही येथे नवेच आहात ना ? इथल्या बहुतेक सर्व लोकांना मी प्रत्यक्ष नाही तरी निदान चेहऱ्यावरून ओळखतो." आपण या गावात किती प्रसिद्ध आहोत याबद्दल स्वतःशीच खूष असल्यासारखे दर्शवीत ते बोलत होते.

"मी येथील हॉस्पिटलमधे डॉक्टर आहे. महिन्यापूर्वीच येथे आलो."

"असं होय. मग कसं काय वाटत आहे आमच पोर्टब्लेअर तुम्हाला? तुम्ही जेलमधे राहता तेव्हां काळचा पाण्यावर शिक्षा भोगायला आल्यासारख नाही ना वाटत?" असा विनोद करून ते गदगदा हासले. हासतांना त्यांचे सर्व शरीरही गदगदा हालत होते, त्याची सदानंदाला गंमत वाटली. प्रथम त्याने या गृहस्थाना पाहिले होते तेव्हां पण बोटीचे कठड्याला टेकून ते असेच हासताना त्याला दिसले होते.

सदानंद अतुल-समितीत चालला आहे हे ऐकून त्यांना नवल वाटलेसे दिसले. ते पण तिकडेच कार्यक्रमाला चालले होते.—"मला या असल्या कार्यक्रमात काही इंट्रेस्ट नाही, पण आज मलाच या लोकानी अध्यक्ष बनवले आहे त्यामुळे माझा नाइलाज आहे. कलकत्त्याला पाठविण्यासाठी काही मालाची ऑर्डर या सेंटरच्या लोकांना मी दिली होती, त्याचे काय झाले ते बघायला जरा येथे डोकावलो होतो," असे म्हणत, "शरीफ" अशी हाक मारून त्याने अपल्या शोफरला बोलावले. त्यांची क्रीम कलरची फिआट गाडी समोरच पार्क केलेली होती.

"देखो, प्रिन्स को लेकर तुम बंगलेपर जाना, फिर आधे घंटे के बाद क्लब में गाड़ी ले आना," अशी आज्ञा त्याला देऊन ते सदानंद बरोबर पायीच निघाले.

"तुम्ही तर बंगाली वाटत नाही, मग तुम्हाला या कार्यक्रमात कसा काय इंट्रेस्ट?" त्यांच्या या प्रश्नाला त्याने सफाइदार बंगालीतून, तो स्वतः इतके दिवस बेलघुरियाला रहात होता, असे उत्तर देताच त्या गृहस्थांचे डोळे आश्चर्याने चमकलेसे दिसले.

"ओहो, बेलघुरियाला?—तिथं कुठं?—अच्छा! भुवनेश्वरी ज्यूट-मिलमधे होय?"—असे म्हणताम्हणता त्यांचा वडिलोपार्जित मोठा वाडा आणि बाग तेथे असल्याचे त्यानी सांगितले.

आता मात्र सदानंदावरच नवल करण्याची पाळी होती! त्याला वाटले, पी. बॅनर्जी म्हणजे नवीनबाबूंचे धाकटे चिरंजीव परितोषबाबू तर नव्हेत! न राहवून त्याने विचारले, "तुम्ही परितोषबाबू काय?"

"होय, मीच परितोष. पण तुम्ही मला कसे ओळखले?"

"बेलघुरियाला असताना तुमच्या वाडचात मी बऱ्याच वेळा गेलेला आहे. पटलबाबूकडून तुमच्या घरची थोडीफार माहिती मला मिळांली आहे."

"हां, पटलकडून काय? अजून तो लुच्चा आहे तर तेथे टिकून!"

कार्यक्रम आटोपून परतताना परितोषबाबूनी त्याला स्वतःचे गाडीतून हॉस्पिटलमधे पोहोचवले.

जेवणानंतर रात्री आरामखुर्चीत पुस्तक घेऊन पडल्यापडल्या त्याला वाटले, परितोषबाबूंना तर मूलबाळ नाही, मग ही मणी— किंवा महाबळीपुरंला शांतिनिकेतनच्या मंडळीत भेटलेली तो झुमी—ही अशुतोषबाबूंची एकुलती एक कन्या तर नव्हे? मणीविषयीच्या रहस्याचे पापुद्रे अनायासे उलगडून आपले कुतूहल लवकरच दूर होणार असा विचार त्याचे मनात डोकावला.

१३

पूर्वी गुन्हेगारांचा काळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या सेल्यूलर जेलचे मुख्य गेटचे दोन्ही अंगाला जो प्रशस्त दुमजली इमारतीचा भाग होता त्याचीच एक बाजू सदानंदाला रहायला दिली होती, व दुसरे बाजूला स्त्रियांचा स्पेशल वॉर्ड होता. तो रहात होता त्या भागातच पूर्वी युरोपिअन जेलर रहात असे. इकडे येण्यापूर्वी अंदमानची माहिती जाणून घेण्यासाठी बॅ. सावरकरांचे 'माझी जन्मठेप' हे पुस्तक त्याने मुद्दाम वाचले होते. त्या पुस्तकात वर्णन केलेली चाळीस वर्षांपूर्वीची स्थिति व आताची स्थिति यातील पडलेला भलताच फरक जाणवून, आता सावरकर इकडे आले तर त्यांना कसे काय वाटेल असा गंमतीचा विचार त्याचे मनात आला.

याच जागेत राहून बारीसाहेब नांवाच्या एका आयरिश जेलरने कर्दन काळासारखे राज्य केले होते. आणि आता त्याच जागेत सेवेचे व्रत चालवायला तो रहात होता. काळाचा महिमा काय वाटेल ते स्थित्यंतर घडवून आणू शकतो. याच काळाच्या महिम्याने कदाचित सध्याची आपल्या देशाची स्थिति व लोकांची दुर्दशा दूर करणारी कांहींतरी घटना घडेलही, असा आशादायी विचार त्याचे मनात डोकावला.

आठवडाभर काम केले की काही स्पेशल केसेस नसतील तर रविवारची सुट्टी तो वाचनात किंवा हिंडण्याफिरण्यात घालवीत असे. त्याचे जोडीदार डॉक्टर, देवीशरण शर्मा, हे यू.पी.च्या बाजूचे एक वयस्कर गृहस्थ होते. हॉस्पिटलजवळच एका छोट्या बंगल्यात ते रहात असत. ते विधुर होते. त्यांच्या आयुष्याची कहाणी मोठी करुण होती.—

वीस वर्षांपूर्वी झाशीकडून लखनौकडे येणाऱ्या गाडीला मोठा अपघात होऊन त्यात त्यांची पत्नी व दोन मुले दगावली होती. ते स्वतः बरेच दिवस अत्यवस्थ अवस्थेत हॉस्पिटलमधे पडून होते. शुद्धीवर आल्यानंतर आपल्या कुटुंबाची झालेली वाताहात ऐकून, बेशुद्धीतच आपला प्राण जाता तर बरे झाले असते असे त्यांना वाटले. पत्नीचा व मुलांचा दहन-संस्कार कोणी केला हे पण त्यांना नीटसे कळले नव्हते.

मनाला वैताग येऊन ते कांहीं दिवस हृषीकेशला एका साधूचे संगतीत राहिले होते. डॉक्टरीपेशा सोडून मंत्रपाठ, भजन, कीर्तन यांतच त्यांनी वेळ घालवला होता. तो साधू मोठा मिठ्ठासवाणीचा व देखणा होता. त्याचा शिष्यमेळावा पुष्कळ होता. सगळेजण त्याला भोलाबाबा म्हणत आणि भाविकपणे त्याचे चरणी लागत. त्या बाबाची इतकी भुरळ त्यांचेवर पडली होती की तो म्हणेल तसे ते वागत असत. स्वतःचा जमीनजुमला, पैसाअडका, सगळे काही त्यानी या भोलाबाबाचे मठाला देणगीदाखल दिले होते. ते पुरेच कफल्लक बनले तेव्हां हळुहळु बाबांचे खरे स्वरूप त्यांना दिसू लागले. त्यांचे जवळ पैसा होता तोपर्यंत बाबा त्यांना आपला पट्टशिष्य मानीत असत. पण त्यांचे सर्वस्व लुंगावल्यावर मात्र बाबांना त्यांची अडचण वाटू लागली होती. कारण हा शिष्य खराच सात्विक होता व अशा सच्चा दिलाचे माणसाला आपल्या प्रभावळीत ठेवले तर आपले बेंड बाहेर फुटेल अशी भीति बाबांना वाटत असावी.

"हिमालयातील केदारनाथच्या वाटेवरील एका कठीण स्थानी माझेसह पायी चल. तुला आध्यात्मिक ध्यानसाधना शिकवून प्रत्यक्ष भगवंताचे दर्शन घडवून आणतो," असे आश्वासन देऊन भोलाबाबा डॉ. शर्मासह पायीच प्रवासाला निघाला होता. त्या अवघड वाटचालीने जातांना त्यांचे शरीर थकले होते. एक दिवस रुद्रप्रयागच्याही थोडे पुढे कुठल्या

तरी एका चट्टीत ते दोघे मुक्कामाला उतरले होते. हिमालयाची जीवघेणी थंड हवा, त्यातून अन्न पण पुरेसे मिळालेले नाही अशा अवस्थेत त्यांना ग्लानी आली. ते सकाळी उठून पहातात तर बाबांचा पत्ताच नव्हता. त्यांना वाटले ते जवळपास कुठे गेले असतील. अजून अरुणोदय झालेला नव्हता, त्यामुळे आजुबाजूची पर्वतराशि धुक्याचे अवगुंठनात लपेटलेली होती. थंडीने त्यांचे हातपाय गोठल्यासारखे झाले होते. तास दीड तास झाला तरी बाबा परत येण्याची लक्षणे दिसेनात. रात्री झोपताना पांघरायला घेतलेल्या रजईखेरीज त्यांचे सामानही तेथून नाहीसे झाले होते. ती रजई पण चट्टीचे मालकाकडून एका रात्रीपुरती भाड्याने घेतलेली होती. चौकशी केल्यावर तेथील पहाडी लोकानी, "आम्हाला काय माहीत," असे उडवाउडवीचे उत्तर दिले. पहाडी अनोळखी प्रदेश, रस्ता माहीत नाही, खिशात दिडकी नाही, की अंगावरचे वस्त्राखेरीज सुतळीचा तोडाही जवळ नाही, अशा अवस्थेत खूप हाल सोसून दहाबारा दिवसानी ते हृषीकेशला परत आले. भोलाबाबाची मठी ओसाड होती. जवळपास चौकशी अंती गेल्या आठवड्यात शिष्यमंडळीसह बाबा परगांवी गेल्याचे कळले.

सुशिक्षित असूनही मूठभर अन्नासाठी व आसऱ्यासाठी दहा ठिकाणी त्यांना भिकाऱ्यासारखा हात पसरावा लागला होता. नाही पोटभर अन्न, नाही स्वच्छ आंघोळ व निवारा, मन चिंतेने व्यापलेले, अशा अवस्थेत ते खरोखरच एखाद्या भणंगासारखे दिसत होते. आपण एक सुशिक्षित डॉक्टर आहोत असे त्यानी काहीजणांना सांगितले तेव्हा त्या लोकांनी त्यांना वेडपटच ठरविले होते. गरिबी म्हणजे काय याची खरी जाणीव प्रत्यक्ष त्या फेऱ्यातून जाऊन त्यांनी अनुभवली होती. अशा परिस्थितीत झाशीला आपल्या नातलगांना तोंड दाखवावे असे त्यांना वाटत नव्हते. कारण काही जिव्हाळ्याच्या मंडळीनी त्यांच्या बुवाच्या नादावद्दल त्यांना सावध केले असताना त्यानी तिकडे दुर्लक्ष केले होते.

हरिद्वारला त्यांचे एक दूरचे आप्त रहात होते. त्यांच्या मदतीने तिथे काही दिवस राहून त्यानी नोकरीची खटपट केली होती. अशाच काही नोकऱ्या कुठे कुठे करून चारपाच वर्षापूर्वी ते इकडे आलेले होते.

डॉ. शर्मा मोठे शांत, निगर्वी व निःस्वार्थी होते. सगळीकडे सहकाऱ्यांच्या हेव्यादाव्याचा अनुभव घेतलेल्या सदानंदाला येथे आपल्या जोडीला असा मनमिळाऊ माणूस भेटला हें फार बरे वाटले. डॉ. शर्माना एके काळी घर, कुटुंब वगैरे सगळे असून परिस्थितीचे चक्रांत ते एकाकी झाले होते, आणि तो दुकटे होण्याचा योगच न आल्यामुळे एकटा होता. कुटुंबसौख्य भोगून ते विरक्त झाले होते, आणि तो हें सौख्य म्हणजे काय तें कळण्यापूर्वी विरागी बनलेला होता. डॉ. शर्मांचे वाचन व अनुभव अफाट होते. त्यांच्या उदात्त व्यक्तिमत्वात आपल्याला शिकून घेण्यासारखे खूप गूण आहेत असे वाटून तो त्यांच्याशी फार आदराने वागे. तरुण वयांतही निर्व्यसनी व सचोटीने वागणारा, मन लावून काम करणारा सदानंद, हासुद्धा हल्लीच्या काळांत फारसा न आढळणारा एक उमदा नमुना म्हणून डॉ. शर्मांचा फार आवडता झाला होता. 'बेटा,' असे स्वतःच्या मुलाला म्हणावे तसे प्रेमाने ते त्याला हाक मारीत, व तोही त्यांना 'चाचाजी' असे म्हणे. तेथील पुष्कळ जण त्यांना याच आपुलकीचे नांवाने हाक मारीत.

सुट्टीच्या दिवशी कधीकधी त्याला सुबोध आपल्याबरोबर लांब सहलींना आग्रहाने घेऊन जाई. हरणांची शिकार हा तेथील पुष्कळांचा आवडता षोक होता. अशा शिकारीत प्रत्यक्ष भाग घेतला नाही तरी तो अधून मधून हजर राही. सुबोध बरोबर जंगलखात्यातील जीपमधून त्याने आजुबाजूच्या जंगलात सफरी केल्या होत्या.

एकदा दाट झाडीतून त्यांची जीप चालली असतांना एक बाण वेगाने सूं सूं करीत आला आणि ड्रायव्हरच्या उजव्या अंगाला बसलेल्या राघवन् नावाचे पोलिस अधिकाऱ्याच्या उजव्या दंडाला चाटून खाली पडला. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. "झारोआ, झारोआ!" असे ड्रायव्हर पुटपुटला ते त्याने ऐकले. प्रसंगावधान राखून सुबोधने व त्याच्या सहकाऱ्याने आपल्या रायफलचे काड्काड् असे बार उडविले. ड्रायव्हरने जीप परत वळवली. वाटेने हातरुमाल भिजवून सदानंदाने त्या अधिकाऱ्याचा दंड घट्ट बांधला. झारोआ या जातीचे तेथील रानटी लोक विषाने माखलेले बाण मारतात हे त्याने ऐकले होते. अर्थात् हा बाण विषारी असेलच असे निश्चित सांगता आले नसते. पण विषबाधेच्या कल्पनेने

तो अधिकारी भीतीने अर्धामेला झाला होता. हॉस्पिटलमधे पोहोचल्यावर त्याने दंड नीट तपासला. जखम फारशी मोठी व खोल नव्हती. दंड जंतुनाशक द्रव्यानें धुवून त्याने झटपट चारपाच टाके घालून ती शिवली, औषधाची पट्टी लावून बँडेज करून टाकले व टिटॅनसचा धोका टाळण्या-साठीं प्रतिबंधक इंजेक्शनही दिले.

तो अधिकारी घामाने निथळत होता. आपण यांतून कसले वाचतो, अशीच समजूत त्याने करून घेतली होती. 'जखम आंतून जळतीय, माझा जीव फार गलबलतोय, मी आता मरणार', असे तो सारखे बडबडत होता. त्या बाणाला विष माखलेले असेल की नसेल ते एव्हांच खात्री-पूर्वक सांगता येणे कठीण होते. पण ती परीक्षा होण्यापूर्वी हा माणूस निवळ मनाच्या भीतीनें दगावेल अशी शंका सदानंदाला वाटली. त्याला कांहींतरी गुंगीचे औषध पाजून बळेंच झोपवावे असेही त्याच्या मनात आले, पण या कृत्रिम गुंगीमुळे विषाचा परिणाम कळण्याचा मार्ग खुंटला तर इतर उपचार करणेही कठीण होईल. हा दगावला तर त्याचा दोष आपल्या माथी येईल.—

या परिस्थितीत काय करावे याचा विचार तो करीत असतांनाच डॉ. शर्मांनी मोठ्या युक्तीने त्याला या विचित्र प्रसंगातून सोडविले.

"अहो मरणार तर मरणार, त्यांत काय? मरण काय कोणाला टळलें आहे? तुम्हांला ना मूल ना बाळ! मागे कसलीच काळजी नाही. मग मरणापूर्वी इतर काही बडबड न करता माझेबरोबर हरीचे नाव तरी घ्या," असे म्हणून त्या माणसाच्या उत्तराची वाटही न पहाता जयदेवाच्या 'जय जगदीश हरे'चा गजर मुक्तकंठाने गोड आवाजांत डॉ. शर्मांनी सुरू केला. भोलाबाबाचे संगतीत छान भजनें म्हणण्याची सवय त्यांना होती.

आपल्याला उपचार करायचे सोडून देवाची कवनें म्हणत बसलेल्या डॉक्टरवर मनाशी जळफळत रागाने भितीकडे तोंड फिरवून तो अधिकारी हताशपणे पडून राहिला. सदानंदाला डॉक्टरांच्या वागण्याचे कौतुक वाटले. ते येथील जास्त अनुभवी होते. इतक्या संथपणाने ते वागतात त्याअर्थी तो बाण विषारी नसावा हें उघड होतें. हळूच उठून त्याने औषधांचे कपाटांतून सिडेटिव्ह मिक्स्चर काढले व त्याचा डोस पेशंटला

दिला. रात्रभर शांत झोप लागल्याने सकाळी तो हुशारीने उठला. जखम फारशी गंभीर नव्हती. एका आठवड्यात ती सहज बरी झाली असती.

त्या अधिकाऱ्याच्या दोन दिवसांच्या हॉस्पिटलमधील वास्तव्यांत त्याची पुष्कळ माहिती सदानंदाला कळली. त्याचा जन्मच येथला होता. गुन्हेगारांबरोबरच कांहीं हिंदी मजूर जंगलसफाई, रस्ते बांधणे, घरे बांधणे, वगैरे कामासाठी इंग्रज सरकारने इकडे आणले होते. त्या-पैकीच एका तामीळ मजुराचा तो नातू होता. स्वतःचे सोयीसाठी तरी वस्तीला कोणी हवे, म्हणून अशा काही लोकांना रहायला लहान घरे व जमिनीचे तुकडे देऊन त्यांची वसाहत इंग्रज सरकारने केली होती. त्याचा बाप पी. डब्ल्यू. डी.त मुकादम होता. लहानपणी त्याचे येथील शाळेत प्राथमिक शिक्षण झाले होते. पुढे तो स्वतः पोलिसखात्यांत शिरला होता. साधा शिपाई, मग हवालदार, सुभेदार, असे चढतचढत आता तो सब्-इन्स्पेक्टर झाला होता. अंदमानद्वीपपुंजातील बहुतेक सर्व बेटें त्याने पालथी घातली होती. झारोआ व इतरही आदिवासी जमातींची त्याला खडान्खडा माहिती होती. काही वर्षांपूर्वी मद्रास-प्रांतातील आपल्या मूळगावी जाऊन त्याने मामाच्या मुलीशी लग्न केले होते. पण त्याची बायको त्याचेजवळ धडपणे कधी नांदलीच नव्हती. त्याच्या भटक्या नोकरीमुळे तिला पुष्कळदा एकटेच रहावे लागे. तिथल्या रहाणीला कंटाळून ती जी माहेरी गेली ती परत आलीच नाही. कुणी म्हणत, बायको माहेरी निघून गेली आहे असे तो आपली अब्रू संभाळ-ण्यासाठी सांगत असे पण, जमालसाहेब नावाच्या एका मुसलमान टिंबर मर्चंटकडे काम कराणाऱ्या एका छकड्या तामिळी छोकऱ्याबरोबर ती पळून गेली, अशी अंदरकी बात होती. वास्तविक अंदमानमधून असे गुपचुप पळून जाणे सोपे नव्हते. पण तो फिरतीवर गेला असतांना मद्रासकडे जाणाऱ्या बोटीवर तिने व तिच्या प्रियकराने जागा मिळविली होती. पुनः ते नजरेस पडले तर त्यांचा खून पाडण्याची प्रतिज्ञा तो दारूचे धुंदीत करीत असे. त्यांना शोधायला तो मद्रासची वारीही करून आला होता. इतकें करूनही त्याचा सगळा आटापिटा फुकट गेला होता. स्वतःच्या या अपमानाचा आणि असंतोषाचा राग तो

आपल्या हाताखालचे लोकांना निष्कारण सतावून आणि सर्वांशी अरेरावीने वागून बाहेर काढी. त्याचे मागे सर्वच त्याची टिंगल करीत.

१४

पोर्टब्लेअरमधे तात्पुरता नेमलेला सरकारी अधिकाऱ्यांचा वर्ग व वरचेवर बदलून येणारे नाविकदलांतील अधिकारी, हे वगळले तर कायम रहिवाश्यांत थोडेफार टिंबरचे व नारळाचे व्यापारी होते, व बाकीची सर्व वस्ती पूर्वी कामासाठी आणलेला मजूरवर्ग किंवा शिक्षेतून सूट मिळालेले गुन्हेगार यांच्यापासून झालेली होती. हा मिश्र हिंदी समाज होता. मजुरांत तामिळ लोकांचा खूप भरणा होता. पण गुन्हेगारांचे वंशज मात्र पंजाबी बाप तर कानडी आई, मराठमोळा बाप तर तामिळी आई, अशा विविध मिश्रणांचे होते. त्यामुळे येथे प्रामुख्याने हिंदीभाषाच बोलली जात असे. पण ही हिंदीसुद्धा तिथल्या माणसांइतकीच मिश्र होती. मध्यप्रदेशांतील संस्कृतप्रचुर, अलीगडचे उर्दूमिश्रित, राजस्थानचे ब्रज, यू.पी.चे मैथिली हिंदी, असे सर्व प्रकारच्या हिंदीच्या भाजणीचे हें कडबोळे होतें.

पोर्टब्लेअरपासून जवळजवळ दहाबारा मैल दूर पूर्वपाकिस्तानच्या निर्वासितांची नवी वसाहत होती. तेथेच लहानसे घर बांधून व शेतीवाडी करून सुबोधचे वडील स्थाईक झाले होते. सुबोध इतक्या दुरून स्कूटर-वरून रोज कामाला येत असे.

या वस्तीचे अलीकडे चार मैलावर पूर्वीच्या गुन्हेगारांची वस्ती होती. तेथे राहणारा कोंडीबा नांवाचा खूप म्हातारा गुन्हेगार सदानंदाच्या परिचयाचा झाला होता. सातारा जिल्ह्यांतील कुठल्याशा खेड्यात त्याचे सगळे नातगोत रहात होते. सावत्रभावाशीं जमिनीवरून झालेल्या भांडणात रागाचे भरात त्याने आपल्या भावाला डोक्यात धोंडा मारून घायाळ केले होते. त्या जबर जखमेमुळे पुढे त्याचा भाऊ मृत्यु पावला होता. या गुन्ह्यासाठी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. काही वर्षानंतर शिक्षेत सूट मिळून येथे वसाहत करायला त्याला परवानगी

मिळाली होती.—वैधव्याच्या अवस्थेत दिराने फशी पाडले अशा स्थितीत अन्नूला भिऊन गर्भपात केल्याच्या गुन्ह्यामुळे इकडे आलेल्या गंगव्वा नावाच्या हुबळीकडील कानडी बाईशी त्याने विवाह केला होता. त्या-वेळच्या तुरुंगातील हकीकती त्याने सदानंदाला मोठ्या रंगवून सांगितल्या होत्या. राजबंद्यांपैकी कांहीं बंगाली क्रांतिकारक त्याने पाहिले होते. पण तो येथे येण्यापूर्वी सावरकर बंधूंना येथून हालवून हिंदुस्तानात परत नेल्यामुळे त्या महात्म्यांचे दर्शन मात्र त्याला घडलेले नव्हते. त्याच्या विवाहाची हकीकत मोठी मंजेदार होती.—

साऊथ पॉइंट गेस्ट हाऊसच्या आजुबाजूच्या भागाला शादीपूर हे नाव आहे. पूर्वी त्या भागात स्त्री गुन्हेगारांचा स्वतंत्र तुरुंग होता, आणि सध्या जेथे हॉस्पिटल आहे तो भाग व त्याचे आतील बाजूला असलेला जुन्या तुरुंगाचा भाग असा मिळून एक मोठा तुरुंग होता. मधल्या टॉवरपासून तुरुंगाच्या सात भागांचे फाटे एकमेकांशी कोन साधून गेलेले होते. टॉवरच्या तळाशी जेलरचे ऑफिस असून त्या ऑफिसभोवतीच्या गोल व्हरांड्यांतून प्रत्येक फाट्याकडे जाण्याचा व येण्याचा रस्ता असे. प्रत्येक विभागाचे स्वतंत्र आवार व स्वतंत्र तटासारखी भित असून एका भागाच्या पाठीमागे दुसऱ्या भागाची दर्शनी बाजू येत असल्यामुळे एका जागेतील हालचाली दुसरीकडे कळत नसत. प्रत्येक कैद्याला रहायला स्वतंत्र सेल् असल्यामुळे या तुरुंगाचे नाव सेल्युलर जेल असे पडले आहे. राजबंद्याखेरीज इतरबंदिवानांना निमूटपणे काम केले व दंगाधोपा न करता मुकाटचाने हाल सोसले तर काही वर्षांनी तिकीट देण्यात येई. हे तिकीट मिळाले की त्या कैद्याला तुरुंगाचे आवाराबाहेर मोकळ्या हवेत जंगलसफाईचे कामाला पाठवीत. ही सवलत मिळूनही पळून जाण्याचा प्रयत्न न करता तो आज्ञाधारकपणे वागला तर आणखी काही वर्षांनी त्याला या बेटावर लग्न करून स्वतंत्रपणे रहायची परवानगी मिळे.

पुरुषाप्रमाणेच जन्मठेपेची शिक्षा भोगण्यास इकडे आलेल्या ज्या स्त्रिया असत त्यांना पण काही वर्षानंतर अशाच सवलती मिळत. विवाह करून येथे रहायला राजी असलेल्या स्त्री व पुरुष गुन्हेगारांना शादीपूरचे भागांत आणले जाई. फक्त हाताच्या पंज्याखेरीज बाकी सर्व अंग बुरख्याने झाकून स्त्री गुन्हेगारांना रांगेने उभे करीत. हिंदु, मुसलमान,

ख्रिस्ती अशा धर्माच्या स्त्रियांच्या वेगवेगळ्या रांगा असत, व आपल्या धर्माप्रमाणे त्या रांगेतील स्त्री, तिचा हात पाहून निवडण्याची सवलत पुरुष गुन्हेगाराला देण्यात येई. स्त्रियांना मात्र कसलीच मुभा नसे. वाटच्याला येईल तो जोडीदार त्यांना पत्करावा लागे. पण त्यामुळे ही लग्ने नेहमीच यशस्वी होत नसत. कित्येकदा नवराबायकोना एकमेकांच्या भाषेचा गंधही नसे. जोडीला हिंदीसारखी भाषा दोघांसही येत नसली की त्या जोडप्याची फार कुचंबणा होई. याचे जोडीलाच शारीरिक व मानसिक फरकही असे, व त्यांचे एकमेकात जमणे शक्य नसे. मग लग्नविच्छेद करून पूर्वस्थितींत तुरुंगाच्या कोठडीत त्यांना रहावे लागे. गुन्हेगारांच्या या 'शाद्या' त्या जागेत होत असल्यामुळे तिचे नाव 'शादीपूर' पडले होते.

कोंडीबा मराठमोळा शेतकरी नि गंगव्वा कानडी अम्मा असूनही त्यांनी सुखाने संसार केला होता. तुरुंगाचे मोडकेतोडके हिंदी दोघांनाही येत असे. याशिवाय कोंडीबाला थोडे कानडी शब्द माहीत होते बाणि गंगव्वाला चार मराठी शब्दांची ओळख होती. आता दोघेही थकले होते. त्यांचा मुलगा कोणा एका ऑफिसरचे घरीं माळ्याचे काम करीत होता, आणि मुलीचे लग्न एका बिहारी गुन्हेगाराच्या मुलाशी झाले होते. एके काळी भयंकार गुन्हेगार म्हणून काळ्यापाण्याची शिक्षा देऊन अंदमानला पाठवलेले हे बंदी हिंदुस्तानातील कित्येक संभावित लोकांपेक्षा जास्त सात्विक होते. त्या दोघांचे परस्परावरील प्रेम पाहिले व त्यांचे तोंडून जुन्या हकीकती ऐकल्या की सदानंदाचे मन भरून येई. दुष्टातले दुष्ट म्हणून या गुन्हेगारांना समाजाने वाळीत टाकून इकडे धाडले, पण योग्य संधि मिळताच त्यांतील कित्येकांनी मोठ्या सचोटीने दिवस काढले होते.

त्याचे उलट परिस्थिति पूर्वपाकिस्तानच्या निर्वासितांची होती. वास्तविक स्वतःचा देश सोडतांना सर्वांचेच नुकसान झालेले होते. समदुःखी या नात्याने त्या सर्वांना एकमेकाशी मनमिळून रहायला कसलीच हरकत नव्हती. पण त्यांतही तुझे माझे, तुला इतके तर मला तितके, असले हेवेदावे करून स्वतःचे नि दुसऱ्याचे समाधान नष्ट करण्याची घातकी खोड त्या लोकांत होती. सुबोधचे चुलत चुलते पण त्याचे वडिलासह वसाहतीला इकडे आले होते. आपल्या भावाला आपल्यापेक्षा

बरा असा जमिनीचा तुकडा वाट्याला आला आहे या कल्पनेने ते पावलो-पावली त्यांचा हेवादावा करीत. "मी चांगला ओळखून आहे तुला नि तुझ्या बापाला," असे ते कित्येकदा रागारागाने सुबोधला म्हणत.

हे सारे कानावर आले की त्याला उगाचच विषाद वाटे. भांडणाचे भरात 'मी अमक्यातमक्याला पक्का ओळखून आहे,' असे कोणाच्या तोंडून ऐकेले की त्याच्या मनात येई, ही माणसे दुसऱ्यांना ओळखायचे सोडून थोडे स्वतःलाच ओळखतील तर जगांतील कित्येक असंतोषाच्या बीजांचा नाश होईल. दुसऱ्याच्या चुकांची काटेकोरपणाने छाननी करणारा माणूस कित्येकदा स्वतःलाच फसवीत असतो. आपण स्वतः फार सज्जन व बाकीचे सगळे लबाड हे जगाला भासविण्याचे धडपडींत तो नकळत आपल्याशींच प्रतारणा करीत असतो. आपला लबाडपणा दुसऱ्यांच्या नजरेस येऊ नये म्हणून त्यावर संभावितपणाचे पांघरुण घालतांना आपल्या मूळ पिंडात दडलेल्या सद्भावना आणि सद्वासना यानांही तो स्वतःचे मनापासून झाकीत असतो. आणि मग स्वतःच्या चुका आपल्या मनाशी कबूल करायला सुद्धा त्याला भीति वाटू लागते.

समाजात कितीशा व्यक्ति स्वतःशी प्रामाणिक असतात ? वरिष्ठांचे, आप्तेष्टांचे व आजुबाजूच्या लोकांचे इतकें दडपण त्यांच्या मनावर असतें की निर्भयतेने व निःसंकोचपणाने आपली मते व विचार चार लोकांत प्रगट करण्याची त्यांना चोरी वाटते. असे दडपणाखाली वागतावागता मग तो खोटेपणा नकळत आंगवळणी पडतो व त्याची सवय होते. दुसऱ्याच्या डोळ्यात धूळ टाकतांना माणूस स्वतःलाही चकवतो आणि आपल्या मूळ प्रकृतीला मुकतो.

माणसाने नसती बंधने व दडपणे न मानता विचाराने स्वतंत्र असावे असे आपले मत वादाच्या भरात त्याने बोलून दाखविले असतांना, "आपण स्वैर वागण्याचे पुरस्कर्ते आहात तर ! पण बंधनाशिवाय आणि शिस्ती-शिवाय माणसाची नीतिमत्ता वाढेलच कशी ?" असा टोमणा त्याला ऐकून घ्यावा लागला होता.

एखादे रोपटे आपण लावले की तें नीट वाढेपर्यंत, गुरांनीं खाऊ नये किंवा तुडविले जाऊ नये म्हणून, आपण त्याचेभोवती काटेरी कुंपण घालतो. पण तें रोपटे वृक्षाचे रूप घेऊ लागले तरीसुद्धा ते कुंपण तसेच ठेवण्याचा

अट्टहास चालू ठेवला तर ते झाड वाढेल की खुरटेल? माणसाच्या शरीराची मनाची आणि बुद्धीची पूर्ण वाढ झाल्यानंतर कुणाच्याही दडपणाखाली न राहता स्वतंत्र विचार करून व स्वानुभवाने आपली मते बनवून आत्मविकास करायला हवा. पण असे कितीजण करतात? किती आईबाप आपल्या मुलांना हे विचारस्वातंत्र्य देतात?

"अहो, तुम्ही स्वतः लग्न केलेले नाही व तुम्हास कसला पाश नाही म्हणून या बडचाबडचा गप्पा तुम्ही ऐकवीत आहात. चुकूनमाकून कधी लग्न केलेत आणि तुम्हाला मुले झाली तर मग पाहू त्यांना कसे वाढविता ते!" त्याच्या मतप्रदर्शनानंतर हे त्याला ऐकून घ्यावे लागले होते. तेव्हापासून ही आपली मते तो फारशी कोणाला ऐकवीत नसे. इतरांचे सुविचार ऐकून घेण्याचे सौजन्य पुष्कळांत नसते. गांधींच्या हृदयपालट वगैरे तत्त्वज्ञानांतील फोलपणा अशाच कित्येक अनुभवांमुळे त्याला पटला होता. स्वतःचे अंतःकरण न ओळखणारा दुसऱ्याच्या हृदयांत काय पालट करणार? दुसऱ्याचे शहाणपण कोणीही ऐकून घेत नाही, आणि एका दृष्टीने तेच योग्य. ज्याने त्याने आपल्या अनुभवाने शहाणे व्हावे. कुठलीही चांगली गोष्ट मोबदला दिल्याशिवाय मिळत नसते. वाईट अनुभवांच्या मनस्तापाची झळ लागल्याशिवाय शहाणपणा तरी कसा मिळावा?

१५

मधूनच कधीकधी मणीचा अश्रूंनी मलूल झालेला चेहरा त्याला आठवे. त्या रात्री कानावर आलेली ती किंकाळी व खळ्कन् कांहीं तरी फुटल्याचा आवाज तो मनाशी आठवून पाही. दुसऱ्या दिवसी सकाळी खिडकीत दिसलेला तिचा कष्टी चेहरा मनापुढे आला की ती किंकाळी तिचीच असावी असे त्याला वाटे. परंतु तिला असे दुःख कशामुळे झाले याची मात्र काहीच कल्पना त्याला करता येत नव्हती.

तीनचार वेळा अंदमानक्लबमधे परितोषबाबूंची नि त्याची गाठ पडली होती. त्यांच्या गाडीतून त्यांना इकडेतिकडे जातांना पण त्याने काही

वेळा पाहिले होते. परंतु दरवेळी ते एकटेच होते. त्यांच्या बंगल्याच्या रस्त्यावरून तो फिरतफिरत गेला होता तेव्हां बंगल्यातील सामसूम पाहून, त्यांच्या कुटुंबातील मंडळी येथे आलेली नाहीत हे त्याने ओळखलें.

एक दिवस जेलच्या खालील अंगाने समुद्रकाठाने गेलेल्या वळणदार रस्त्यावरून तो चालला असतां, अचानक परितोषबाबूंची गाडी मागून पुढे जातांना मधेच थांबली. मागचे दार उघडून बाहेर येत ते म्हणाले, "काय, डॉक्टर, भेटतच नाही कधी? काल अंदमानक्लबचे पार्टीत कसे दिसला नाहींत?"

"कालच्या निमंत्रणाबद्दल मी विसरूनच गेलो. काम संपवून काल जरा बाजारात गेलो होतो, तसाच खाली फिरतफिरत चट्टम आयलंडच्या ब्रिजपर्यंत गेलो आणि मग परतायला रात्र झाली."

"तुम्हाला फिरायची बरीच आवड दिसते. मग एखादे दिवशी सकाळी आमच्या बंगल्याकडे का नाही चक्कर टाकीत? मॉर्निंग वॉक तर चांगला!"

त्याला वाटले त्यांना म्हणावे तुमच्या नकळत अशा कितीतरी चकरा मी तुमच्या बंगल्यापुढून मारल्या आहेत. पण प्रत्यक्षात मात्र तो म्हणाला, "ते खरे, पण सकाळी आठलाच ड्यूटीवर जावे लागते, मग सकाळी कुठला वेळ व्हायला?"

"हो, बरोबर आहे. मग संध्याकाळी या की कधी. आतांच येता का? मी आणखी आठ दहा दिवसच येथे आहे, मग मला कलकत्त्याला जावे लागणार आहे."

"आतां नको, येईन परत कधीतरी."

"मग उद्या संध्याकाळी याल का?"

"बरं. उद्या येईन."

त्याच्याशी हस्तांदोलन करून ते गाडीत चढले. शोफरने गाडीला वेग दिला व वळणावर गाडी दिसेनाशी झाली.

पोर्टब्लेअरच्या आसपास व लाँग आयलंडच्या भागांतही परितोषबाबूंच्या मालकीची बरीच मोठी नारळाची लागवड होती. म्हणून इथले लोक त्यांना गंमतीने 'किंग कोकोनट' असे म्हणत. या भागांत किंग कोकोनट नावाची एक नारळाची विशिष्ट जात आहे. हें झाड सात फुटापेक्षा उंच

वाढत नाही, व त्याचा बुंधा इतर जातीच्या नारळींपेक्षा जाड असतो. या बुटक्या नारळाचे झाडाला एकेक वेळी मोठमोठे आठ दहा नारळ लगडतात, व ते एखाद्या उंच माणसाला सहज हाताने तोडता येतात. परितोषबाबूंचा बेताच्या उंचीचा जाडसर बांधा त्या झाडासारखाच होता, त्यामुळे हे नाव त्याना चांगले शोभून दिसे.

दुसऱ्या दिवशी परितोषबाबूंच्या बंगल्यातील बैठकीच्या खोलीत परितोषबाबूंनी पुढे केलेला मद्याचा प्याला त्याने नाकारलेला पाहून त्यांना नवलच वाटले. त्याच्यासारखा सडाफटिंग, सिगारेट दारू व स्त्री यांत न गुरफटला तरच आश्चर्य ! तो संकोचाने नको म्हणत असेल असे वाटून ते म्हणाले, "घ्या हो. आताशा बहुतेक सगळेच या पेयाचे दोस्त असतात. पूर्वीसारखी या प्रकाराची झाकपाक करायची गरज उरलेली नाही."

"जर पीत असतो तर कुणाच्याही निंदास्तुतीची मी परवा केली नसती, पण हे पेय मी घेत नाहीं तेव्हा ते सांगण्याची पण मला भीड वाटायचे काय कारण ? आताशा सगळेच पितात म्हणून मी पण प्यायले पाहिजे असे थोडेच आहे ? माझ्या मनाला त्याची आवश्यकता अजून तरी वाटलेली नाही."

"मग आज पिऊन बघा. एकदम खूष होऊन जाईल तब्बेत. चला, तुम्हाला एक नवा धडा देण्याचा पहिला मान मिळू दे मला."

"नको, परितोषबाबू. हे पिण्याची माझ्या मनाला खरोखरच कधी इच्छा झाली तर तो धडा घ्यायला मी आपण होऊन तुमच्याकडे येईन."

—मग तो विषय तेवढ्यावरच राहिला. त्याचेसाठी लेमनस्क्वॉश मागवून ते स्वतः सोड्याची बाटली फोडून व्हिस्कीचे ग्लासांत ओतू लागले. गप्पाचे ओघात, काही महिन्यापूर्वी एम्. व्ही. अंदमान बोटीने तो इकडे आला होता तेव्हां प्रथम परितोषबाबूंना त्याने बोटीवर कोणाला तरी उतरून घ्यायला आलेले पाहिल्याचे त्याने सांगितले. त्यावर ते म्हणाले, "त्या बोटीत तुम्ही होता तर ! माझी पत्नी, माझी पुतणी आणि माझ्या पत्नीचा भाचा तेव्हां इकडे आले होते."

रात्री सदानंदाने त्यांचे घरी जेवावे असा आग्रह त्यानी केला. पण त्या दिवशी जेलरसाहेबाकडे त्याला जेवायला जायचे होते.

"पुन्हा येईन कधी तरी. मला काय सडचा माणसाला, कुठेतरी जेवायचे. त्यातून मी आहे ब्राह्मण, तेव्हां 'ब्राह्मणो भोजनप्रियः' या उक्तीनुसार भोजनाच्या निमंत्रणाचे मला वावडे नाही."

त्याच्या या कोटीवर ते त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे गदगदा हासले होते.

१६

एकदा बाजाराच्या मुख्य चौकातील जॉडवेट् कंपनीच्या मोठ्या दुकानातून काही सामान आणण्यास तो गेला असतांना परितोषबाबूंची गाठ पडली. त्यांचे बरोबर एक काळाकुट्ट, जाड, उंच, पुढच्या दोन दातांवर सोन्याचे पत्रे बसवलेला एक इसम होता. त्याच्या वर्णाला शोभणार नाही इतका शुभ्र पोषाख त्याचे अंगावर होता.

"हॅलो, डॉक्टर, कसली खरेदी चालली आहे ?"

"ताज्या भाज्या आणि फळे मनाजोगी मिळत नाहीत, मग असल्या टिन्च्या मालावर भागवावे लागते," असे तो म्हणाला.

अति पावसामुळे आणि खडकाळ जमिनीमुळे भातशेती, नारळ, केळी, अननस, याखेरीज फारसे काही या बेटांवर पिकत नसे. गरजेच्या आवश्यक गोष्टीसाठी मेनलँडवरच ती बेटे अवलंबून असत. पंधरा दिवसानी एकदा कलकत्त्याहून बोट येई, व त्यांतूनच गरजेच्या वस्तु आणल्या जात. काही कारणाने बोट उशिरा आली, किंवा माल नीट पाठवला गेला नाही, की येथे रहाणाऱ्यांची कुचंबणा होई. जिनसा बऱ्याच महाग असत. संसारी लोकांना हे विशेष जाणवे.

हव्या त्या मालाची खरेदी उरकून तो निघाला तेव्हा परितोषबाबू त्यांचे जोडीदाराला म्हणाले, "निरंजनबाबू, हे डॉ. सदानंद—येथील नवे डॉक्टर.—आणि डॉक्टर, हे निरंजन दास, एम्. पी. आहेत ! या बेटांचे हे प्रतिनिधि असल्यामुळे आपल्या सर्वांच्या सुखसोयी पहाण्याचे काम यांचेकडे आहे. तुमच्या काही अडचणी किंवा मागण्या असल्या तर बोला ! सरकारदरबारी तुमची गाऱ्हाणी पोहोचलीच म्हणून समजा."

परितोषबाबूंच्या अघळपघळ हास्याला आपल्या हॅः हॅः चो जोड देत व सोनेरी दात दाखवित त्याने सदानंदाशी हस्तांदोलन केले. हा माणूस एम्. पी. आहे हे ऐकून त्याला वाटले, ठीक ! आपल्या राज्याची धुरा वहाणाऱ्यांच्या प्रभावळीत शोभेल अशीच वल्ली आहे.

नंतर काही दिवसानी हॉस्पिटलचे काम पहाण्याच्या व त्यांच्या काही मागण्या असल्या तर त्या ऐकण्याच्या निमित्ताने तो ॲसिस्टंट कमिशनर-बरोबर हॉस्पिटलमधे आला होता. असे कोणी व्ही. आय्. पी. येणार असले की हॉस्पिटलचे वॉर्ड जंतुनाशक द्रव्याच्या नेहमीपेक्षां जास्तच उग्र वासाने दरवळत. नर्सेस्चा आणि वॉर्डबॉइज्चा पोषाख विशेष टापटिपीचा असे. रोग्यांचे विछान्यावर शुभ्र चादरी दिसत. आणि खालच्या जमादारा-पासून वरच्या डॉक्टरपर्यंत सगळेच त्या दिवशी रोग्यांशी आस्थेवाईकपणे वागत.—सरकारी पैशाचा विनियोग योग्य रीतीने होत आहे असे दाख-वायला हवे, मगच आणखी गरजा पुढे करून जास्त कांहींतरी हक्काने मागून घेता येईल—हे या मागचे धोरण होते. सगळाच देखावा, सगळेच ढोंग !

याच ठिकाणी नव्हे तर इतरत्रही, रोग्यांचे नाव पुढे करून मिळवलेल्या सवलतीवर हॉस्पिटलचे अधिकाऱ्यांनी हात मारायचा, सरकारचे प्रतिनिधि म्हणून तपासणीला येणाऱ्यांचीही यात भागी असायची, मागण्या मंजूर केल्याचा शेरा मारून कागदपत्र वरिष्ठांच्याकडे गेले की तेथे फालतू चर्चेत थोडा वेळ जायचा, व त्या मागण्या पुऱ्या करण्याबद्दल स्वतःला कितपत फायदा मिळेल याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे जलद किंवा दिरंगाईने मागण्या मंजूर व्हायच्या; इतके सगळे होऊनही हॉस्पिटलच्या रोग्यांची कुचंबणा संपतच नसे.

उडिया जातीच्या कामकरी कुटुंबातून निरंजन दास पुढे आलेला होता. येथील सरकारी शाळेत मॅट्रिक झाल्यावर कलकत्त्याच्या कॉलेजात त्याने एकदोन वर्षे घालविली होती. अंदमानातील खालच्या वर्गात त्याच्या तोडीचा कोणीच नसल्यामुळे तो निवडून आला होता. एका साध्या लाकडाच्या झोपडीत तरटावर निजणारा आणि सायकलवरून मैलच्या मैल तुडवीत पोटासाठी भटकणारा हा माणूस एकदम दैवाचे चक्र अनुकूळ फिरल्यामुळे महाभाग झाला होता. त्याचे मार्फत आपल्या गरजांची दाद घेतली जाईल या भोळचा समजुतीने कामकरी वर्ग त्याचेकडे आदराने

पहात असे. व्यापारीवर्ग इतका भोळा नव्हता. यॅा माणसाला लोणी लावले तर आपल्याला व्यापारी सवलती मिळतील, ह्या स्वार्थासाठी आपापल्या गाड्या त्याचे दिमतीला देणे, स्वतःच्या बंगल्यात त्याला मेजवानीला बोलावणे, त्याचेप्रीत्यर्थ क्लबात खास कार्यक्रम करणे, वगैरे प्रकार मोठ्या चुरशीने चालत. थोड्या दिवसासाठी येथे आलेला सरकारी अधिकारीवर्ग विचार करी, हा इथला स्थानिक पुढारी आहे. याला हाताशी धरले तर आपले येथील वास्तव्य आरामात जाईल.—असा सगळ्याच वर्गांकडून झेलला गेल्यामुळे तो माणूस चढून गेला, व स्वतःची खरी लायकी न ओळखता ऐट दाखवूं लागला तर त्यात काय नवल? मोठे होण्याची संधि त्याला मिळाली नसती तर प्रामाणिकपणाने उपार्जनाचा मार्ग शोधून साधे आयुष्य त्याने घालविले असते. पण हा नसता मोठेपणा अंगी चिकटल्यामुळे त्याच्या पूर्वजांनी कल्पनेतही कधी न पाहिलेली चैन तो भोगीत होता. विमानाचा प्रवास, दिल्लीतील थाटबाज रहाणी, मोठे मोठे सेमिनार, पाटर्चा व क्लबातील कार्यक्रम यात भाग घेणे—या सगळ्यामुळे एम्. पी. होणे म्हणजे चैन करणे एवढेच त्याला कळले होते. त्याला बुद्धिबळांतील सोंगटीसारखे नाचवणारे वरचे पुढारी ती त्याची समजूत पक्की करीत होते. जनतेच्या हितासाठी तो खरोखरच काही करू लागला तर त्यांना धोका होता. त्यामुळे त्याला या डामडौलात रमवून त्याची दिशाभूल करणे त्यांना भाग होते. आपल्या या लोकशाहीमुळे असे नालायक लोक जोंवर पुढे येत आहेत तोंवर देश उन्नतीला येण्याचे स्वप्नसुद्धा बघण्यात अर्थ नव्हता. सदानंदाला या सगळ्या प्रकाराची मनापासून चीड येई व आपण यात काही करू शकत नाही या जाणीवेने त्याला खेद वाटे. त्याचा हा मनस्ताप पाहिला की, डॉ. शर्मा म्हणत, "बेटा, आपण आपल्या सद्वर्तनाबद्दल जागरूक असावे. इतरांच्या गुणदोषांवर टीका करण्याचा आपल्याला काय अधिकार? आणि आपली टीका तरी कोण ऐकून घेणार?"

"ते खरे, चाचाजी. पण आपला समाज इतका अधोगतीला चालला आहे की त्यात सरळमार्गी माणसाला सुखाने राहणे अशक्यच!"

"माझ्यासारख्या म्हाताऱ्याने असे हताशपणाचे उद्‌गार काढले तर ते एकवेळ शोभून दिसतील, पण तू तरुण आहेस. काही झाले तरी तू

निराश होता कामा नये. असा मनाने खचून गेलास तर नकळत या अधोगतीला तू शरण जाशील. धीराने मान वर ठेवलीस व शौर्यानें झुंजत राहिलास तर तुझे उदाहरण पाहून तुझ्यासारखे काही नवजवान धिटाईने तुझ्या जोडीला येतील, आणि तुमच्यासारखे काही विचारवंत व कर्तबगार तरुण एकत्र येऊ शकले तर त्यांतूनच उद्धाराचा मार्ग निघेल. प्रवाहाविरुद्ध पोहण्याइतके हें कठीण आहे खरे, पण त्यात तुझ्या शौर्याची कसोटी आहे. धीर सोडू नको. माणसाने इतर कांहीं करावे, पण हातपाय गाळून कधीहीं बसू नये."

—डॉ. शर्माचे हे उपदेशाचे शब्द अमृतवाणीप्रमाणे मधुर व मनाला तजेला आणणारे होते. त्यांचेशी बोलत बसण्यात त्याला नेहमीच फार सुख वाटे.

१७

एका रविवारी सकाळीच परितोषबाबू त्याचेकडे आले. पॅन्टवर चढवलेल्या ब्रीचेस्, सन्-हॅट, हॅवरसॅक, व छोटी स्टेन्-गन् हा त्यांचा वेश पाहून जवळपास कुठे तरी शिकारीला जाण्याचा त्यांचा बेत असावा हे त्याने ताडले.

"आज कुठे शिकार मारणार?" त्याने विचारले.

ते म्हणाले, "शिकार नाही, आज तुम्हाला नॉर्थ-बेला घेऊन जायला आलो आहे. इतके दिवस येथे आहात, पण हत्ती लाकडांचे ओंडके एकत्र रचून ते होडीवर कसे चढवतात हे ऑपरेशन तुम्ही कधी पाहिले आहे काय?—नाहीं ना? माझ्याच बागेतल्या कांही वठलेल्या झाडांना तोडून आज माल इकडे आणायचा आहे. मग येणार ना?"

जरा वेळ विचार केल्यासारखे करून तो म्हणाला, "बरं, चला." —त्याला त्या दिवशी दुसरे काहीच काम नव्हते, तेव्हा सारा दिवस त्यांचे संगतीत राहून ही सफर करण्याचे त्याने कबूल केले.

चट्टम आयलंडच्या मुख्य धक्क्याचे उत्तरेस थोड्या अंतरावर खाजगी होड्यांसाठी एक लहानसा स्वतंत्र धक्का होता. तेथे त्यांच्या मालकीच्या

दोन मोटरलाँच नांगर टाकून उभ्या होत्या. ते आपल्या नोकराला म्हणाले, "मन्सूर हम आज सुंदरीसे जाएंगे. तुमलोग समुंदरीसे पीछे आना."—सुंदरी व समुंदरी ही त्यांच्या खाजगी बोटींची नावे होती.

सुंदरी छोटीशीच पण नावाप्रमाणे सुंदर होती. छोटी इंजिनरूम, त्याचे मागील बाजूला दोन लहान बर्थची केबिन, दोन्ही बर्थचे बाजूला लहान तीन खिडक्या, इतर दोन बाजूंना एक इंजिनरूममधील माणसाशी बोलता यावे अशी खिडकी, व दुसरी विरुद्ध बाजूला वरच्या त्रिकोणी डेक कडे उघडणारी लहानशी दारासारखी खिडकी, आणि तिचे खाली केबिन-मधे उतरण्यास दोन पायऱ्या अशी तिची रचना होती. इंजिनरूममध्ये शिरून त्यांनी मोटर सुरू केली तेव्हा फट्फट् असा, फटफटी सुरू करावी त्याप्रमाणे आवाज झाला. मन्सूरने त्यांचे सामान केबिनचे आंतील भागात आणून ठेवले, व "जागलूला बरोबर देऊ का?" असे विचारले.

"नको नको. आम्ही होतो पुढे. मात्र तुम्ही सगळे निघाच मागोमाग," असे म्हणून त्यांनी लाँचचे तोंड हळुहळु फिरवण्यास सुरवात केली. इतर लाँच व होडच्या यांतून आस्ते आस्ते वाट काढीत समुद्राच्या मोकळ्या भागात लाँच शिरली तेव्हां त्यांनी वेग वाढवला. मागे पाणी घुसळल्याचा आवाज व इंजिनचे फट्फट् यातून वेगाने मार्ग कापीत लाँच निघाली. बघताबघता लाँग आयलंडच्या किनाऱ्याजवळची झाडी नजीक येऊ लागली. इतका वेळ पोर्टब्लेअर शहराचे आड दडलेले रॉस आयलंड पण दिसू लागले.

लाँग आयलंडचे उत्तर टोकाला नॉर्थ पॉइंट म्हणून उंच डोंगराचा सपाट कडा आहे. तेथे एक डाकबंगला आहे. याच डाकबंगल्यात पूर्वी तुरुंगातून पळालेल्या एका गुन्हेगाराने युरोपिअन कमिशनरचा खून केला होता. त्या कडयावर कमिशनरचे भूत दिसते असा येथील स्थानिक लोकांचा समज कित्येक वर्षे होता, त्यामुळे इकडे कोणी फिरकत नसे. पण आता वरपर्यंत मोटरचा रस्ता व कँटिन वगैरे सोई केल्यामुळे काही षोकीन ऑफिसर कधीमधी तेथे जातात.

लाँचचा वेग आणखीच वाढला. आता पोर्टब्लेअरची तुरळक घरें व झाडी आराशीत मांडल्यासारखी दिसू लागली. समुद्राच्या उसळणाऱ्या लाटांतून ती चिमुकली लाँच धिटुकलेपणाने पाणी कापीत पुढे चालली होती.

समोरून भिंतीसारखी उंच लाट दिसू लागली की सदानंद खिडकीची चौकट घट्ट पकडून धरी, कारण त्या लाटेवर चढून लाँच पाण्याशी काटकोन करून जवळजवळ खडीच होई व एकदम तितक्याच वेंगाने खाली आदळे. एकेक वेळी अशी प्रचंड लाट आली की त्याला वाटे, ही छोटी बोट या माऱ्यापुढे कशी टिकणार?—पण परितोषबाबू संथपणे चिरूट ओढीत उभे होते. या हेलकाव्यांनी त्यांचा तोलसुद्धा जात नव्हता, त्याअर्थी असल्या प्रवासाची त्यांना सवय असावी. त्यांना मुक्कामाला पोहोंचायला मध्यान्ह झाली. ऐन दुपारचे ऊन डोक्यावर रणरणत होते. पण बेटावर पोहोंचल्यावर झाडांच्या गर्द छायेत समुद्राचा शीतल वारा अंगावर घेतल्यावर तो शीण केव्हांच दूर झाला.

वाटेने लहान मोठी कितीतरी बेटें त्यांनी मागे टाकली होती. प्रत्येक बेट लागले की त्याचे नाव ते सदानंदाला ऐकवीत. ती सगळी नावे लक्षात राहणे कठीण होते, पण दोन नावे मात्र त्याचे ध्यानात राहिली. एक व्हॅम्पायर आयलंड, हे नुसत्या सर्प जातीचे राखीव वसतिस्थान म्हणून, व दुसरे गोट आयलंड हे शेळ्यामेंढ्यांचेंच राज्य म्हणून. गोट आयलंडची हकीकत मजेची होती. एकदा मेनलँडकडून खूपशा बकऱ्यांनी भरलेले एक जहाज तिकडे येत होते. या बेटाचे किनाऱ्यावर आपटून ते फुटले. जहाजावरची सगळी माणसे मेली, पण बऱ्याचशा बकऱ्या मात्र सुदैवाने किनाऱ्याला लागल्या. त्यांचा अफाट वंश तेथे वाढला. त्यामुळे या बेटाचे नाव गोट आयलंड असें पडले. तेथल्या बकऱ्या इतक्या माजलेल्या आहेत की कोणी त्यांना पकडू लागले तर त्यांच्या एका ढुसणीने गारद व्हायची वेळ येते. त्या बेटाजवळून जातांना त्यातली एखादी तरी आडदांड बकरी दिसावी म्हणून बेटावरच्या झाडीकडे नजर ताणून सदानंदाने पाहिले, पण त्याला एकही बकरी आढळली नाहीं.

इथल्या बेटांवर तऱ्हतऱ्हेचे साप, कानखजुरे नावाने ओळखल्या जाणाऱ्या खूप मोठ्या आकाराच्या गोमा, जळवा वगैरेंचा उपद्रव आहे. पण वाघ, सिंह, चित्ता, असलीं हिंस्र श्वापदें अजिबातच नसल्यामुळे हरणे, कोकरे, वगैरे जंगलांत बिनधोक संचार करू शकतात. आपल्याकडे गावात जशी बकरी इकडे तिकडे चरतांना आढळतात तशी येथे छोटी छोटी पिवळट, तपकिरी रंगाची, पाठीवर ठिपके असलेली गोजिरवाणी

हरणे बागेच्या कुंपणाचे हेज् खायला आलेली दिसतात, व ते पाहून मजा वाटते.

सर्कशीत शिकवून तयार केल्यासारखा शिस्तीने व बिनचूक काम करणारा तो लहान मोठा हत्तींचा कळप पाहून त्याला गंमत वाटली. मन्सूर व इतरही नोकर कामाची व्यवस्था बघण्यास होते. त्यामुळे ते दोघे बेटाच्या आतील रमणीय भागांत एका लहान तळ्याकाठी मोठ्या झाडाखाली सतरंजी अंथरून बसले. परितोषबाबूंच्या बरोबर फराळाच्या इतक्या प्रकारच्या जिनसा होत्या कीं फक्त दोघांसाठी एवढे जंगी वनभोजन कशाला, असे त्याला वाटले. आग्रहाने त्याला बरेच प्रकार खायला लावून, व जिनसा चांगल्या बनविल्याबद्दल बटलरला धन्यवाद देऊन त्यांनी खाण्याचे जोडीला पिण्याचेही सत्र सुरू केले. बरेच मद्य पोटात जाऊनही त्यांचा तोल सुटला नव्हता, त्यावरून ते पट्टीचे पिणारे असावे हें उघड होते.

सूर्यास्तानंतर ते परत फिरले. मद्याच्या अंमलामुळे ते नीटपणाने लाँच परत आणतील कीं नाही असे वाटून बरोबर कोणाला तरी घ्यावे असे त्याने सुचविले. त्याच्या मनांतील भीति ओळखून ते गदगदा हासत म्हणाले, "फिकीर करू नका. अगदी सुखरूप तुम्हाला घरी पोहोंचवतो."

चांदणी रात्र होती. समुद्राच्या हलत्या पाण्यावर चंद्रकिरणांचे कवडासे रुप्याच्या तुकड्यासारखे चमकत होते. आजुबाजूची बेटे एखाद्या मोठ्या काळ्या मातीच्या ढिगासारखी दिसत होती. काही बेटांच्या माथ्यावर दीपगृहातील कार्बाइड्चे ऑटोमॅटिक दिवे उघडमिट करतांना दिसले की एखादी मोठी चांदणी चमकल्यासारखी वाटे. लाँचच्यापुढील फ्लड्लाइटने समुद्राचा तो भाग प्रखर प्रकाशाने उजळल्यासारखा दिसे.

परितोषबाबूंनी आज एखाद्या जिव्हाळ्याच्या नातलगाप्रमाणे त्याला वागवले होते. घरच्या कित्येक गोष्टी त्याचेपाशी ते मनमोकळेपणाने बोलले होते.

त्यांची पुतणी मणि ही मोठी गुणी नि गोड पोरगी आहे असे ते म्हणाले होते, त्यावरून त्यांचा जीव तिच्यावर असावा असे दिसले. त्यांच्या बायकोच्या मनात मणीने तिच्या भाच्याशी लग्न करावे असे आहे, पण या बाबतीत अलिकडच्या मुली थोडेच वडील माणसांचे ऐकतात? —"बाकी मी असे म्हणतो खरा, पण आमच्या तरुण वयात आम्ही

दोघांनीसुद्धा वडील माणसांना धाब्यावर बसविले होते. आमचा आंतर्जातीय प्रेमविवाह आहे. त्यावेळच्या काळात ही गोष्ट समाजात पटण्यासारखी नव्हती. आमच्या घरांत तर यामुळे मोठेच वादळ झाले होते. बाबांनी माझें तोंड न पहाण्याची प्रतिज्ञा केली होती. माझ्या सासऱ्यांनी मात्र फारशी धूसफूस न करता आम्हाला जवळ केले. सात वर्षापूर्वी ते वारले. त्यांच्या मालकीच्या चहाच्या मळ्यांचा धंदा मीच पाहतो. येथील नारळीची बागाईत मात्र मी खरेदी केलेली आहे," असे ते म्हणाले.

त्यांच्या बायकोची भाऊ-भावजय त्यांच्या लग्नापूर्वी अपघातात दगावले होते. त्यामुळे या भाच्याची जबाबदारी त्यांचेवर होती. त्यांच्या सासऱ्याने मरतेवेळी स्वतःची इस्टेट मुलीचे व नातवाचे नावे करून ठेवली होती पण त्यांचा भाचा वयाच्या मानाने जरा पोरकटच असल्या-कारणाने दोघांची इस्टेट संभाळण्याचा भार त्यांचेवरच होता.

मोटरलाँचमधून परत येत असतांना ते म्हणाले होते, "मला मणीची मोठीच काळजी लागली आहे—मी इकडे येण्यापूर्वी आमच्या कलकत्त्याच्या घरांतून ती एक दिवस कोणालाही न सांगता निघून गेली. माझ्या तर तोंडचे पाणीच पळाले. गावात ओळखीच्या व नात्याच्या सर्व लोकांकडे चौकशी केली. इतकेच काय, पण ती पूर्वी शांतिनिकेतनला होती म्हणून तिकडेही जाऊन आलो. शेवटी, माझ्या टेबलावर एका पुस्तकाखाली तिने लिहून ठेवलेली चिठ्ठी मिळाली.—'नोकरी करून स्वतंत्र रहावे म्हणून मी निघून जात आहे, माझी काळजी करूं नका व शोधही करू नका,' असे तिने लिहिले होते. पण काळजी करू नका म्हणण्याने काळजी थांबते का? माझी बायको तिच्यावर, तिने लग्नाचे नाकारले म्हणून, रागावली होती. पण यामुळे मणीवर घर सोडण्याचा प्रसंग येईल अशी मात्र माझी कल्पना नव्हती. ती माझ्या मोठ्या भावाची एकुलती एक मुलगी आहे. खरे पाहिले तर आमच्या घराची ती एकटी वारस आहे. मरतेवेळी दादाने तिचा सांभाळ कर असे मला बजावले होते. आता ही सापडली नाही तर एक प्रकारे विश्वासघाताचे पातक माझ्या माथी येईल! या अफाट जगात तिच्यासारख्या कोवळ्या मुलीचा कसा निभाव लागणार? तिचे काही बरेवाईट झाले तर मी काय करायचं?"

भावनावशतेने परितोषबाबूंना गहिवरून आले होते. कसलाही आडपडदा न ठेवता ते इतक्या मोकळेपणाने बोलले याचे त्याला नवल वाटले. अति सुखात काय किंवा अति दुःखात काय, माणसाला कोणीतरी समभागी हवा असतो. असे मनमोकळे बोलले की आपल्या चिंतेच्या ओझ्यातील थोडासा तरी वाटा दुसऱ्याला दिला या कल्पनेने जरा हलके वाटत असावे. आता या परिस्थितीत त्यांचे कोणत्या शब्दांनी सांत्वन करावे हें त्याला कळेना. आपले मनही या काळजीने भरले आहे असे त्याला वाटले.

रात्री पुढच्या व्हरांड्यातून दिसणाऱ्या चंद्रबिंबाकडे बघत तो मनाला विचारीत होता—'खरंच, कुठं गेली असेल मणी?' तो स्वतः मन मानेल तसा हवा तिथे फिरलेला होता, पण तो पुरुष होता. समान हक्कांच्या कितीही गप्पा मारल्या तरी असे जीवन स्त्रीने जगणे अनुचित होते. त्यातून ती वयाने किती लहान होती—असेल फार तर २१/२२ वर्षांची. आयुष्यांतील धकाधकीला तोंड देण्याइतके विचारांचे व अनुभवांचे ज्ञान तिला कितीसे असणार? मागे उगाचच त्याचे कुतूहल जागे करून तिने त्याची मनःशांति ढवळली होती, आणि आता ही नसतीच काळजी उत्पन्न करून ती कुठे तरी गुप्त झाली होती.

बेलघुरियाला तिच्या वाड्यातील दालनांतून तो मनानेच जाऊन आला. ग्रंथालयाचे मध्यावर नवीनबाबूंचा एक मोठा फोटो लावलेला असे. फोटोंतील त्यांची करारी मुद्रा आठवून तो पुनश्च मनाशी म्हणाला, "कुठं गेली असेल मणी?"

१८

व्हिन्सेंट रोडवरील दुकानांत औषधे आणि इतर काही खरेदी उरकून सदानंद खुदादाद सर्कलवरून पायीच टिळकब्रिजकडे चालला होता. लेडी जमशेडजी रोडवरील त्याच्या वडलांचा ब्लॉक तेथून बराच दूर होता. पण पायी चालण्याची त्याला मनापासून आवड होती. मुंबईचे ते बस्‌चे मोठेमोठे क्यू पाहिले की त्याला वाटे, जेथे पायी जाणे शक्यच नसेल तेथे जायची वेळ आली तरच ही तपश्चर्या करावी. नाहीतर बस्‌ची मार्गप्रतीक्षा करण्यास जेवढा वेळ लागेल त्या वेळात पायी सहज जाता

येईल. अंदमानच्या मुक्कामात खूप लांब फिरून येण्याची सवय अशा वेळी उपयोगी पडत असे. पण तेथील मोकळ्या हवेत सुंदर वनश्रीनी सजलेल्या शांत रस्त्याने फिरण्याचे सुख कुठं, आणि येथील माणसांच्या नि वाहनांच्या रेटारेटीतून कसाबसा मार्ग काढीत चालणे कुठं ! संमिश्र आवाजांचा कोलाहल, हॉटेलांतून येणारे खाद्यपदार्थांचे वास, व त्याचे जोडीला ग्रामोफोनवर चालू असलेले उच्च स्वरातील हिंदी चित्रपटसंगीत, या सगळ्या गलक्यांत त्याचा जीव अगदी उबून जाई. खुराड्यासारख्या लहान घरातून, उकाड्याने आणि घामाने घुसमटत, आणि यंत्रासारखे जीवन जगत येथे हजारो लोक रहात होते—केवळ नाइलाजानेच नव्हे तर आवडीनेसुद्धा. येथील बऱ्याच जणांना या वातावरणातून उचलून एखाद्या रम्य, शांत खेड्यात काही व्यवसाय देऊन नेले तर थोड्या दिवसातच, "हे काय लाइफ आहे ? मुंबईची मजा कुठच नाही. आपल्याला नाही बुआ येथे करमत !" असे कुरकुरत ते लोकलच्या खेचा-खेचीत चेंगरायला, घामाने हाशहुश् करीत फिरायला, चौपाटीवरच्या दाट गर्दीत लाल्याची भेळ हायहाय करीत खायला, आणि दोन खोल्यांच्या छोट्या जागेत पाण्याचे हाल सोसून अडचणीने रहायला धावतील.

त्यांच्या ब्लॉकच्या गॅलरीत त्याची धाकटी बहीण मिरा उभी होती. त्याला पाहून ती खाली वाकली त्यामुळे तिचे दोन्ही शेपटे खांद्या-वरून पुढे लोंबत राहिले. "दादा, तुझी दोन पत्रं आली आहेत," असे म्हणत ती आत पळाली. जिना चढतांना त्याला वाटले, आपली इतकी आठवण झाली तरी कुणाला ? एक पत्र बहुतेक डॉ. शर्माचेच असेल. पण दुसरे कोणाचे बुआ !

दार लोटून तो घरात येताच मिराने दोन पाकिटे त्याचे हातात दिली, व ती म्हणाली, "दादा, माझ पुस्तक आणलं ?"

"अरे खरंच. विसरलोच की ! उद्या आपण दोघं जाऊ दुकानात, मग तर झालं," असे म्हणून तो गॅलरीकडे वळला.

मिराला कसलेसे पुस्तक हवे होते. तो दुपारी घरातून बाहेर पडला तेव्हा ते आठवणीने आणण्याबद्दल तिने त्याला बजावले होते. पण औषधे, फळे व इतर काही त्यांची स्वतःची खरेदी या नादात तो पुस्तक आणण्याचे अजिबात विसरला. मिरा मोठी समजूतदार मुलगी होती

—दादा आज विसरला हे बरेच झाले, आता उद्या त्याच्यावरोबर गेले की परत येतानां मंगलदास स्वीटमीट मार्टमधील छानदार लस्सी, नाहीतर कॅडबरी चॉकोलेट असे काहीतरी लाड नक्कीच पुरविले जातील !

त्याचे अपेक्षे प्रमाणे एक पत्र डॉ. शर्माचेच होते. पण दुसऱ्या पत्रावरील हस्ताक्षर अपरिचित वाटल्यामुळे कुतूहलाने त्याने तेच पाकीट प्रथम फोडले. पत्राचे सुंदर कागदावर कोपऱ्यात निळ्या शाईने छापलेले पी. बॅनर्जी हे नाव, व पत्राखालील 'तुमचा परितोष' ही सही पाहून त्यांनी आपल्याला पत्र लिहावे याचे त्याला नवल वाटले.

परितोषबाबूंनी लिहिलं होते, "दोन दिवसापूर्वीच कलकत्त्याहून मी इकडे आलो. डॉ. शर्माचे कडून तुम्ही मुंबईला गेल्याचे कळले. त्यांचे-कडूनच तुमचा पत्ता घेऊन हे पत्र मी लिहीत आहे. आता तुमचे वडील बरे आहेत ना ? तेथे किती दिवस राहण्याचा तुमचा विचार आहे ? या खेपेलाही मी एकटाच इकडे आलो आहे. कालच कामानिमित्त नॉर्थबेला गेलो होतो. आपण दोघानी मजेत केलेले वनभोजन व गप्पा-गोष्टी यांची आठवण झाली. आता तुम्ही इकडे आला की आपण निकोबार बेटांची सफर करू या. इथले सगळे नेहमीप्रमाणेच चालू आहे. कालच टिंबर मर्चंट जमाल भाईकडे मोठी पार्टी झाली. 'बरेच दिवसात डॉ. सदानंद दिसले नाहीत. पोर्टब्लेअर सोडले की काय त्यांनी ?' अशी पुष्कळजण तुमची चौकशी माझ्यापाशी करीत होते. आपण दोघे एकमेकांचे दोस्त आहोत अशी त्यांची समजूत झालेली दिसते.

खरे पाहिले तर आपल्या दोघात, देश, भाषा, वय, आवडीनिवडी, कशातच साम्य नाही. मी एक बेछूट प्राणी आहे, तर तुम्ही तुमच्या वयाला न शोभण्याइतके गंभीर आहात. माझ्याचसारख्या बेफिकीर लोकांचे संगतीत सारे आयुष्य घालविल्यामुळे आता तुमची संगत मला विशेष आवडू लागली आहे. तुम्ही इथे असतांना आपण काही सारखेच एकत्र येत नव्हतो. पण तुम्ही नसल्यामुळे मात्र तुमची अनुपस्थिति खूप जाणवत आहे.

नुकताच आसामला जाऊन आलो. मळ्यातील मजुरानी संप केला होता. मजुरांची वाढती अरेरावी, सरकारी करांचे दडपण, व विश्वासू माणसें कामाला मिळण्याचा अभाव, यामुळे मी त्रासून गेलो आहे. त्याच्याच

जोडीला घरची काळजी ! आता वयही झाले, त्यामुळे कशातच फारसा उत्साह वाटत नाही. माझा ब्लडप्रेशरचा त्रास तुम्हाला माहीतच आहे. मनःस्वास्थ्य नसल्यामुळे तो त्रास वाढल्या प्रमाणात आहे.

मणीची अजून कांहींच वातमी कळलेली नाही. 'नो न्यूज् इज् गुड् न्यूज्' या म्हणीनुसार ती सुखात असेल असे धरून चाललो आहे. तुमच्या घरच्या मंडळीना माझ्या शुभेच्छा."

तुमचा
परितोष—

—त्याचे वडलांना हार्ट अॅटॅक येऊन ते अत्यवस्थ असल्याची तार तो हॉस्पिटलमधे काम करीत असतानाच त्याचे हाती पडली होती. तो गुरुवार होता. दर शुक्रवारी कलकत्त्याहून इंडियन एअर लाइन्चे डाकोटा विमान थोडक्या उतारूंना घेऊन दुपारी तेथील चिमुकल्या विमान तळावर उतरे, व दुसरेच दिवशी सकाळी इथले मोजके प्रवासी घेऊन ते परत जाई. आठवड्यातून एकदाच अशी खेप होत असे, व तीसुद्धा नोव्हेंबर ते जूनपर्यंत. जुलईपासून पावसाळ्याचा जोर सुरू झाला की हा प्रवास धोक्याचा होई. डोंगरांच्या लहानमोठ्या रांगामधे असलेली विमान उतरायची सपाट जागा दाट ढगांचे आडून दिसणे मुष्किलीचे असल्यामुळे हा धोका पत्करणे योग्य नसे.

नुकताच मे महिना सुरू झाला होता, विमानवहातुक चालू होतीच, त्यामुळे दोन दिवसानी तो विमानाने जाणार होता. अशा घाईच्या वेळी बोटीने प्रवास करण्यात अर्थ नव्हता. त्यांतून बोट नुकतीच खेप करून गेली होती, व ती आणखी दहाबारा दिवस परत येणार नव्हती. विमानाची तिकिटेसुद्धा एकेक महिना आधी रिझर्व्ह केली जात. एका व्यापारी मित्राने त्याची अडचण ओळखून आपले तिकीट रद्द करून ती सीट त्याला मिळवून दिली होती. सुदैवाने त्याच दिवशी संध्याकाळी डमडमहून मुंबईकडे जाणाऱ्या व्हायकौंटमधे त्याला एक जागा मिळू शकली, व शनिवारी रात्री बाराचे सुमारास तो घरी पोहोंचला. इतक्या रात्रीची घंटा कुणी खणखणून वाजवली, असे वाटून त्याच्या आईने किंचित घाबरट आवाजात, "कोण आहे" असे आंतूनच विचारले.

खोलीतला दिवा लागल्याचे त्याने पाहिले. "मी आहे, सदानंद," असे त्याचे शब्द ऐकताच आईनें दार उघडले.

त्याचे वडलांना हिंदु कॉलनीतील एका खाजगी नर्सिंगहोममधे ठेवलेले होते. अहमदाबादला नोकरी करणारा त्याचा धाकटा भाऊ बाहेरच्या खोलीतील कॉटवर पडलेला होता. आंतल्या खोलीत त्याची लग्न झालेली बहीण कुसुम, तिची छोटी बेबी आणि मिरा यांची अंथरुणे दिसत होती. त्याची आई म्हणाली, "आता जरा बरं आहे यांचं, पण अजून कांही दिवस नर्सिंगहोममधे रहावं लागेल. तू इतक्या लवकर इकडे येऊं शकशील असे मात्र वाटले नव्हते. यांनी तुला भेटायचा फार ध्यास घेतला आहे."

"प्लेनमधे जागा मिळाली म्हणून जमले. नाहीतर तिकडून इकडे यायचे म्हणजे काळचापाण्यावरून परत येण्याइतकेच कठीण."

त्याच्या या विनोदाने किंचित हासल्यासारखे करून, पण मग लगेच गंभीर होऊन त्याची आई म्हणाली, "किती दूर गेला आहेस तू! बरं, पण तू आधी काय घेणार ते सांग. मी चटकन भातपिठलं करते."

"नको काही करू. विमानात भरगच्च डिनर मिळालं आहे. मला आता काही नको. तू नीज. मी जरा हातपाय धुवून कपडे बदलतो व येथेच पंख्याखाली पडतो." त्यांच्या या बोलण्याने त्याचा गाढ झोपलेला भाऊ जागा झाला. "अरे, तू कधी आलास?"

"हा आताच," असे त्याला सांगून तो बाथरूमकडे वळला. कपडे बदलून झाल्यावर स्वतःचाच होल्डॉल पंख्याखाली उलगडून त्याने त्यावर अंग टाकले. त्याची आई त्याला म्हणत होती, "थांब, गादी घालून देते."—पण "राहू दे आता. फार उशीर झालाय. झोपा सारे," असे म्हणत तो कुशीला वळला.

१९

दुसरे दिवशी सकाळी तो आईला व मिराला बरोबर घेऊन वडलांना भेटायला टॅक्सी करून गेला. भिंतीकडे तोंड करून ते पडलेले होते.

टक्कलाच्या कडेकडेचे त्यांचे केस जास्तच पिकल्यासारखे त्याला वाटले. चादरीवरील त्यांचा हात खूपच वाळका दिसत होता, व हाताची कातडी पण सुरकुतलेली होती.

"अप्पा, मी आलोय," असे त्याने म्हणताच त्यांनी तोंड वळवले. त्याने वडलांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. बंगालमधे वडील मंडळींना असाच नमस्कार करतात, हे त्याने पुष्कळ वेळा पाहिलेले असल्यामुळे ती पद्धत त्याने नकळत उचलली असावी.

"अरे हें काय, राहू दे. तू आलास, आता मी सुखाने मरेन." त्यांच्या या वाक्याने त्याच्या आईचे डोळे भरून आल्याचे व खालचा ओठ दाबून तिने आलेला हुंदका परतवल्याचे त्याच्या नजरेस आले.

"असं कां म्हणता? तुम्ही लवकर बरे व्हाल. आणि खर पाहिलं तर तुम्ही झालाच आहात बरे. आताशा असल्या दुखण्यावर इतकी प्रभावी औषधे निघाली आहेत की त्यांच्यायोगाने तुम्ही आणखी कितीतरी वर्षें मजेत राहू शकाल. आता मी आलो आहे तेव्हा योग्य ती काळजी भी घईनच. काळजी करायचे अजिबात सोडून द्या, म्हणजे लवकर बरे वाटेल."

त्याने वडलांना नीट तपासले. हार्ट अॅटॅक येऊन गेल्यामुळे ते फारच अशक्त झाले होते, शरीरापेक्षा मनानेच जास्त खचले होते. त्यांचे ब्लड-प्रेशर बरेच लो होते. शरीर बरे होण्याची उपाययोजना करण्याबरोबरच त्यांचा गेलेला उत्साह परत आणणे आवश्यक होते. ठिकठिकाणच्या वास्तव्यात हजारो व्यक्तींचे नमुने पाहिल्यामुळे तो माणसांच्या शरीराइतकाच त्यांच्या मनाचा डॉक्टरही झाला होता. त्याच्या उमद्या वागण्याने त्याने घरातल्या सर्वांचाच गेलेला उत्साह परत आणला.

तो आल्यानंतर दोनच दिवसांनी त्याचा धाकटा भाऊ अहमदाबादला परत गेला. एक आठवड्याचीच रजा घेऊन तो घाईन इकडे आला होता. तो इकडे येण्यापूर्वी त्याच्या लहान मुलाला ताप आला होता त्यामुळे त्याला तिकडे लवकर जाणे जरूर होते. शिवाय, डॉक्टर, असलेला मोठाभाऊ येथे आल्यामुळे तो गेला तरी चालण्यासारखे होते. सदानंदाने चार दिवसातच वडलांना घरी आणले. त्यांचे आता पुष्कळच बरे आहे असे पाहून कुसुम पण सासरी परत गेली.

वडलांची शुश्रुषा, औषधपाणी, सगळे तो संभाळीत होता. हॉस्पिटलचे अणि स्पेशॅलिस्टांचे बिल त्याने खतः भरले होते. वाटेल तितकी महाग औषधें, फळें, सगळा खर्च तो खुषीने करीत होता.

त्याच्या या मदतीने व सेवेने त्याचे वडलांना आणि आईला पण मनांतून ओशाळल्यासारखे झाले होते. आतापर्यंत ज्याला परकाच मानला, ज्याच्या आवडी निवडीची कधी दखल घेतली नाही, कुठेही रहा, काहीही कर अशी बेफिकिरी ज्याला दाखवली तोच हा त्यांचा मुलगा त्यांच्यासाठी किती झटत होता ! हे सगळे करताना त्याचे वागणे इतके साधे व मनमोकळे पणाचे होते, की पूर्वायुष्यातील असंतोष किंवा रोष याचा मागमूसही दिसत नसे हे विशेष. आपद्धर्म म्हणून काहीजण कर्तव्यपालन करतात, पण दुसऱ्याला चार चार वेळा तें ऐकवून उणे काढण्याची संधि ते दवडीत नाहीत. अशी निर्लेपबुद्धि कुणाच्यात नसते. त्यामुळे, आपण ज्याला चक्रम् ठरविले होते तो हा आपला मुलगा, ज्याचा अभिमान बाळगावा इतका गुणी आहे या जाणिवेने त्या उभयतांना त्याचे विषयी फार प्रेम वाटू लागले.

त्याची आई त्याच्या आवडीनिवडी व त्याचा आराम याची न बोलता काळजी वहात होती. त्याच्याशी मोकळेपणाने बोलण्याची सवय नसल्यामुळे आता पण त्याच्याशी बोलण्याचा तिला संकोच वाटत असावा. पण तो जेवायला बसला की पानांतला कोणता पदार्थ संपला आहे ते पाहून तो पुन्हा वाढायला आणणे, 'इतकीच कशी पुरे पोळी, आणखी घेना' म्हणून अर्धी तरी पोळी आग्रहाने वाढणे, तो दुपारचा पडला असला आणि शाळेला उन्हाळचाची सुट्टी असल्यामुळे मिरा "दादा, दादा" करत त्याच्याशी काही बोलायला आली की, "गप बस ग, दादा जरा पडला आहे, दिसत नाही का तुला ? सारखा काय त्रास द्यावा," असे तिला दटावणे, सकाळी तो उठताच गरम चहा तयार ठेवणे, आंघोळीला पाणी काढून देणे, या सगळचा आईच्या वागण्यात कमालीची आस्था व अगत्य सहज दिसून येत असे. दहा बारा वर्षांची मिरा तर या डॉक्टरदादावर भलतीच खूष होती. त्याच्याबरोबर समुद्रकाठी फिरायला जाणे, पाणीवाला नारळ पिणे तर अधूनमधून सिनेमाला जाणे,—आजपर्यंत तिचे इतके लाड कोणीच केलेले नव्हते.

अशक्तपणामुळे अप्पांना फार बोलवत नसे. तो त्यांना कुठलेच श्रम करू देत नव्हता. रोज नियमितपणे काही वेळ त्यांचपाशी बसून वर्तमानपत्रातल्या महत्त्वाच्या वातम्या व इतर चांगले लेख तो त्यांना वाचून दाखवी. आपल्या प्रवासी आयुष्यांतील गमतीदार अनुभव तो सांगू लागला की ते ऐकतांना त्याची आई आणि मिरा पण त्यात रमत.

त्यांना आता पुष्कळ बरे वाटू लागले होते. ब्लडप्रेशर जवळजवळ नॉर्मल आल्यामुळे घरातल्या घरात रोजचे व्यवहार ते करू लागले होते. जिन्याची चढउतार त्यांना इतक्यातच झेपण्यासारखी नव्हती म्हणून सदानंद त्यांना बाहेरच्या व्हरांड्यात आरामखुर्ची टाकून देई. खालच्या रस्त्यावरील प्रचंड वाहतुक बघत ते चुपचाप पडून रहात.

—" तुला वाटलं तर तू आणखी रजा वाढवून घे. येथील कामाचा मला जास्त ताण पडेल अशी काळजी करू नको. आईवडलांचे छत्र भाग्याचे असते. कितीही बाहेरच्या जगात मित्र जोडले तरी घरातल्या मायेची सर त्याला येत नाही. तुझ्या गोड आणि कष्टाळू स्वभावाने तू घरातल्या सगळ्यांना हवासा वाटत असशील याची मला खात्री आहे. तुझे वडील पुष्कळच बरे असतील अशी आशा करतो," असे डॉ. शर्मांनी त्याला लिहिले होते. पण त्यालाच आता मुंबईचा कंटाळा आला होता.

त्यांच्या तीन खोल्यांच्या ब्लॉकमधे बाहेरच्या खोलीतच तेवढा एक जुना सीलिंग फॅन होता. या उकाड्यात आतल्या खोलीत त्याची आई आणि मिरा पंख्यावाचून कशा झोपतात याचे त्याला नवल वाटे. पूर्वी शिकत असताना तो पण उन्हाळ्याचे सुट्टीत या जागेत पंख्याशिवाय झोपलेला नव्हता काय? पण आता कित्येक नव्या आरामशीर सवयी नकळत त्याच्या आंगवळणी पडल्या होत्या. प्रशस्त बेडरूम, फोम रबरची आरामशीर गादी, बेडरूमला लागूनच असलेली स्वच्छ, मोठी व मुबलक पाणी असलेली सॅनिटरी वाथरूम, विजेच्या पंख्याचा वारा, फ्रीझचे थंडगरा पाणी—आपल्याला पुष्कळजण अगदी साधा समजतात, पण वास्तविक किती सुखासीन आहोत आपण! थोडे दिवस या आरामा वाचून रहायची वेळ आली तर कुरकुर न करता आपण राहू, पण फार दिवस असे रहायला आपल्याला आवडणार नाही. सवयीसुद्धां, मग त्या चांगल्या असल्या तरी, नडतातच.

जोपर्यंत त्याने येथे राहण्याची खरोखरच गरज होती तोपर्यंत कुठल्याही गैरसोयींचा विचार त्याच्या मनात आला नव्हता. आता त्याचे वडील पूर्ववत् झाले होते. योग्य काळजीघेऊन राहिले तर आता त्यांना धोका नव्हता. गेल्या वर्षी नोकरीतून सेवानिवृत्त होऊन त्यांनी पेन्शन घेतले होते. मिराखेरीज त्यांचे मागे दुसरी कसलीच जबाबदारी नव्हती. त्यांना जरूर भासेल तेव्हा शक्य तेवढी आर्थिक मदत करायला तो तयार होता.

तो परत जाण्याच्या गोष्टी बोलू लागला तेव्हा त्याचे वडील म्हणाले, "सदा, कुठल्या तोंडाने तुला येथे रहा असे म्हणू ? आजपर्यंत मी तुझ विशेष कांहींच केलेले नाही. गेल्या जन्मीचा तू माझा ऋणी लागत होतास की काय, कोण जाणे ! आता मात्र मीच तुझा ऋणी झालो आहे. तू इथेच रहावेस असे मला वाटते. तू कर्तबगार आहेस. इथं तुझा जम वसायला वेळ लागणार नाही. माझा आता नेम नाही. तू इतक्या लांब जाणार असे मनात आले की वाटते, आता तू कसला भेटतोस !"— अप्पा हे बोलत असतांना त्याची आई पण पदराने डोळे टिपत असल्याचे त्याने पाहिले. त्यांच्या कोमल भावनांचा अनादर करण्याचे त्याच्या जिवावर आले, पण त्याचा नाइलाज होता. त्याला हा जिव्हाळा मिळायला फार उशीर शाला होता. वनात स्वैरसंचार करणाऱ्या पक्षाला 'पिंजरा सोन्याचा व चारा मोत्यांचा' देऊ केंला तरी तो त्याला कसा हवासा वाटणार ? इतके दिवस एकटे रहाण्याची व स्वतंत्रपणे वागण्याची सवय त्याच्या आंगवळणी पडली होती, आता या छोटचा ब्लॉक मधील हें जीवन त्याच्या मनाला मानवण्यासारखे नव्हते.

शक्य तितक्या गोड शब्दात त्यांना नकार देऊन व वेळ आल्यास केव्हाही धावत त्यांचेसाठी येण्याची तयारी दर्शवून त्याने आपल्या निघण्याचा दिवस पक्का केला. कलकत्त्यावरून अंदमानला तो बोटीने परत जाणार होता. तेथील हॉस्पिटलसाठी आवश्यक असलेली नवीन एक्स-रे मशीनरी इतरही सामान त्याला कलकत्त्याला खरेदी करायचे होते. तिथे महाराष्ट्र निवासातच उतरावे असे ठरवून त्यांना खोली राखून ठेवण्याबद्दल त्याने लिहिले होते.

२०

मिरा तिच्या अभ्यासाच्या वह्या आणि पुस्तके आवरून ठेवत होती. ती आता वरच्या वर्गात गेली असल्यामुळे त्या पुस्तकांचा तिला आता उपयोग नव्हता. जवळच खुर्चीवर बसून तो तिची ड्रॉइंगची वही चाळत होता. त्यात काढलेले फ्रीहॅन्ड पद्धतीचे एक नक्षीदार डिझाइन एकदम त्याचे मनात भरले. "अरे वा! मिरा, तू छान चित्र काढतेस की ग!" असे त्याने म्हणताच ती म्हणाली, "इश्श! ते मी नाही काढलं. त्यातलं बरचसं आमच्या बाईंनीच काढून दिलय. मला काही केल्या नीट जमत नव्हतं तेव्हा मला समजावून सांगताना त्यांनी स्वतःच पटपट आखलं. काय छान ड्रॉइंग काढतात त्या! आणि बरं का दादा, त्या बंगाली आहेत. यंदाच आमच्या शाळेत त्या आल्या आहेत. किती छान आहेत दिसायला, अन् बोलतात पण फार गोड. त्यांच नाव काय माहीत आहे? मिस्, बॅनर्जी."

त्या शाळेत नुकतीच नोकरीला लागलेली शिक्षिका मिस् बॅनर्जी, हे ऐकून ही मणी तर नसेलना अशी शंका येऊन त्याने विचारले, "नाव काय त्यांचे?"

"मिस् बॅनर्जी, काय तरी ही बंगाली आडनांवे नाही का रे? चतर्जी, बॅनर्जी, मुखर्जी"—मिराची बोलण्याची आगगाडी मधेच रोखीत तो म्हणाला, "अग ते झालं त्यांचे आडनाव, पण मी विचारतो आहे, त्यांचे नाव काय?"

"काय जणं बाई, आम्हाला ते कसं कळणार? पण त्या एम्. बी. अशी सही करतात, त्यावरून त्यांचे नाव काही तरी एम्ने सुरू होणारे असणार, नाही का?"—हो, ही मणीच असावी! त्याला वाटले, आपले तिकीट रद्द करून मिराच्या शाळेची सुट्टी संपेपर्यंत इथेच रहावे, मग काही तरी निमित्ताने तिच्या शाळेत जाऊन त्या शिक्षिकेला प्रत्यक्ष पाहून स्वतःची खात्री करून घ्यावी. परितोषबाबूंची काळजी दूर करण्यासाठी त्यांचा स्नेही म्हणून असे करायला काय हरकत?

पण पुन्हा त्याला वाटले ही अद्याक्षरे असलेल्या हजारो मुली बंगालमधे आढळतील. मणी इतक्या लांब परमुलखात आलेली असेल हे तरी

कशावरून ? त्यातून आता जाणे लांबविले तर घरच्या मंडळींना काय सबब सांगायची ? ते 'रहा रहा' म्हणत असताना आपण परत जाण्याचा हट्ट सोडला नाही. तिकीट काढून झाले, इतकेच काय, पण जाणे दोन दिवसावर आले आहे. आता यात बदल करणे बरे दिसणार नाही. इतके करून आपण राहिलो व ती दुसरीच कोणी असली तर पुनश्च रिझर्वेशनची धावपळ, कलकत्त्यातील कामांचा खोळंगा, अशी नसतीच दगदग होईल.

त्याला पोहोचवायला व्ही.टी.वर जाण्याचा हट्ट मिराने धरला होता. वडलांना घरी सोडून त्याच्या आईला येणे शक्यच नव्हते. मग मिराने एकटेच इतक्या लांब परत कसे यायचें म्हणून शेजारच्या जोशांच्या मधूला बरोबर घेतले होते.

ते व्ही.टी.ला पोहोचले तेंव्हां गाडी सुटायला अवघा पंधरा मिनिटांचा अवधि होता. पहिल्या वर्गाला जोडलेल्या प्रवाशांची नावे वाचून त्यात आपले नाव शोधीत तो चालला असता, पहिल्या वर्गाच्या एका डब्याच्या दारापाशी एक तरुण मुलगी एका पुरुषाशी हासून गप्पा मारीत उभी असलेली त्याला दिसली. तिच्याकडे नीट पहाताच तो आश्चर्याने थबकून उभा राहिला. दाराला लटकत असलेली नावांची यादी पहाण्याचे तो विसरूनच गेला.

"अय्या, मिस् बॅनर्जी," मिरा त्याचे मागून पुढे येत म्हणाली. मिराच्या आवाजाने त्या तरुण मुलीचे लक्ष अर्थातच त्यांचेकडे गेले. सदानंदाला पहाताच तीपण त्याच्याइतकीच विस्मित झालेली दिसली.

"दादा, याच आमच्या आर्ट टीचर. आणि बाई, हा माझा दादा डॉ. सदानंद. माझा दादा फार लांब राहतो, अंदमानात." मीरा तोडक्या मोडक्या हिंदीत म्हणाली.

"तुम्ही इकडे पळून आलात काय ? तिकडे तुमच्या काकांना किती काळजी लागली आहे ?"

"असं ! पण तुम्हाला कसं माहीत ?"

"तुम्ही त्यांना लिहून ठेवलेली चिट्ठीसुद्धा दाखवली आहे त्यानी मला—आणि तुम्ही विचारता मला काय माहीत !"

"खरं !"—असे म्हणताना तिने दोन्ही ओठ घट्ट जुळवून मंद हास्य केले. त्यांचा हा संवाद बंगालीतूनच झाला. आणि त्यामुळे मिराला, इतकेंच काय पण मणीच्या बरोबरच्या त्या तरुण पुरुषाला बरेच नवल वाटलेसे दिसले.

"दादा, तू ओळखतोस यांना ?"

"आपनारा चेनाशुना आछेन ना की ?" (तुम्ही परिचित आहात काय ?) मिराकडून आणि त्या तरुणाकडून हे दोन्ही प्रश्न एकाच वेळी विचारले गेले.

"हो. आम्ही ओळखतो एकमेकांना," असे मणीच्या हासऱ्या चेहऱ्याकडे बघत उत्तर देत असताना सदानंदाला वाटले, आमची जन्म जन्मांतरीची ओळख आहे असे त्यांना सांगावे.

"हा माझा आतेभाऊ, पुलिनचंद्र मुखर्जी. येथे सिनेमा व्यवसायात आहे," अशी त्याची ओळख तिने सदानंदाला करून दिली. तो तिला पोहोचवायला आलेला होता.

योगायोगाने त्याच्याच डब्यात तिची पण राखीव जागा होती. पहिल्या वर्गाच्या कॉरिडर असलेल्या डब्यात चार बर्थची दोन कंपार्टमेंट दोन बाजूला व मधे कुपे असतो. हा कुपे बहुतेक स्त्रियांसाठी राखीव असे. त्यातच एका पंजाबी बाईच्या जोडीला मणीची जागा होती. सदानंदाची जागा शेजारच्याच कंपार्टमेंटमधे असून त्याच्या व तिच्या बर्थमधे पातळ लाकडी पार्टिशन होते.

गाडी हालली. माणसे व स्टेशन दिसेनासे झाले, तेव्हा दोघे आत वळली. त्याचेशी बोलत ती त्याच्याच जागेवर बसली होती.

"तुमच नाव मणी की झुमी ?" असा प्रश्न त्याने विचारला तेव्हा आपले टोपण नावसुद्धा त्याला माहीत आहे याची तिला गंमत वाटली. हा परदेशी डॉक्टर आपल्याला इतके ओळखतो, इतकेच नव्हे, तर आपली भाषासुद्धा बिनचूक बोलू शकतो याचे तिला राहूनराहून आश्चर्य वाटले होते.

ती म्हणाली, "लहानपणी माझ्या आजीने झुमी हे लाडके नाव मला ठेवले होते. त्यामुळे मला कोणी झुमी म्हणतात, तर कोणी मणी म्हणतात. पण माझ खर नाव मणिदीपा."

मणिदीपा

७

व्ही. टी. सोडल्यापासून तों इगतपुरी येईपर्यंत मणी सदानंदच्या जागेवर बसून त्याचेशी बोलत बसली होती. मग बरोबर आणलेल्या डब्यातील परोठा, आलूदम, मिठाई, वगैरे तिने त्याला आग्रहाने खायला लावले. तो म्हणाला, "उद्या दुपारी चहाचे वेळी आमच्या घरचा लाडू, चिवडा बाहेर काढू. आईने बरच काहीस दिलंय बरोबर."

खाणे झाल्यावरही ती दोघे गप्पागोष्टी करीत होती. सदानंदच्या वागण्यात कमालीचा मोकळेपणा असूनही तितकाच सभ्यपणा होता. एक स्त्री या नात्याने तिला न वागवता पुष्कळ दिवसाच्या ओळखीच्या आणि जिव्हाळ्याच्या माणसाला वागवावे असे तो तिच्यापाशी वागला होता. आणि त्यामुळे तिच्या मनावरचे संकोचाचे पटल दूर होऊन ती पण मनमोकळेपणाने बोलत होती. फार दिवसानी असे अघळपघळ हसाबोलायला मिळाले या आनंदाने तिचे अंतःकरण प्रफुल्लित झाले होते.

आपल्या मनगटावरील चिमुकल्या घड्याळात दहा वाजायला आल्याचे लक्षात आल्यावर ती उठली. "बरं, झोपूया आता, गुड नाइट," असे म्हणून ती स्वतःचे जागेवर आली. स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या त्या कुपेत तिच्या जोडीला एक फॅशनेबल पंजाबी मुलगी होती. वरच्या बर्थवर ती झोपली होती व तिचे उंची रंगीबेरंगी पांघरूण मणीच्या जागेपर्यंत लोंबत होते. हलक्या हाताने ते तिच्या अंगावर घालून तिने डब्याचे दार लावून घेतले. अंगावरील रेशमी वस्त्र बदलून साधे पांढरे पातळ ती नेसली, मोठा झगझगीत दिवा मालवून निळा मंद दिवा लावला व बिछान्यावर तिने अंग टाकले.

गेल्या कित्येक दिवसात आपल्या मनावर आलेली औदासीन्याची छाया सदानंदच्या वागण्याने दूर व्हावी याचा मनाशी विस्मय करीत ती आठवू लागली—महाबळीपुरम्‌ला तो तिला प्रथम भेटला होता. त्याच्या सुदृढ बांध्याने व वागण्यातील तरतरीतपणाने तो तिच्या लक्षात राहिला होता. बसमधून उतरताना तिच्या पदराचे टोक खिळ्याला

अडकले, त्या वेळी तो इतका आपल्या जवळ असेल याची तिला कल्पना नव्हती. पदर सोडवायला तिने हात पुढे केला तेव्हा झालेला त्याच्या हाताचा स्पर्श तिला आठवला. त्याने तिचा पदर न फाटू देता नीट सोडवून दिला होता. त्या वेळी तिला उगाचच वाटलेली लाज व त्यानंतरचा ती गाणे म्हणत असताना त्याच्या नजरेत दिसलेला पसंतीचा व खुषीचा भाव.—त्या दिवशी पहाटे ती खिडकीच्या चौकटीला डोके टेकून उभी असताना अकल्पित त्याला समोर रस्त्यावर उभे असलेले तिने पाहिले, त्यावेळी ती स्वतः आपल्या दुःखात चूर होती. त्याने आपल्याला असे रडताना पाहिले याची शरम वाटून ती झटकन आत वळली. थोड्या वेळाने हळूच खिडकीचा पडदा दूर करून तिने बाहेर पाहिले, तों रस्त्यावर कोणीच नव्हते. जवळजवळ महिनाभर ती पोर्टब्लेअरला होती, पण पुन्हा कधी तो ओळखीचा चेहरा तिला कोठेही दिसला नाही. तिला वाटले, त्या दिवशी आपल्याला भास तर झाला नाहीं ?

आपल्या व त्याच्या बर्थमधे हे पातळ लाकडी पार्टिशन आहे म्हणून, नाहीतर तो किती जवळ आहे आपल्या ! ही कल्पना मनात आली मात्र, आणि तिला लाजल्यासारखे वाटले. आता तो काय करीत असेल, झोपेच्या आधीन झाला असेल, की तिच्याविषयी विचार करीत असेल, कोण जाणे !

विचारांचे तंद्रीत तिचा केव्हा डोळा लागला हे तिचे तिलाच कळले नाही. विचित्र घटनांनी भरलेल्या स्वप्नांनी तिची झोप चाळवलेली होती.—

"हे काय, अंधारात का बसली आहेस ?" असे म्हणत तिच्या काकीने खोलीतला दिवा लावला. प्रखर प्रकाशाची तिरीप सहन न होऊन तिने डोळे चोळीत मान फिरवली. तिची काकी म्हणत होती, "आज क्लबात डिनरपार्टी आहे हे लक्षात नाही का तुझ्या ? अजून तर तुझी काहीच तयारी नाही."

वर मान न करताच ती म्हणाली. "नको काकिमा. माझं आज फार डोकं दुखतय."

"नसल यायच तर नको येऊस. रोज उठून कोण तुझी आर्जवं करणार ! घरात आज फक्त नोकरांचाच स्वंयपाक झाला आहे,

९८९८३

त्यातलेच तुला आज खावे लागेल," असे म्हणत तिची काकी फणकाऱ्याने तेथून निघून गेली.

बंगल्याच्या डाव्या बाजूला तिला झोपण्यासाठी दिलेल्या एका छोट्या खोलीत खिडकीपाशी आरामखुर्चीवर दुपारचे चहानंतर ती पुस्तक वाचीत बसली होती. वाचतावाचता तिचा डोळा लागला व रात्र पडली हे तिच्या ध्यानीच आले नाही. काकीचा तिच्याविषयीचा तिरस्कार दिवसेदिवस वाढत्या प्रमाणात होता. मणीला तिच्या मनाप्रमाणे वागणे शक्य नसल्यामुळे काकीचा तुसडेपणा दूर होण्याची आशा नव्हती.

बाहेरच्या व्हरांड्याच्या लाकडी जमिनीवर तिच्या काकीच्या उंच टाचांच्या चप्पलचा आवाज हळुहळु दूर होत गेला व थोड्याच वेळात गाडी सुरू झाल्याचा आवाज आला. तिला वाटले, काकी नि सुरेन् बाहेर गेले. तिचे काका काही कामानिमित्त कार-निकोबारला गेलेले होते. पण ते घरात असले काय की नसले काय, काकीचे कार्यक्रम स्वतंत्रपणे चालूच असत.

हवेत फार उष्मा होता. बराच वेळ एका जागी अवघडून बसल्यामुळे तिच्या पायाला मुंग्या आल्या होत्या. साऱ्या अंगावर एक प्रकारचा जडपणा आला होता. भूक तर मुळीच वाटत नव्हती. आत जाऊन पाणी पिऊन यावे, व आपल्याला काही खायचे नाही असे नोकराला सांगावे, हा विचार करून ती जागची उठली.

जेवणाच्या खोलीतील फ्रीज् उघडून काचेच्या ग्लासात पाणी ओतीत असताना तिने खिडकीतून बाहेर पाहिले—दर्शनी व्हरांड्याच्या पायरीवर उभा राहून सुरेन् त्यांच्या तामिळी नोकराशी बोलत उभा असलेला तिला दिसला. त्याच्या ऐटबाज पोषाखावरून त्याने हा जामानिमा पार्टीला जाण्यासाठीच केलेला असणार, मग काकिमाबरोबर तो कसा गेला नाही याचे तिला आश्चर्य वाटले. त्याने आपल्याला पाहिले तर तो आपल्याशी बोलायला येईल आणि मग त्याच्या नकोशा वाटणाऱ्या संगतीत आपल्याला वेळ काढावा लागेल असे वाटून तिथे पाणी प्यायला न थांबता भरलेला ग्लास घेऊन ती हळूच आपल्या खोलीत गेली.

तिच्या खोलीच्या खिडकीतून तिने पाहिले, अष्टमीच्या चंद्राच्या मंद प्रकाशात आजुबाजूचे दृश्य अगदी पुसट नि धूसर दिसत होते. कुठल्यातरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्थलप्र.
अनुक्रम ५४०८८ दि: ...
आवक ३१.५.७० नों दि: ...

भयाण जागेत आपण एकट्या आहोत असा भीतीचा विचार मनात डोकावून तिचे अंग शहारले. तिने पाण्याचा ग्लास जवळच्या टीपॉयवर ठेवला. खोलीचे दार आतून बंद करावे व पाणी पिऊन झोपून जावे असा विचार करून ती वळली. दारातच पडदा दूर सारून सुरेन् उभा होता. त्याची नजर व उभे रहाण्याची पद्धत पाहून तिरस्कार आणि भीति यांनी आपले मन आतल्याआत कापत आहे असे तिला वाटले. मनाची खळबळ त्याला दिसू न देता, वरकरणी हसून ती म्हणाली, "हे काय, तू कसा गेला नाहीस पार्टीला ?"

"तुझ्यासाठी ! तुझ्यासाठीच नाही गेलो."

"माझ्यासाठी !—माझा काय संबंध ?"

"तुझा काय संबंध !—मणी, जाणूनबाजून कशाला हा लंपडाव खेळतेस ? माझ्या मनातील गोष्ट तुला माहीत आहे. आपल्या दोघांच्या मीलनाला तुझ्या काकाकाकीची संमति आहे, इतकेच काय, तू माझ्याशीच लग्न करावस अशी तुझ्या काकीची फार इच्छा आहे हे तू जाणतेस. असे घडले तर माझ्या आजोबांच्या, तसेच तुझ्या वडलांच्या व काकांच्या अफाट संपत्तीचे आपण दोघे मालक होऊ. मग आपल्या सुखात व चैनीत काय कमतरता ! माझ्यापासून दूर रहाण्याचा हा वेडा हट्ट तू कशासाठी करते आहेस हेच मला कळत नाही."

"राहू दे हा विषय. मी तुला एकदा सांगितले ना, मला लग्न करण्याची इच्छाच नाही म्हणून ? मग पुन्हापुन्हा हा अप्रिय वाद घालण्यांत काय अर्थ आहे ?"

"आज मी वाद घालायला आलेलाच नाही, कृती करायला आलोय्. आज मी तुला माझी करणार ! कोण मला अडवतोय, बघू या."

पुढे होऊन त्याने तिचा हात घट्ट पकडला. त्याने घेतलेल्या मद्याचा उग्र दर्प तिच्या नाकात शिरला. त्याचा हात जोराने हिसडून, "हां, सुरेन्, खबरदार !" असे म्हणत मोठ्याने किंकाळी फोडून ती धडपडत दूर झाली. तिच्या धक्क्याने टीपॉय उलटले, व पाण्याने भरलेला ग्लास खाली पडून खळकन फुटला. बाहेरच्या व्हरांड्यातून, "क्या हुआ, क्या हुआ" म्हणत नोकर धावत आला.

—झोपेत तिने खरोखरच दुःखाने किंकाळी फोडली होती. वरच्या बर्थवरील पंजाबी मुलगी तिच्याजवळ उभे राहून विचारीत होती, "क्या हुआ ?"

डोळे उघडून पहाताच, 'क्या हुआ' असे म्हणत आत शिरलेला तामिळी नोकर आपल्याला दिसण्याऐवजी ही मुलगी कशी इथे आली याचे तिला नवल वाटले, पण रूळ बदलतांना गाडीला बसलेला धक्का व खडखडाट ऐकून आपण पोर्टब्लेअरच्या बगल्यातील त्या खोलीत नसून आगगाडीच्या डब्यात आहोत याची तिला जाणीव आली. ती पंजाबी मुलगी तिचा हात धरून पुन्हा विचारीत होती. "आपको क्या हुआ, आप तो बहुत डर गयीं हैं."

"मला काहीतरी भीतिदायक स्वप्न पडलं, पण माझ्यामुळे तुमची मात्र झोप मोडली. मला क्षमा करा."

"छे, त्यात काय ? तुम्हाला पाणी देऊ का ? पाणी प्या म्हणजे बरं वाटेल," असे म्हणत तिने आपल्या वॉटर बॅगमधून पाण्याचा ग्लास भरून तो मणिदीपाचे पुढे केला. पाणी पिऊन झाल्यावर मणीने पुनश्च तिचे आभार मानले, व ती बाकावर मागे रेलून बसली. थोड्या वेळाने ती पंजाबी मुलगी आपल्या जागेवर चढून झोपली.

खिडकीतून चंद्रकोर दिसत होती. तिजकडे पहात असता तिचे मनात विचार आला, स्वप्नसुद्धा अगदी प्रत्यक्षात घडावे इतके स्पष्ट कसे दिसते कोण जाणे !

ग्लास फुटल्याच्या आवाजाने नोकर धावत आल्यामुळे त्यावेळच्या प्रसंगातून आपण निभावलो या आठवणीने तिचे डोळे अश्रूंनी भरून आले. अचानक नोकर आल्याने सुरेन्ही वरमला होता. 'क्या हुआ,' असे नोकराने विचारले तेव्हां, "कुछ नहीं, ग्लास गिर पडा है. देखो तो, मेमसाबको कुछ लगा है क्या ?" असे म्हणत तो खोलीतून बाहेर निसटला. फुटक्या ग्लासाचे तुकडे गोळा करून नोकर बाहेर पडताच तिने खोलीचे दार आंतून घट्ट लावून घेतले होते. दुःखाचा व अश्रूंचा आवेग आवरत नव्हता. मनस्तापामुळे तिला त्या रात्री धड झोपच आली नव्हती.

इतकी संपत्ति, पुष्कळच बऱ्यापैकी रूप व विद्या असूनही आपल्यावर असे दुःख करण्याची पाळी यावी, आपल्यावर माया करणारी सारी माणसे काळाने दूर न्यावी, व जगाशी टक्कर द्यायला आपल्याला असे एकटे सोडावे याचा तिला विषाद वाटला.

आपल्या आयुष्यातील सुखदुःखांच्या आठवणी मनाशी काढीत ती खिडकीच्या काचेतून पाहू लागली. गाडीच्या दिव्यांच्या उजेडामुळे पलीकडचा रूळ व त्याखालची खडी मागे धावताना दिसत होती. गाडी मोठ्या वेगात पुढे धावत होती. तिच्यासारख्या, सदानंदासारख्या, आणखीही कितीतरी भिन्न स्वभावाच्या व भिन्न परिस्थितीतील शेकडो लोकांना घेऊन गाडी चालली होती. त्यातले काहीजण उत्साहाने, तर काहीजण दुःखाने, व बसेचसे निर्विकारपणे निघालेले असतील. काही थोडे जण पहिल्या वर्गाच्या कुशनवर आरामात पडलेले, तर त्यांचेपेक्षाही सुदैवी असे कोणी एअरकंडिशनच्या शीतल हवेचा उपभोग घेत गुंगले असतील, तर बाकीचे पुष्कळसे दाटीवाटीने बसल्या बसल्या एकमेकांचे अंगावर लेटून डुकल्या घेत असतील !

आगगाडीतून जाणाऱ्याच काय, पण जन्माला आलेल्या सगळ्यांचाच जीवनप्रवास सतत चालू असतो. हे प्रवासी दैवाप्रमाणे त्यांच्या वाटचाला आलेल्या मार्गाने वाटचाल करीत असतात. या वाटचालीत कधी कोणाची संगत त्रासदायक व नकोशी वाटते, तर कधीकधी कोणाची तरी सोबत सारखी मिळेल तर किती चांगले होईल असे वाटू लागते.

ती आणि सदानंद—दोघेही पथिकच ! आज दोघांचे पथ योगायोगाने एकत्र आलेले आहेत, पण कदाचित थोड्या दिवसातच दोघांनाही दोन भिन्न मार्गाने जावे लागेल. तिला वाटले त्याची सोबत नेहमीच आपल्याला कशी लाभणार ?

२

शामबझारमधील भूपेंद्र बोस ॲव्हेन्यूवर शाम स्क्वेअर म्हणून एक मोठा पार्क आहे. त्याच्या समोर एक लहानशी गल्ली आहे. त्यांतून आत शिरले की तीन चार घरे टाकल्यावर नवीनचंद्र बॅनर्जींचा मोठा

वाडा लागतो. बाहेर दोन मोठी गेट आहेत. डाव्या गेटमधून पीर्चकडे वळलेली वाट तशीच पुढे उडव्या गेटला मिळालेली आहे. आता त्या दोन्ही गेटवर 'आशापूर्णा नर्सिंगहोम' अशी पाटी आहे.

पण पूर्वी नवीनबाबूंचे ह्यातीत त्या वाड्याचे स्वरूप पुष्कळच निराळे होते. डावीकडच्या गेटवर रामहरि नावाचा हिंदुस्तानी दरवान खैणी खात एका मोडक्या खुर्चीवर बसलेला असे. उजवीकडचे गेट बहुतेक बंदच असे. फक्त नवीनबाबूंची किंवा त्यांना भेटायला आलेल्या कुणाची मोटरगाडी बाहेर निघायची असली की ते गेट उघडले जाई व पुन्हा बंद होई. बाबूंच्याकडे कुणी बडे लोक आले गेले तर रामहरि आदबीने उठून सलाम ठोकी. नाहीतर इतरांना, "क्या है रे? क्या मंगता है?" असे दटावीत असे. दुपारच्या वेळी बाहेरच्या अंगणातील लहानशा मोरीत आंघोळ करून फाटकाच्या जवळच्या भितीवर धोतर वाळत घालताना किंवा रात्री वाड्यात निजानीज झाल्यावर, "तुम बड़े गरीब निवाज," असा भसाड्या आवाजातील त्याच्या भजनाचा सूर कधीमधी कानावर येई. नवीनबाबूंचा मुक्काम वाड्यात असला की तो फारच चुपचाप असे. पण ते त्यांच्या जमिनदारीचे गावी गेलेले असले की त्याच्या आगाऊपणाचा प्रसाद घरातील इतर नोकरांना, मदत मागण्यासाठी येणाऱ्या गोरगरिबांना, किंवा कोणी फळविके व फेरीवाले यांना येता जाता मिळे. बड्या घराचे श्वान धन्याचे आश्रयाने आरामात गवाणीत बसून येणाऱ्या जाणाऱ्यांवर उगाच गुरगुरतात तसेच त्याचे अकारण ज्याच्या त्याच्यावर खेकसणे वाटत असे.

त्या दिवशी नवीनबाबूंच्या घरात कसल्यातरी अशांतीचे वादळ उठले होते. झुमी त्यावेळी फार लहान होती, अवघी सहा वर्षांची. तिचे दादू (आजोबा) तिच्या काकांवर काही तरी कारणाने फार संतापले होते. तिची ठाकुरमा (आजी) आतल्या खोलीत पदराने डोळे पुशीत होती. जवळच एका खुर्चीवर तिचे बाबा गंभीर चेहरा करून बसल होते.

"झुमी, आत चल. लहान मुलांनी मोठ्या माणसात बसू नये. तुला भूक लागली असेल ना? मी भरवू का तुला?" असे म्हणत तिच्या माने तिला तेथून दूर नेले.

"दादू का ग रागावलेत काकांच्यावर?" तिने आपल्या माला विचारले.

"तू आधी जेऊन घे बरं,"—असे म्हणत तिची आई मोलकरणीला म्हणाली, "गोपालेर मा, झुमीचा पाट मांड."

त्यांच्या विधवा मोलकरणीचे नाव काय होते कुणास ठाऊक, पण तिच्या मुलाचे नाव गोपाळ असल्यामुळे सगळे तिला गोपालेर मा म्हणत. तिचा तो गोपाल कुणीच कधी पाहिलेला नव्हता.

झुमीला पाटावर बसवून तिच्या आईने आचाऱ्याला हाक मारली, "ठाकूर, भात वाढ. आज झुमीच्या आवडीचा रुई मासा तळलास की नाही?"

"बहु दी, गिण्णिमा डाकछेन (वहिनीसाहेब, आईसाहेब बोलावताहेत)" असे म्हणत त्यांचा म्हातारा नोकर दुर्गादास आत आला.

"गोपालेर मा, झुमीला काय हव जको, बघ," असे म्हणत हात धुवून तिची आई लगबगीने तेथून गेली.

"दिदिमणी, तुमच्या काकावाबूनी एका कायस्थाच्या मुलीशी लग्न ठरवलं आहे, त्यामुळे बडोबाबू फार चिडले आहेत. बडोबाबू, गिण्णिमा किती जुन्या वळणाचे, त्यांना कसं हे आवडणार? हे कलियुग बरं. ब्राह्मणाच्या मुलानं वेगळ्या जातीत का लग्न करायचं?"—तिला भात भरवता भरवता गोपालेर मा बडबडत होती. झुमीला सांगण्याच्या निमित्ताने ती आपल्याशीच मनातले बोलत असावी. स्वैपाकघराच्या दारात उभा राहून हे सारे ऐकत असताना ठाकूर मिस्किलपणे हासत होता.

आईने आपल्याला दाद लागू दिली नाही, पण गोपालेर माकडून कळलेच काय ते, याची तिला गंमत वाटली. ब्राह्मण म्हणजे काय, कायस्थ म्हणजे काय, यातले तिला काहीच धड कळत नव्हते. पण आपल्या आजोबांच्या मनाविरुद्ध काहीतरी भयंकर कृत्य करण्याचे काकांनी ठरविले आहे एवढेच काय ते तिला समजले. आजोबांचा रागीट उग्र चेहरा पाहिला की तिला खूप भीति वाटत असे. "झुमीऽ," अशी त्यांची घोगऱ्या आवाजातील खणखणीत हाक ऐकू आली की ती सर्व खोड्या टाकून चुपचाप बसे. खरं म्हणजे आजोबानी तिला कधीच मारले नव्हते की रागे भरले नव्हते. पुष्कळवेळा तिला जवळ बोलावून रसगुल्ला किंवा संदेश आपल्या

हाताने ते तिला भरवीत. पण एवढे मोठे आपले बाबा, आजोबा बाहेरून आले की उठून उभे राहतात, आपली मा डोक्यावरचा पदर थोडा जास्तच पुढे ओढल्यासारखा करून संकोचाने वागते, तोंडाचा पट्टा चालविणारी आजी गप्प होऊन हसतमुखाने सामोरी जाते, नोकर माणसेसुद्धा आपापली कामे खालच्या मानेने करू लागतात, हे सारे पाहून सगळ्यांवर दरारा चालविणारे ते कोर्णातरी जबरदस्त इसम आहेत असे तिला वाटे. लहानपणापासून नकळत ती त्यांना भ्यायला शिकली होती. अशा या आजोबांची परवा न करता त्यांच्या मर्जीविरुद्ध वागायचे धाडस काकांनी दाखविले, म्हणजे कमालच आहे त्यांची ! तिला वाटले आपले काका खूपच शूर व धाडसी असले पाहिजेत.

मनाविरुद्ध असो की कसेही असो, लग्न तर ठरलं आहे ना, मग आतां खूप मजा करायला मिळेल या आनंदात ती होती. लग्नात मिरवायचे, नवे नवे कपडे नि दागिने घालायचे, यथेच्छ मिठाई खायची, असे जंगी बेत ती मनाशी करत होती, पण तिची निराशाच झाली. तिचे काका घरातून निघूनच गेले. काही दिवसानी तिला कळले की त्यांनी खूप दूर आसामात जाऊन तिकडच्याच कोणा मुलीशी लग्न केले. तिला काकांचा फार राग आला. इतर कोणाला राहो, पण त्यांनी तिला तरी त्यांच्या लग्नाला न्यायला नको होते कां ?

तिच्या काकीचे वडील फार श्रीमंत आहेत, आसामात त्यांचे मोठे चहाचे मळे आहेत, तिचे काका आता त्यांचेच घरी राहणार आहेत, वगैरे बातम्या गोपालेर माकडून तिला कळल्या होत्या. पण हे सारे तिचेकडून कळले असे घरात कोणाजवळही न बोलण्याबद्दल तिला बजावले होते.

काका घरातून गेल्यापासून त्यांच्या घरावर एक प्रकारच्या औदासीन्याची छाया पडली होती. तिच्या आजोबानी अंथरूण धरले होते. डॉक्टरांची ये जा व घरातील मंडळींची धावपळ यामुळे ती बावरून गेली होती. कलकत्त्यातच भवानीपुरला राहणारी तिची आत्या आपल्या धाकट्या मुलांना घेऊन रहायला आली होती. तिचे चुलतमामाही आले होते. सारा वाडा, घरात इतकी माणसे असूनही अगदी शांत होता. सगळे आपापली रोजची कामे मुकाटचाने करीत होते. आजोबांच्या पलंगावर त्यांच्या पायापाशी बसलेली आजी जेमतेम आंधोळीला व कसेबसे चार

घास खायला आत येत असे. झुमी किंवा तिच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा असलेला तिचा आतेभाऊ पूर्णचंद्र हे आजोबांच्या खोलीकडे जरा डोकावले की तिची आई किंवा आत्या—"मागच्या माडीत खेळा, जा, इथं काय तुमचं काम आहे," असे म्हणून त्यांना दूर पिटाळत. सगळ्या वाड्याभर आरडाओरडा करत, नाचतबागडत, व खोड्या करत स्वैरसंचार करणाऱ्या झुमीची मोठी पंचाईत झाली होती. दंगा करायची इच्छा असूनही तिला चुपचाप बसावे लागत होते. घरातील गंभीर वातावरणाचा परिणाम होऊन की काय, ती तिच्या भावांशी व शेजारच्या संवगड्यांशी दबलेल्या आवाजात बोलू लागली होती. एरव्ही पूर्णने तिच्या खेळाला हात लावला की त्याच्याशी भांडणारी झुमी त्याला हवे ते करूं देत होती. तिच्या आईचा गंभीर चेहरा, आत्याचे उतरलेले तोंड, आजीचे वारंवार भरून येणारे डोळे आणि बाबांची धावपळ याचा काहीतरी विलक्षण परिणाम तिच्या बालमनावर झाला होता.

"दिदिमणी, तुमचे आजोबा काही या दुखण्यातून वाचतीलसे वाटत नाही. पाहिलत ना, वडील मंडळींचे नाही ऐकले की कसे होतं ते? मग देव रागावतो नि मुलाना शिक्षा म्हणून त्यांच्या मोठ्या माणसांना आपल्या घरीच घेऊन जातो," असे गोपालेर मा हलक्या आवाजात तिला म्हणताच झुमी म्हणाली होती, "देवाची आपण क्षमा मागितली की झालं, मग देव आपल्या वडील माणसांना परत देईल!"

"एकदा नेल की देव कधीच परत देत नाही, म्हणून दांडगाई करू नये व नेहमी सगळ्या मोठ्या माणसांचे ऐकावं."—गोपालेर माचा हा उपदेश ऐकून तिने मनाशी ठरवले होत की यापुढे दंगा म्हणून करायच नाही आणि कोणाशी भांडायचेही नाही. मग कांहीं आपले आजोबा मरणार नाहीत!

पण हे दोन्ही निश्चय पाळणे दिवसेदिवस कठीण होऊ लागले होते. पूर्णचा शिष्टपणा खपवून घेणे, शेजारच्या मैत्रिणींचा ढालगजपणा चालू देणे—छे छे, भांडायच नाही हा निश्चय भलताच कठीण होता. आपल्याला उगाच भीति दाखवण्यासाठी गोपालेर माने खोटेच काहीतरी सांगितले नसेल ना, असे तिला वाटू लागले. आजी सगळ्यात मोठी आहे व तिला खूप कळते, तेव्हा यातला खरेखोटेपणा तिलाच विचारून

घ्यावा, असे मनाशी ठरवून आजीशी बोलायची संधि ती शोधू लागली. एक दिवस दुपारी आत्याचा हात धरून आजी जेवायला आत आली तेव्हा ती तिथेंच काहीतरी करत होती. तिच्या आईने पाट मांडून पाण्याचा स्वच्छ पेला आणून ठेवला, आणि ती ताट आणण्यास स्वैपाकघराकडे वळली. ही वेळ साधून ती हळूच येऊन आजीला बिलगली.

"झुमी, आजीला जेवू तरी दे जरा. बाहेर जा बर," असे तिच्या आत्याने तिला हटकले, पण "राहू दे ग, बसे ना का ? पोर आताशा कुठं येती आहे माझ्याजवळ," असे म्हणून तिला कुरवाळल्यासारखे करीत तिच्या आजीने विचारले, "बाळ, भात खाल्लास का ?" तिच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी लाडाने तिच्या दंडावर गाल घाशीत मोठे धाडस करून झुमीने विचारले, "आजी, देवबाप्पा आजोबांना घेऊन जाणार आहे, होय ?"—पुढचे काही शब्द तिच्या तोंडून बाहेर पडण्यापूर्वीच आईच्या हातची झणझणीत थप्पड तिच्या पाठीत बसली. "काय दुष्ट कारटी आहे ! चल, चालती हो बाहेर," असे म्हणत तिच्या आईने तिला फरफटत नेऊन बाहेर ढकलले. आजीचा मोठा हुंदका तिला ऐकू आला. तिची आत्या पण मुसमुसून रडत होती. तिने तेथून ओशाळे होऊन पाय काढला खरा, पण असे विचारण्यात आपल्या हातून काय दुष्टपणा झाला हे मात्र तिला कळेना. तिला आजीस बरेच काही सागायचे होते. यापुढे आपण कधीच कोणाशी भांडणार नाही, दांडगाई करणार नाही, सगळ्या मोठ्या माणसांचे ऐकत जाऊ वगैरे कबुलीजबाब, देवाने आजोबांना नेऊ नये म्हणून ती देणार होती, पण तिला पुरते बोलही न देता, आईने तिला दुष्ट ठरविले होतें. किती तरी वेळ मागच्या माडीत जाऊन ती रडत बसली होती, पण कोणीही तिची समजूत घालायला आले नाही. नेहमी प्रमाणे मधल्या वेळचे खायला बोलावले की अगदी रुसून बसायचे, व आईने किंवा गोपालेर माने कितीही आर्जवे केली तरी मुळीच खाली जायचे नाही असे तिने आपल्या मनाशी ठरवले, पण कोणीही तिची दखल घेतली नाही. सकाळी गोपालेर माने थोडासा भात तिला भरवला होता. त्यानंतर तिचे पोटात काहीच गेले नव्हते. उपास पडल्याने आणि अपमानाने ती आतल्याआत धुसफुसत होती. रडतारडता तिचा डोळा लागला.

संध्याकाळी घरात एकदम रडण्याचा कल्लोळ उठला तेव्हा ती दचकून जागी झाली. हळूच जिना उतरून ती खाली आली. "दिदिमणी, वडोबाबू देवाघरी गेले," असे गोपालेर मा आक्रंदून सांगत होती. माणसे देवाघरी आकाशात कशी जातात हे पाहण्याची तिला फार उत्सुकता होती. आपल्याला झोप लागल्यामुळे आपण ते पाहू शकलो नाही असे मनाशी चुटपुटत ती आजोबांच्या खोलीकडे वळली. नवल असे की, आजोबा रोजच्यासारखेच त्यांच्या बिछान्यावर निजलेले तिला दिसले. मग ते देवाघरी गेले हे कसे? नेहमी ते झोपलेले असले की त्यांच्या खोलीत सगळे गपचुप वावरत. आज मात्र सगळे ओक्साबोक्शी रडत होते. डोके बडवून आक्रोश करणाऱ्या तिच्या आजीला आईने सावरून धरले होते. आणि तिचे बाबा, "हेम, पुरे-तूच अशी आकांत करू लागलीस तर आईला कोण धीर देणार?" असे म्हणत तिच्या आत्याला समजावीत होते, व आत्या, "बाबा, कसे हो आम्हाला टाकून गेलात," म्हणून आजोबांचे अंगावर पडून रडत होती. इतका सगळा गोंधळ आजुबाजूला चालू असूनही आजोबा कांहीं जागे होत नव्हते. प्रत्यक्ष ते तिथे झोपलेले दिसूनही सगळे त्यांना विचारीत होते, "कसे हो आम्हाला सोडून गेलात?" या वडील माणसांची तरी कमाल आहे!

मग थोडचा वेळाने शेजारच्या बुकुन्ची आई तिला व तिच्या दोघा आते भावांना त्यांच्या घरी घेऊन गेली. त्यांच्या पुढच्या माडीत ती, बुकुन्, तिचे दोघे दादा निताई व निमाई असे सगळे बोलत बसले होते. माणूस मेले की काय होते, माणसाला फुलानी सजवून स्मशानात नेतात, मग जाळून टाकतात, अशी माहिती तिला निताईकडून कळली. तिची छाती भीतीने धडधडू लागली. आपल्या आजोबांनासुद्धा जाळणार की काय, असे तिला वाटले.

एकदम 'हरीबोल'चा गजर ऐकू आला. निमाई म्हणाला, "तुझ्या आजोबांना नेताहेत."—सगळी मुले पुढच्या गॅलरीकडे धावली. फुलांनी सजवून त्यांच्या पलंगासकट आजोबांना चारपाच जणांनी उचललेले होते. त्या गर्दीत काकांचाही चेहरा तिला दिसला. तिला वाटले त्यांना ओरडून म्हणावे "तुम्ही मोठचा माणसाच ऐकल नाही म्हणून देवबाप्पाने ही शिक्षा केली."

माणूस मरतो म्हणजे नक्की काय होते? त्याला जाळतात तेव्हा अंगाला चटके बसून तो ओरडत कसा नाही, आणि देवबाप्पा माणसाला नीटपणे त्याच्या घरी न नेता, जाळूनपोळून मग का नेतो, अशा कितीतरी शंकाकुशंका तिच्या मनांत गर्दी करीत होत्या. इतकी वडील माणसे घरात असूनही आपल्या शंका कोणाहीपाशी बोलाव्या असे तिला वाटत नव्हते. पुन्हा, 'दुष्ट कारटी,' असे आईच्या तोंडचे रागाचे शब्द ऐकून घेण्याची तिच्या मनाची तयारी नव्हती. शेवटी, गोपालेर मा सारखा बृहस्पती आपल्या घरात असताना आपल्याला कशाची अडचण, असे वाटून या सगळ्या प्रश्नांचा भडिमार तिच्यावरच करायचा, असे तिने ठरविले पण तीसुद्धा आजीजवळ नाहीतर आत्याजवळ सारखी बसलेली असे. त्यामुळे झुमीला आपल्या शंका मनातल्या मनात दाबाव्या लागल्या.

३

त्या भागात होणाऱ्या सार्वजनिक दुर्गोत्सवात त्यांच्या घरची वर्गणी सगळ्यात मोठी असे, त्यामुळे आळीतली मुले तिच्या वडलांच्या सल्लयाने मूर्ति, आरास वगैरे सगळे करीत. दुर्गापूजेनंतर कोजागिरी पौर्णिमेला त्याच मांडवात लक्ष्मीपूजा करायची व मगच तो मांडव उतरायचा अशी प्रथा असे. विजयादशमीपासून कोजागिरीपर्यंत चार दिवस मांडव रिकामा असे. त्यामुळे त्यांत आजुबाजूच्या मुलामुलींचे गायन, वादन, नाच, वगैरे कार्यक्रम केले जात.

झुमीच्या मैत्रिणीचे खरे नाव होते श्रावणी, पण तिला सगळे बुकुन् म्हणत. झुमी बुकुन्, बुकुन्चे दोघे मोठे भाऊ, निताई व निमाई, समोरच्या वाडग्यात नवीनच बिऱ्हाडाने आलेल्या गांगुलींचा अमूल्यधन व त्याची छोटी बहीण, आनंदिता, सगळ्यानी मिळून 'नदेर निमाई' या भक्तिरसपूर्ण नाटकाचा प्रयोग करून सर्व वडील मंडळींना चकित करायचे असे ठरविले होते. निताई निमाई हे चवदा पंधरा वर्षाचे म्हणजे बरेच मोठे होते, त्यामुळे त्यांच्याच नेतृत्वाखाली सगळे ठरत होते.

समोरच्या गांगुलींचा अमूल्य नाजूक व गोरागोमटा होता. नेहमीच परीटघडीचे कपडे, पायात बूटमोजे, केस व्यवस्थित फिरवलेले, अशा

थाटात तो असे. त्याची धाकटी बहीण पण छानदार फ्रॉक, बॉब केलेले केस, फ्रॉकच्याच रंगाची रिबन, अशा ऐटीत असे. ते घरी टेबलावर जेवीत. घरातल्या घरातसुद्धा त्यांची आई चपला घालून हिंडे फिरे. वसायच्या खोलीत लहान मुलांना फिरकायला बंदी असे. त्याचे वडील सरकारी नोकरीत मोठ्या हुद्यावर होते. झुमीच्या घरी ऐश्वर्य असले तरी त्यात जुन्यावळणाचा साधेपणा होता. त्यामुळे या मंडळीविषयी तिला कुतूहल वाटे. तिच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा असलेला अमूल्य तिला फार आवडला होता.

चैतन्य महाप्रभु म्हणून ओळखला जाणारा निताई हा विष्णुभक्त होता. त्याने विरक्त होऊन गृहत्याग केल्यामुळे दुःखी झालेली त्याची आई, शचिबाला, तिचा धाकटा मुलगा निमाई याचे अगदी लहान वयातच लग्न करून त्याला संसारात गोडी लावण्याचा प्रयत्न करते. छोटी सून विष्णुप्रिया मोठी गुणी असून सासूची व नवऱ्याची फार लाडकी होते. पुढे ऐन तारुण्यात वडील भावाच्या विरक्तीची व देवभक्तीची भुरळ पडून तो त्याचेच अनुकरण करून घर सोडतो. माता शचिबाला व पत्नी विष्णुप्रिया या निद्रित असताना तो निघून जातो, व वडील भावाप्रमाणे भक्तिमार्ग स्वीकारून वैराग्यशाली बनतो. घरात त्या दोघी दुःखाने वेडया होतात. इकडे चैतन्य महाप्रभु निताई व त्याचा शिष्य बनलेला धाकटा भाऊ निमाई हरिनाम-संकीर्तन करत देशोदेशी हिंडू लागतात. त्यांचेच गावात जगाई व मधाई नांवाचे दारुडे व वाईट, संगतीने बिघडलेले दोघे भाऊ असतात. निमाईचे हरिगुणगान ऐकून 'काय शिंची कटकट ! तोंड गप्प का ठेवीत नाही हा !' असे म्हणून ते दोघे त्याच्या डोक्यात विटेचा टोला हाणतात. भक्तिरसाने वेडावलेल्या निमाईला त्या प्रहाराचीं वेदना जाणवतच नाही. कपाळातून रक्त ठिबकत असतानाही तन्मयतेने तो गात असतो—

"मेरेछिश्, बेश करेछिश्, आमाय तो लागेनि,
एकबार तबु भाई, बोल, हरि बोल"—

'मला मारलंस, बरं केलस, मला तर ते लागलंच नाही. काहीही कर, पण बापडया, एकदा तरी मुखात हरि नाम आण,' असे बेभान होऊन

निमाई गात असतो. डोक्यातून रक्त गळत असतानाही त्याला असे गाताना पाहून दारुड्या जगाई-मधाईंना हसूं आवरत नाही. दारूच्या निशेंत झोकांड्या जात असतांनाही निमाईला चिडविण्यासाठी त्याच्या हरिनामाची नक्कल करीत टाळ्या पिटून 'बोल, हरि बोल' असे ते गाऊ लागतात. चेष्टेनेच का होईना, पण मुखातून आलेल्या त्या हरिनामाने प्रसन्न होऊन कनाई (कृष्णकन्हैया) अवतरतो व त्या दोघा पाप्यांचा उद्धार करतो.

—असा आशय असलेले 'नदेर निमाई' हे नाटक करण्याचे ठरले. निताई आणि निमाई म्हणाले, आमची नावें आयती तीच आहेत तेव्हा ते पार्ट आम्हीच करू. बोसबाबूंचे शोभन व मोहन आहेत ते जगाई मधाई छान शोभतील. समोरचा फॅशनेबल गोरागोमटा अमूल्य आहे त्याला कनाई करू या. बुकुन् होईल शचिबाला, आणि झुमी विष्णुप्रिया—बस् ठरलं! झुमीचा हात ओढीत निमाई तिला म्हणाला, "झुमे, नाटकात तू माझी बायको होणार आहेस, बरं का! मी सांगेन ते ऐकले पाहिजे."

"हॅट्! मी नाही जा तुझी बायको होणार! तू नुसता काळाकुट्ट नि ढेपसा आहेस—आपण अमूल्यलाच करू या निमाई. मी होईन त्याची बायको."

"अहाहा, काय पण! त्या नाजूक बाहुल्याला माझ्यासारखे ढंगदार हावभाव करून गाणे आणि नाचणे जमणार आहे होय?"

अमूल्यकडे वळून लडिवाळपणे झुमी म्हणाली, "अमूल्य, मी शिकवीन रे तुला. तू होशील ना निमाई?"

फ्रॉकच्या बोशी खेळत कोपऱ्यात उभी असलेली आनंदिता म्हणाली, "दादा, तू या मुलांत मिसळायचे नाही म्हणून ममीने बजावले आहे ना तुला? चल घरी, नाहीतर मी सांगेन तिला."—बिचारा अमूल्य! निताई-निमाई व झुमी यांच्या भांडणाने तो आधीच गोंधळून गेला होता, त्यामुळे बहिणीची ही धमकी ऐकून त्याने तिचेसह हळूच काढता पाय घेतला.

"भली जिरली ठमाबाईची, त्या गोऱ्यागोमट्याची बायको व्हायला पाहिजे काय?"—

—"अमूल्यच्या बायकोची हुर्यो!"

अशा आरडाओरडचात व रडण्याचिडण्यात सभा बरखास्त झाली. आणि नाटक बसवायला आरंभ होण्यापूर्वीच भरतवाक्य होऊन पडदा पडला.

अमूल्य तिच्या मनांत जसा चटकन भरला होता, तसाच उतरलाही थोडचाच दिवसात. त्या नाटकाच्या भांडणानंतर तिचे दोस्तमंडळ तिला 'अमूल्यची बायको' म्हणून चिडवत. तो तिला आवडला होता म्हणून ते चिडवणे तिने फारसे मनावर घेतले नव्हते.—एक दिवस त्यांच्या घराचे मागील अंगणात पेरूचे झाडावर चढून निमाई पेरू पाडीत होता. ती, बुकुन् व अमूल्य झाडाखाली उभे होते. जवळच भांडी घासायच्या मोरीपाशी पाण्याचा मोठा हौद होता. त्याचे कट्टचावर चढून हा पेरू पाड, तो पेरू तोड, अशी सूचना झुमी निमाईला देत होती. हे सगळे सांगत असताना, कडेवरील बाहुलीसकट तोल संभाळणे तिला कठीण जात होते. खाली पाडलेले पेरू बुकुन् वेचत होती. अमूल्य मात्र त्या तिघांपासून थोडा दूरच उभा होता. त्याच्या बालमनाला पेरूचा मोह होत असावाच. पण त्या तिघांच्या गोंधळात प्रत्यक्ष सामील होणे बरे नाही असे वाटून की काय, चार पावले दूर उभे राहून तो गुपचुप त्यांची मजा पहात होता.

"दिदिमणी, थांबा हं, सांगते तुमच्या माला," असे धमकावीत गोपालेर मा तेथून आत गेली, तेव्हां, "निमाई, लवकर आणखी दोन पेरू पाड नि उतर खाली. मा रागवेल," असे म्हणता म्हणता स्वतः हौदाचे खाली उतरण्याचे नादात तिची बाहुली पाण्यात पडली. ती बाहुली तिची फार आवडती होती. दोन वर्षामागे तिचे काका विलायतेहून आले तेव्हा त्यांनी ती तिच्यासाठी आणली होती. तिचे केस खऱ्या मडमेसारखे सोनेरी भुरे होते. गाल गुलाबी, डोळे निळे, नि ओठ अगदी लालचुटुक! पाहिली कीच मनांत भरावी अशी गोड बाहुली होती. तिच्या अंगावरचा लेस लावलेला फ्रॉक आता मळकट झाला असला तरी एकेकाळी फार सुंदर होता. बाहुली पाण्यांत पडली म्हणून ती रडू लागली. नुकत्याच पाडलेल्या पेरूंनी बुकुन्ची ओंजळ भरलेली होती. निमाई तर झाडावरच होता. म्हणून ती अमूल्यकडे वळून म्हणाली, "तू माझ्यापेक्षा उंच आहेस. कट्टचावरून खाली वाकलास तर तळापर्यंत तुझा हात सहज पोहोचेल. दे ना काढून माझी बाहुली."

"नको रे बाबा. माझा शर्ट खराब झाला तर ममी रागवेल," असं म्हणत एखादा तरी पेरू मिळवण्याच्या आशेने उभा असलेला अमूल्य तेथून सटकला.

"हाट् लेका," असे म्हणत झाडावरून धाडकन खाली उडी मारून निमाईने तिची बाहुली ताबडतोब तिला काढुन दिली.

तिला अमूल्याचा फार राग आला होता. आपल्यापेक्षा स्वतःच्या शर्टाचीच काळजी त्याला जास्त असावी याची तिला चीड आली होती.

पुढे कोणी तिला, 'अमूल्यची बायको' असे चिडवले की, "गप्प बसणार, का लगाऊ एक ठोसा" असे ती संतापाने म्हणे.

४

त्या विलायती बाहुलीप्रमाणे तिच्या आईने तिला कालिघाटहून आणलेली एक छानदार बाहुली होती. तिचा वेष एखाद्या कुलवधूसारखा होता. ती पण झुमीची फार आवडती होती. झुमीने तिचे नाव हौसेने मनीषा असे ठेवले होते. ते ऐकून गोपालेर मा मोठ्या खुषीने म्हणाली होती, "मनशा काय ? वा ! चांगल देवीच नाव ठेवलय की !" हे ऐकताच ती म्हणाली होती, "ए वेडे, मनशा नाही, मनीषा." तरीसुद्धा ते न पटून गोपालेर मा म्हणाली, "मा मनशाची गोष्ट मी सांगितली नाही का तुम्हाला ? सागर सौदागराचे मुलगे जगत नव्हते. सती बेहुलाचे त्याने आपला धाकटा मुलगा चाँद सौदागर याचे मुलाशी लग्न लावले, तरीपण त्याच्या मुलाचा अपमृत्यु झाला. शिवशंकराची मानसकन्या मनशा त्याला कालनागिणीचे रूप घेऊन डसली होती. देवी मनशेला चांद सौदागराकडून पूजा घ्यायची होती म्हणूनच ही लीला तिने केली होती. सती बेहुलाने मनशा-पूजा करून तिला प्रसन्न केले, व पतीचे प्राण परत मिळवले. दरवर्षी भाद्रपदांत पुष्कळ घरातून मनशा-पूजा करतात हे माहीत नाही का तुम्हाला ?"

"अग ती असेल ग मनशा, पण ही माझी मनीषा आहे बर !"

पण किती वेळा सांगितले तरी गोपालेर मा तिच्या मनीषाला मनशाच म्हणायची. शेवटी तिला सांगण्यात काही अर्थ नाही, त्या अडाणीला

म्हणू दे काय वाटेल ते, असा विचार करून झुमीने तो नाद सोडला होता.

तिची मैत्रीण बुकुन् हिच्याकडे एक बाबूचे वेषातील बाहुला होता. पूजेच्या सुट्टीत नाटकात काम करण्याचे असे ओंफस झाल्यामुळे, उन्हाळ्याच्या सुट्टीभर काय करायचे हा प्रश्नच होता. दोघी मैत्रिणीनी संगनमत करून बाहुलाबाहुलीचे लग्न करायचे असे ठरविले. त्या निमित्ताने एक दिवस तर दंगल उडवता आली असती! शिवाय, लग्नाची जुळवाजुळव करण्यात काही दिवस गडबडीत गेले असते. आईच्या पाठीस लागून तिने परवानगी तर मिळवली. मग तयारीचा धुमधडाका सुरू झाला.

बुकुन् म्हणाली, "झुमी, खेळातले लग्न म्हणून काहीतरीच नाही हो करायचं! सगळं यथासांग झालं पाहिजे. निताईदादा होईल वाजंत्री-वाला आणि निमाईदादा होईल पुरोहित, शोभन, मोहन, सुरमा, शांति, अपर्णा, ही सगळी होतील वऱ्हाडी."—अमूल्य व त्याची बहीण आनंदिता या शिष्ट बहिणभावंडांचे वर बहिष्कार टाकून त्यांची ऐट जिरवायची, हे पण एकमुखाने ठरले. मुलाकडचे व मुलीकडचे वऱ्हाडी कुणी व्हायचे याची वाटणी झाली. झुमी मुलीची आई होती, नवऱ्यामुलाला छानदार पोषाख व नवऱ्यामुलीला दागदागिने मुलीच्या आईनेच द्यायचे, इतकेच काय, खेळातील बोळकी, छोटा पलंग, कपाट, वगैरे पण नवे घेऊन द्यायचे अशा अटी मुलाची आई झाल्यामुळे चढून गेलेल्या बुकुन्ने घातल्या होत्या. ती मोठ्या ठमकाऱ्याने मिरवीत होती. लग्नात मुलीकडच्यांनी थोडा कमीपणा पत्करून मुलाकडच्यांचे सगळे थाटात करायचे असते, हे लहानपणापासून नात्यांतल्या व शेजारपाजारच्या लग्नात झुमीने पाहिले असल्यामुळे ती आपल्याकडून मुलीच्या आईची भूमिका योग्य तऱ्हेने वठवीत होती. मोठा गंभीर भाव चेहऱ्यावर आणून, 'काय करायचं बाई, मुलीला उजवलं तर पाहिजे' असा गळ्याशी आलेल्या मुलीच्या कष्टी आईचा अभिनय करीत असतांना काही उणे पडू नये म्हणून ती झटत होती.

लग्नाच्या दिवशी तर तिला उसंतच नव्हती. मोठ्या सोसाने नेसलेली साडी सत्रादा सुटत होती व तिचा बोंगा सावरताना तिला

नकोसे झाले होते. पुरोहित झालेला निमाई, "मनीषाची मा, हे पाहिजे, ते पाहिजे," असे सारखे तिला सतावीत होता.—"इश्! हा कसला मुलाचा पोषाख? घरातलच जुनं जरीकाठी धोतर फाडून ठेवलंय, तें का माझ्या मुलाला नेसवायचं? वीतभर कोऱ्या कापडाचा तुकडासुद्धा नाही का सापडला घरात?—अहाहा! काय पण दागिने केले आहेत मुलीला! सोनेरी मण्यावरचा वर्खसुद्धा निघाला आहे!—साडचा तरी नीट घालायच्या लेकीला—ही का सून म्हणून घरी आणायची!" असे काहीना काही तिला टोचून बोलत बुकुन् तिचा पाणउतारा करीत होती, व "काय आहे ते गोड करून घ्या" अशा नाकदुऱ्या तिला काढायला लावीत होती.

हे सारे पाहून तिची आई व आत्या फिस्फिस् करून हासत होत्या. गोपालेर माने तर दुःखावर डागण्या देण्याचा विडाच उचलला होता.—"पाहिलत दिदीमणी, मुलीची आई होणं किती कठीण असतं? तुमच्या लग्नात वहिनीसाहेबांना असंच दुसऱ्यापुढं वाकावं लागेल."—

हे ऐकून तिला विलक्षण संताप आला. मुळात तिची वृत्ति स्वाभिमानी होती. कोणापुढे वाकणे तिच्या जिवावर येई. चूक झाली तरीसुद्धा ती कबूल करून क्षमा मागणे तिला अपमानास्पद वाटे—खेळात झालं म्हणून काय झालं, सगळ्यानी तिला वाटेल ते बोलावे, आणि तिने ते मुकाटचाने सहन करावे?—नाही, कधीच शक्य नाही!

तिला वाटल, उधळून लावावा हा खेळ.

"ए बुकुन्, उगाच जास्त शिष्टपणा करशील तर मी नाही खेळणार जा," असे चिडक्या आवाजात म्हणत तिने आपली बाहुली उचलली.

"वा ग वा! लग्न झाल्यावर मुलीवरती तुझा काय हक्क? आता माझ्या बाहुल्याची ती बायको झाली आहे. मी तिला आमच्या घरी घेऊन जाणार," असे म्हणत बुकुन् बाहुलीला झुमीच्या हातातून हिसकावू लागली. या ओढाताणीत त्या बिचाऱ्या बाहुलीचा एक पायच तुटला. ते पाहून बाहुलीला झुमीचे अंगावर भिरकावत बुकुन् म्हणाली, "घे जा तुझी पांगळी लेक. हवीय कुणाला असली लंगडी सून!"

पायाने पांगळ्या झालेल्या तिच्या लाडक्या मनीषाला कुशीत घेऊन रात्री ती कितीतरी वेळ रडली होती.

५

तिच्या आईचे नांव 'निहार,' हे तिने प्रथम ऐकले ते मामांच्या तोंडूनच.

निहार म्हणजे सुंदर ! खरंच, किती यथार्थ होतं हे नाव ? तिची आई होतीच खूप सुंदर आणि नाजुक. पान खाल्ल्यावर लालचुटुक दिसणारे तिचे ओठ, काळेभोर डोळे, गोरापान रंग, रेखीव बांधा, आळ-त्याच्या रेषेने अधिकच आरक्त दिसणारीं पावलें, लखलखीत सुवर्ण कांकणांनी शोभणारे गोंडस हात, हे पाहिले की तिच्या नावाची समर्पकता सहज पटे. ती भांगात शेंदूरसुद्धा अगदी रेखून घाली, आणि तिच्या कपाळावरील कुंकवाची टिकली तिचे रूपात सात्विकपणाची भरच टाकी.

झुमीचे आजी-आजोबा तिच्या आईला बहुमा म्हणत असत. काका व आत्या बहुदी म्हणायचे. आजा-आजी हयात असेपर्यंत नोकरमाणसे पण तिला बहुदीच म्हणत. पण आता त्यांच्या मागे सगळे नोकर तिला बडोमा म्हणू लागले होते. आणि झुमीचे बाबा तिला झुमीर मा अशी हाका मारीत. त्यामुळे इतके योग्य नाव असूनही त्या नांवाने तिला कोणीच हाक मारीत नसे.

झुमीला वाटे याच्या किती उलट आहे आपल्या काकिमाचे ? तिच्या काकीचे नाव राजमोहिनी होते. आणि काका तिला पावलोपावली 'राज, राज' अशी सर्वांसमोर हाक मारीत.

आजीच्या मृत्यूनंतर तिचे वडील बेलघुरियाच्या बागानबाडींत रहायला आले होते. बेलघुरियाचे घर, इतर शेतीवाडी व उत्पन्न आजोबानी तिच्या वडलांना दिले होते, आणि कलकत्त्याचे घर काकांच्या नावे करून ठेवले होते. तिचे काका आसामात आपले सासुरवाडी रहात. त्यामुळे आपला दादा कलकत्त्याच्या घरात राहिला तरी त्यांची हरकत नव्हती. पण आपली जाऊ मनाची निर्मळ नसल्यामुळे पुढे मागे वाईट ठपका यायला नको या हेतूने तिच्या आईनेच बेलघुरियाला जाऊन राहण्याची चउल केली होती.

इतके दिवस झुमी शामबझारच्या नॉर्थ कलकत्ता गर्लस् स्कूलमध्ये शिकत होती. तिला आता बारा वर्ष पूर्ण झाली होती. वयात येण्याची सर्व पूर्वचिन्हे तिच्या कोवळ्या शरीरावर उमटू लागली होती. बाल्य

व तारुण्य याच्या अर्धवट सीमारेषेवर ती होती. बेलघुरियाच्या जवळपास चांगलीशी शाळा नसल्यामुळे झुमीला शांतिनिकेतनच्या विश्वभारतीत शिकायला ठेवण्याचा बेत अशुतोषबाबूंनी केला होता. त्यांच्या वडलांचे जुने स्नेही, सुकोमल मल्लिक, हे तर रवींद्रनाथांचे हयातीत तिथेच घर बांधून स्थाईक झालेले होते. त्यांचा मोठा मुलगा साधन हा तेथील कलाविभागात अध्यापक होता. त्यांचे ओळखीनेच झुमीला तिकडे पाठवायचे असें ठरलें होतें.

अलीकडे तिच्या आईची प्रकृति फारशी बरी नसे. आजी वारल्या-पासून सर्व परिवाराची जबाबदारी तिच्या आईवर होती. आणि ती पार पाडीत असतांना स्वतःच्या ढासळणाऱ्या तब्बेतीकडे ती दुर्लक्ष करीत होती.

"वहिनी, एखाद्या चांगल्या डॉक्टरला तरी दाखव एकदा ! किती वाळली आहेस आताशा ! जेवण जात नाही, खाल्लेल पचत नाही, असं नेहमी होण बरं नाही. तू काही ऐकायची नाहीस. थांब, दादालाच बजावते मी,"—असे म्हणून तिच्या आत्याने शंका व्यक्त केली तेव्हा तिचे वडील सचित मुद्रेने म्हणाले, "खरंच, एखाद्या चांगल्या डॉक्टरला दाखवलं पाहिजे हिला." पण तिच्या आईने मात्र हें बोलणे थट्टेवारीच नेले होते.

कलकत्त्याला काही कामानिमित्त आलेले असतांना तिचे मामा बेलघुरियाचे घरी भेटायला आले होते. लवकरच झुमी शांतिनिकेतनला जाणार तेव्हा त्यापूर्वी तिला घेऊन आपल्या बहिणीने थोडे दिवस तरी आपले घरी हसनाबादला येऊन रहावे असा त्यानी आग्रह केला. "निहारची प्रकृति काही ठीक दिसत नाही. तिला पण हवापालट होईल," असे ते म्हणाले.

हे तिचे चुलतमामा होते. तिचे सख्खेमामा तिच्या जन्मापूर्वीच वारले होते, आणि आपल्या एकुलत्या एक मुलाला घेऊन तिची मामी या चुलतमामांच्या आश्रयाला येऊन राहिली होती. झुमीची धाकटी मावशी व तिचे यजमान यांनीं तिच्या आईवडलांशी फारसा संबंध ठेवलेला नव्हता. आपल्या वडलांनी मोठ्या बहिणीला लग्नात जितके सोनेनाणे दिले त्या मानाने आपल्याला काहीच दिलेले नाही असा तिच्या मावशीचा रुसवा

होता. नुसते गोडगोड बोलून तोंडाला पानेच पुसली असा मावशीचे यजमानांचा दावा होता. वास्तविक या प्रकरणात तिच्या आईचा कांहींच संबंध नव्हता, पण झुमीच्या घरची संपन्न स्थिति त्यांना बघवत नसावी. झुमीने आपल्या मावशीला एक दोन वेळाच काय ते पाहिले होते. हे तिचे चुलतमामा पण फारसे त्यांचेकडे येत नसत.

पूर्वी मार्टिन कंपनीची लाइट रेल्वे होती तेव्हां त्या मार्गाने हसनाबादला जाणे सोयीस्कर होते. पण आता शामबझारच्या मुख्य नाक्यावरून बसीरहाटमार्गे जाणाऱ्या खाजगी बस्‌मधून जावे लागे. प्रवास ४।५ तासांचा व मोठ्या कटकटीचा होता. रस्ता पुष्कळ ठिकाणी अगदी अरुंद व खाचखळगे असलेला, त्यामुळे बस्‌ला गचके बसत. याशिवाय बस्‌मधे पाय सरकवायलाही जागा नाही अशी गर्दी असे. तेव्हा ती यातायात टाळण्यासाठी घरच्याच गाडीने झुमी, तिची आई व मामा निघाले. तीन चार दिवस त्यांचेकडे राहून परत यायचे असा बेत ठरला होता.

हसनाबादला मामांचे घर लहानसेच पण भक्कम बांधणीचे होते. बाजाराचे हमरस्त्यावर घर असल्यामुळे पुढच्या भागात तिच्या मोठ्या मामेभावाने किराणामालाचे दुकान चालविले होते. याशिवाय, कालि-मंदिराचे वाटेवर कापडाचे, स्टेशनचे वाटेवर स्टेशनरी सामानाचे, अशी तीन चार दुकानें तिच्या मामांच्या मालकीची होती.

तिची सख्खीमामी मोठी शांत व गरीब होती. आणि गरीबपणाने न वागून काय करणार बिचारी! तिचा मुलगा नरेंद्र मार्गी लागेपर्यंत तिला मुकाटचाने या आधाराला चिकटून राहणे भागच होते. तिचे माहेर पाकिस्तानात होते. माहेरी एका भावाशिवाय कोणीच नव्हते, आणि तो पण तेथील सगळे सोडून जिवाच्या भीतीने इकडे पळून आला होता, व बसीरहाटला कांहींतरी व्यवसाय करून कसेबसे दिवस काढीत होता.

व्यापारधंद्यात जम चांगला बसल्यामुळे व जवळ बरीच माया जमल्यामुळे तिचे हे चुलतमामा, मामी व मामेभावंडे मोठ्या दिमाखात होते. "निहार, तुझे सासरे दुकानदार म्हणून आम्हाला कमी लेखीत, पण तुमच्यासारख्या जमिनदारांना सरकारने आणलेच की नाही

ठिकाणावर? आता घराण्याचा नुसता पोकळ अभिमान बाळगण्या-पलीकडे राहिलय काय हातात?" तिच्या आईला खिजवण्याच्या उद्देशाने ते म्हणाले होते. पण त्यावर काहीच उत्तर न देता आई गप्प बसली त्याअर्थी 'काय नादी लगायचय यांच्या' असाच विचार तिच्या मनात आला असावा.

रात्री सगळी निजानीज झाल्यावर तिच्या आईच्या कुशीत शिरून तिची मामी कळवळून रडत होती, व तिची आई, "वहिनी, उगी रहा, रडू नको धीर धर," असे तिला समजावीत होती. त्यामुळे झुमीची झोप उडाली, तरी गपचिप पडून राहून ती त्या दोघींची बोलणी ऐकू लागली.

मामा पैशासाठी कसलेही नीतिबाह्य वर्तन करण्यास मागेपुढे न पाहणारे होते. पाकिस्तानातून चोरून मारून माल आणून त्याचा काळाबाजार करणे, वरिष्ठांची मूठ पैशाने दाबून मालाचा बेकायदा साठा व विक्री करणे, यांत त्यांचा हातखंडाच होता. असे असूनही गावात एक प्रनिष्ठित इसम म्हणून ते ओळखले जात होते. तेथील प्रदेश काँग्रेस कमिटींत त्यांचा वरचष्मा होता. निवडणुकीत कोणता उमेदवार उभा करायचा, कमिटीत कोणते ठराव पास करायचे, या महत्त्वाच्या गोष्टीसुद्धा त्यांचे सल्ल्याने चालत.

पण हा गुंडपणा फार दिवस चालणे शक्य नव्हते. दर वेळी नवा पोलिस जिल्हाधिकारी बदलून आला कीं त्यांचे उद्योग कांहीं दिवस स्थगित होत. त्या अधिकाऱ्याचा मगदूर ओळखून त्याची मूठ दबायला काय योजना करायच्या याचा अंदाज घेऊन मग पुनश्च त्यांचे उद्योग सुरू होत. सध्या इकडे नवीन बदलून आलेला जिल्हाधिकारी पूर्वीच्या सगळ्या अधिकाऱ्यांपेक्षा कडक व शिस्तप्रिय होता. त्यामुळे मामांच्या जातीचे सगळे लोक विशेष सावधगिरीने पावले टाकीत होते.

त्यांच्या या भानगडीत तिच्या मामीला चिंता करण्याचे मुख्य कारण म्हणजे तिच्या चौदा पंधरा वर्षांच्या अजाण नरेंद्रला त्यांनी आपला हस्तक बनवला होता. तो लहान असल्यामुळे मालाची बेकायदा ने आण करण्याचे काम त्याचेवर सोपवले तर पोलिसांना विशेष संशय येणार नाही या सबबीवर त्यांनी त्याला हाताशी धरले होते. तो जर पोलिसांचे हाती लागला तर कसे होणार याची चिंता मामीला अहोरात्र जाळीत

होती. सुंदरवनातही मामांच्या मालकीची थोडीशी जागा होती. तेथें दाट कळकाचे वन होते. तेथील बांबू एकत्र करून त्याचे भारे विक्रीसाठी इकडे आणण्याच्या कामावर देखरेख करण्यास ते पुष्कळ वेळा नरेंद्रला पाठवीत. सुंदरवनात वाघांचा व केवटे जातीच्या सापांचा बराच उपद्रव होता. त्यामुळे अशा कामासाठी नरेंद्र तिकडे गेलेला असला कीं तो घरी परत येईतों मामीच्या जिवात जीव नसे. गोडगोड बोलून तिच्या विम्याचे पैसे व दागदागिने या मंडळीनी लुंगावले होते—आणि आता तिची मुख्यच धनदौलत—तिचा पुत्र नरेंद्र याची नीतिमत्ता बिघडवून त्यांनी तिच्या काळजालाच हात घातला होता. त्यांचे नादाने नरेंद्रला पण या गुंडपणाची इतकी चटक लागली होती की तो आपल्या आईचे या बाबतीत काहीच ऐकुन घेण्यास तयार नव्हता. सिनेमा, पान सिगारेट, हॉटलेचे खाणे, छानछोकीचे कपडे, वगैर नरेंद्रची हवीतशी चैन पुरवून त्यांनी त्याला अगदी आपला अंकित केला होता.

दुसरे दिवशी संध्याकाळी नरेंद्रबरोबर झुमी इच्छामती नदीचे तीरावर फिरायला गेली असता तो म्हणाला, "या नदीचे पलीकडे पाकिस्तान आहे, माहीत आहे का तुला ?"

"खरंच !" असे म्हणत तिने समोर पाहिले. पलीकडच्या तीरावर दुरून दिसणारी लहान लहान घरें, झाडें, माती, सर्व कांही इथल्यासारखेच दिसत होते. पाकिस्तान म्हणजे एखाद्या चेटकिणीच्या जादूनगरीप्रमाणे कांहीं विलक्षण देश असेल अशी लहानपणी तिची समजूत होती. पण प्रत्यक्षात हा कुठल्याच प्रकारे अजब देश नसून अगदी आपल्या देशासारखाच आहे हें पाहून तिला नवल वाटले. माणसांनी हा भेद निर्माण केला म्हणून, नाहींतर एकेकाळी एकाच वंगदेशाचे हे भाग नव्हते का ?

नरेंद्र मोठ्या प्रौढीने आपल्या शौर्याची फुशारकी मारण्यासाठी काही गुप्त गोष्टी तिला सांगत होता, व वरचेवर, "शपथ आहे हं, झुमी, बोलायचं नाही कोणापाशीं," असे तिला बजावीत होता.

रात्री अंथरुणावर पडल्यापडल्या त्याच्या साहसी जीवनाची कल्पना ती मनाशी करीत होती. अंधाऱ्या रात्री इच्छामती नदीच्या निर्जन किनाऱ्यावर गावापासून दोन-तीन मैल दूर एका पडीक मंदिराचे मागील घाटावर नरेंद्र व त्याचे दोघे मामेभाऊ, नाहीतर मामांची कोणी विश्वासू

माणसें गपचुप जमत. घाटापाशी एक होडी तयारच असे. नदीच्या पैलतीरावर पाकिस्तानच्या खुलना जिल्ह्यातील कुठलेसे खेडेगाव होते. तिकडून इकडे मालाची चोरटी वाहतुक होत असे. दुरूनच अंधुक उजेडात पैलतीरावर थोडी हालचाल दिसू लागली की नरेंद्र मशाल पेटवून त्या उजेडात आपल्या हातातील पंचा एका ठराविक पद्धतीने हालवून खुणेची निशाणी देई. मग त्या तीरावर पण दिवटी पेटवली जाई, व नौकेसारखे मोठे काळेकुट्ट काही तरी तिकडच्या किनाऱ्यावरून हळुहळु इकडे सरकू लागले आहे असे दिसे. ते पाहिले कीं मामांची माणसे आपली होडी पाण्यात सोडीत. नरेंद्रला पहारा करण्यासाठी घाटावरच ठेवीत. काही धोका आढळला तर तो उलट दिशेने पंचा हालवून खूण करी. मग त्या नौका आपापल्या तीराला गुपचिप येऊन भिडत. धोका नसेल तेव्हा त्या होडच्या इच्छामतीचे विशाल पात्रात साधारण मध्यावर भेटत. मोठ्या चपळाईने तिकडचा माल इकडे उतरवला जाई. माल ताब्यांत आला की नरेंद्रचा दादा, रुपयांचा तोडा त्या नौकेवर फेकी.— नारळ, सुपारी, ज्यूट, तांदूळ ह्याच जिनसा त्या मालात प्रामुख्याने असत. हा माल पाकिस्तानात इथल्यापेक्षा कितीतरी स्वस्त मिळे. तो माल चोरून इकडे आणून दामदुपटीने विकला की भरपूर फायदा मिळत असे. तिकडच्या व इकडच्या तीरावर बंदोबस्तासाठी नेमलेल्या पोलिसांना या फायद्यातील ठराविक भागी दिली की सगळे काम बिनबोभाट चाले. मालच काय, पण माणसेसुद्धा अशी गपचूप पासपोर्ट करण्याचे भानगडीत न पडता इकडून तिकडे येत जात. एखादा नवा पोलिस अधिकारी बदलून आला की या हालचालींना तात्पुरता खंड पडे. तो थापडवाईक व अल्पसंतुष्ट असला तर हा व्यवहार लवकरच पुर्ववत् चालू होई. पण तो नाठाळ व कडक असला, आणि आपल्या अधिकाराचे जोरावर दडपण आणून कायद्याचा बडगा दाखविण्याच्या बाता करू लागला की त्याला जास्त भागीचे आमिष दाखविले जाई. एवढ्यानेही तो वश न झाला तर एकटा दुकटा गाठून 'तुझा काटा काढू' अशा धमक्याही देण्यात येत, व साम-दाम-दंड-उपायांनी त्याला ताळ्यावर आणीत. पण आताचा नवा इन्स्पेक्टर मात्र कोणालाही न भिणारा व कडक प्राणी होता. सरकारमधे मोठ्या हुद्यावर त्याचे नातलग होते. असे वशिले असल्यामुळे त्याला

दुखवणें किंवा धमकावणें सोपे नव्हते. त्यामुळे या हालचालींना मोठाच पायबंद पडला होता, तरी एवढे मोठे फायद्याचे घबाड सहजासहजी सोडायला मामा तयार नव्हते. जास्त सावधगिरीने व फार चोरून मारून त्यांनी हें काम चालू ठेवले होते खरे, पण केव्हाही पकडले जाण्याचा धोका होताच.

हे सगळे ऐकल्यापासून या मंडळीतून कधी एकदा दूर आपल्या शांत सुखमय घरी परत जातो असे तिला झाले होते. घरच्याच गाडीने ते इकडे आल्यामुळे मनात आणले तर केव्हाही परत जाणे शक्य होते. "आपण घरी जाऊं या," असे तिने आईजवळ म्हणताच आईने पण दुपारचे जेवण झाले की निघण्याचा बेत केलेला आहे हे कळून तिला अगदी हायसे वाटले. त्या दोघी निघाल्या तेव्हां, "पुन्हा आलं पाहिजे बरं का," असे मामामामी तिचे आईला बजावीत होते.

"वन्स, मला विसरू नका" असे म्हणतांना तिच्या विधवा मामीचे डोळे भरून आले होते.

"ह्यांना सांगून नरेंद्रची काहीतरी व्यवस्था मी जरूर करीन, तू धीर सोडू नको," असे आश्वासन मामीला देऊन तिची आई मोठ्या गंभीर मुद्रेने गाडीत चढली. गाडी सुरू झाल्यावर पुन्हा कधी या भयंकर माणसांचे तोंड पहायचं नाही असा निश्चय करावा असे झुमीच्या मनाला वाटले. तो तिचा निश्चय मोडण्याची पुढे तिच्यावर वेळ येऊ नये अशाच घटना घडल्या होत्या.

६

बोलपुर स्टेशनवर दुपारी एकचे सुमारास नॉर्थ बेंगॉल एक्स्प्रेसमधून ती व पटलबाबू उतरले. सायकल-रिक्षा करून शांतिनिकेतनला पोहोचायला दीड वाजून गेला. बोलपुर गावाची लहानलहान घरे व बाजारपेठ मागे टाकल्यावर रस्त्याच्या दुतर्फा मोकळे माळरान पाहून तिला फार बरं वाटल. एका वळणावर गुरुदेव रवींद्रनाथांचा बैठा पुतळा दिसला. रिक्षावाला म्हणाला, "आलच शांतिनिकेतनचं आवार."

ते दोघे सरळच मल्लिकबाबूंच्या छोट्या बंगल्याकडे गेले. साधन मल्लिक हे तिच्या वडलांपेक्षा आठ दहा वर्षांनी लहान होते. तरीपण वयाच्या मानाने त्यांनी आपली तब्येत छान संभाळली होती. रिक्षांतून त्यांना उतरतांना पाहून ते लगबगीने पुढे आले व म्हणाले, "ओ हो, आलीस, मी वाटच पहात होतो. बरं का, मिठुर मा, अशुतोषबाबूंची झुमी आली हं." असे त्यांनी म्हणताच, त्यांची पत्नी व तिच्याच वयाची त्यांची बारातेरा वर्षांची मुलगी, मिठू, बाहेर आल्या. साधनबाबूंची पत्नी खूप स्थूल शरीराची, पण मोठी हसतमुख बाई होती. आणि मिठूच्या चेहऱ्याकडे पहाताच, 'बरी मिळाली जोडीला मैत्रीण' असाच विचार तिचे मनात आला.

तिला पोहोचवल्यावर संध्याकाळचेच गाडीने पटलबाबू परत गेला. तो बुधवार होता, त्यामुळे तिथं सगळ्यांना सुट्टी होती. रविवारी बाहेरचे पाव्हणे शांतिनिकेतन पहायला येतात म्हणून मुद्दामच बुधवार हा सुट्टीचा वार तेथे ठेवलेला होता. वास्तविक नवे वर्ग शुक्रवारपासून सुरू व्हायचे होते. पण, बंगाली लोकात गुरुवारी मुलीला बाहेरगांवी पाठवीत नाहीत. गुरुवार हा लक्ष्मीचा वार समजतात. कन्या, पत्नी किंवा सून यांपैकी कोणत्याही गृहलक्ष्मींना त्या दिवशी घर सोडून दुसरीकडे रहायला पाठवीत नाहीत. म्हणून एक दिवस आधीच ती तेथे आली होती. शुक्रवारपासून ती वसतिगृहात राहू लागणार होती. या नव्या वातावरणात तिला अगदी बुजल्यासारखे झाले होते.

लहानपणी आजा-आजीबरोबर पुष्कळ वेळा बेलघुरियाच्या बागान-बाडीत ती येऊन रहात असे. तेथे आले की खूप खेळायला मिळते यामुळे ती खूष असे. पण तिच्या वडलांनी कलकत्त्याचे घर कायमचेच सोडले हे कळल्यावर मात्र आपली बालमैत्रीण बुकुन्, शाळेतील इतर मैत्रिणी या सर्वांना आपण पुन्हा कधी भेटणार या कल्पनेने तिला वाईट वाटलें होते. तिची समजूत घालतांना आई म्हणाली होती, "एखाद्या सुट्टीत तुझ्या बुकुन्ला आपण आपल्या बेलघुरियाच्या घरी रहायलाच घेऊन जाऊ या, मग तर झालं?"—आणि आता तर बेलघुरियाचे घरापासून व तिच्या माबाबापासूनही दूर एकटीच ती इकडे आली होती. मनातून येणारे दुःखाचे कढ ती मोठ्या प्रयासाने दाबीत होती.

ती इकडे यायला निघाली त्याचे चारपाच दिवस आधी तिच्या आईचा अपचनाचा व पोटदुखीचा त्रास वाढला होता. कलकत्त्याच्या एका डॉक्टरांनी सांगितले होते की यांना आतड्याचा अल्सर आहे. कदाचित ऑपरेशन करावें लागेल अशी बोलणीं तिच्या कानावर आली होती, त्यामुळे आईला सोडून येण्याचे तिच्या अगदी जिवावर आले होते. पण तिचे वर्ष वाया घालवून उपयोग नाही असे वाटून वडलांनी जवळजवळ जबरदस्तीनेच तिला इकडे पाठवले होते.

"संभाळून रहा, प्रकृतीला जप, नीट अभ्यास कर, सगळ्यांशी चांगली वाग," वगैरे उपदेश तिला केल्यावर, "सुट्टी पडताच लगेच तुला घरी आणू. तू काही काळजी करू नको," असे आश्वासन आईने दिले होते. पण झुमी निघाली तेव्हा मात्र आईला रडू अनावर झाले.—आता आपली मा कशी असेल? आपल्यावाचून तिला करमत असेल का? असे कित्येक कष्टी विचार झुमीच्या मनात गर्दी करत होते.

शुक्रवारी वर्ग सुरू झाल्यावर तिला इथल्या राहणीची खूप गंमत वाटली.—सकाळी लवकर उठून चटपट सर्व आवरून अनवाणीच सगळे विश्वभारतीचे मुख्य इमारती समोर गौरप्रांगण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या खुल्या मैदानात जमत. तेथे सामुदायिक प्रार्थना होई. प्रार्थनेनंतर सगळेजण आपापल्या वर्गांकडे जात. शालेय शिक्षणक्रमाचे जोडीला इतर भाषांचे वर्ग, संगीत, चित्रकला, नृत्य, वगैरे शिकण्याचे वर्ग असे बरेच विविध शिक्षणक्रम येथे होते. लहान बालकांसाठी शिशुभवन, शालेय शिक्षणाचे पाठभवन, गाण्याच्या व्यासंगाचे संगीतभवन, चित्रकलेचे कलाभवन, चिनी भाषा व संस्कृति यांचे मार्गदर्शन करणारे चिनाभवन, वगैरे बरीच भवने होती. त्यांच्या लहानलहान इमारती व पुढे फुलझाडांची बाग असलेले स्वतंत्र आवार होते.

पाठभवनचे आवार बरेच मोठे होते. वृक्षांचे सावलीत मोकळ्या हवेत, पक्षांचे कूजन नि आकाशांतल्या ढगांचे नक्षीकाम यांच्या साक्षीने वर्ग चालत. अगदी पाऊसच आला किंवा अगोदर पाऊस पडल्यामुळे बाहेर चिखल असला, तरच इमारतीचे व्हरांड्यात वर्ग भरत. सगळा अभ्यास हसतखेळत गोष्टीरूपाने शिकवला जाई, याची तिला फारच मजा वाटली होती. झाडाखाली आसनासारखी लहानशी चटई अंथरून आपली वह्या

पुस्तके उघडून ती जेव्हा पहिला पाठ घ्यायला बसली तेव्हा कलकत्ता सोडल्याचे दुःख कुठच्याकुठे पळून गेले.

मिठूचे वडील साधनदा कलाभवनात अध्यापक होते. पाठभवनातील अभ्यासक्रम पुरा झाला की त्यांचे हाताखाली चित्रकलेचा अभ्यास करायचा असे तिने आधीपासूनच ठरवून टाकले. कदाचित या आवडीमागे चित्रकलेच्या प्रेमापेक्षा साधनदांच्याविषयी वाटणारा लोभ असावा.

मिठू आणि ती थोड्याच दिवसात खूप मैत्रिणी झाल्या होत्या. अभ्यासाचा वेळ, जेवणे व झोप वगळले तर त्या दोघी सारख्याच बरोबर असत. संगीतभवनाचे समोरून गेलेला रस्ता उत्तरायणचे पुढून जाणाऱ्या मुख्य रस्त्याला मिळालेला होता. पूर्वी गुरुदेव असताना ते उत्तरायणमध्ये रहात. त्याचे आवार फार मोठे होते. उत्तरायण हे गुरुदेवांचे निवासस्थान सामानासकट पूर्वी जसे होते तसे आल्यागेल्याला दाखवण्यासाठी ठेवलेले होते, त्याला लागूनच असलेले उदयन नावाचे छोटे घर ठाकुर कुटुंबातील कुणी इकडे आले तर त्यांना राहण्यासाठी होते. उदयनच्या थोडे पुढे घंटाघर हे गुरुदेवांचे खास प्रार्थनामंदिर होते. आणि त्याचे समोरच वृक्षांच्या दाट सावलीत गुरुदेव कधीमधी निवासासाठी वापरत असलेली 'श्यामली' नावाची साधी कच्च्या मातीची, पालापाचोळ्याचे छप्पर असलेली, लहानशी वटिका होती. या सर्वाभोवतीची फुलबाग फार मनोहर होती. सगळ्या जागेत कमालीची स्वच्छता पाळली जात असल्यामुळे इथे आले की कसे पवित्र व शांत वाटे. कितीतरी वेळा त्या दोघी हातात हात घालून तेथे फिरत. उत्तरायणचे वरचे अंगानी गेलेल्या रस्त्याला छातिमतला नावाचा भाग होता. तेथे गर्द झाडीत एक छोटा दगडी चौथरा व त्यावर सावलीसाठी सिमेंटची छत्री बांधलेली होती. या ठिकाणी पुष्कळदा गुरुदेव शांतपणे विचार करीत बसत. त्यामुळे या बैठकीला तिथले सर्वजण पूजास्थान मानीत. छातिमतलाचे मोकळ्या भागात शामियाना घालून वार्षिक पदवीदानसभारंभ होत असे. तेथे एक काचेचे प्रार्थनामंदिर होते. त्याला सगळे कांचघर म्हणत. दर बुधवारी सुट्टीचे दिवशी येथे प्रार्थना होई. उत्तरायणला लागूनच 'विचित्रा' नावाचे नवे म्युझिअम अगदी आधुनिक बांधणीचे होते. गुरुदेवांच्या वापरातील वस्तु, त्यांचे ग्रन्थ, त्यांची चित्रे व ठाकुर

कुटुंबाची समग्र छायाचित्रे येथे ठेवलेली होती. दर रविवारी बाहेरचे लोक हे सारे पहायला तिथे गर्दी करत. शनिवारी दुपारी वर्ग सुटला की कला-भवनच्या मुली विचित्रा व उत्तरायण यांचे दर्शनी भागात सुंदर अल्पना आखून ठेवीत. रविवारसाठी ही खास तयारी असे. त्या मुली अल्पना काढीत असतांना, ती आणि मिठू त्यांचे कौशल्य पहात आपणही मोठे झालो की अशीच नवी नवी कलाकुसर निर्माण करूं, असे बेत करीत.

मिठूचे खरे नाव होते सेफाली.—सेफाली म्हणजे प्राजक्ताचे फूल. पण मिठू मात्र त्या नावाला शोभण्यासारखी नव्हती. वयाचे मानाने तिचे हाडपेर बरेच मोठे होते, व तिच्या वागण्यात पुरुषी धिटाई नि दांडगेपणा होता. पण ती झुमीशी इतकी गोड वागे की तिला वाटे, सेफाली हे नाव तिला शोभत नसले तरी मिठू हे तिचे टोपणनाव मात्र यथार्थ आहे.

कधीकधी त्या दोघी पायी चालत तेथून दोन तीन मैलावर असलेल्या श्रीनिकेतनला जात. श्रीनिकेतनमधे उद्योगधंद्यांचे शिक्षण देण्याचे वर्ग होते. तेथील सुतारकामाचे वर्गात शिक्षक म्हणून मिठूचा मावसभाऊ काम करीत होता. श्रीनिकेतनकडे जाणारी वाट मोठी रमणीय होती: दोन बाजूला भातशेते, मधूनच उंचावरून गेलेला रस्ता, त्यावर सावलीसाठी लावलेली अंब्याची व निंबोळीची झाडे नि तुरळक एखाद दुसरे नारळीचे झाड! शेतावरून शुभ्र बगळ्यांचे थवे उडतांना दिसले की फार मजा वाटे! श्रीनिकेतनपर्यंत इतक्यालांब चालायचा कंटाळा आला की मधल्या वळणावरती ओहोळावर बांधलेल्या एका पुलाच्या कट्ट्यावर बसून त्या दोघी गप्पागोष्टी करीत.

दर आठवड्याला आईचे पत्र येतच असे. गेल्या आठवड्यात मात्र वडलानीच लिहिले होते, "तुझ्या माला बरे नाही म्हणून मीच हे पत्र लिहीत आहे, पण तू काळजी करू नको. लवकरच तुला सुट्टी सुरू होईल, मग तू इकडे येशीलच." आईच्या प्रकृतीच्या काळजीने तिला सुचेनासे झाले होते, त्यामुळे सुट्टी कधी सुरू होणार म्हणून ती दिवस मोजत होती.

एक दिवस तिचा वर्ग चालू असतानां साधनदा आले. प्रथम तिचे अध्यापकांशी काहीसे बोलून व मग तिच्याकडे वळून ते म्हणाले, "झुमी, इकडे येतेस? जरा काम आहे तुझ्याकडे." पुस्तके आवरून ती

त्यांचेबरोबर निघाली. पाठभवनचे बाहेर आल्यावर ते म्हणाले, "तुझ्या खोलीत जाऊन चटकन बॅग भर. आपल्याला आत्ता दुपारचे तीनचे गाडीने कलकत्त्याला जायला हवे. तुमच्या हॉस्टेलच्या दिदींना भेटून मी त्यांची परवानगी घेतली आहे. मी येतोच रिक्षा घेऊन, तू आटप." हे सगळे सांगत असतानां त्यांची नजर दुसरीकडेच होती, व त्यांचा चेहरा कमालीचा गंभीर झाला होता. बॅगेत कपडे भरत असताना तिला वाटले, आपल्या माचे दुखणे एकाएकी जास्त झाले की काय? आता कसं करायचं?

गाडी सुटल्यावर साधनदानी हळूच तिचा हात आपले हाती घेतला, व ते म्हणाले, "तू मन घट्ट करायला हवं. काही प्रसंगच असे असतात की त्यापुढे कोणाचेच काही चालत नाही. ईश्वराचे इच्छेला मुकाट्याने मान तुकवावी लागते. तू अजून फार लहान आहेस, पण आता मात्र तुला मोठं व्हायला पाहिजे."

—या सगळ्याचा काय अर्थ असावा? आपल्या मनाच्या ठिकऱ्या उडवणारी ही कसली ईश्वराची इच्छा! तिला वाटले, साधनदांना म्हणाव, 'सांगा तरी एकदा काय ते? असे संदिग्ध न बोलता एकदाच काय घाव घालायचा तो घालून टाका.' पण तरीसुद्धा ती मन घट्ट करून गप्पच बसून राहिली. तिचा हात थोपटीत साधनदा म्हणाले, "झुमी, बाळ, तुझी मा देवाघरी गेली." हें वाक्य कानावर पडले मात्र, क्षणभर आपल्या हृदयाचे ठोकेच बंद पडले असे तिला वाटले. तिच्या मनात आले, त्यांना ओरडून सांगावे, "शक्य नाही. ती मला कशी टाकून जाईल? माझ्यावर केवढा जीव आहे तिचा!"

बेलघुरियाला जाण्यासाठी दक्षिणेश्वरच्या स्टेशनवर न उतरता ते तसेच गाडीतून सियालदाकडे निघाले. साधनदा म्हणाले, "आपल्याला तुमच्या शामबझारच्या घरी जायचं आहे. काल वहिनींचे जास्त झाले तेव्हा त्यांना कलकत्त्याच्या हॉस्पिटलमधे हालवले होते. तिथल्या घरातच सगळे जमलेले आहेत."—झुमीची वाचाच बसली होती. साधनदांशीच काय, पण कोणाशीच काही बोलू नये असे तिला वाटत होते.

आईच्या मृतदेहावर अंग टाकून दुःखातिरेकाने ती बेशुद्धच पडली होती. तिची शुद्ध परत आली तेव्हा तिला आढळले—आता आपली मा नाही—

कुठेच नाही. जागृत किंवा मृत कुठल्याच अवस्थेत ती कधीच आता आपल्याला दिसणार नाही !

७

साऊथ इंडियाची ट्रिप कलाभवनच्या विद्यार्थ्यांनी ठरविली त्यांत झुमीने मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता. आता एकच वर्ष बाकी होते. मग तेथील तिचा अभ्यासक्रम पुरा होणार होता. घरी आलें कीं वडलांच्या सान्निध्यात, बेलघुरियाच्या त्या शांत बागानबाडीत नदीकाठी बसून ती कलासाधना करणार होती. आणि ते करताना वडलांची खूप सेवा करून, त्यांची खालावत चाललेली प्रकृति सावरण्यासाठी ती झटणार होती. अलीकडची काही वर्षें त्यांना डायबिटिसचा त्रास होता. त्यामुळे जेवणखाणाचे पथ्य बरेच पाळावे लागे. आपला हा एकमेव आधार धूर्त काळाचे नजरे आड सफाईनें लपवायचा—आपल्या सेवाशुश्रुषेची पराकाष्ठा करायची, असे तिने ठरवले होते. त्या वेळी तिचे वय १८।१९ वर्षाचे असले तरी तिचे वडील मात्र साठीचे घरात होते. विवाहानंतर बरीच वर्षें त्यांना अपत्यच झाले नव्हते. मग कित्येक डॉक्टरी व दैवी उपायानंतर दोन वेळा गर्भपाताचा आघात सोसल्यावर झुमीची प्राप्ति झालेली होती. त्यामुळे ती सगळ्यांची फार लाडकी होती. काकाकाकींना मुलबाळ नव्हते, आणि आत्याला पाची मुलगेच होते, त्यामुळे ती आत्याची पण खूप लाडकी होती.

आईच्या वियोगाचे दुःख जरा मागे टाकून ती मनमोकळी वागू लागते ना लागते तोंच वडलांच्या प्रकृतीची काळजी उद्भवत होती. तिच्या आईच्या मृत्यूनंतर ते एखाद्या योग्यासारखे वागू लागले होते. वकील असूनही त्यांनी कधी मन लावून प्रॅक्टिस केलीच नव्हती. केवळ स्वतःच्या वडलांची इच्छा मानायची म्हणून ते वकील झाले होते इतकेंच. घरात विपुल ऐश्वर्य असल्यामुळे पैशासाठी धंदा करण्याची ओढ त्यांना नव्हती. —आता तर सर्वसंगपरित्याग केलेल्या निरिच्छ संन्याशासारखे ते रहात होते. मासळी खाणे त्यांनी सोडले होते, बरेच वेळा रात्री ते नुसते दूधच पीत. स्नान, संध्या, गीतापाठ, सायंकाळी नेमाने दक्षिणेश्वरच्या मंदिरात

देवीचे दर्शन, आध्यात्मिक ग्रंथवाचन, असा त्यांचा नित्य कार्यक्रम असे. रविवारी कधीकधी कलकत्त्याहून नात्याचे किंवा इतर मित्र त्यांचे घरी जमत. मग बुद्धिबळाचा डाव, गप्पागोष्टी, खाणेपिणे, यांनी तो शांत वाडा गजबजून जाई.

एकदा सुट्टीची ती घरी आली असता तिला कळलें कीं थोड्याच दिवसापूर्वी हसनाबादचे मामा इकडे आले होते. तिच्या वडलांचा व त्यांचा वाद इतका कडाक्याचा झाला की पुनश्च एकमेकांचे तोंडही न पहाण्याचा त्यांनी निश्चय केला होता. अर्थातच यासंबंधी तिचे बाबा तिच्याजवळ काहीच बोलले नव्हतें. तिच्या सारख्या अजाण मुलीला कशाला सांगायच्या या गोष्टी, असे त्यांना वाटले असावे. पण ती सारी हकीकत आत्याकडून तिला कळली होती.

मामांना, त्यांच्या मोठ्या मुलाला व नरेंद्रला बेकायदा व्यापार करण्याबद्दल पोलिसांनी पकडले होते. कशीबशी जामिनावर स्वतःची सुटका करून ते इकडे धावले होते. अशुतोषबाबू स्वतः वकील होते. मोठमोठ्या न्यायाधीश व बॅरिस्टर लोकात नवीनबाबूंच्या वेळेपासून त्यांची ये जा होती. त्यांची बहीण हेमांगिनी ही पूर्वीचे सुप्रसिद्ध जज्ज, कैलासनाथ मुखर्जी, यांची सून होती. त्यामुळे मामांच्या मतें या प्रसंगातून त्यांची सुटका करणे म्हणजे अशुतोषबाबूंच्या हातचा मळ होता. त्यांनी नुसता शब्द खर्च केला तरी केस रद्द केली गेली असती—आणि तसे झाले नसते तरी वकिली डोके लढवून बचावाचा मार्ग ते सहज शोधू शकले असते. पण अशुतोषबाबूंनी असल्या प्रकारची मदत करण्याचे साफ नाकारले. "संसारातून मन काढण्याच्या इच्छेने मी कलकत्त्यापासून दूर रामकृष्ण-परमहंसांचे छायेत रहायला आलो आहे. असल्या भानगडीत मी पडणार नाहीं," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. ज्याला त्याला लाचलुचपतीचे आमिष दाखवण्याची सवय अंगवळणी पडलेले मामा हे ऐकून गप्प बसले नाहीत. त्यांना वाटले, 'किती केले तरी हा वकील माणूस, मी त्यांचा नातेवाईक म्हणून त्यांची मदत फुकटातच घ्यायला आलो असेन अशा कल्पनेने हे मला चाळवण्या देत असतील, पण हजार दोन हजाराचे आमिष दाखवले की येतील रुळावर.' मामांनी पैशाबद्दल सूतोवाच केले मात्र, संतापाने अशुतोषबाबूंचा थरकाप उडाला होता. "थुंकतो मी तुमच्या

हरामाच्या पैशांवर. तुम्ही मला काय समजता? पुन्हा तोंड दाखवू नका," असे ते चिडून गरजले होते. त्यावर मामांनीही त्यांना कारण नसतांना दुरुत्तरें केली.

मामांच्या खटल्याचे पुढे काय झाले याची आत्याला माहिती नव्हती. अर्थात् त्यांचे काही झाले तरी झुमीला त्याची परवा नव्हती. पण तिच्या त्या सख्ख्या मामीचा करुण चेहरा आठवून आता तिचे कसे होणार असे तिला वाटले होते.

सुट्टीची शांतिनिकेतनहून ती इकडे परत आली कीं तिची आत्या त्यांचेकडेच रहायला येई. तिचे पाचही आतेभाऊ खूप मोठे होते. धाकटा पूर्णचंद्र वगळला तर बाकीचे सगळेच नोकरीधंदा करीत होते. आत्याला दोन सुनाही आलेल्या होत्या. तिच्या आतेभावांची नावे, पुलीनचंद्र, प्रफुल्लचंद्र, प्रशांतचंद्र, प्रमोदचंद्र व पूर्णचंद्र, अशी होती. त्या सर्वांचा झुमीवर फार लोभ होता. आत्याचे यजमान परिमलबाबू हे पण खूप थट्टेखोर व मनमिळाऊ होते. प्रथम काही वेळा इकडे आल्यावर आत्या तिला थोडे दिवसासाठी आपल्याघरी घेऊन जात असे. मग त्यांच्या घरचे कोणीच तिला लवकर सोडीत नसत, त्यामुळे तिच्या वडलांच्या ती फारशी वाटचासच येत नसे. एका सुट्टीत अशुतोषबाबू आपल्या बहिणीला म्हणाले, "हेम, त्यापेक्षा तूच का नाही इकडे येऊन रहात? तुझी आई आणि वहिनी गेल्यापासून तुझे माहेरपण संपलेच आहे. या निमित्ताने तरी थोडे दिवस तुला माहेरी रहायला मिळेल"—तेव्हांपासून जसे काही ठरूनच गेले होते कीं दर सुट्टीत झुमी इकडे आली म्हणजे आत्याने पण बेलघुरियाला रहायला यायाचे. परिमलबाबू चेष्टेने म्हणत, 'घरी सुना आल्या आहेत, दोनवेळी वेळवर ताट पुढे येते म्हणून माझे ठीक चालले आहे, नाहींतर तुमची बहीण अशी पुटुपुटु माहेरी पळू लागली असती तर माझी पंचाईतच होती."

कलकत्त्याचे घर सोडून तिचे वडील इकडे रहायला आले तेव्हा सामानाबरोबर नोकरांचीही वाटणी झाली होती. नवीनबाबूंच्या वेळचे तीन जुने नोकर तिच्या वडलांबरोबर इकडे आले होते. एक ठाकूर, दुसरा दुर्गादास व तिसरी गोपालेर मा.—गोपालेर मा आता फार थकली होती. झुमीची आई वारल्यापासून घरात कोणीच बाईमाणूस नसल्यामुळे ती

कंटाळून आत्याकडे राहू लागली होती. आत्याच्या परिवारात जमेल तेवढे थाडेफार काम करीत ती दिवस ढकलीत होती. झुमी इकडे आली की तीही आत्याबरोबर इकडेच रहायला येई.

अजून तरी तिच्या विवाहासंबंधी घरात कोणी गंभीरपणे बोलत नव्हते. पण गोपालेर मा मात्र दिवसातून चारदा 'दिदिमणीचे लग्न आता लवकरच करायला हवे,' असे आत्याला म्हणे.—"गोपालेर मा, मी इकडे आले की घर कस भरल्यासारखं वाटतं असं तू म्हणतेस ते खोटंच तर! खरं म्हणजे मला या घरातून घालवायला तू अगदी टपलेली आहेस," झुमीने असे म्हटले की डोळ्यात पाणी आणून ती म्हणे, "बेटी, तू या घराचा प्राण आहेस, पण पोरीच्या जातीला नवऱ्यावाचून काय शोभा? तू संसाराला लागलेली पाहिली की मी सुखानं डोळे मिटीन. अलीकडच्या मुलींचे एक एक थेर कानावर आले की आम्हा म्हाताऱ्यांना भीति वाटते, म्हणून घाई करायची."

जुनी विश्वासू नोकरमाणसे म्हणजे घरातली आप्तच होऊन जात. म्हातारा दुर्गादास पण तसाच होता. दिदीमणीवर त्याचाही कमालीचा जीव होता. त्याचा नातू मुरली हा लहानपणापासून वेडसर व बोबडा होता. तोही त्यांच्याच घरी रहात असे. तो वेडा झुमीला एखाद्या देवतेप्रमाणे मानी, व तिची कामे मोठ्या आवडीने करी.

मात्र एका सुट्टीत घरी न येता कलाभवनच्या लोकांनी लांबची ट्रिप करायची ठरवल्यामुळे ती त्यांचेबरोबर साऊथ इंडियाला गेली होती. तिकडची देवळें, समुद्रकिनारा व सृष्टिशोभा चित्रकलेला पोषक असल्यामुळे तिकडे जाण्याचा बेत त्यांनी केला होता.

महाबळिपुरम्च्या त्या रमणीय समुद्रतीरी तो गाणे म्हणाली होती—तिचे गाणें डॉ. सदानंद अगदी लक्ष देऊन ऐकत होता—प्रथमच त्याचे व्यक्तिमत्व तिच्या मनावर ठसले, ते तिथेच!

८

त्या नंतरची तीनचार वर्षे तिच्या आयुष्यात कमालीच्या मनस्तापाची व अस्थिर अशी गेली. या वर्षांची आठवण आपल्या आयुष्यातून कायमची

बुजेल तर किती बरें होईल असे तिला वाटत होते. पण एखादी गोष्ट विसरायची असे ठरविले की आपले हट्टी मन नको त्या विचारांभोवती पुनः पुनः घोळू लागते.

तिचा कोर्स संपून ती शांतिनिकेतनहून परत आली ती आता वडलांच्या सान्निध्यात खूप दिवस राहून त्यांची सेवा करण्याच्या इच्छेने. परंतु ईश्वरेच्छा वेगळीच होती! पायाला झालेल्या साध्या गळवासारख्या फोडाचे दुखणें गँग्रीनवर गेले. शुश्रुषा, औषधपाणी, पथ्य, सगळे व्यवस्थित संभाळूनही प्रयत्नांना यश आलें नाही. काका, काकिमा, आत्या, परिमलबाबू, सगळे जमले होते. शेवटी मरणापूर्वी एक दिवस आधी तिचा हात काकांचे हाती देऊन ते म्हणाले, "माखन, माझ्या जिवाच्या कलिजाला तुझ्या हाती सोपवीत आहे, तिचा सांभाळ कर."

तिचे वडील व आत्या अगदी एका पाठचे होते. पण मधली दोनतीन मुले गेल्यावर काकांचा जन्म झालेला होता. लहानपणी ते खूप गोरे व गुटगुटीत दिसायचे, व त्यांचे अंगही फार लुसलुशीत होते, म्हणून लहानपणी त्यांना लाडाने सारेजण माखन असे म्हणत. शेवटच्या घटकेला भावाची आर्जवे करतांना लहानपणचे हे लाडके नाव नकळत तिच्या वडलांच्या तोंडून बाहेर पडले होते.

परंतु ती काकांच्याकडे रहायला गेली नाही. काकीजवळ रहायचे तिच्या जिवावर येई. काकीची ऐटबाज राहणी, सुंदर पण उग्र रूप, वाढत्या वयाला न शोभणारा थाटमाट, या सगळ्यामुळे पहिल्यापासूनच त्यांच्या घरात ती कुणालाच आवडत नसे. आपल्या माहेरच्या श्रीमंतीचा तिला फार गर्व होता, व त्या जोरावर ती सर्वांना तुच्छ लेखीत असे. इतरांचे राहो, पण प्रत्यक्ष काकांनासुद्धा ती जुमानीत नसे याचा झुमीला फार राग येई. घरकाम करणे तर तिला भलतेच कमीपणाचे वाटे. घरात कांही अडचण असली तरी तिच्या चैनीत ती कुणाचाही व्यत्यय खपवून घेत नसे. तिचे काय गुण पाहून काका भाळले ते झुमीला कळत नसे. तिला कधीकधीं काकांचा फार राग येई. आपल्या बायकोचा आचरटपणा ते खपवून घेतच, शिवाय 'राज, राज' म्हणून सारखा तिचेपुढे गोंडा घोळीत. तरुण वयात तिची काकी आतापेक्षा बरीच सुंदर दिसत असे, पण त्या सौंदर्याला गुणांची महिरप नसल्यामुळे एखादे

सुंदर चित्र फ्रेम केल्यावाचून राहू दिले तर त्याचे रंग उडालेले व धुळीने मळलेले दिसतील, तशी तिची काकी तिला वाटे.

तिच्या आत्याचाच काय, पण आत्याच्या घरच्या सगळ्याच लोकांचा तिच्यावर फार लोभ होता. साहजिकच तिने, "आत्या, मी तुझ्यापाशी राहणार" अशी इच्छा दर्शविताच तिचे मागणे मोठ्या आनंदाने मान्य केले गेले. काकांनी तिला आपले बरोबर आसामला येण्याचा आग्रह केला. "आताच नको, येईन थोडे दिवसांनी," असे ती म्हणाली, तेव्हा तिच्या सध्याच्या मनःस्थितीत तिच्या मनाप्रमाणे होऊ दे म्हणून काकांनी तिला आत्यापाशी राहू दिले. आत्याकडे असताना वेळ जायचे साधन म्हणून तिने ॲकॅडमी ऑफ फाईन आर्टस मध्ये पार्टटाईम नोकरी पत्करली होती. आत्याला हे फारसे पसंत नव्हते. पण तिच्या मनाला विरंगुळा मिळाला तर कदाचित हा दुःखाचा आघात ती विसरेल, या विचाराने आत्याने तिला विरोध केला नाही.

खरे पाहिले तर तिची आत्या त्या तिघा भावंडातही चांगली सुदृढ प्रकृतीची होती. झुमीने तिला कधी आजारी अशी पाहिलीच नव्हती. पण काळाला तिचे प्रेमळ छत्र झुमीला फार दिवस लाभू द्यायचे नव्हते. अलीकडे आपल्या पोटांत गोळा वाढतो आहे, तो मधूनच फिरतो व खूप दुखतो अशी तक्रार आत्या करीत असे. पोटांत दुखू लागले की तिच्या हातापायांची जळजळ होई व जीव घाबरे. डॉक्टरांना ट्यूमरची शंका होती, पण ऑपरेशनचे नाव काढले की आत्या भीतीने अर्धमेली होई. तिचा संसार आता मार्गाला लागलेला होता. तिसरी सून नुकतीच आली होती, नातवंडांनी घर भरलेले होते, धाकट्या पूर्णलासुद्धा आता नोकरी लागली होती, त्यामुळे आता देवाने डोळे मिटले तरी हरकत नाही, असे तिला वाटे. मरणापूर्वी झुमीचा विवाह आपल्या हातून व्हावा म्हणजे मागे काळजी राहणार नाही असे ती कळकळीने म्हणे, व परिमल-बाबूंना लवकर चांगला मुलगा बघा असे टुमणे लावी.

"झुमीची आत्याबाई, तुमच्या लाडक्या भाचीसाठी एक छान स्थळ हेरलं आहे. कोणतें, ओळखा बरं ? ए झुमी, तू ओळखतेस त्या मुलाला. तुझा दोस्त होता म्हणे तो लहानपणी."

परिमलबाबू असे म्हणाले तेव्हा, कोण हा, हे काहीच ध्यानात न आल्यामुळे ती संभ्रमात पडली. ते पाहून ते पुन्हा म्हणाले, "अग, अमूल्य गांगुली. शामबझारला ते गांगुली नव्हते का रहात तुमच्या घरासमोर, त्यांचाच मुलगा. मध्यंतरी ते येथे नव्हते. नुकतीच इन्कमटॅक्स कमिशनर म्हणून त्यांची परत इकडे बदली झाली आहे. सदर्न ॲव्हेन्यूला मोठ्या फ्लॅटमधे राहतात ते. अमूल्य पण यंदाच एम्. ए. झाला आहे. गांगुली साहेबांच्या वशिल्याने बिर्ला कंपनीत मोठ्या पगाराची नोकरी त्याला मिळणार आहे. ते उभयता म्हणत होते, लहानपणापासून त्यांनी तुला पाहिलेली आहे व तू त्यांना पसंत पडण्यासारखी आहेसच. तेव्हा हे लग्न ठरायला काहीच वांधा नाही."

तो गोरागोमटा, नाजूक, परीटघडीचे कपडे नि बूटमोजे घालून फिरणारा छोटा अमूल्य तिच्या डोळ्यापुढे उभा राहिला. तिच्या बाहुलीला हौदांतून काढून देण्याऐवजी तो पळून गेला होता. स्वतःच्या इस्त्रीच्या कपड्यापुढे झुमीच्या मनाची त्याला परवा वाटली नव्हती, तेव्हांपासूनच तो तिच्या मनातून उतरला होता. त्यानंतरचे आयुष्यात एकदाही कधी त्याचा विचार तिच्या मनात डोकावला नव्हता. अमूल्यच्या आईबद्दल लहानपणापासूनच तिच्या मनात काकीप्रमाणेच अढी होती. आपण आता कशा दिसतो हे न पहाताही आपल्याविषयीची पसंती या लोकांनी व्यक्त केली त्याचे मुख्य कारण आपल्या कुटुंबाच्या आपण एकट्या वारस आहोत, हेच असावे एवढेही न कळण्याइतकी ती लहान नव्हती. तिच्या रूपागुणांपेक्षांही ती श्रीमंताची एकुलती एक कन्या आहे असे कळले की पुष्कळसे तरुण तिच्या फारच पुढेपुढे करतात हे तिच्या ध्यानात आले होते. या सगळ्या लोकांपासून ती मुद्दामच दूर राही. तिच्या मनात भरेल असा एकही तरुण पुरुष तिच्या सहवासात आला नव्हता.

—या विचाराबरोबरच महाबळिपुरम्‌ला भेटलेल्या त्या परदेशी डॉक्टरचा तरतरीत देखणा चेहरा आपल्या मनापुढे का तरळावा याचे तिला नवल वाटले. पदर सोडवितांना झालेला त्याचा हस्तस्पर्श तिला आठवला. परंतु तो तिच्या मनात ठसला असला तरी तो कोण, कुठला, काहीच तिला माहीत नव्हते, त्यामुळे त्याचा काय उपयोग होता ?

९

तिच्या लग्नाची बोलणी पुढे होऊ नयेत अशी घटना अकल्पित घडली. ऑपरेशन न करण्याच्या हट्टामुळे आत्या दुखणे अंगावर काढीत होती. पण एक दिवस टचूमर आतल्याआत फुटून असह्य वेदनांमुळे ती बेशुद्ध झाली व तावडतोब तिला हॉस्पिटलमधे हालवले.

ऑपरेशनसाठी तिला टेबलावर घेतले तेव्हां, "देवा, माझ्यावर दया कर. आतापर्यंत मला केले आहेस तेवढे निराधार पुरे नाही का? माझ्यासारख्या दुबळ्या मुलीला अधिकच पोरके करण्यात तुला काय मिळणार?" असे तिने कळवळून देवाला विनविले होते. ईश्वरी योजना कोणालाही कळत नसतात हेंच खरें!

एका पाठोपाठ कळू लागल्यापासून हे मृत्यूचें तांडव बघून तिचे मन अगदी बधिर झाले होते—अशा स्थितींत काकाकाकीच्या सहवासात आज आसामला तर उद्या दार्जिलिंगला, कधी कलकत्त्याला तर कधी अंदमानला, अशी तिची फरफट चालू होती.

काही दिवसांच्या सहवासाने आपले काका मनाने प्रेमळ असून त्यांचा आपल्यावर जीव आहे हे तिच्या लक्षात आले होते. पण असे असले तरी काकीपुढे त्यांचे काहीच चालत नसे.

काका घरी असोत की नसोत, काकीचे बाहेर भटकणे, क्लब, मित्र-मैत्रिणी व पाटर्या, हे सारे चालूच असे. काका फारसे त्यांत सामील होत नसत. सासऱ्याच्या धंद्याचा व्याप संभाळण्याची जबाबदारी त्यांचेवर होती. त्यांना अलीकडे ब्लडप्रेशरचा त्रास सुरू झाला होता. त्यामुळे त्यांचे अखंड धूम्रपान व अतिरिक्त मद्यपान पाहिले कीं तिला त्यांची फार काळजी वाटे. परंतु काकी पूर्ण बेफिकिरीत असल्यासारखी वागे. पतिपत्नींची मने जोडणारा अपत्य हा सेतु आहे. तो नसेल तर संसारात दोघे दोन किनाऱ्याला राहतात, व मनाने एक होऊ शकत नाहीत. त्या दोघांच्या विसंवादीपणाचे मुख्य कारण हेच असावे असे तिला वाटे.

नवीनबाबूंच्या मृत्यूनंतर कलकत्त्याच्या घराची मालकी तिच्या काकांकडे आली होती. तत्पूर्वी केवळ सासऱ्याचे आधारावर त्यांनी घर सोडले होते. ते विलायतेस शिकत असतांना व्यापाराचे निमित्ताने तिकडे

आलेले दत्तबाबू व त्यांची एकुलती एक कन्या, राजमोहिनी, यांच्याशी त्यांचा परिचय झाला होता. राजमोहिनीचे रूप, स्वैरवृत्ति, तिच्या वडलांची संपत्ति, या सगळ्याच्या मोहाने ते वहावले होते. आपल्या तारुण्यसुलभ नखऱ्यांनी आणि श्रीमंतीच्या दिमाखांनी तिने आपल्या नवऱ्याला पूर्ण काबीज केले होते. तिच्या विवाहानंतरही तिच्या रूपामुळे व पैशामुळे, तसेंच, आधुनिकतेच्या नावाखाली होणाऱ्या तिच्या स्वच्छंदी वागण्यामुळे पुष्कळ पुरुष तिच्याभोवती घोटाळत. त्या सर्वांना नाचवणे हा तिचा आवडता छंद होऊन बसला होता. मूल न झाल्यामुळे संसाराचीही ओढ नव्हतीच. प्रथमच तिच्या वागण्याला काकांनी लगाम घातला असता तर त्याचा कांहीं उपयोग होण्याचा संभव होता; पण फॅशनेबलपणाचे नावासाठी, आणि मुख्य म्हणजे तिच्या पैशाच्या मिंधेपणामुळे ते कांहीं बोलत नसत. आता गाडें इतके पुढे गेले होते कीं ते आवरणें त्यांच्या हाताबाहेरचे होते. आपल्या असहायतेला विसरण्यासाठी ते दारूचे दास बनले.

सासऱ्याच्या मागे त्यांचा व्यवसाय काकांनी आपल्या कर्तबगारीने बराच वाढवला होता. त्यांची बायको नि तिचा भाचा यांचे नावे अर्धी-अर्धी संपत्ति मागे ठेऊन सासरे गेले होते. त्यांचा मेव्हणा व त्याची पत्नी त्यांच्या लग्नापूर्वीच अपघातात वारले होते. त्यामुळे अज्ञान भाच्याची जबाबदारी त्यांचेवर होती. आता सज्ञान होऊनही काही वर्षें लोटली तरी उद्योगधंद्याकडे लक्ष देण्यापेक्षा स्वतःच्या आत्याचे अनुकरण करून क्लबात तरुणतरुणीत स्वैरसंचार, सिनेमा, सिगारेट, मद्यपान, यांतच तो गर्क असे. क्वचित कधीतरी फॅशन म्हणून घोड्यावरून ब्रह्मपुत्रेच्या काठच्या जंगलात शिकारीला जाणे याचाही त्याला नाद होता.

झुमी प्रथम त्यांचे घरी रहायला आली त्यावेळीं, कुठून आली ही पीडा इकडे, असेच तिच्या काकीला वाटले होते. तिला टेबलमॅनर्स नाहीत, लहानवयांतही एखाद्या पोक्त बाईसारखी ती दिसते, आधुनिक तऱ्हेने केस फिरवणे व फॅशनेबल कपडे घालणे तिला जमत नाही, अशी कांहीं ना कांहीं कुरकुर करून काकी तिला नकोसे करी. ती एकटीच आपल्या मनाशी दुःख करू लागली कीं, काकी घरात नाही असे पाहून काका तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत. ते तिला 'झुमी' अशी हाक मारीत

तीसुद्धा काकीला पसंत नव्हती. "लहान का आहे ती आता असल्या लाडक्या नावाने हाका मारायला? आपण आता तिला 'मणिदीपा' नाहीतर 'मणी' म्हणू या." असा कायदा काकीने जाहीर केल्यामुळे तिला सगळे 'मणी' अशी हाक मारू लागले.

आपला तरुण भाचा सुरेन् याची नजर मणीकडे वळली आहे व ती त्याच्या मनात भरली आहे हे तिच्या चाणाक्ष काकीचे नजरेस येताच मात्र तिची वागणूक एकदम बदलली.

—एक दिवस ती अशीच काहीतरी काम घरात करत असताना काकीने तिला हाक मारली, "मणी, जरा बाहेर ये बघू." बाहेरच्या खोलीत गालिचावर तऱ्हेतऱ्हेच्या रेशमी व नायलॉनच्या कापडांचा ढीग पडला होता. टेप गळ्यात अडकवलेला दर्जी गालिचाच्या टोकाशी अवघडून बसला होता. सोफ्यावर तिची काकी ऐटीत रेलून बसली होती. जवळच्याच खुर्चीवर बसलेला सुरेन् तिच्याकडे न्याहळून बघत होता. तिला सुरेन्च्या त्या नजरेचा मनापासून राग येई. आपल्याला इथ कशाला बोलावलं आहे तिला कळेना.

"तुला नवे कपडे करावे म्हणते. तुझे सगळेच कपडे आऊट ऑफ फॅशन आहेत. पुढच्या महिन्यात आपल्याला पोर्टब्लेअरला जायचं आहे, त्यापूर्वी चांगले नवे कपडे करून घेऊ."

काकीचे हे बोलणे ऐकून तिला एकदमच हा पुळका कुठून आला असे तिला वाटले. तसे पाहिले तर साडचांचा नि पोलक्यांचा भरपूर साठा तिच्याजवळ होता. त्यामुळे स्वतःला आणखी नवे कपडे करण्याची गरज तिला वाटत नव्हती. काहीच न बोलता ती गप्प राहिली, तेव्हा दर्जीकडे वळून काकी म्हणाली, "देखो दर्जी, ये मेमसाबका माप लेनेका है. सलवार-खमीसका फिटिंग बिलकुल अच्छा होना मंगता है."

टेप सरसावीत पुढे आलेल्या दर्जीला, "नको नको" असे म्हणत काकीकडे वळून ती बोलली, "काकीमा, मी कधीच घालत नाही सलवार-खमीस."

"नसले घातलेस म्हणून काय झाल? यापुढे घालीत जा. सोसायटीत मिसळायच म्हणजे वागण्यात असा बदल करायलाच हवा."

"पण मला नाही अशा लोकात मिसळायची हौस."

हे तिचे शब्द ऐकून आलेला राग प्रयासाने दाबीत, "सर्वांसमोर माझा अपमान करू नको. मुकाटचाने माप दे," असे इंग्रजीत म्हणत काकी आत निघून गेली. तिच्याकडे बघून मिस्किलपणे हसत सुरेन् म्हणाला, "मणी, तुला वंडरफुल फिगर आहे. अशा ड्रेसात तू कशी छान उठून दिसशील!"

त्याच्या एक तोंडात भडकवावी असे तिला वाटले. पण काहीच न बोलता ती सुद्धा आत निघून गेली.

त्या रात्री काकीने बरेच थैमान घातले. "तुमच्या पुतणीपायी मला चार लोकात खाली पहावं लागतं," असे म्हणून तिने केलेला त्रागा, काकांचा गुळमुळीतपणा व सुरेन्चा आचरट लघळपणा हे पाहून तिला वाटले, पळून जावे इथून.

१०

एक दिवस बंगल्यापुढचे बागेत ती एकटीच फिरत होती.

डोंगरांच्या रांगावर एकाखाली एक खाचा पाडून पायऱ्यापायऱ्यांनी केलेली चहाची लागवड हिरवीगार व छान दिसते. पानें खुडणाऱ्या गोरटेल्या चपटचा चेहऱ्याच्या बाया, त्यांचे रंगीबेरंगी वेष, पाठीवर टोपली अडकवून व दोन्ही हात मोकळे ठेऊन चुटुचुटु डोंगर चढण्याची त्यांची तऱ्हा पहाताना मजा वाटे. पहाडी रस्त्यांच्या कडेकडेने डुलणारे फर्नचे नाजुक तुरे व पाइनचे नि ओकचे मोठमोठे वृक्ष, सगळेच काही मनोहर होते. पण तिची मनःस्थिति ठीक नसल्यामुळे या सौंदर्याचे रसग्रहण ती करू शकत नव्हती. काकीचा बंगला गावापासून जरा दूरच, चहाच्या मळचाला लागून उंच ठिकाणी होता. बंगल्यापुढची बागही मोठी सुबक होती. पण तिला मात्र हा रमणीय निसर्ग एकाकी व रहस्यमय वाटत होता.

मागे कुणाची तरी चाहूल जाणवली. तिने पाहिले, सुरेन् तिच्या पाठीशी येऊन उभा राहिला होता. हसतहसत तिच्याकडे बघून तो म्हणाला, "सृष्टिसौंदर्य असं एकटचापेक्षा दोघांनी जोडीने पाहिलं कीं अधिक रमणीय वाटतं. चल, बाहेर कुठे फिरून येऊ या का?"

त्याची आपल्यावर नजर आहे व काकीचे मनात आपण त्याच्याशी लग्न करावे असे आहे हे माहीत असल्यामुळे ती नेहमीच त्याला टाळीत असे. आतासुद्धा त्याच हेतूने ती म्हणाली, "नको, मला जरा काम आहे."

एखाद्या विव्हल प्रेमिकाचा चित्रपटात शोभण्यासारखा अभिनय करीत तो म्हणाला, "मणी, तू माझा नयनमणी आहेस. माझे मन तू ओळखतेस, मग माझ्यापासून अशी दूर का राहतेस? अलिकडच्या तरुणींप्रमाणे पुरुषात मोकळेपणाने मिसळायची तुला सवय नाही म्हणून लाजतेस की काय? पण लाजायचे काही कारण नाही."

"तुला काय म्हणायचं आहे तेच मला कळत नाही. अगबाई! काकांसाठी संत्र्याचा रस काढायचा राहिलाच की! मी जाते हं," असें म्हणून ती बंगल्याकडे वळली.

हाताने तिचा रस्ता अडविल्यासारखा करून तो म्हणाला, "हे वेड पांघरणे पुरे. एकदा स्पष्टच सांग तू माझ्याशी लग्न करणार की नाही?"

त्याची नजर टाळून ती म्हणाली, "रागावू नकोस, सुरेन्. मला लग्नच करावस वाटत नाही. उगाच गैरसमज करून घेऊ नकोस. आणि कृपा करून पुन्हा हा विषय माझ्याजवळ काढू नकोस." लगबगीने ती घरात गेली. तिला वाटले होते, या स्पष्ट नकारामुळे तो तिचा नाद सोडून देईल.

तिच्या काकीची संपत्तीची व सत्तेची लालसा तिला कळून चुकली होती. ती जर सुरेन्ची बायको झाली तर बॅनर्जी कुटुंब आणि दत्तकुटुंब या दोन्ही घराण्यातील संपत्तीची सूत्रधार काकी होऊ शकली असती. मणिदीपाचा विवाह दुसरीकडे झाला तर ते शक्य नव्हते. तसेच सुरेन्ने पण दुसरीच कुणी मुलगी घरात आणली असती तर काकीच्या अबाधित सत्तेला अडथळा निर्माण झाला असता. तेव्हा मणिदीपा व सुरेन् यांचा संयोग काकीच्या दृष्टीने भलताच फायद्याचा होता. सुरेन्चे मोहरे ती स्वतःच्या इच्छेप्रमाणे हालवू शकत होती. पण वरकरणी गरीब व शांत दिसणाऱ्या मणिदीपाला आपल्या लहरीप्रमाणे तिला वाकवता येत नव्हते. घरातल्या वाढत्या असंतोषामुळे मणिदीपा कमालीची बेचैन होती.

पोर्टब्लेअरच्या बंगल्यातील त्या प्रसंगाने या घरात आपले शील सुरक्षित राहणे कठिण आहे, तेव्हा निघून जाण्याखेरीज उपाय नाही हे ओळखून ती संधीची वाट पाहू लागली.

कलकत्त्याच्या घरी असतांना तिने एक दिवस टाइम्स् ऑफ् इंडियांत जाहिरात पाहिली, "पाहिजे—मॉडेल गर्ल्स स्कूल, पॅरेडाइस सिनेमाजवळ, माहीम, मुंबई १६. येथें चित्रकला शिकविण्यास ट्रेण्ड आर्ट टीचर हवी आहे."—तिने ताबडतोब अर्ज धाडला व उत्तर आत्याचे पत्त्यावर मागवले.

त्यानंतर एक दिवस ती परिमलबाबूंना भेटायला गेली. बरेच दिवसांनी ती अशी अचानक आलेली पाहून त्यांना आश्चर्य वाटले. तिच्या उदास चेहऱ्याकडे बघत ते म्हणाले, "किती वाळली आहेस झुमी, बरं नव्हतं तुला?" त्यांच्या या मायेच्या शब्दांनी तिला अश्रु अनावर झाले. मन मोकळे करून स्वतःची सारी हकीकत तिने त्यांना सांगितली. दुःखातिरेकाने, "या घरातून निघून जायला मला मदत केली नाहीत तर मी जीव देईन," असे तिने म्हणताच ते म्हणाले, "वाटेल तें बोलायला वेड तर नाही लागलं? आम्ही सगळे असतांना तुला का काळजी?" त्यांनी परोपरीने तिला धीर दिला, व पूर्णला त्यांचे घरी पाठवून 'झुमीला आमचे घरी ठेवून घेतले आहे' असे कळवले. तिच्या सारख्या घरंदाज श्रीमंताचे मुलीने नोकरी करावी हे त्यांना बरे वाटत नव्हते. पण तिच्या सध्याच्या मनःस्थितीत असा बदल तिला मानवेल हे पटल्यामुळे ते तिच्या बेताशी सहमत झाले.

आठ दिवसांनी अर्जाचे अनुकूळ उत्तर आले. तिचा मोठा आतेभाऊ पुलिनचंद्र मुंबईलाच रहात असे. तेव्हा त्याचेच घरी तिने रहावे असे ठरले. परिमलबाबुंनी तसे त्याला पत्राने कळवून तिला स्टेशनवर उतरवून घेण्यासाठी लिहिले होते.

काकाकाकींना काही संशय येऊ नये म्हणून मुंबईस जाण्यापूर्वी ती थोडे दिवस त्यांचेकडे रहायला आली. आपले आवश्यक सामान ते उभयता घरी नसतांना तिने पूर्णचे हाती अगोदरच हालवले होते. स्टेशनवर निघण्यापूर्वी, "मी नोकरी शोधली असून स्वतंत्र राहण्याच्या इच्छेने जात आहे तरी माझी काळजी करू नका, व कृपा करून माझा

शोधही करू नका," अशी चिट्ठी काकांचे नावे ठेऊन, नुसती मनिपर्स बरोबर घेऊन व नोकराला 'जरा बाहेर जाऊन येते' असे सांगून तिने घर सोडले.

परिमलबाबू व पूर्णचंद्र तिला पोहोचवायला हावऱ्याला आले होते. गाडी सुरू झाली तेव्हा घर सोडण्याचा आपला बेत ठरल्याप्रमाणे पार पडला खरा, पण यापुढील आपल्या आयुष्यात सुख व समाधान आपल्याला भेटेल की नाही या शंकेने तिचे मन व्याकुळ झालें.

११

आतासुद्धा मुंबईला परत जाण्यासाठी ती स्टेशनवर निघाली होती. त्या वेळेसारखेच परिमलबाबू व पूर्ण तिला गाडीवर पोहोचवायला आले होते. पण त्या वेळच्या व आताच्या जाण्यात केवढा फरक होता! त्यावेळी, कोठेच आधार नाही, काहीतरी करून कुठेतरी दिवस काढायचे अशा उदास विचारांनी तिचे मन भरलेले होते. आणि आता पाहिजे ते मिळाले, आधार सापडला—असातसा नव्हे तर अगदी मनाजोगता—या खुषीने मन प्रफुल्लित होते. आता जगण्यात निःसंशय आनंद होता. उत्साही व आशादायी विचार अंतःकरणात काठोकाठ भरले होते.

गेल्या आठदहा दिवसातल्या साऱ्या घटनांची मनाशी जुळवणी करून ती आपल्याशीच खुषीने हासत होती. त्या दिवसांतला सदानंदाचा सहवास, त्याचे व तिचे आपसांतील बारीकसारीक बोलणे, सारे कांहीं आठवून ते सुख ती पुन्हा अनुभवत होती. एरव्ही कंटाळवाणा वाटला असता असा हा दोन दिवसांचा प्रवास व हवेतील उष्मा यांकडे मन आनंदी असल्यामुळे तिचें लक्षच नव्हते.

पंधरा दिवसापूर्वी सदानंदबरोबर तिने हा प्रवास केला होता. शांतिनिकेतनची तिची मैत्रीण, मिठू, हिच्या लग्नासाठी ती कलकत्त्याला आली होती. तिचे आतेभाऊ, पूर्ण नि प्रफुल्ल, स्टेशनवर आलेच होते. त्यांना व सदानंदला एकाच मार्गाने जायचे होते म्हणून ते सारे एकाच टॅक्सीतून निघाले. हरीश मुखर्जी रोडवर, संकारीपाडा रोडच्या क्रॉसिंगजवळ मणिदीपा व तिचे आतेभाऊ उतरले, व सदानंद पुढे गेला. तिच्या

आतेभावांच्या आग्रहामुळे तो त्या दिवशी संध्याकाळी त्यांचेकडे आला होता. ती, परिमलबाबू, सदानंद व तिचे आतेभाऊ, सगळ्यांनीच चहाफराळ करीत बऱ्याच गप्पागोष्टी केल्या. डॉ. सदानंदला बंगाली भाषा उत्तम बोलता येत असल्यामुळे तो या लोकात सहजतेने मिसळला होता. परितोषबाबूंची व त्याची दोस्ती आहे, इतकेंच काय, पण बेल-घुरियाच्या घरातील पटलबाबूसुद्धा त्याच्या परिचयाचा आहे हे ऐकून परिमलबाबूंना नवल वाटले होते.

त्याची अंदमानची बोट पाचसहा दिवसांनी निघणार होती. त्यामुळे शांतिनिकेतनला मिठूचे लग्न उरकले की लगेच इकडे परत येण्याचे तिने त्याला कबूल केले होते. ती मात्र आणखी काही दिवस तरी कल-कत्त्यासच राहणार होती. दुसरे दिवशी सकाळी ती शांतिनिकेतनला निघाली तेव्हां सदानंद तिला पोहोंचवायला स्टेशनवर गेला होता.

सदानंदाची बोट निघण्याचे आदले दिवशी त्या दोघांनी सिनेमाला जाण्याचे ठरविले. मेट्रोला कुठलेसे विनोदी पिक्चर चालू होते. तेथेच ते दोघे गेले.

थिएटरमधील गर्दीमुळे सिनेमा सुटल्यावर साहजिकच ती दोघं अगदी खेटून चालली होती. चित्रपटातील काहीतरी विनोदी घटना आठवून त्याचेकडे मान वर करून ती हसत हसत काहीसे बोलली, त्यावर त्याने पण मजेदार उत्तर दिले, त्यामुळे ती जास्तच हसू लागली. एकदम हसता हसता ती चमकून थबकली. ॲंडव्हान्स बुकिंगचे खिडकी जवळ गर्दीकडे तोंड करून सुरेन् उभा होता. तिच्या मुखावरील हास्य पुसले गेले. आपण जसे काही त्याला पाहिलेच नाही असे दर्शवून ती गर्दीतून वाट काढू लागली. पुढच्या कमी गर्दीच्या भागात आल्यावर सदानंदसह ती फुटपाथकडे वळणार इतक्यात सुरेन् एकदम पुढेच येऊन उभा राहिला.

"हॅलो, मणी, लग्न करायच नाही म्हणता म्हणता जोडीदार गाठलास म्हणायचा!" असे बोलत असतांना तिच्याजवळ उभ्या असलेल्या सदानंदकडे त्याची नजर रोखलेली होती.

"काय वाटेल ते बोलतोस सुरेन्. हे माझे—हे डॉ. सदानंद." हे माझे मित्र म्हणावे, की नुसतेच परिचित म्हणावे हे न कळून ती बोलताना अडखळली होती. तिच्या या संभ्रमाचा फायदा घेऊन तिला

खिजवण्यासाठी सुरेन् म्हणाला, "हे तुझे डॉ. सदानंद काय? छान छान! विश् यू गुड लक् डॉक्टर! मला जे जिंकता आलं नाही ते अखेर तुम्ही मिळवलेत, शाबास!"

त्याला जास्त काही बोलण्याची संधि न देता ती पुढे सटकली. सुरेन्च्या या अचरटपणामुळे ती खजील झाली होती. त्याच्या-विषयीची हकीकत प्रवासात तिने सदानंदला सांगितली होती. तरीपण आताच्या त्याच्या प्रलापामुळे सदानंदला काय वाटले असेल असे तिच्या मनात आले. सगळी संध्याकाळ कशी आनंदात गेली होती. सुरेन्चे अपशकुनी तोंड दिसल्यामुळे त्या आनंदावर विरजण पडल्यासारखे झाले.

मनाच्या अस्वस्थतेत सुरेन्द्रनाथ बॅनर्जी रोडचे क्रॉसिंग कधी आले ते तिला कळलेच नाही. तिला गाडीचा धक्काच बसायचा, पण, "हे काय? तुझं लक्ष कुठं आहे? पोलिसचा हात बघशील की नाही?" असे म्हणत सदानंदाने दंडाला धरून तिला मागे खेचले होते. प्रवासातील मैत्रीत तिने सदानंदाला, 'मला अहो जाहो म्हणायचं नाही हं! मी खूप लहान आहे तुमच्यापेक्षां,' असे बजावले होते.

ते दोघे टॅक्सीत बसले तरी सुरेन्वरचा राग तिच्या मनातून गेलेला नव्हता. "कशाला मेला भेटला, कोण जाणे!" असे ती त्रासिक आवाजात पुटपुटली तेव्हा तो किंचित हसून म्हणाला, "तुला तो आवडत नसला म्हणून काय झाले? पण त्या बिचाऱ्याचे मन जडलं आहे तुझ्यावर —खरं सांगू का, तू कोणालाही आवडशील अशीच आहेस. मी दहा वर्षांनी लहान असतो तर मी सुद्धा तुला मागणी घातली असती." त्याच्या या बोलण्याने तिचे मन भलतेच गोंधळून गेले. काय उत्तर द्यावे हे न सुचल्यामुळे ती गप्पच राहिली. बहुतेक त्यालासुद्धा उत्तराची अपेक्षा नसावी, कारण तोही अगदी गप्पच होता. तिच्या आत्याचे घर लहानशा गल्लीत होते. ती कुंडू लेन तोंडाशी चिंचोळी असली तरी पुढे हळुहळु रुंदावून आत्याचे घरासमोर तर एका मोकळ्या ग्राऊंडलाच मिळाली होती. पण त्या लेनचे अरुंद तोंड पाहिले की बहुतेक सगळे टॅक्सीवाले गाडी आत वळवायला कुरकुर करीत. हा टॅक्सीवाला पण कटकट करू लागला तेव्हा लेनचे तोंडाशीच टॅक्सीतून उतरून ते पायीच घराकडे निघाले.

वाटभर ती एकच विचार करत होती. सदानंद जर तिच्या वयाजोगा असता तर किती चांगले झाले असते ? एकदम तिच्या मनात आले, हे वयाचे अंतर वाजवीपेक्षां थोडे जास्त असले म्हणून काय झाले ? वयाच्या मानाने तो कितीतरी तरुण दिसतो. आरोग्याच्या देणगीमुळे त्याला प्राप्त झालेले शरीरसौष्ठव व वागण्यातील त्याचा तरतरीतपणा ऐन पंचविशीतल्या तरुणाला लाजवील असाच होता. तिच्यासारख्या पोरक्या व अननुभवी मुलीला त्याच्यासारखा कर्तबगार पुरुष आधार या दृष्टीनी शोभला नसता का ? मग केवळ वयाच्या जास्त अंतरामुळे त्यांच्या मीलनास अडथळा यावा हे योग्य होते काय ? तिला नुकतेच बाविसावे वर्ष संपले होते, व तो ३७।३८ वर्षांचा होता. जगाचे दृष्टीनें हे अंतर हास्यास्पद असले तरी ती दोघेही जगावेगळीच नव्हती का ? तिच्या विशिष्ट परिस्थितीत एखाद्या अल्लड तरुणापेक्षा अशा प्रौढ पण सुविचारी जोडीदाराचीच तिला जास्त गरज नव्हती का ?

विचारांचे तंद्रीत घर कधी आले ते कळलेच नाही. रस्त्यात फारशी रहदारी नव्हतीच. एखाददुसरी रिक्षा टणटण आवाज करीत जात येत होती, व कोपऱ्यावरच्या कचऱ्याच्या ढिगाजवळ एकदोन कुत्रीं गुरगुरत होती. आत्याच्या शेजारच्या घरात रेडिओ सिलोनचा कार्यक्रम दणकून सुरू होता.

त्याला निरोप देण्यापूर्वी ती एकदम म्हणाली, "तुमच्यापेक्षा वयाने खूप लहान असलेल्या मुलीशी तुम्ही लग्न केले तर ती मुलगी विचारांनी तुमच्याशी समरस होऊ शकणार नाही असं तुम्हाला वाटतं की काय ?"

रेडिओ सिलोन गर्जत होता, "ताकद के लिये बोर्नव्हिटा, शक्ति के लिये बोर्नव्हिटा—अपनी थकावट दूर करने के लिये बोर्नव्हिटा इस्तेमाल कीजिये"—

या गोंगाटात आपला प्रश्न त्याला ऐकू गेला की नाही अशी शंका तिला आली, पण त्याने तो प्रश्न ऐकलेला होता. आपण ऐकले ते जागेपणी की स्वप्नी असे वाटल्यामुळे तो थोडावेळ थबकला असावा. एकदम त्याला काय वाटले कोण जाणे, पण तिचे दोन्ही हात हलकेच आपल्या हाती घेत तो म्हणाला, "आपण केव्हा लग्न करू या, सांग."

असा उघड सवाल आपल्या प्रेयसीला कोणी विचारला नसेल—ती गोंधळली. 'संगम' चित्रपट सुरू होण्याच्या कितीतरी आधीपासूनच लोकप्रिय झालेल्या त्यातल्या संगीतातील एक गाणे रेडिओ सिलोन गात होता, "मैं क्या करू राम, मुझे बुढ्ढा मिल गया"—

मनापासून हासत तो म्हणाला, "ऐकलंस ! माझ्याशी लग्न करायच असेल तर हे गाणे तुला पाठ करावे लागेल." त्याच्या या थट्टेने ती कमालीची लाजली.

१२

दुसऱ्या दिवशी सकाळी महाराष्ट्रनिवासच्या खोलीबाहेरील व्हरांड्यात हजरा रोडवरील रहदारी पहात ती दोघे उभी होती. त्यावेळी तो तिला म्हणाला होता, "मी तुला कोणत्या नावाने हाक मारीत जाऊ? झुमी, मणी, मणिदीपा की दीपा ?"

"तुम्ही काहीही म्हटलंत तरी मला आवडेलच."

यावर तो म्हणाला होता, "देवी दुर्गेची कशी शतनामे आहेत, अपर्णा, अंबा, भवानी, उमा, गिरिजा, तशीच तुझीही आहेत—आणि तो भोळा शंकर जसा त्याच्या प्रियेला या विविध नावांनी आळवीत असे, तसाच मी पण तुला कधी झुमी, तर कधी मणो, तर कधी मणिदीपा—पुढे मागे आपल्याला बाळ झालं की मग तुला 'बाळाची मा' असेही म्हणत जाईन, नाही का ?"

"पुरे पुरे ! आता फार पांडित्य नकोय."

"अग, तुझा माझा जोडा शिव-पार्वतीसारखाच आहे. हिमवानाची श्रीमंतीत वाढलेली एकुलती एक रूपवती, गुणवती कन्या जशी पार्वती, तशीच तू पण बडचा अशुतोषबाबूंची लेक, आणि मी त्या शंकरासारखा निष्कांचन नि सडाफटिंग !"

हे ऐकून हसत ती म्हणाली, "आणखीन् काही उपमा नाहीत ना बाकी ?"

—"वयाच्या अंतराचे विसरलीस वाटतं ? गौरी तरुण, तर शंकर वृद्ध"—

"असूं दे कसाही, पण तो तिला आवडला होता ना ? त्याच्या प्राप्ती-साठी तिने केवढी तपश्चर्या केली होती ठाऊक नाही का तुम्हाला ? मला

तुम्ही आवडला आहात, मग इतर लोकांना त्याबद्दल काय वाटेल त्याची परवा करण्याचे मला काय कारण ?"

खिदिरपूरच्या डॉक नंबर ८ ला एम्. व्ही. अंदमान बोट लागली होती. बोट सुटण्याची वेळ रात्रीची होती, आणि डॉकची बाजू अगदीच आड-वळणाला असल्यामुळे तिने सोबतीसाठी पूर्णचंद्रला बरोबर घेतले होते. डॉ. सदानंदला निरोप देऊन परतायला त्यांना बरीच रात्र झाली.

कलकत्ता सोडण्यापूर्वी आपला डॉ. सदानंदशी विवाह करण्याचा निश्चय तिने परिमलबाबूंजवळ व्यक्त केला. तो बंगाली नाही, तसेच दोघांचे वयात बरेच अंतर आहे, या दोन मुद्यांचा पुढील आयुष्याचे दृष्टीने नीट विचार केल्याशिवास तिने असा घाईने शब्द द्यायला नको होता असे त्यांचे मत पडले. तिने त्यांना आपली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते म्हणाले, "हल्लीच्या काळात प्रत्यक्ष पित्याचासुद्धा अधिकार कोणी मानीत नाही. आमचा तर तुझ्यावर तसा काहीच हक्क नाही. पण जे काय करशील ते तुझ्या सुखाचे होवो म्हणजे झाले. तसे डॉक्टर सदानंद पसंत पडण्यासारखेच आहेत, पण त्यांचा फारसा आगापिछा आपल्याला माहीत नाही म्हणून जरा मन खटकतं."

तसे पाहिले तर त्या दोघांनाही प्रत्यक्ष विरोध करणारे कोणीच नव्हते. ती आता वयात आलेली होती, त्यामुळे तिची ती मुखत्यार होतीच. आणि तो तर त्याच्या घरापासून अलग होऊन कितीतरी वर्षे अगदी स्वतंत्र आयुष्य जगत होता. त्यामुळे त्या दोघांनी योजलेला हा विवाह-निश्चय केव्हा अमलात आणायचा एवढाच प्रश्न होता.

आणखी पाचसहा महिन्यांनी परत थोडे दिवसांची रजा घेऊन तो मुंबईस आला कीं तेथेच रजिस्टर पद्धतीने चुटपुटीत लग्नसोहाळा उरकून दोघांनी पोर्टब्लेअरला जायचे, तोपर्यंत मणिदीपाने मुंबईतच राहून शाळेतील नोकरी करायची, असा बेत त्यांनी केला होता. शाळेत मिरा भेटली की तिच्याशी वागताना आपल्याला कसे वाटेल याचा विचार ती मनाशी करत होती. डॉ. सदानंदाने तिला सुचविले होते, "तुझ्या पुलिनदाला बरोबर घेऊन आमच्या घरी माझ्या आईवडलांना भेटून ये. आपले लग्न ठरल्याचे पुलिनदालाच त्यांचे कानावर घालायला सांग."

त्यावर ती म्हणाली होती, "नको रे बाबा, मला लाज वाटते, आणि मला तुमची भाषा तरी कुठं येतीय. तिथं जाऊन आम्ही काय बोलणार त्यांच्याशी ? तुम्हीच कळवा त्यांना काय ते."

ती कलकत्त्यास असतांना त्याची पोहोचल्याची तार तिला मिळाली होती. पोर्टब्लेअरहून पत्रे मिळायला दोनतीन आठवडे लागत असत. त्यामुळे या पाचसहा महिन्यांचे अवधीत पाच वेळा तरी पत्ररूपाने त्याची भेट होईल की नाही, याची तिला शंकाच होती. हे पाच महिने कधी संपतील असे तिला झाले होते.

आपले लग्न झाल्याचे कळले की काका, काकी, नि सुरेन् यांना काय वाटेल, या विचाराबरोबरच त्या दिवशीच्या सुरेन्च्या प्रलापांमुळे आपला विवाह ठरला हा मजेदार विचार तिचे मनात आला. तिला वाटलं, 'काय गंमत आहे पहा ! त्यावेळी सुरेन्ची भेटच झाली नसती तर सदानंदाला काही आपल्याला मागणी घालण्याची बुद्धि झाली नसती.' सिनेमा सुटल्यावर त्याने तिला आत्याच्या घरी पोहोचवले असते व तो निघून गेला असता. दुसऱ्याच दिवशी तो कलकत्ता सोडणार होता, मग पुन्हा कधी योगायोगाने ती दोघं भेटली असती किंवा नसतीही. तिच्या विषयी त्याला आकर्षण असूनही मागणी घालण्याचे धाडस त्याने केले नसते, आणि तो फार आवडलेला असूनही स्त्रीसुलभ संकोचाने तिने मौनच स्वीकारले असते.—एक प्रकारे पहाता सुरेन्चे खूप आभार मानले पाहिजेत. वाईटातूनही कधीकधी चांगले निघते म्हणतात तें असें !

१३

"पुढील महिन्यांत बावीस तारखेपासून येथील विमानवाहतुक सुरू होईल. मी लगेच निघून तेवीसला मुंबईस येतोच"—असे सदानंदाचे पत्र तिला आक्टोबरमधे मिळाले होते. तेव्हापासून ती दिवस मोजीत होती.

तिच्या पुलिनदाचा व त्याच्या श्वशुरांचा ओनरशिप बेसिसवर घेतलेले फ्लॅट एकाच इमारतीत शेजारी शेजारी होते. बांद्र्याहून खारकडे जाताना घोडबंदर रोडशी समांतर असलेल्या लिंकिंग रोडवर मोठी चार

मजली इमारत होती. तेथील सर्व फ्लॅट सिनेमा व्यवसायातील बंगाली लोकानी ओनरशिप पद्धतीने बांधल्यामुळे ती इमारत म्हणजे चिमुकला बंगालच होता. दत्त, सेन, दासगुप्त, चक्रवर्ती, लाहिरी, मुखर्जी—सगळेच बिन्हाडकरू बंगाली. तिचा दादा बी. एस्. सी. (टेक्.) होता. फिल्म प्रोसेसिंग व एडिटिंकचे काम तो करीत असे. प्रकाशयोजनेचे त्याचे ज्ञान वाखाणण्यासारखे होते. 'लाइट इफेक्ट आणावा तर पुलिनबाबूंनीच' असे सगळेजण त्याची स्तुति करीत.

तिचा विवाहाचा बेत ऐकून व एका मराठी डॉक्टरशी तिने लग्न ठरवल्याचे पाहून तिचा दादा थट्टेने म्हणाला, "शाबास ! वर्ष झालं नाही तुला इथं येऊन तर एका मराठ्यावर प्रेम करण्याइतकी पुढं गेलीस ना ?"

ती म्हणाली, "शहाणाच आहेस ! त्यांची नि माझी ओळख काय इथली आहे होय ?" त्यावर तिची वहिनी हसत हसत म्हणाली, "ते खरंच ! ओळख झाली मद्रासला, परिचय वाढला बंगालमधे, लग्न होणार महाराष्ट्रात नि संसार थाटणार अंदमानला ! छान ! मणिदीपा, तुमचं हे प्रेमप्रकरण अगदी अखिल भारतीय स्वरूपांच आहे म्हणायचं ! पण आता मराठी माणसाशी लग्न करणार, तेव्हा त्यांची भाषा नि रीत-रिवाज थोडे शिकून घे. काचा घातलेली नऊ वारी साडी तर पहिल्याने नेसायला शिक."

या सगळ्या थट्टेने वरकरणी रागाचा अभिनय केला तरी तिच्या मनाला आनंदाच्या गुदगुल्या होत. रोजचे सगळे व्यवहार करीत असताना ती आपल्या मनाशी भावी संसाराची कल्पनाचित्रे रंगवी.

मिराकडे ती पूर्वीपेक्षा जास्त आपुलकीने व मायेने पाहू लागली होती. चित्रकलेचे तासाला ती मिराला प्रत्येक चित्र कसे आखावे व रंगवावे हे मनापासून समजाऊन देई. ते पाहिले की वर्गातल्या मुली, 'बॅनर्जीबाईंची फेव्हरिट्' असे तिला चिडवीत. मणिदीपाला वाटे, मीराला म्हणावे 'त्या चहाटळ मुलीना सांग, बॅनर्जीबाई आता लवकरच माझ्या वहिनी होणार आहेत.'

सदानंदने आपल्या बंगालमधील आठवणी व अनुभव तिला गप्पांचे ओघात सांगितले होते. बेलघुरियाच्या वाड्यांतील तिच्या वडलांच्या

ग्रंथालयात तो कित्येकवेळा वाचीत बसलेला होता. बागेत व गंगेकाठी फिरण्यात त्याने कित्येकदा कितीतरी वेळ घालवलेला होता.—एका दृष्टीने पाहिले तर आपल्यापेक्षाही जास्त रसिकतेने त्याने त्या वास्तूचे निरीक्षण केलेले आहे. तिला वाटे, त्याचे पोर्टब्लेअरमधील नोकरीचे कॉन्ट्रॅक्ट संपले की आपण त्याला बेलघुरियाच्याच वाड्यात संसार करण्याची विनंति करू. मग आपल्या व त्याच्या जुन्या आठवणींनी तिथल्या वास्तव्याला किती तरी गोडी येईल !

—कधी एकदा येईल सदानंद ! अजून एक महीना आहे.—कसा संपणार हा महिना ?—पण तेवीस नोव्हेंबरला तो प्रत्यक्ष येण्याऐवजी त्याची तारच तिचे हाती पडली.

'परितोषबाबूंच्या अकस्मित निधनामुळे निघता आले नाही. सविस्तर पत्र टाकलं आहे'—

पत्र मिळेपर्यंत सगळी हकीकत कळणे शक्य नव्हते. काकांना एकाएकी असे काय झाले, तिला कळेना ! आपला आणखी एक कौटुंबिक दुवा तुटला ! तिचे व सदानंदाचे सहजीवन सुरू होण्यापूर्वी तिच्यामागे माहेरचा कुठलाही पाश न ठेवण्याचे ईश्वराने ठरवले होतें की काय ?

तीनचार दिवसांनी त्याचे सविस्तर पत्र तिला मिळाले. त्याने लिहिले होते, "माझं पत्र तुला लवकर मिळावं म्हणून एका आय्.ए.फ. मधील ऑफिसरचे हातीं हे पत्र कलकत्त्याच्या पोस्टात टाकण्यासाठी देत आहे. मागच्या पत्रात परितोषबाबूंचा मुक्काम येथे नसल्याचे मी तुला लिहिलेच होते. ते इकडे आले की तुझी खुशाली त्यांना कळवून आपल्या दोघांचा लग्न करण्याचा निश्चयही त्यांना सांगायचा असं मी ठरवलं होतं, पण चारपाच दिवसापूर्वी ही अकल्पित घटना घडली !

नुकतेच हॉस्पिटलचे काम उरकून मी घरी परतलो होतो तेव्हाच फोन आला—'हॅलाव डाक्टरसाब, बाबू बहोत बीमार हो गये हैं, आप जलदी आइये,' परितोषबाबूंचा नोकर फोनवर बोलत होता. तेव्हा आश्चर्य वाटून मी त्याला विचारले की ते आले तरी कधी, अन् त्यांना असे अचानक झाले तरी काय ? त्यावर नोकर म्हणाला, 'साब तो कलही कलकत्ते से आये, और आज अचानक उनका तबियत बिघड गया. पता नहीं क्या हुवा. आप फौरन आ जाइये.'

मी घाईनेच त्यांचे बंगल्यावर गेलो. बाहेरचेच सोफावर ते अस्ता-व्यस्त पडलेले होते. त्यांचा श्वास कमालीचा जड होता. शरीर घामाने निथळत होते व ते शुद्धीवर नव्हते. मला लक्षणे ठीक दिसेनात म्हणून मी डॉ. शर्मांना फोन करून माझे जोडीला बोलावले. या परिस्थितीमुळे सगळे नोकरचाकरही बावरून गेले होते. त्यांच्यापाशी चौकशी केल्यावर तुझी काकी किंवा सुरेन् कोणीच इकडे आलेले नाही असे कळले.

मी व डॉ. शर्मांनी उपचारांची पराकाष्ठा केली, पण आमचे हाताला यश आले नाही ! मरणापूर्वी अर्धवट शुद्धीत मला ओळखल्यासारखे दर्शवून ते अडखळत म्हणाले, 'मणीचा शोध करा—तारकबाबूजवळ-माझं वुइल—' बोलतांना त्यांना इतके परिश्रम होत होते की मी त्यांना, 'बोलू नका, स्वस्थ पडा' असं विनवलं. निजलेल्या अवस्थेत श्वास घेणे मुष्किलीचे होऊ लागले, म्हणून मी त्यांना माझ्या आधाराने पाठीशी उशांचे टेकण देऊन किंचित बसतें केलें. ऑक्सिजन सुरू करून व कोरॅमिन देऊनही काहीच उपयोग झाला नाही. शेवटी माझ्या खांद्यावर डोके टेकून त्यांनी प्राण सोडला.

तुझी काकी कलकत्त्याला आहे की आसामला, याची काहीच कल्पना नोकरांना नव्हती. त्या दोन्ही ठिकाणचे पत्ते हुडकून काढून तिकडे मी तारा केल्या. आजच, शुक्रवारच्या प्लेनने येत असल्याचे त्यांचे उत्तर तारेने आले आहे.

त्या इकडे येईपर्यंत परितोषबाबूंचा देह ठेवणे अशक्यच होते. शेवटी मीच अंत्यक्रिया केली. माझ्या हातून—त्यांच्या भावी जावयाचे हातून-शेवटचा अग्निसंस्कार त्यांना घडावा अशी ईश्वराची इच्छा होती ! अखेरपर्यंत तुझी हकीकत त्यांना सांगून त्यांची काळजी दूर करता आली नाही याची मात्र मला फारच रुखरुख लागली आहे.

मी माझ्या जबाबदारीवर अंत्यविधि केलेला असल्यामुळे तुझ्या काकी इकडे येऊन त्यांना सगळे सांगेपर्यंत मला मुंबईला येता येणार नाही. जर जमलं तर त्या ज्या प्लेनने इकडे येणार आहेत त्याच प्लेनने शनिवारी मी इकडून निघण्याचा प्रयत्न करीन. नाहीतर मग माझे येणे आणखी एक आठवडा लांबेल. तोपर्यंत दोघांनाही धीर धरायला हवा. आता फार तर आठ दहा दिवसच बाकी आहेत.—मग तू माझीच !"

१४

तो ठरल्याप्रमाणे शनिवारी इकडे आला.

बंगाली मुलीशी त्याने लग्न करायचे ठरवले याबद्दल त्याचे घरी उघड असा विरोध कोणी केला नव्हता, कारण त्या विरोधाला तो मानणार नाही हे त्याच्या वडील मंडळींना माहीत होते. काही मोठी माणसं तशी शहाणी नि समजुतदार असतात. आपल्या शब्दाला मान दिला जाणार नाही याची खात्री असली की फुकटचा विरोध न करता ते आपला मान पणाला लावण्याचे टाळतात. सदानंदाचे आईवडील याच वर्गातले होते. बंगाली असली म्हणून काय झालं, पण घरंदाज ब्राह्मणाची तर मुलगी आहे, असे त्यांतल्या त्यात त्यांनी समाधान मानून घेतले. मात्र रजिस्टर पद्धतीने लग्न न करता धार्मिक विधीने विवाह साजरा व्हावा हा त्यांचा आग्रह सदानंदाने मानला.

पुलिनचंद्रच्या जागेसमोरील मोकळ्या आवारात मांडव घालून थोडक्याच इष्टमित्रांना बोलावून सुटसुटीतपणे लग्नसमारंभ पार पडला. परिमलबाबूंना स्वत: येणे शक्य झाले नाही, पण पूर्णचंद्र व प्रफुल्ल लग्नाला हजर होते. तिच्यासाठी उंची बनारसी साडच्या व दागिन्यांचा सेट त्यांनी अहेरादाखल पाठविला होता. त्याशिवाय ट्रस्टी या नात्याने तारकबाबूंच्या ताब्यात असलेले तिच्या आईचे निवडक अलंकार या प्रसंगी वापरण्यासाठी त्यांनी पाठविले होते. डॉ. सदानंदालाही घडच्याळ, अंगठी, बटणें, उंची पोषाख, असे सर्व तिच्या आतेभावांनी केले होते. पानसुपारीचा व मेजवानीचा थाटही उत्तम होता.

सुंदर अलंकार, भरजरी शालू, भांगात रेखलेला शेंदूर, पावलावर आरक्त आळत्याची रेषा, कुंकुमतिलकाचे आजुबाजूला चंदनाच्या ठिपक्यांची अल्पना, या बंगाली थाटाचे जोडीला, गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरवा चुडा, पायात जोडवी, असा मराठी साज भरीला घालून सदानंदाची नववधू, लेडी जमशेदजी रोडवरील त्यांच्या जागेत प्रवेशली तेव्हा सुनेचे सुकुमार रेखीव रूप पाहून सासूसासरे हरखले. कुतूहलाने आणि कौतुकाने सगळ्यांनीच तिचे स्वागत मोठ्या थाटात केले. नव्या नवरीचे नाव

बदलावे की नाही हा प्रश्न उद्भवला, तेव्हा नाव बदलायचे नाही असाच निर्णय सदानंदाने घेतला. त्याच्या दृष्टीने तिचे मणिदीपा हे नाव योग्य असेच होते. त्याच्या एकाकी आयुष्याचा मार्ग प्रकाशित करणारी ती रत्नदीपिकाच नव्हती का ?

मिस बॅनर्जी आपल्या वहिनी झाल्या, आणि लग्नात या सगळ्या बंगाली लोकांनी त्या सर्वांचा खूप छान मानपान केला व लग्न झोकात केले, हे सारे शाळेतल्या मुलींना किती सांगू नि किती नको, असे मिराला झाले होते. ती आपल्या नव्या वहिनीवर भलतीच खूष होती.

एक आठवडचानंतर ती दोघे कलकत्त्याला गेली. परिमलबाबूंनी या नवदांपत्याचे स्वागत् प्रेमाने केले. मणिदीपाचा सुवासिनीचा साज व प्रसन्न मुखमंडल पाहून तिने परजातीत लग्न केले ही त्यांची रुखरुख दूर झाली. दिदिमणीला नववधूचे वेषात पाहून गोपालेर माला आनंदाश्रु आवरेनात. हा क्षण जितका सुखाचा तितकाच हे सुख बघायला कोणीच वडील माणसे उरली नाहीत म्हणून खेदाचाही होता.

डाकोटा विमानाने ते डमडमहून पोर्टब्लेअरकडे निघाले. सुखातिशयाने मणिदीपाचे मन काठोकाठ भरले होते. तिचा पति—ज्याचे नावच सदानंद—तो चित्स्वरूपी आनंदच नाही का ? तोच तिचा असल्यावर तिला कशाची कमतरता ! तिची कष्टमय एकाकी वाटचाल संपली होती. तिचा प्राणसखा, तिच्या जिवाचा आधार, आता जोडीला असल्यामुळे यापुढचा प्रवास निःसंशय सुखमय होता.

रंगूनच्या विमानतळावर फ्युएल्साठी या मार्गाने जाणारी विमाने थांबतात. त्यामुळे तो एक तास विमानातच बसून न घालवता ती दोघे विमानतळाचे बारमधे जाऊन बसली. सदानंदाने लेमनस्क्वॉश् मागवले.

थंडगार पेय काडीने हळूच पिता पिता तो तिच्याकडे निरखून पहात होता.

तिने विचारले, "इतकं काय पहाता माझ्याकडे ?"

"बघतोय, आनंदात आहेस की नाही ते !"

"सदानंदाची वधू आनंदी नसणार हे शक्य तरी आहे काय ?"

हलकेच तिचा हात हाती घेऊन तो म्हणाला, "तुला शक्य तितकं सुखी करायचं हीच माझी मनीषा आहे."

ती म्हणाली, "मग तुमच्याबद्दलची माझी मनीषा याहून वेगळी कशी असेल ? सुखाचा संसार करायचा हीच आता आपल्या दोघांची मनीषा !"

मनीषा

७

त्या दोघांची मनीषा चिमुकले मूर्त स्वरूप घेऊन जन्माला आली. जगाचे पहिले वारे सहन न होऊन तो कोवळा जीव टँहाँ टँहाँ करून रडत होता. त्या इवल्याशा लाल गोळ्याला जन्म देतांना त्याची माउली श्रांत होऊन अर्धवट गुंगीत पडली होती. आणि त्या नवजात शिशूचा पिता कपाळावरचा घाम पुसत श्रमसाफल्याचे आनंदाने मनाशीच हासत होता.

ज्या तुरुंगाचे आवारात हे हॉस्पिटल होते त्या कारागृहाच्या तटाआड कितीतरी बंदिवानांनी यातनांचे व दुःखांचे कढ निराश मनाने सहन केले होते, त्याच भागात हा नवा जीव आनंद व उत्साह यांचे आशादायी चिमुकले पंख पसरून या जगात आला होता.

मणिदीपाच्या प्रसूतीला जास्त वेळ लागला व यातना सहन न होऊन ती अतिशय विह्वल झाली तेव्हा स्वतः डॉक्टर असूनही सदानंद अगदी गोंधळून गेला होता. हॉस्पिटलमधील खूप वर्षाच्या जुन्या वयस्कर सिस्टर, शांतादेवी, त्याची थट्टा करीत म्हणाल्या, "तुम्ही दोघं अपत्य-दर्शनाला फारच उत्सुक असला तरी तुमची उत्सुकता पुरी ताणल्याशिवाय जगात यायचं नाही असं तुमच्या बाळानं ठरवलेलं दिसतय."

त्याची अस्वस्थता पाहून डॉ. शर्मा म्हणाले, "पहिलटकरणीला असा जास्त वेळ पुष्कळवेळा लागतो. तू डॉक्टर आहेस, तुला एवढं समजू नये? तिला धीर द्यायचा सोडून तू स्वतःच बेचैन होतोस म्हणजे कमाल आहे! इतरांच्या केसेस हुशारीने व शांतचित्ताने करणारे डॉक्टर स्वतःच्या जिवलगांचे बाबतीत भलतेच हळवे असतात, हे खरेच म्हणायचं!"

शेवटी एकदाचे बाळ जन्माला आले. तो वळवळणारा कोवळा लालसर जीव बघून त्याचे मन भरून आले. मणिदीपा अर्धवट बेशुद्धा-वस्थेत होती. प्रसूतियातना संपल्यानंतर सुटकेचा तो क्षण असा सुखमय तंद्रीचा असतो की त्या स्थितीत आपल्याला काय मूल झालं, मुलगा की

मुलगी, कशाचीच जाणीव नसते. शारीरिक व मानसिक ग्लानीच्या त्या क्षणी सगळ्या जगाचे व्यापार अजिबात विसरायला लावील अशी सुखनिद्रा गात्रांत अगदी भरून येते. सदानंदाला वाटलं तिला हळूच या तंद्रीतून जागे करून तिच्या कानात सांगावं, "पाहिलीस का ही आपल्या दोघांची मनीषा!"—पण त्याने तिला झोपू दिले. गेले दहाबारा तास ज्या यातना तिच्या नाजुक शरीराने सोसल्या होत्या त्या तिच्या सुकुमार देहाला विश्रांतीची फार आवश्यकता होती.

सुख आणि दुःख या आयुष्यरूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. ओली-सुकी करतांना कधी छाप तर कधी काटा दिसतो, तसाच हा सुखदुःखाचा खेळ अविरत चालू असतो. दुःखाशिवाय सुखाची चव कळत नाही, व सुखाशिवाय दुःख पेलण्याची ताकद येत नाही. प्रसूतिच्या तीव्र वेण्या सोसाव्या नि मगच वात्सल्याचे अमर्याद सुख भोगावे!

त्यांच्या कन्येचे नाव 'मनीषा' असे ठेवायचे या सदानंदाच्या आग्रहाला मणिदीपाने मोठ्या खुषीने संमति दिली. लहानपणी तिच्या आवडत्या बाहुलीचं हेच नाव तिनं मोठ्या हौसेनं ठेवलं नव्हतं का? आणि आता ही हसती खेळती सजीव बाहुली तिच्या मांडीवर होती!

मनीषाचे करण्यात तिचा सारा वेळ अगदी गडबडीत जाई. त्यामुळे ती आपल्याकडे हळुहळु दुर्लक्ष करते, अशी कौतुकाची तक्रार सदानंद करी.

मनीषा जरा मोठी होऊन रांगू बसू लागल्यावर मणिदीपाला अचपळ-पणाने जरासुद्धा उसंत देत नसे. तिच्या संचाराला अडथळा येऊ नये म्हणून घरातल्या सामानाची मांडणीसुद्धा मणिदीपाला बदलून टाकावी लागली. पुढेपुढे दूध पाजणं आणि झोपवणं याव्यतिरिक्त ती मणिदीपाच्या वाटचालाच येत नसे. कधी डॉ. शर्मा, तर कधी शांतादेवी, नाहीतर शेजारचे इतर कोणी, मनीषाला वेळात वेळ काढून खेळायला घेऊन जात. ती मोठी गोड पोर होती. गोरा रंग, गोंडस व गुटगुटीत शरीर, काळे भोर टपोरे डोळे, दाट कुरळे केस आणि गालावरच्या छोट्या खळ्या! पाहिली कीच मनात भरावी अशी होती ती.

मणिदीपाचा तर ती जीव की प्राण होती. तिला वाटे, संपले आपल्या आयुष्यांतील दुःखाचे पर्व!—देवा, तू कधीकधी इतकं दुःख देतोस अन् नाही तेव्हा असं अमाप सुख! हे सुखसुद्धा मनात मावेनासं होतं

कधीकधी—सुखसागरात बुडून गेल्यासारखं—सुखातिरेकानं गुदमरल्यासारखं वाटतं !

अशाच मनाच्या आनंदी अवस्थेत मनीषाला थोपटत असताना ती गुणगुणत होती,

"एतो सुंदर ए जीबन बुझिनि ओ ग,
तोमार काछे एइ पाबार आगे—"

(तुझ्याकडून या सौख्याची ओळख होईपर्यंत हे आयुष्य इतकं सुंदर व जगण्याजोगं आहे याची मला कल्पनाच नव्हती !)

२

"मणिदीपा, परिमलबाबूंच पत्र आलं आहे," सदानंद आत येत म्हणाला.

"बघू द्या" त्याचे हातातून पत्र घेऊन ती वाचू लागली—

"मागेच मी तुम्हा दोघांना तिकडे इतक्या दूर, अंदमानला न राहता इकडे तुझ्या वाडचातच येऊन रहावे, व येथेच सदानंदानी प्रॅक्टिस सुरू करावी असे सुचवले होते. तुमचा काय बेत ठरलाय ? माझे आता वय होत चालले, त्यामुळे तू इथे येऊन एकदा तुझ्या इस्टेटीचा रीतसर ताबा घ्यावास अशी माझी फार इच्छा आहे. सॉलिसिटर सन्याल यांना नुकताच भेटून आलो. तुझ्या वडलांची सर्व संपत्ति तर तुझी आहेच, पण तुला आश्चर्य वाटेल, तुझ्या काकांनी सुद्धा वुइल करून कलकत्त्याचे घर व पंचवीस हजार रुपये तुझ्या नावे ठेवले आहेत. त्यासोबत एक सीलबंद लखोटा पण तुझे नावे ठेवलेला आहे. तू समक्ष इकडे आलीस की तो तुला सॉलिसिटरबाबूंकडून मिळेल. तुझ्या काकांना इतके शहाणपण असेल असे वाटले नव्हते.

तुमचं ठीक चालल आहे व छोटी मनीषा मजेत आहे हे वाचून आनंद वाटला. तिला फार पहावेसे वाटत आहे. गोपालेर मा आता खूप थकली आहे. डोळ्यांत मोतीबिंदु पडल्यामुळे तिला नीटसे दिसतही

नाहीं, पण मरण्यापूर्वी दिदिमणींची खरीखरी 'मनशा' एकदा तरी पोटाशी धरावी असा तिने घ्यास घेतला आहे.

तुझ्या काकीने पोर्टब्लेअरची इस्टेट विकून टाकल्याचे तू कळवले होते. तिने नुकताच बालीगंजला बंगला विकत घेतला आहे, व आताशा ती येथेच राहते असे कळले. पटल बरेच दिवसात इकडे फिरकलेला नाही. दुर्गादास नुकताच येऊन गेला. बेलघुरियाचे घर जसे काही आपल्याच मालकीचे असावे अशा थाटात पटल तिथे रहात आहे असे त्याच्याकडून कळले. प्रत्यक्ष आमचा इस्टेटीशी काही संबंध नसल्यामुळे त्याच्या वागण्याचा जाब आम्हाला विचारता येत नाही.

तू आता इकडे येच. बेलघुरियाला राहणे तुम्हाला पसंत नसेल तर ती इस्टेट विकून तुम्ही कलकत्त्याचे घरी राहू शकता. सदानंदाना स्वतंत्र प्रॅक्टिस किंवा नोकरी इथे सहज करता येईल. आणि त्यांनी जन्मभर काही केलं नाही तरी तुम्हाला पुरून उरेल इतके तुझे वैभव आहे."

पत्र वाचून तिने ते सदानंदाच्या हाती दिले. शेवटच्या दोन ओळी त्याच्या मनाला विशेष खटकल्या. त्याला आपल्या कॉलेजमधील आयुष्याची आठवण झाली. घरजावई होऊन मिंधेपणा पत्करण्याचे टाळण्यासाठी मायापासून तो किती कटाक्षाने दूर राहिला होता, आणि आताही सासऱ्याच्या वैभवाचा उपभोग घेत, चैनीने, पण एक प्रकारचे मिंधेपणाने, राहणे त्याला पटत नव्हते. मणिदीपाच्या श्रीमंतीला भुलून व तिच्या लहान वयाचा फायदा घेऊन त्याने तिला फसवले आहे असे उद्‌गार काही हितशत्रु काढतात हे त्याचे कानावर होते. या प्रचारांत सुरेन्‌चा प्रामुख्याने भाग होता. असल्या प्रलापांना काडीमात्र किंमत देऊ नये हे पटल्यामुळे तो या गोष्टींकडे दुर्लक्ष करी. इतरांची त्याला परवा नव्हती, पण मणिदीपालासुद्धा चुकूनही आपल्या वागण्याविषयी किंतु वाटू नये म्हणून तो अगदी जागृत असे. लग्न झाल्यानंतर, "कशाला हवी आता इतक्या लांबची नोकरी? मला काही कमी आहे का? आपण दोघं आमच्या बेलघुरियाच्या वाड्यातच राहू. तिथंच तुम्ही प्रॅक्टिस सुरू करा," असा आग्रह मणिदीपान केला, तेव्हा त्याने तो मानला नव्हता. पण तिला वाईट वाटू नये म्हणून वेगळ्याच तऱ्हेने त्याने तिला समजावले होते. तो म्हणाला होता, "तू एका परक्या जातीच्या

माणसाशी विवाहबद्ध झाली आहेस, याचे कुतूहल काही वर्षांनी आपोआप मागे पडेल. आपण दोघंही संसारात गुंतू, मग आपण कुठंही संसार केला तरी आपल्याला इतर लोकांचा त्रास होणार नाही. आपल्यासारख्या, लोकांच्या टीकेचा विषय झालेल्या जोडप्यांनी, पहिले काही दिवस तरी अगदी परक्या वातावरणात राहणे फार बरे. पोर्टब्लेअरची सुंदर वनश्री व शांतता नवविवाहितांना योग्य व अनुकूळ अशीच आहे."

त्यानंतर तिने पण हा वाद वाढवला नव्हता. मात्र हे पत्र वाचून पुनश्च तिच्या मनाने उचल घेतली.

"इथं किती सुखात आहोत आपण! आपल्या दोघांच्या नि चिमुकल्या मनीषाच्या गरजा व्यवस्थित भागतील इतकं मला मिळतय. इथं कुणाचा हेवादावा नाही, धुसफुस नाही! इतकं मनःस्वास्थ्य कलकत्त्याला किंवा बेलघुरियाला आपल्याला मिळेल का?" तिला समजावण्यासाठी तो म्हणाला.

रुसक्या आवाजात ती म्हणाली, "तुम्ही नाहीतरी तुटकच आहात. तुम्हाला कोणात फार मिसळायला नको, की कुठं यायला जायला नको. मी नि मनीषा तुम्हाला हव्या आहोत हे तरी नशिबच म्हणायचं!"

हाताच्या मिठीत तिला घेत तो म्हणाला, "मणी, वेडे पोरी, एका जागीं राहून कंटाळली असशील तर तसं सांग ना मोकळेपणानं? पुढच्याच महिन्यात मी मोठी रजा घेईन, मग जाऊ आपण कुठं तरी—मद्रासला जायचं का? महाबळीपुरम्च्या ज्या समुद्राकाठी मी प्रथम तुला पाहिलं तिथं आता जोडप्याने, इतकंच नव्हे, तर मनीषासकट जाऊ या!"

परंतु, एकाएकी डॉ. शर्मा बरेच आजारी पडले, त्यामुळे रजा घेऊन जाण्याचा बेत रहित करावा लागला.

अधूनमधून सवड मिळेल तेव्हा तो तिला घेऊन आजुबाजूंच्या बेटांवर सहलीला जात असे. एकदा तर आठ दिवसांची सुट्टी घेऊन ती दोघं निकोबारला राहिली होती. पण मनीषाच्या जन्मापासून मात्र तिला कुठेच जाणे फारसे जमत नसे.

परंतु थोडेच दिवसात त्यांना कलकत्त्याला जावे लागले. परिमलबाबू रिक्षातून कुठेसे जात असताना टॅक्सीचा धक्का लागून रिक्षा उलटली व सर्वांगाला जबरदस्त मुका मार बसल्यामुळे ते अंथरुणावर असल्याचे

पत्र आले. मग मात्र मणिदीपाला राहवेना. तिने सदानंदालाही आपल्यावरोबर कलकत्त्याला येण्यास भाग पाडले.

छोटी मनीषा जेमतेम सवा वर्षाचीच होती, पण वयाच्या मानाने ती खूप चपळ होती. एवढ्याशा लहान वयात कितीतरी एकेरी शब्द ती बोलत असे. म्हाताऱ्या गोपालेर माला आपला मुका घेऊ न देण्यासाठी तिने एकदा तिच्याशी कुस्तीच केली. त्या अचपळ पोरीपुढे ती म्हातारी काय टिकाव धरणार ? पण मुका नाही मिळाला तरी दिदिमणीची लेक भेटली याचाच आनंद ओसंडून वहात होता. आनंदाश्रु टिपत गोपालेर मा म्हणाली, "आता लवकर मुलगा होऊ दे."

"छान ! गोपालेर मा, तुझ्या अपेक्षा कधी संपल्या आहेत का ? दिदीमणींचे लवकर लग्न होऊ दे, मग मूल होऊ दे—आता सोन्यासारखी मुलगी दिली आहे देवाने, तर म्हणे लवकर मुलगाच होऊ दे !"

"मग नको का मुलगा व्हायला ? आता तुमचंच पहा ना, तुम्हीच जर मुलगा असता तर वडलांचे घरी दिवा लागला असता ! आता तुम्हीच झाला दुसऱ्याच्या, मग घर ओस पडलय, तिकडे आहे का कोणी पाहायला ? तुमचा मुलगा तरी त्या घराला नावारूपाला आणू दे. माझी म्हातारीची इच्छा कांही वावगी आहे का ?"

मणिदीपाच्या मनात कुठंतरी खटकलं ! संपूर्ण सुखाने भरलेल्या आपल्या मनातही आपल्या नवऱ्याचा हा दुराग्रह दुधात चुकून पडलेल्या मिठाच्या खड्यासारखा वाटत होता. आपल्या मालकीचे दोन वाडे असताना आपली मुलगी भाड्याच्या जागेत वाढावी हे दुर्दैवच नाही का ? पण काही झालं तरी सदानंदाच्या मनाविरुद्ध वागायचं नाही असा तिनं निश्चयच केलेला होता. ती वयानं लहान व श्रीमंतीत वाढलेली असल्यामुळं त्याच्यासारख्या पुरुषाशी संसार करणं तिला झेपेल की नाही याचा विचार विवाहापूर्वीच तिने करावा असे त्याने बजावले होते. भावनेच्या त्या क्षणी कसलेच विचार करीत बसण्याची तिच्या मनाची स्थिति नव्हती. आता त्याच्या इच्छेविरुद्ध असं हट्टानं वागलं तर त्याला वाटेल, 'बघा, मला चांगले पैसे मिळत असूनही हिला आपल्या वडलांच्या ऐश्वर्याचा आणि थाटामाटाच्या राहणीचा मोह सुटत नाही.'—त्याला असं वाटू नये म्हणून ती आपल्या इच्छेची जबरदस्ती त्याचेवर करीत नव्हती.

३

एक दिवस सहज मजेने म्हणून बेलघुरियाच्या घरी जाऊन यावे असे ठरले. परिमलबाबूंची प्रकृति अजूनही तितकी ठीक नव्हती. त्यामुळे त्यांना येणे शक्य नव्हते, पण पूर्णचंद्रने बरोबर येण्याचे कबूल केले.

वेलिंगटन् रोडवर कसलीशी मिरवणूक जात होती, त्यामुळे रस्त्यातील वहानांची रहदारी स्थगितच झाली होती. टॅक्सीवाल्याने त्या गर्दीतून कशीबशी वाट काढीत बहुबझारचे रस्त्याला गाडी वळवली. त्या रस्त्याला ओळीने फर्निचरची अनेक लहानमोठी दुकाने आहेत. त्यापैकी काही दुकानातून जुने फर्निचर विकले जाते. अशाच एका दुकानाजवळ, पुढच्या गाडचा अडल्यामुळे टॅक्सी उभी राहिली होती. मणिदीपाने पाहिले, तिचे आईवडील वापरीत असत, अगदी हुबेहुब तसाच नक्षीकाम असलेला मोठा पलंग त्या दुकानात विक्रीस ठेवलेला होता. पक्ष्यांनी पसरलेल्या पंखांवर तोलून धरल्यासारखी नक्षी असलेली मच्छरदाणीची लाकडी चौकट, व त्या नक्षीकामात मधोमध बसवलेली काचेवरच्या पेंटिंगची मुरलीधर कृष्णाची मूर्ति ! अगदी आपल्या घरच्यासारखा पलंग इथं कसा ? आताशा तर असल्या धर्तीचे फर्निचर बनवण्याची पद्धत नाही ! आपल्या मनातली शंका सदानंदजवळ तिने व्यक्त करण्या-पूर्वी टॅक्सी बरीच दूर गेली होती. आपल्या घरीं गेल्यावर प्रत्यक्षच पाहून खात्री करून घ्यायची असं तिनं ठरवलं.

वाडचाच्या भोवतीची ढासळू लागलेली भिंत, गेटवरच्या सिंहाचे तुटलेले शेपूट, ओसाड बाग आणि निर्मनुष्य वाडा—हे सारे पाहून तिचे डोळे आसवांनी भरून आले. अकरा बारा वर्षापूर्वी तिची आई वारली तेव्हापासूनच या वास्तूची नीटशी दखल कोणी घेतलीच नव्हती. आईच्या मृत्यूनंतर कशातच मन नसल्यासारखे तिचे वडील वागत होते, आणि वडलांच्या मागे, गेली पाचसहा वर्षे ही वास्तु अगदी उजाड व पोरकी झाली होती. तिला वाटलं झाडांच्या सळसळणाऱ्या फांद्या, खाली साचलेला वाळका पालापाचोळा, डागडुजीविना कळाहीन दिसणारे घर, सारे काही आक्रोश करून तिला सांगत आहेत, "आमच्याकडे दुर्लक्ष

करून आमची ही काय अवस्था केली आहेस ? आता तरी आमच्याकडे जरा बघ !" मोठ्या कष्टी मनाने ती टॅक्सीतून उतरली.

अचानक कोण आले हे पहायला उघड्या अंगाने, डोके खाजवीत, वीरू बाहेर आला. "ओहो, डॉक्टरबाबू !" त्याने डॉ. सदानंदालाच प्रथम ओळखलं. या वाड्याच्या मालकिणीला तो नीटसा ओळखत नसावा. त्याने घरात जाऊन डॉक्टरबाबू आल्याची वर्दी दिली.

"आशून डॉक्टरबाबू" असे म्हणत, नेसलेली मळकी लुंगी सावरीत पटलबाबू बाहेर आला. डॉक्टरबाबू एकटे नव्हते. त्यांच्याबरोबर एक सुंदर स्त्री, एक अगदी छोटी मुलगी व एक तरुण पुरुष होता. त्या तरुणाचे तोंड पटलबाबूकडे वळताच आश्चर्यचकित होऊन तो म्हणाला, "अरे वा, पूर्णबाबू ? तुमची नि यांची ओळख कुठली ?"

"हे बघ, पटल, आधी तुझ्या मालकीणबाईंचं स्वागत कर, मग इतर बात," पूर्णचंद्र तुसडेपणानं म्हणाला. पण त्याच्या बोलण्यातील रागीट खोच कळलीच नाही असं दर्शवीत, व त्या तरुण स्त्रीकडे निरखून बघत पटलबाबू म्हणाला, "मालकीणबाई ! ओहो, म्हणजे या दिदिमणीच की ! अरे, मी ओळखलंच नाही बरं का. हल्ली नीट दिसत नाही, ऐकू ही येत नाही तितकसं, चालायचच ! वय झालं, आता हळुहळू सारी गात्रें निरोप घेणारच !"

पूर्णला वाटलं त्याला म्हणावं, 'सगळं काही सोडून जाईल, पण लबाडपणा काही तुझी संगत मरेपर्यंत सोडणार नाही !'

मग पटलबाबूचं सौजन्य नि आनंद ओसंडून वाहू लागला.—"अग वीरूची आई, पाहिलंस का, आज इथं कोणाचे पाय लागले आहेत ते ? नवीनबाबूंच्या वंशाची शोभा, साक्षात् देवी जगत्धात्रीच इथं अवतरली आहे"—अशा अलंकारिक शब्दांची खैरात करून आलेल्या मालकिणीला नुसत्या बोलण्यानेच गार करून टाकायचे त्याने ठरवले असावे; नाहीतर कधी ती खुशाल आहे की नाही याची त्याने नुसती दखलही घेतल्याचे मणिदीपाच्या ऐकिवात नव्हते.

आपल्या मालकाच्या मुलीने एका परप्रांतीय माणसाशी लग्न केले आहे हे पटलबाबूला कळले होते. पण आपल्या इतका परिचयाचा हा मराठी डॉक्टरच दिदिमणींचा पति असेल हे मात्र त्याला माहीत नव्हते.

त्यामुळे त्याला विलक्षण नवल वाटले. त्याच्या धूर्त नि कावेबाज डोक्यात आले, आपल्याकडून बॅनर्जीकुटुंबाच्या श्रीमंतीची आणि त्यांच्या एकुलत्या एक कन्येची हकीकत ऐकून या लबाड डॉक्टरने मुद्दामच तिच्याशी ओळख काढून हा डाव साधलेला दिसतो. एरवी असे कसे घडले असते?—परंतु वरकरणी मात्र आनंदाचेच प्रदर्शन करीत तो म्हणाला, "अरे बीरू, स्टेशनवरच्या दुकानातून फर्स्टक्लास चहा मागव, नि त्या मिठाईवाल्या सुबीरबाबूला सांग, चांगल्यातली चांगली वेचक मिठाई दे, दिदिमणी आल्या आहेत."

"काही नको. आम्ही सगळ आणलय बरोबर. चहासुद्धा आणलाय थर्मासातून. संध्याकाळपर्यंत इथंच काही तास घालवणार आहोत आम्ही," मणिदीपा म्हणाली.

"असं का? वा! वा! फार छान! शहरातून असं मोकळ्या हवेत यायलाच हवं मधून मधून. अरे बीरू, मोठी चटई नाहीतर सतरंजी आण रे. इथंच टाकूं या झाडांच्या सावलीत. काय, असं मोकळ्यावरच बसणार ना? हो. महाल काय शहरातूनही असतात, पण अशी बाग काही तिथं नसते."

त्याचे हे बोलणे ऐकून तिला वाटलं, त्याला म्हणावं, 'अरे चोरा! मी घरात जाऊ नये यासाठी तुझ्या ह्या हुलकावण्या चालल्या आहेत तर!—आणि कधीमधी मी इथं यावं काय? काय लबाड आहे हा! एखादा प्रेमळ जिव्हाळ्याचा नोकर असता तर म्हणता, 'आता इथेच का येऊन रहात नाही'—पण वरकरणी आपल्या मनातील राग न दर्शवता ती म्हणाली, "पटलदा, आधी मला ही दालनं उघडून देतोस का? कधी एकदा सगळ्या घरात फिरून येईन असं मला झालंय."

"पण दिदिमणी, आतमधे खूप धूळ साचलेली असणार. आपले नि छोट्या बेबीचे कपडे मळून जातील.—तो लुच्चा दुर्गादास महिन्याच्या महिन्याला माझ्याकडून पगार घेत असे, पण आठवड्यातून दोनदासुद्धा येऊन धड झाडीतही नसे. मीच मग तारकबाबूंना सांगून त्याला काढून टाकला. काय करावं? आताशा या कारखान्यांमुळं लोकानां जास्त पगाराची चटक लागलीय, त्यामुळं कामाला माणसही मिळत नाहीत. मी असा थकत चाललो आहे. माझा मोठा मुलगा दिवसभर दुकानावर

असतो. इथं जवळच किराणामालाचं दुकान चालवतोय् तो. बीरू तर काय इतका मोठा झाला तरी एक नंबरचा उनाड आहे. मग एखादे दिवशी कसंतरी करून मीच हे सारं झाडून स्वच्छ करतो. काय करायचं, मीठ खातोय ना धन्याचं, तेव्हा पडेल ते काम करायला हवंच की ! आपण इकडे येणार याची आधी कल्पना असती तर सगळं साफ करून ठेवलं असतं."

पूर्णला वाटले त्याला म्हणावे, "काही 'साफ' करायचे बाकी ठेवले आहेस का ?"—पण तो काहीच बोलला नाही.

पटलच्या वक्तृत्वाचा ओघ मधेच रोखीत मणिदीपा म्हणाली, "असू दे धूळ, चालेल मला. पण इतक्या दिवसानी इथं आली आहे ती या घराचं आतून बाहेरून दर्शन घेऊनच जाईन."

"बरं बरं. आणतो हं चाव्या. ही सतरंजी टाकली आहे त्यावर थोडा आराम करा. मी सगळी दारं नि खिडक्या उघडतो नि बोलावतो तुम्हांला," असं म्हणत पटलबाबू घरात पसार झाला.

मनीषाला भूक लागली होती म्हणून थर्मासमधून गरम दूध काढून ते तिला पाजीत मणिदीपा झाडाखालच्या सतरंजीवर बसली होती. सदानंद व पूर्णचंद्र काही तरी गप्पा मारीत बागेत फिरत होते.

बराच वेळ झाला तरी पटलबाबू किल्ल्या घेऊन येईना. घर उघडलं जाण्याची काहीच लक्षणे दिसेनात. शेवटी तिनं पूर्णला हाक मारली, व 'पटल काय करतोय ते बघून ये,' असं त्याला सांगितलं. पूर्णने, 'बीरू, बीरू,' अशी हाक मारताच, "मोठ्या रस्त्यावर आमच्या एका नातलगाला बस्चा धक्का लागून तो घायाळ झालाय असं कळलं म्हणून आताच बीरू नि त्याचे वडील काय आहे ते पहाण्यास तिकडे गेले आहेत," असे पटलबाबूची बायको दाराआडून म्हणाली.

मणिदीपाचे डोळे भरून आले. रडव्या आवाजात ती कळवळून सदानंदाला म्हणाली, "मी नक्कीच सांगते, दुकानातला तो पलंग आमच्याच घरचा आहे. आम्ही कोणी इथं रहात नाही त्यामुळं या लबाडाला बरं मिळालय कुरण चरायला !—तुम्ही माझं ऐकायला तयार नाही, आता उघड्या डोळ्यांनी माझ्या माहेरच्या घराची धूळधाण झालेली पाहणं भाग आहे !"

त्याच्या हट्टामुळं तिच्या मनाची झालेली कष्टी अवस्था पाहून व त्यापेक्षाही या वास्तूची ही पोरकी नि उध्वस्त अवस्था पाहून त्याचेही मन भरून आले होते. एकेकाळी या बागेत फिरताना व येथील ग्रंथालयात वाचीत बसले असतांना कल्पनेनेच तो या घरातील लोकात मिसळला होता. त्या वंशात एकटीच मुलगी आहे अन् ती इथे नसते हे ऐकून त्याला वाटले होते, तिने इथेच राहिले पाहिजे, या सुंदर आणि भव्य घराची निगा राखली पाहिजे व ही वास्तु नावारूपाला आणली पाहिजे ! आणि योगायोगाने तोच त्या मुलीच्या आयुष्याचा जोडीदार झाला होता ! त्याच्याच हट्टामुळे आता ही वास्तु ओसाड पडली होती. त्याला वाटले, आपले चुकले ! आता शक्य तितक्या लवकर मणिदीपाला घेऊन इकडेच रहायला यायचे, आणि या जागेचे गेलेले चैतन्य परत आणायचे !

४

त्या रात्री मणिदीपाला जवळ घेऊन, तिच्या घरी येऊन रहायला त्याची संमति असल्याचे त्याने तिला सांगितले. ते ऐकून तिला फारच आनंद वाटला. मग गप्पागोष्टी करीत त्या दोघानी पुढचे बेत आखले. दुसऱ्या दिवशी त्यांचा हा निर्णय ऐकून परिमलबाबूंनाही समाधान वाटले. त्यानंतर जास्त वेळ न दवडता ते दोघे सॉलिसिटर सन्याल यांना भेटायला गेले.

काकांनी तिच्या नांवे ठेवलेले सीलबंद पाकिट उघडून वाचतांना डोळ्यातले अश्रु त्यावर पडू न देण्यासाठी तिला सारखे जपावे लागत होते. आसवांनी डोळे भरून आले की पुढच्या ओळी दिसत नसत, मग डोळे टिपून मनाशी सुस्कारा सोडीत पुढचे वाचावे लागे.—

"लाडके मणी,

तू कुठं असशील देव जाणे ! तुझा शोध लागला तर ठीकच आहे. पण मरेपर्यंत तुझी भेट झाली नाही तर तुला काही सांगायचं आहे, ते तुला कळावं म्हणून इस्टेटीचे बक्षीसपत्रासोबत हा लखोटा मी ठेवीत आहे. माझ्या मृत्यूनंतर तुझा शोध लागला की हे सारे तुला मिळेल. तू हे वाचशील तेव्हा तुझा दुर्दैवी काका या जगात नसेल.

कुठल्या कुमुहूर्तावर तुझ्या काकीची नि माझी पहिली ओळख झाली अन् तिची भुरळ मला पडून मी असा पाघळलो, कोण जाणे ! जाऊ दे ! तुला तो सारा इतिहास वाचण्याचा शीण मी देत नाही. तुझी तिच्या-विषयीची अप्रीति व सुरेन्‌ला तू दिलेला नकार हे पाहून एक प्रकारे मला तुझा अभिमानच वाटला. तू वयानं इतकी लहान असूनही बरंवाईट ओळखण्याची शक्ति तुला असावी, वरवरच्या दिमाखाला न भुलण्याइतका खंबीरपणा व विचारीपणा तुझ्यात असावा याचे मला कौतुकच वाटले. मी तुझ्या मानाने किती नालायक अन् दुबळा आहे ! मी स्वतःला तर स्वत्वहीन केलंच आहे, पण माझ्यात तुला संरक्षण देण्याचीही कुवत नसावी, अन् स्वतःचा सांभाळ करायला तुला येथून निघून जाण्याशिवाय मार्गच उरू नये याची खंत मात्र अहोरात्र मनाला जाळीत आहे. 'माखन, माझ्या जिवाच्या कलिजाला संभाळ,' हे दादांचे शब्द कानात घुमतात, अन् स्वतःच्या नालायकीची लाज वाटून मी आपल्या मनाशीच दुःख करतो—पण मणी, येथून निघून जाण्याचा तुझा बेत तू मला सांगितला असतास तर किती बरं झालं असतं ? मी तुझ्या बेताला विरोध तर केलाच नसता, पण तुला देता येईल तितकी मदत दिली असती. माझं या घरात काही चालत नाही ही तुझी समजूत चुकीची नसली तरी माझं तुझ्यावर पराकाष्ठेचं प्रेम आहे, आणि तुझं अनहित मी कधीच करणार नाही इतकं तरी तू ओळखायला हवं होतंस. असो. तुला तरी काय कल्पना असणार !

तू प्रत्यक्ष भेटावीस व मोकळेपणानं तुझ्याशी बोलता यावं अशी फार इच्छा आहे. पण ती पुरी होईल की नाही कोण जाणे ! इथं पोर्ट-ब्लेअरला डॉ. सदानंद म्हणून एक मराठी डॉक्टर आहेत. त्यांची नि माझी अलीकडे बरीच दोस्ती जमली आहे. आजच त्यांच्याजवळ तुझ्याविषयीची माझ्या मनाची तळमळ मी मोकळेपणानं बोलून गेलो. डॉ. सदानंद फारच सज्जन आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व माझे मनात भरण्यास काही कारणे आहेत—जवळजवळ सगळ्या जगभर मी प्रवास केलेला आहे. त्या दृष्टीनं पाहता माझा अनुभव सर्वांगीण असायला पाहिजे, पण तो तसा नाही !

जगातील एका विशिष्ट थरात—ज्या थराचा ढोंगीपणा हा मूलमंत्र आहे, पैसा व चैन हेच ज्याचे अधिष्ठान आहे, जेथे प्रेमाचा नुसता देखावाच चालतो—त्या स्वार्थी, ढोंगी, चैनबाज थरात मी खूप मिसळलेला आहे. आणि विरोधाभासामुळेच की काय, मी सदानंदाकडे प्रथम कुतूहलाने व नंतर आदराने ओढला गेलो. त्यांच्या वागण्यातला साधेपणा, विचारीपणा व कर्तव्यनिष्ठा हे गुण आताच्या जगात दुर्मीळ असे आहेत. ते माझ्यापेक्षा फारतर आठ-दहा वर्षांनीच लहान असतील, पण मी त्यांच्या मानाने कितीतरी थकलेला दिसतो. त्यांची उमेद, उत्साह व आरोग्य हे सुद्धा त्यांच्या निर्मळ मनामुळेच त्यांना लाभले आहे असे मला वाटते.

ते तुला ओळखतात, असे ते म्हणत होते. महाबळीपुरम्‌ला तू ट्रीपला गेली असताना त्यांनी तुला पाहिले आहे. तसेच ते पूर्वी बेलघुरियाला नोकरी करीत होते, व तेथील आपला वाडा त्यांना चांगलाच माहित आहे.

तुझी व त्यांची फारशी ओळख नसतांनाही त्यांच इतकं वर्णन तुझ्याजवळ करण्यांच कारण, पुंढमागं तुझ्याविषयीची सारी हकीकत मोकळेपणानं त्यांना सांगून, तुझा शोध करून तुझं वैभव व सुख तुला मिळवून देण्याची जबाबदारी मी त्यांचेवर सोपवणार आहे. तुझ्यासारख्या संपन्न पण एकाकी मुलीला निस्वार्थी मनाने सहाय्य देऊ शकेल असा तो एकच पुरुष सध्यातरी माझे डोळ्यापुढे आहे.

आपले कलकत्त्याचे घर व बाबांच्या इस्टेटीतील माझ्या वाटणीस आलेले पंचवीस हजार रुपये मी तुझ्या नावे ठेवीत आहे. माझे सासरे वारले त्या वेळी त्यांची अर्धी इस्टेट तुझ्या काकीला मिळालीच आहे. पोर्टब्लेअरचे नारळीसुपारीचे सर्व उत्पन्न माझ्याच कर्तबगारीचे आहे. पण येथील धंदा सुरू करायला मूळ भांडवल मी सासऱ्यांच्या पैशाचे वापरले होते. तुझ्यासारख्या सोज्वळ मुलीला हा चैनीचा पैसा शिवायलाही नको म्हणून, हे सारे माझ्या कमाईचे असूनही यातले काहीच मी तुला देत नाही. पोर्टब्लेअरची सारी इस्टेट मी तुझ्या काकीचे नावेच करीत आहे. तसेच, आपल्या जुन्या घराण्यावर तुझ्या काकीच्या उपभोगलालसेची छाया पडू नये म्हणून कलकत्त्याचे घर तिचे नावे न करता, तूच आमच्या घराण्याचा एकमेव वारस म्हणून मी तुझ्या नावे करीत आहे.

वाजवीपेक्षा जास्त पैसा असणे हा सुद्धा शापच आहे, आणि तो डोक्यावर घेऊन तू जन्माला आली आहेस. या संपत्तीमुळेच तुझे आयुष्य संकटमय होण्याचा संभव आहे. आपमतलबी माणसांची, फासेपारध्याने शिताफीने फेकावी अशी जाळी, व नानातऱ्हेची प्रलोभने, या सगळ्यापासून तुझा बचाव व्हावा आणि तुझे आयुष्य निष्कंटक व्हावे याला एकच उपाय आहे. तो म्हणजे एखाद्या सुविचारी माणसाची जोडीदार म्हणून तुला सोबत मिळणे ! पण हा योग दुर्मीळ आहे, कारण विवाहेच्छेने जे तरुण तुझ्याभोवती जमतील त्यातले बहुतेक सगळे तुझ्या पैशावर जन्मभर आराम करायला मिळेल याच उद्देशाने आलेले असतील.

कधीकधी वाटतं, डॉ. सदानंदासारखा पति जर तुला लाभेल तर किती छान होईल ? ते बंगाली असते तर तुझ्याशी लग्न करण्याची गळ मी त्यांना नक्कीच घातली असती.

त्यांच्या हातून तुझा शोध लागो, आणि त्यांच्या मदतीने तुझे कल्याण होवो अशी इच्छा करीत आहे. माझे तुला मनःपूर्वक आशीर्वाद. मी तुला आधार देऊ शकलो नाही त्याबद्दल राग धरू नकोस.

तुझा
काका."

"तसं पाहिलं तर काकांचे आशीर्वादच आहेत आपल्या लग्नाला ! आपल्या दोघांचं आयुष्य एकत्र गुंफलं जावं अशी इच्छा त्यांना होती, ही किती नवलाची गोष्ट नाहीं का ? अन् तुमच्याविषयी केवढा आदर नि प्रेमभाव होता त्यांना ! बघा," ते पत्र सदानंदाच्या हाती देत ती म्हणाली. त्याने पाहिले, तो आणि परितोषबाबू ज्या दिवशी नॉर्थ-बे-ला गेले होते त्या दिवसाची तारीख पत्रावर होती.

सॉलिसिटर तारकबाबूंचा मधला मुलगा बिपिन हा डॉक्टर होता. तो सदानंदाला म्हणाला, "कलकत्त्याच्या वाडचात आवश्यक असा बदल करून घेतला तर तेथे एक चांगले खाजगी नर्सिंगहोम चालू करता येईल. कित्येक हुशार डॉक्टरांना जागे-अभावी काही करता येत नाही. अशा लोकांना हाताशी घेतले तर त्यांच्या मदतीने उत्तम हॉस्पिटल तयार होईल. नाहीतरी कलकत्त्याच्या या भागात जवळपास नर्सिंगहोम नाहीच आहे."—त्याची ही सूचना त्या दोघांनाही पसंत पडली.

इतके दिवस आपल्या सुखात पतीच्या दुराग्रहामुळे जो थोडासा वैगुण्याचा भाग होता तोही आता दूर झाला, व आता सर्व काही आपल्या मनाजोगं झालं ! अगदी आनंदी मनानं आत्याच्या घरातील पुढच्या गॅलरीत ती रस्त्याकडे पहात उभी होती.

दररोज संध्याकाळी एक आंधळा भिकारी गळ्यांत अडकवलेल्या बाजाच्या पेटीवर सफाईने बोटे फिरवीत, व त्या सुरांवर गोड गाणे म्हणत तेथून जात असे. त्याच्या सोबतीला एक लहान वयाची मुलगी असे. ती येणाऱ्याजाणऱ्या समोर हात पसरून मिळेल ती भिक्षा गोळा करीत असे. त्या भिकाऱ्याला येताना पाहून काही सुटे पैसे आणण्यासाठी मणिदीपा आत वळली. या शुभ दिवशी दानधर्माचे पुण्य जोडावे असे तिला वाटले. तिने माडीवरून टाकलेली पावली झेलतांना त्या मुलीचे डोळे आनंदाने चमकले, व तिने मणिदीपाला मोठ्या खुषीने प्रणाम केला. तो भिकारी गात होता—

"जीवन नदीर ज्वार भाटाय— कोतो ढेऊ उठे चढे,
एइ काल तबु राखे ना तादेर खियाल— "

(जीवनाच्या नदीतील भरती-ओहोटीत सुखदुःखांच्या कितीतरी लाटा वर उसळतात नि खाली आदळतात—पण काळ त्यांचा कुठे हिशेब ठेवतो !)

—जसा काही तो तिला म्हणत होता, 'अजाण मुली, सुखानं इतकी भारून जाऊ नकोस. तुझ्या आयुष्यातील सुखाची प्रभात आता उगवली, म्हणून तू खुषीत आहेस, पण सकाळ नंतर संध्याकाळ असतेच नाही का ?' —सुखामागून दुःख, दुःखामागून सुख, असे हे रहाटगाडगे चालूच असते. घड्याळाचा लंबक एकाच जागी स्थिरावला तर ते बंदच पडेल ! —या जगाचे गाडेसुद्धा प्राणिमात्रांच्या आयुष्याचा लंबक कधी सुखाकडे तर कधी दुःखाकडे झुकतो आहे, म्हणूनच चालले आहे ना ?

६

मनीषाच्या दुसऱ्या वर्षाच्या जन्मदिवशीच त्या दोघांनी बेलघुरियाचे वाड्यात गृहप्रवेश केला. त्या निमित्ताने मणिदीपाच्या नात्यातल्या नि

ओळखीच्या बऱ्याच लोकांना त्यांनी मेजवानी दिली. मनीषाचे पाठीवर मणिदीपाला परत दिवस गेले होते. त्यामुळे या श्रमाने तिला फार गळून गेल्यासारखे झाले होते. मग दोनतीन दिवस सदानंदाने तिला अगदी इकडचे तिकडे करू दिले नाही. इकडे येण्याच्या थोडे दिवस आधी कलकत्त्याचे नर्सिंगहोम शुभदिवस पाहून त्यांनी सुरू केले होते. 'आशापूर्णा नर्सिंगहोम' हे नाव मणिदीपाच्या आजीचे स्मरणार्थ दिले होते.—बेलघुरियातील बागानबाडीच्या गेटवर, संगमरवरी दगडावर सुबकतेने लिहिलेली 'निहार' हीं अक्षरें व त्या वाडचाचे हे बदललेले रूप पाहण्यास, रस्त्याने जाणारे लोक क्षणभर कुतूहलाने थांबत.

हा सारा बदल घडवून आणायला सातआठ महिने लागले होते. इकडे रहाण्याचा बेत पक्का झाल्यावर सदानंद एकटाच पोर्टब्लेअरला परत गेला होता. मणिदीपाला व मनीषाला परिमलबाबूंनी त्यांचे घरी आग्रहाने ठेऊन घेतले होते. जवळजवळ दीड दोन महिन्यांनी अंदमानची नोकरी सोडून व तिथले सगळे सामान हालवून तो इकडे परत आला. त्याला निरोप देतांना डॉ. शर्मांना विशेष हळहळ वाटली होती. त्यांना सोडून येण्याचे त्याच्याही जिवावर आले. त्याच्या इतक्या वर्षांच्या नोकरीच्या आयुष्यात डॉ. शर्मासारखे प्रेमळ सहकारी त्याला कुठेच भेटलेले नव्हते.

"तू नेहमी सगळ्यांशी चांगला वागतोस, व कोणाचा हेवादावा करीत नाहीस हे खरे असले, तरी तुझी ही भरभराट पाहून अकारण शत्रूंचा तुला त्रास होण्याचा संभव आहे. त्यायोगाने सुख भोगतांनाही मनस्तापाची झळ तुला जाणवेल. त्या दृष्टीने स्वतःच्या मनाला तयार कर. असल्या परिस्थितीत तू आपल्या मनाची शांति ढळू न देण्याचा प्रयत्न केलास तर तुझे सुखसमाधान कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही."

—सदानंदाच्या प्रेमळ चाचाजींनी—डॉ. शर्मांनी—तिथून निघताना त्याला हा उपदेश केला. तो त्यांना गुरुस्थानी मानीत असे.

कलकत्त्याच्या हॉस्पिटलसाठी तेथील घरात जो बदल करणे आवश्यक होते त्याची देखरेख डॉ. बिपिन—सॉलिसिटरबाबूंचा मुलगा—मोठ्या हौसेने पहात होता. मणिदीपाचा एक आतेभाऊ प्रफुल्ल हा सिव्हिल इंजिनीयर होता. त्यानेही या दोन्ही कामात मोठ्या हुरूपाने मदत केली

होती. हॉस्पिटल सुरू झाले की मग सवड होणार नाही म्हणून सदानंद व मणिदीपा मनीषासह थोडे दिवस मुंबईला जाऊन आले.

सदानंदच्या वडलांची प्रकृति आता पुष्कळच बरी होती. छोटी गोड नात मनीषा त्याच्या आईवडलांना फारच आवडली. प्रथम ती त्यांच्याजवळ अजिबात जात नसे. पण मिराला मात्र ती चिकटली होती. खूप लाड करणारी मिरा आत्या तिला फारच पसंत पडली होती. दहा बारा दिवसातच हॉस्पिटलच्या बांधकामातील काही महत्त्वाच्या सूचना देण्यासाठी त्याला एकट्यालाच कलकत्त्याला परत जावे लागले. पण मणिदीपाला व मनीषाला मात्र त्याच्या घरच्या मंडळीनी, तसेच पुलिनचंद्रने सोडले नाही. थोडे दिवस सासरीं नि मग पुलिनदाकडे असे राहून त्या दोघी महिन्याने इकडे परत आल्या. भाषा इतकीशी येत नसूनही सुनेचा गोड व नम्र स्वभाव बघून, तसेच श्रीमंताची मुलगी असूनही तिचा साधेपणा पाहून सासूसासऱ्यांना आनंद वाटला होता. नात तर त्याना इतकी आवडली होती की रोज तिची दृष्ट काढल्यावाचून तिच्या आजीला राहवत नसे. तिचा अचपळपणा व बोबडे बोल ऐकून, "दमवलं ग बाई पोरीनं" असे कौतुकाचे उद्‌गार त्यांचे तोंडून येत. तिच्या पाठीवर आता छानसा नातू होऊ दे अशी अपेक्षा ते उभयता करीत होते.

मिरा आता एकदम मोठी दिसायला लागली होती. तिच्या वागण्यातला पूर्वीचा मोकळेपणा जाऊन त्या जागी लाजरा शांत भाव आलेला होता. सदानंदाला हा बदल विशेष जाणवला. वार्षिक परीक्षा संपली की सुट्टीत कलकत्त्याला दादा-वहिनीकडे रहायला जायचे तिने कबूल केले होते.

सदानंदाला सकाळी व संध्याकाळी, दोन्ही वेळ कलकत्त्याला हॉस्पिटलच्या कामासाठी जावे लागे. संध्याकाळी तो निघण्यापूर्वी बागेतच खुर्च्या टाकून ते चहापाणी घेत.

असाच एक दिवस चहा घेण्यापूर्वी छोट्या मनीषाचे बोट धरून तो बागेत नदीकाठाने फिरत होता. नदीच्या प्रवाहात नौका सोडून, फक्त ती वेडेवाकडे वळण घेणार नाही एवढे अवधान राखण्यासाठी सुकाणूचा

दांडा तेवढा हाती धरून, एक तरुण नावाडी खुल्या दिलाने गाणे म्हणत चालला होता :

"ओ रे आमार मन, तुइ एमनि भीरू मन—
कॅनो फिरली पिछु पाने ! —"

कुठल्याही संकटाच्या भीतीने पिछेहाट न करता, धैर्याने पुढे व्हायला मनाला शिकवणारे ते उदात्त गाणे तो नावाडी किती आळवून म्हणत होता ! गाण्याचे मधुर स्वर गळ्यातून उतरवण्याच्या आनंदा खेरीज त्यातील गहन अर्थाकडे पहाण्याची प्रवृत्ति त्या माणसाला होती की नाही कोण जाणे, बहुधा नसावीच ! नुसता वाचाळपणा खूप, पण कृती मात्र शून्य, असेच सगळीकडे दिसते. मोठेमोठे तत्त्वज्ञान गात भिक्षा मागणारे रस्तोरस्ती दिसतील, पण त्या तत्त्वज्ञानाचा एक सहस्रांश भाग तरी त्यांच्या किंवा ते ऐकणाऱ्यांच्या वर्तनात आढळतो का ? मनाला उपदेश करणारे गाणे तो तरुण गात होता, पण त्या मनाकडे कितीशा माणसांचे लक्ष असते ?

शरीर, बुद्धि आणि मन हीं माणसाच्या व्यक्तिमत्वांची मुख्य अंगें आहेत. त्यांपैकी शरीर व बुद्धी यांची जोपासना करण्याचे शिक्षण अगदी लहानपणापासून आपणाला दिले जाते. सकस अन्न खाऊन, स्वच्छता पाळून व व्यायामाने शरीराला सौष्ठव आणून आरोग्यरक्षण कसे करावे हे आपल्याला शिकवले जाते. बुद्धीला धार यावी म्हणून जरासा समज येऊ लागल्यापासूनच ज्ञानार्जनाचे धडे देण्यास सुरवात होते. पण मनाच्या योग्य वाढीकडे इतके लक्ष पुरवले जाते का ? शरीर अन् बुद्धीप्रमाणे मनही बलशाली व निरोगी रहायला हवे, हें किती जणांना माहीत असते ?

धनलाभानें ही व्यक्ति फार गर्विष्ठ झाली आहे—अमका माणूस उच्चशिक्षणामुळे चढून गेला आहे—हा पेहेलवान सर्वांवर दादागिरी करू पाहतो—असे उद्‌गार कोणाविषयी ऐकले की सदानंदाला वाटे, संपत्ति, ज्ञान व शरीरबल या मनुष्याला बिघडवणाऱ्या शक्ति आहेत काय ? तसे नसेल तर या शक्तींच्या प्राप्तीमुळं माणूस उन्नतीकडे न जाता अवनतीकडे का धावतो. या विषयाचे सुंदर विवेचन एकदा त्याने श्रीरंगनाथानंदांच्या प्रवचनात ऐकले होते, तें त्याला आठवलें.—

आपण पौष्टिक अन्न खाल्ले, व तें पचवण्याची शक्ति आपल्या पचनेंद्रियांत असली तरच तें अन्न आपल्या शरीराला पोषक ठरेल. पण पचनेंद्रियेंच दुबळी असली तर अपचनाचा विकार होईल. तसेच, या तीन शक्तींना पचवून आत्मसात करण्याचे सामर्थ्य आपल्या मनाला असेल, तर त्या शक्ति आपल्या व्यक्तिमत्वाला भरघोस उठाव आणतील. आणि ते सामर्थ्य नसेल तर अहंकार ही रोगट अवस्था प्राप्त होईल.

घोड्यावर बसण्यात निपुण असलेल्या माणसाला कितीही जबरदस्त घोडा ताब्यात दिला तरी तो मोठ्या आत्मविश्वासाने त्यावर आरूढ होईल, पायाची मांड चळू देणार नाही, की लगाम ढिला होऊ देणार नाही, आणि त्या घोड्याला स्वतःच्या इच्छेप्रमाणे हव्या त्या दिशेने फिरवून आणील—पण उलटपक्षी, घोड्यावर बसण्याची अक्कल नसतांना अशा घोड्याचा ताबा मिळाला तर त्या घोडेस्वाराची काय स्थिति होईल?

धनलाभ पचवण्याची शक्ति मनात असेल तर तो धनवान आपल्या संपत्तीचा विनियोग स्वतःचे व समाजाचे कल्याणासाठी करील—मनास ज्ञान पचवण्याचे सामर्थ्य मिळाले तर त्या विद्येचा उपयोग आपल्या व दुसऱ्यांच्या विकासासाठी करता येईल—शरीरबल पचवण्याचे सामर्थ्य मनाला लाभले तर ती शक्ति स्वतःच्या व इतरांच्या संरक्षणाचे कारणी लागेल.—पण मनच दुबळे असेल तर या शक्तींच्या अल्पशा लाभानेही अभिमान व दंभ ह्या विकृती निर्माण होऊन व्यक्तिमत्व नासून जाईल.

म्हणूनच मनाच्या योग्य वाढीची काळजी अगदी लहानपणापासून घेऊन त्याला शिस्त लावणे फार जरूर असते. ज्याला आपले मन आवरता आले त्याने आयुष्याची लढाई यशस्वीपणे जिंकली, असे मानण्यास हरकत नाही. पण हे साधणे फार कठीण! 'अचपळ मन माझे नावरे आवरीता' असे श्रीरामदासस्वामींसारख्या थोर विभूतींनी लिहिले आहे, मग सामान्य माणसांची काय कथा?

त्याच्या मनात आले क्वचित कधीतरी शरीर बुद्धि व मन ही तिन्ही अंगें सुगठित असली तर दुर्दैवाने आयुष्याची दोरीच बळकट नसते—असे का? अगदी पूर्वीच्या काळातले संत ज्ञानेश्वर व अलीकडचे स्वामी विवेकानंद यांच्यासारखे श्रेष्ठ पुरुष किती अल्पायुषी होते! अर्थात् दीर्घायुष्यातच नव्हे तर जन्मोजन्मीही कोणाला साधणार नाही

अशी भव्य कामगिरी अल्प काळांतच करून या व्यक्ति चिरंजीव झाल्या आहेत. आत्मोद्धाराची महती स्वतःच्या आदर्श वागणुकीने व सदुपदेशाने इतरांना पटवून दिल्यावर आता या देहाचे काय काम? अशा विचाराने हे सत्पुरुष आपल्या इच्छाशक्तीचे जोरावर स्वतःचा अवतार संपवीत तर नसतील ना?

"ओले आमाल मन—"

त्या नावाड्याच्या गाण्याची नक्कल आपल्या लाडिक बोबड्या बोलाने मनीषा करीत होती. त्यामुळे या विचारांच्या तंद्रीतून सदानंद भानावर आला. तिचे लाडिक हावभाव पाहून त्याला वाटले, आजपर्यंत पुष्कळ सुविचार मनामधे जोपासले खरे, पण आता ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याचे कार्यक्षेत्र आपल्यापुढे उभे आहे. या छोट्या मनीषाच्या योग्य विकासासाठी, तसेच आपल्या कुटुंबाच्या उन्नतीसाठी आपल्याला किती तरी करायचे आहे. मनांतल्या सदिच्छा व्यवहारात आपण कितपत उतरवू शकतो ते आता पहायचे!

६

प्रकृतीने सशक्त व चुणचुणीत असल्यामुळे मनीषा वयाचे मानाने मोठीच दिसे. इतके मोठे घर व बाग तिच्या संचाराला अपुरीच पडत. सध्याच्या गरोदर अवस्थेत तिच्यावर लक्ष ठेवण्याची कसरत मणिदीपाला झेपण्यासारखी नव्हती. मनीषाच्या खोडकरपणाला काहीतरी धरबंद यावा म्हणून तिला लहान वयातच मॉंटेसरी शाळेत घालावे असे ठरले.

ती प्रथम शाळेत जाऊ लागली तेव्हा पुरती अडीच वर्षांचीसुद्धा नव्हती. सकाळी ती तिच्या बाबांबरोबरच निघे. तिची शाळा शामबझारला, नर्सिंगहोमपासून जवळच होती. शाळेची वेळ नऊ ते बारा होती, पण सदानंदाचे काम दुपारी एक दीड पर्यंत चालत असे. मनीषाची शाळा सुटली की ड्रायव्हर तिला गाडीने नर्सिंगहोममधेच घेऊन येई. सगळ्या नर्सेस्, दाया व नोकर डॉक्टरांच्या लेकीवर प्रेम करीत. तिथे पेशन्टसाठी जेवण तयार होतच असे. त्यातच मनीषाचा मऊ भात केला जाई. मग ड्यूटीवर नसलेली नर्स किंवा दाई मनीषाला भात भरवी व दूध

पाजी. पेशन्ट नसलेल्या एखाद्या खोलीत ती कॉटवर पडून लहानशी डुकली पण घेई. या वातावरणात रोजचा कांहीं वेळ घालवल्यामुळे घरी आल्यावर बाहुलीशी खेळतांना तिला औषध पाजणे, इंजेक्शन देणें असलेच खेळ ती खेळत राही. "आतापासूनच डॉक्टर व्हायचं तुमच्या लेकीनी ठरवलेलं दिसतय," असं मणिदीपा कौतुकाने म्हणे.

सदानंद व मनीषा घरी येईपर्यंत ते पाचसहा तास मणिदीपाला फार कंटाळवाणे वाटत. ते दोघे येण्याचे सुमारास त्यांची वाट बघत ती बाहेरच्या व्हरांड्यात आरामखुर्चीवर काहीतरी वाचत पडे. कितीही उशीर झाला तरी सदानंद घरीच जेवण घेत असल्यामुळे तो आला की त्याचे पान वाढण्यात मणिदीपा गुंतून जाई. त्याच्याआधी जेऊन घेणे तिच्या मनाला मुळीच रुचत नसे, पण सध्याच्या तिच्या अवस्थेत असे उशिरा व अवेळी जेवणे तिला सोसणार नाही, म्हणून तिने आधी जेवलेच पाहिजे अशी सक्ती सदानंदाने केली होती.

घरी येताच मनीषा बागेत खेळायला पळून जाई. म्हाताऱ्या दुर्गादासला त्यांनी इकडे रहायला आणले होते. बारीक सारीक कामांची देखरेख करायला थकलेली गोपालेर मा पण होतीच. दुर्गादासची सून मणिदीपाचे हाताखाली घरकाम करीत असे, आणि तिचा वेडसर मुलगा मुरली मनीषावर लक्ष ठेवण्याच्या कामाला उपयोगी पडे. पुष्करणीकडे मनीषाने जाऊ नये म्हणून भोवती चौकटीच्या तारांचे कुंपण त्यांनी करविले होते. याशिवाय बागेचे काम पहायला एक माळी व गाडीसाठी ड्रायव्हर हेही कामाला होतेच, पण ते तिथे रहात नसत.

पटलबाबूने घरातील कितीतरी जिनसा विकून, झाडे तोडून व त्याची लाकडेही विकून, इतकेच नव्हे, तर गराजमधे पडलेल्या जुन्या ऑस्टिन गाडीचे सामानही सुटे करून पळवून, त्यांचे अनेकप्रकारे नुकसान केले होते. त्याला हाकून देण्यावाचून उपायच नव्हता, पण जातांना आपण केलेल्या अपराधांची खंत न दर्शवता, "कसे टिकता या गावात तें पहातो," अशी निलाजरी धमकी सदानंदाला देण्यासही तो कचरला नव्हता. बालिगंजला तिच्या काकीकडे त्याने नोकरी धरल्याचे मणिदीपाच्या कानावर आले तेव्हा ती गोष्ट तिला एखाद्या अपशकुनासारखी वाटली. काकी व पटलबाबू हे दोघे धूर्त व मतलबी लोक आपल्या या शांत नि सुखी

आयुष्याच्या जलाशयात अशांतीचे ढिकूळ तर टाकणार नाहीत ना, अशी हुरहुर कितीतरी दिवस तिला वाटली होती. पण त्यानंतरचे काही महिने अगदी सुखसमाधानात गेल्यामुळे तिची काळजी ती हळुहळु विसरली.

सदानंद इकडे परत रहायला आला म्हणून सुशांतसारख्या काही चहात्यांना फार आनंद झाला होता. डॉक्टरबाबू नुसतेच परत आले नाहीत, तर अगदी त्यांच्यातलेच एक होऊन कायमचेच इकडे आले, याचे त्यांना कौतुक वाटले होते.

पटलबाबूच्या मोठ्या मुलाचे दुकानच गावात असल्यामुळे या वाड्याचा आश्रय सुटला तरी तो बिऱ्हाड करून त्याच गावात राहिलेला होता. सदानंदाविषयी कुत्सित उद्‌गार काढून त्याचेविरुद्ध दुष्ट विचार पसरवण्याची हीन कामगिरी तो आपल्यापरीने करीत असे. काही कुचाळ लोक, त्यांचा काहीच संबंध नसूनही, या कुप्रचारात भाग घेऊन सदानंदाला त्रास देण्याचा प्रयत्न करीत. इतकी वर्षे नवीनबाबूंची बागानबाडी ओसाड पडलेली असतांना, त्या जागेची किंवा तिच्या मालकिणीची कोणालाही शुद्ध नव्हती. पण एका वेगळ्याच जातीच्या डॉक्टरने तिचा पती या नात्याने त्या जागेची मालकी मिळवली म्हणून त्यांच्या पोटात दुखत असे.

सदानंदाने या कुटाळक्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते. त्याला वाटे, पटलबाबूचा त्याच्यावर राग झाला असला तर त्यात स्वार्थाला बाध आल्याचे कारण तरी होते, पण या अकारण शत्रूंच्या त्रास देण्याला काय म्हणावं ? 'ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे,' म्हणतात ते खरेच !

बेलघुरियात आपल्या पतीला पुष्कळ लोक फार मानतात हे पाहिलं की आपण परजातीत लग्न केलं आहे म्हणून इथले खेडवळ लोक आपल्याशी चमत्कारिकपणे वागतील, ही शंका उरलेली नाही असं मणिदीपाला वाटलं.

पूर्वी सदानंद इथे होता त्यापेक्षा काही बदल ठळकपणाने त्याला जाणवले.—एक म्हणजे तपस्विनी सुतपाचा विवाह ! एका प्रौढ पण श्रीमंत बिजवराशी तिचा विवाह झाला होता. तिच्या या त्यागामुळे तिचे वडील कर्जमुक्त झाले होते इतकंच काय, पण तिच्या पाठच्या दोन

बहिणींची लग्नेंही झाली होती. विवाहापूर्वी आपल्या माहेराची ती 'मा'च होती, आणि आता या लग्नाने अपत्यसंभव होण्याची शक्यता फारशी नसूनही वृद्ध पती व सावत्र मुले या सर्वांची ती माताच होती. आपल्या कष्टाळू व प्रेमळ वागण्याने सासरच्या सगळ्या मंडळींना तिने जिंकले होते. नाहीतरी आपले आयुष्य लग्नावाचून फुकट चाललेच आहे—मग विवाहाचा हा नाममात्र टिळा कपाळी लावून, त्यांतून माहेरच्या माणसांचा उद्धार होत असेल तर असा त्याग का करू नये, या विचाराने तिने हे बलिदान मोठ्या मनाने केलेले होते.

दुसरा बदल मोहिनी डॉक्टरांच्या घरी त्याला विशेषाने जाणवला.—दोन वर्षांपूर्वीच ते वारले होते. तो इकडे रहायला आल्यावर काही दिवसानी गणेश व कार्तिक त्याला मुद्दाम भेटायला आले होते. "आईला एकदा भेटायला या. तुम्ही यावे अशी तिची फार इच्छा आहे. शक्य झालं तर वहिनींना व बेबीला पण आणा"—हा त्यांचा आग्रह पाहून मणिदीपाला गंमतच वाटली. ते गेल्यानंतर ती सदानंदाला म्हणाली, "मी मूळची इथली, तुम्ही अवघे दोन वर्षेंच होता इथं, पण आता तुमच्याकडूनच गावात मला बोलावणी येऊ लागली म्हणजे कमालच आहे! तुम्हीच खुद्द या गावचे, नि मी परजातीची, अशी तर नाही ना गावकऱ्यांची समजूत?"

ते दोघे मोहिनी डॉक्टरांच्या घरात शिरले तेव्हा बाहेरच्या दाराचे चौकटीत एक कोवळ्या वयाची तरुणी पाठमोरी उभी होती. मोठ्या नक्षीदार काठाची गुलाबी शांतिपुरी साडी, पदराला लावलेला किल्ल्यांचा जुडगा, डोक्यावरचा पदर किंचित ओघळल्यामुळे दिसणारा मोठा अंबाडा, व त्यावर खोचलेले सोन्याचे फूल, साडीच्या काठाखालून दिसणाऱ्या टाचेच्या भागावरची लालचुटुक अळत्याची रेषा!—सदानंदाला वाटले, गणेशचे लग्न झाल्याचे तर ऐकिवात नाही, मग ही नववधू कोण? इतक्यात त्यांची चाहूल लागल्यामुळे पदर सावरीत ती मुलगी लाजून आत पळाली, व गणेश, कार्तिक बाहेर आले.

त्यांची आई दारातून पुढे येत दोघांना 'बसा' म्हणाली. तिचे डोळे भरून आले होते. वैधव्यामुळे तिच्या वेषात आणि वागण्यात केवढा

बदल झाला होता ! तिच्या उदास मुद्रेकडे पहातांना, हीच का ती पूर्वीची जहांबाज बाई, असे त्याला वाटले.

"नुकतंच टेपीचं लग्न केलंय्. समोरच पैलतीरी बालीखलला सासर आहे तिचं. ए टेपी, ये ना बाहेर. डॉक्टरदादांना नि वहिनींना नमस्कार कर."

मघाशीच दिसलेली ती नववधू लाजत बाहेर आली व तिने दोघांच्या पायांला स्पर्श करून नमस्कार केला. नमस्काराला ती वाकली तेव्हा तिच्या डोक्यावरचा पदर दूर सरकला व तिचा चेहरा त्याला स्पष्ट दिसला.

त्याला वाटलं, हीच का ती पूर्वीची खटचाळ टेपी ? तिच्या उस्कटलेल्या झिज्या, बटनं तुटलेले मळकट कपडे, कांहींतरी खात थुंकायची सवय व आडदांडपणा आठवून त्याच्या मनात आले, अवघ्या चार वर्षांत इतका बदल झाला ! त्यावेळी ही फारतर नऊ दहा वर्षांची असेल, आणि आता तरी काय, जेमतेम चवदा वर्षांची, म्हणजे अजून ही पोरच नव्हे का ? पण वयात आल्या की मुली किती समजूतदार होतात !

७

मणिदीपाचा प्रसूतिकाल आता अगदी जवळ आला होता त्यामुळे थोडावेळ तरी दुपारी ती पडून राही. सदानंदाचे जेवण झाले की कधीकधी तो तिच्याजवळ वाचीत पडे. मनीषावर लक्ष ठेवायला मुरली नाहीतर माळीबुआ असतच. मधूनच सदानंद स्वतः जाऊन तिचे काय उद्योग चालले आहेत ते पाहून येई. त्या दिवशी मणिदीपाचा डोळा लागला आहे असे पाहून तेथून हळूच उठून तो ग्रंथालयाच्या खोलीत आला. श्री अरविंदांचे 'लाइफ डिव्हाइन' हे पुस्तक काढून आरामखुर्चीत पडून वाचतांना त्याच्या मनात विचार आला, अलीकडची काही वर्षे अध्यात्मविषयाचे विचारात आपण मन घालू लागलो आहोत. पुष्कळ वेळा तरुण वयात, आत्मा, ईश्वर, मुक्ति, वगैरे म्हातारपणी काही उद्योग नसतो म्हणून विचार करायच्या गोष्टी, असा अर्थ सगळे घेतात व याकडे विचारांचा ओघ वळूच देत नाहीत.

आत्मा हा चैतन्यमय ईश्वराचा एक स्फुलिंग आहे, त्याचे अस्तित्वाने या शरीरांत चैतन्य खेळते, तो गेला की संपले या देहाचे जागतिक कार्य ! सर्व प्राणिमात्रांना चेतना देणारी ही ठिणगी-म्हणजेच आत्मा—तो सर्वांभूती एकच स्वरूपाचा असतो. मग कांहीं माणसे सुष्ठ तर काही दुष्ट, कोणी विचारी तर कोणी विकारी, काही उत्साही तर काही उदासीन, असा फरक का असावा ?

एकदा या विषयावर स्वामी चिन्मयानंदांनी केलेलें सुंदर रूपक त्याच्या वाचनात आले होते—तारेतून वहाणारा विद्युत्प्रवाह एकाच तऱ्हेचा असतो, पण वेगवेगळी उपकरणें प्लग्ने त्याला जोडली गेली की, निरनिराळ्या प्रकारच्या विद्युत् शक्तीचा आविष्कार पहायला मिळतो. फ्रीझचा थंडावा, हीटरची उष्णता, पंख्याची खेळती हवा व दिव्याचा प्रकाश, असा वेगवेगळा खेळ, विद्युत्प्रवाह एकच असूनही आपण पाहतो. त्याचप्रमाणे शरीर बुद्धि व मन या तीन पिना असलेला मानवी व्यक्तिरूपी प्लग् परमेश्वरी चैतन्याला जोडला गेला की तेथून मिळालेल्या 'आत्मा' या शक्तीमुळे तो मनुष्यप्राणी आपल्या प्रकृतिगुणांप्रमाणे खेळ करू लागतो. प्रत्येक प्राणिमात्राचा प्रकृतिगुण वेगवेगळा असतो, कुणी सात्विक, कुणी राजस, कुणी तामस ! या फरकांमुळे व्यक्तिव्यक्तींचे स्वभावधर्म व गुणावगुण यांत भेद दिसतो.

पण मग प्रकृतिगुण तरी सर्वांच्या ठिकाणी एकसारखे कां नसावेत ! —डार्विनच्या उत्क्रांतिवादाप्रमाणे पाहिले तर जीवसृष्टीचा विकास अगदी एका पेशीच्या सूक्ष्म जीवापासून मानवाच्या उत्पत्तीपर्यंत हळुहळु झालेला आहे. मानवाला निर्माण करतांना संरक्षणाची कुठलीही बाह्य साधने न देता, बुद्धि व मन या अपूर्व देणग्या दिल्या गेल्या, त्या एवढ्याचसाठी की यापुढचा विकास माणसाने आपल्या कुवतीप्रमाणे करावा. मानव-निर्मितीच्या पहिल्या टप्यांत सगळीच माणसे जवळजवळ पशुतुल्य अर्थातच तमोगुणी होती. हळुहळु सुधारणा होत गेल्या, व आत्मविकासाच्या सोपानावर काही मानव थोडे वर चढू लागले. मग ही उन्नति तमोगुणाकडून रजोगुणाकडे व आणखी पुढे सत्त्वगुणाकडे अशी होत गेली. तो सोपान चढण्याची कुवत सर्वांची सारखी नसल्यामुळे प्रकृतिगुणात म्हणजेच स्वभावधर्मात—फरक आढळतो. व्यक्ति तितक्या प्रकृति या

न्यायाने व्यक्तिव्यक्तीत भिन्नता असली तरी त्यांच्या अस्तित्वामागचा सूत्रधार आत्मा हा एकच स्वरूपाचा असतो.

खरे पाहता, ही कल्पना किती तत्त्वशुद्ध आहे! तरीपण परमेश्वरी चैतन्य म्हणजे काय अन् ते कुठून उद्भवले ही शंका उरतेच!—आपण पडूस अन्न खातो, त्याच्या कडू, गोड, खारट, तिखट, आंबट, तुरट या चवी आपण सांगू शकतो. पण प्रत्येक पदार्थाला विशिष्ट असा स्वाद असतो, तो स्वाद आपल्याला समजतो पण सांगता येत नाही, तसाच हा चैतन्यमय ईश्वर आहे. त्याचे अस्तित्व जाणवते पण त्याचे वर्णन करता येत नाही. मोठ्या तपस्वी योग्यांनासुद्धा साधनेने त्याचे अस्तित्व जाणवले तरी ते शब्दातीत असल्यामुळे त्यांनी ईश्वराला निर्गुण निराकार असे म्हटले आहे.

"तुम्ही परमेश्वर पाहिला आहे काय?" असा प्रश्न स्वामी विवेकानंदानी श्रीरामकृष्ण परमहंसांना केला तेव्हा, 'हो, पाहिला आहे, तुला वघायचा आहे'? असे विचारून त्यांनी स्वामी विवेकानंदांचे मस्तकावर आपला हात ठेवला.—शब्दांचे महासागर उलथेपालथे करूनही जे कळले नसते ते गुरूचे स्पर्शातून संवेदनेचे रूपाने त्यांनी हेरले. थोडेसे अंतर्मुख होऊन आपल्या मनाशी गंभीरपणे याचा विचार केला तर ह्या संवेदनेची लहानशी ठिणगी, चुटपुटत्या विजेच्या झटक्यासारखी कोणाही विचारवंत माणसाचे मनाला चाटून जाऊ शकेल. पण तसा प्रयत्न करावा असे वाटतच नाही.—वेळ आहे कुणाला?

नवे नवे शोध लावून मानवजातीला सुखाची नि प्रगतीची नवी नवी दालनें उघडून दाखविण्यात विज्ञानी लोकांची बुद्धिमत्ता गुंतली आहे. त्यायोगे गवसलेल्या सुखसाधनांच्या भोगाने माणूस दिवसेंदिवस अधिकच दुवळा होत चालला आहे. आरामशीर जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी इतकी अक्कल आणि शक्ति खर्चली जात आहे की त्यातून सुखाची फलश्रुति कितपत मिळते, याची शंकाच आहे. माणूस पुन्हा असमाधानी! असे का?

कितीही प्रवास केला, ऐश्वर्य भोगले किंवा ज्ञान पैदा केले तरीही खरा आनंद मिळू शकत नाही. तो मिळवायचा असेल, तर मनाशी विचार करून तिथेच समाधानवृत्ति रुजवण्याचा प्रयत्न करणे, हा एकच

उपाय थोर योग्यांनी सांगितलेला आहे. 'तुझे आहे तुजपाशीं' असा हा आत्मानंद, प्रत्येकाचे शरीरातील मन या अतींद्रियात दडलेला असतो, आणि त्या आनंदाला स्वतःचे मनांतच दडवून, दिशाभुलीमुळे त्याचे शोधासाठी अहोरात्र आपण भटकतच राहतो.—पण आत्मानंद म्हणजे तरी काय?—समाधानी शांतवृत्ति! सुखदुःखात समतोल रहाणारी, व्यवहार करत असतांनाही त्यात न लिंपणारी अशी वृत्ति, म्हणजेच आत्मानंद; तो ज्याला मिळवता आला तो जीवन्मुक्तच!

विचाराने व प्रयत्नपूर्वक अभ्यासाने अशी वृत्ति थोडीफार तरी साधता यावी. हे फार कठीण आहे हे खरें, पण प्रयत्नांतीं परमेश्वर असे म्हणतात त्याप्रमाणे यत्न करायला काय हरकत?

कितीतरी वेळ अशाच विचारात तो गढून गेला होता. इतक्यात कुणाचीशी चाहूल लागली व त्याचा तंद्रीभंग झाला.—मणिदीपा आत आली होती. तिला नीट उभेही राहता येत नव्हते. तिने खुर्चीचा हात घट्ट पकडला व 'आई ग'! असा उद्‌गार काढला, ते पाहून या प्रसूति-वेदना आहेत हे सदानंदाने ओळखळे. चटकन उठून तिला खुर्चीवर बसवीत तो म्हणाला, "थांब हं, घाबरू नकोस. मी गाडी बाहेर काढतो, आपण जाऊच या नर्सिंगहोममधे." ग्लासातून थोडे पाणी तिला प्यायला देऊन व धीर दिल्यासारखे करून घाईने कपडे करायला तो त्याचे खोलीकडे वळला. या खेपेला तरी विशेष त्रास न होता तिची सुटका लवकर व्हावी म्हणून त्याने मनातल्या मनात प्रार्थना केली.

त्या दिवशी आजारी पडल्यामुळे ड्रायव्हर कामाला आलेला नव्हता. लवकर कपडे चढवून तो बाहेर पडणार इतक्यात 'धप्प'! असे काहीतरी जोरात पडल्याचा आवाज, व लगोलग लहान मुलाने कळवळून फोडलेली किंकाळी, सुकलेल्या पाचोळ्यावरून कुणीतरी पळत गेल्याचा आवाज—त्याच्या कानीं आला. घाईनेच तो बाहेर पडला. मनीषा बागेत खेळत होती, तिला तर कांहीं इजा झाली नसेल ना? जिकडून आवाज आला त्या दिशेने अत्यंत भयभीत झालेला मुरली धावतच येत होता. सदानंदाला पहाताच, "बीयू, बीयू, नायकोल, धूप्प—मनु—" असे काहीसे तो हातवारे करून सांगू लागला. मनीषाला तो बोबडा 'मनु' म्हणायचा.—मनीषालाच अपघात झाला, शंकाच नको! मुरलीने हाताने दाखवलेल्या

दिशेला सदानंद धावला. पुष्करणीचे उजव्या अंगाला असलेल्या नारळीचे झाडाखाली मनीषा बेशुद्धावस्थेत पालथी पडलेली होती. जवळच भला मोठा असोला नारळ पडलेला होता. तिचे हात पुढे पसरलेले होते. तोंडावरच पडल्यामुळे ओठात दात शिरून ओठ फाटला होता, हनवटीला व कपाळाला खरचटले होते. नाकालाही बराच मार बसला होता. तिचे पाय मात्र अगदी वेडे वाकडे अजिबात त्राण नसल्यासारखे होऊन दुमडले गेले होते. ज्या जागी कमरेवर वरून नारळ पडला होता ती जागा काळीनिळी होऊन सुजू लागली होती.

दोन्ही हातानी अलगद तिला पोटाशी धरून तो घरात आला. कोचावर तिला सरळ निजवण्याचा त्याने प्रयत्न केला, पण बेशुद्ध स्थितींतही ती विव्हळली, व वाताचा झटका आल्यासारखे तिचे सारे शरीर कंपित झाले, त्यावरून तिला उताणे निजवणे शक्यच नव्हते हे त्याने ओळखले. या गडबडींत ग्रंथालयांतील खुर्चीत बसून प्रसूतीच्या कळा सोशीत असलेल्या मणिदीपाची आठवण तो क्षणभर विसरलाच होता. परंतु तशा अवस्थेतही घरांत काहीतरी मोठा घोटाळा झाला आहे हे कळण्याइतकी शुद्ध मणिदीपाला होती. तशीच धरून उठत व सावकाश पावले टाकत ती बाहेरच्या खोलीत आली. बेशुद्ध झालेल्या मनीषाला उपचार करण्यात गढलेला सदानंद, नोकरांची धावपळ, गोपालेर माचे रडणे, मुरलीचे हातवारे, हे सारे पाहून तिचे अंतःकरण थरारले.—"माझ्या मनीषाला काय झालं हो ?" असा आक्रोश करीत ती वेगाने पुढे धावली.

"मणी, तू शांत रहा," असे काहीसे तो म्हणणार त्यापूर्वीच मनीषाचे शुद्धिरहित वेडेवाकडे झालेले शरीर पाहून, अत्यंत शोकाने ती त्याच्या पायाशी बेशुद्ध होऊन पडली !

८

पुत्रजन्माचा आनंद मानावा, की लाडकी लेक मनीषा जन्माची पांगळी झाली या गोष्टीचा विषाद करावा, त्याला कळेना ! अर्थातच् मनीषाच्या तीव्र काळजीपुढे त्या नव्या जीवाचे कौतुक करण्याच्या मनस्थितीत तो नव्हता.

त्या दिवशीचा प्रसंग डोळ्यापुढे आला की भीतीने त्याचे मन थरारे. सुखदुःखात समतोल रहाण्याचा प्रयत्न करण्याच्या बढाया आपण मनाशी मारीत होतो, तेव्हा आपली परीक्षा घेण्यासाठीच हा प्रसंग दैवाने आपल्यावर आणला नसेल ना, असे त्याला वाटले !

मणिदीपाला गाडीचे मागील जागेवर निजवून व पुढे दुर्गादासचे मांडीवर बेशुद्ध मनीषाला देऊन तो वेगाने गाडी चालवीत होता. बॅरॅकपूर ट्रंक रोडवरील बेशिस्त रहदारी व खाचखळग्यांनी भरलेला रस्ता—एरवी अत्यंत सावधपणे गाडी हाकली तरी कितीतरी वेळा अपघाताचे प्रसंग येत, पण त्या दिवशी गाडी चालवण्याकडे त्याचे चित्त नसूनही केवळ सुदैवाने ते सारे नर्सिंगहोममधे सुखरूप पोहोंचले.

डॉ. बिपिन लगोलगच त्याच्या मदतीला धावला. डॉ. विजय व डॉ. सुशील यांनाही फोन करून बिपिनने बोलावले. बेशुद्धीमुळे मणिदीपाच्या कळा बंद झाल्या होत्या. या अवस्थेत आईला व तिच्या गर्भाला विलक्षण धोका होता. त्वरित सिझेरियन ऑपरेशन करून तिची सुटका करणे अवश्यच होते.

बिपिन म्हणाला, "मी नि डॉ. विजय मणिदीपाची काळजी घेतो. डॉ. सुशील मनीषाकडे बघतील, तुम्ही काही काळजी करू नका."

मनीषाचा अपघात कितीही मोठा असला तरी तिच्या जिवाला धोका नव्हता. तिला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्नाला लवकरच यश येईल असे वाटत होते, कारण मधूनच ती किंचित् कण्हल्यासारखा आवाज करू लागली होती. पण मणिदीपाचे आयुष्य मात्र निःसंशय धोक्यात होते. त्यामुळे सदानंद म्हणाला, "तसं नको, मीच बघतो मणिदीपाला. डॉ. विजय, तुम्ही मनीषावर उपचार करा. मी मणीला ऑपरेशनसाठी टेबलावर घेतो. डॉ. बिपिन, प्लीज तुम्ही माझ्या हाताशी या." हे सारे बोलतांना सदानंदाला मोठे प्रयास पडत होते. या धक्क्याने आपले मनच काय, पण सारी गात्रेसुद्धा बधिर झाली आहेत असे त्याला वाटले. मोठ्या कष्टाने ही मनाची स्थिति सावरून धरीत, आलेल्या प्रसंगाला तोंड द्यायला तो सज्ज झाला.

ऑपरेशनसाठी त्याने शस्त्र हाती घेतले तेव्हा त्याच्या कापऱ्या हातांकडे बघून डॉ. बिपिनच्या मनात आले, 'याच्या मानसिक अस्वस्थतेमुळे काही

घोटाळा न होवो म्हणजे मिळवली !' पण शस्त्रक्रियेला सुरवात झाल्यावर मात्र त्याचा हात सफाईने व कुशलतेने चालला होता, आणि त्याचा चेहरा कामात गढलेला व शांत दिसत होता. मनाचा दुबळा हळवेपणा जिकण्यासाठी प्रयत्न करीत असतांना प्रथम कष्ट पडले तरी मग मात्र त्याला वाटले, त्याच्यापुढे ती त्याची प्राणप्रिया मणिदीपा नसून हा एक मानवी देह आहे—त्याच्या कौशल्यपूर्ण हाताच्या सहाय्याची आवश्यकता असलेला हा एक जीव आहे—एवढीच भावना उरून देऊन बाकीचे सारे विचार त्याने मनांतून दूर केले. संकटकाळी मनाचा तोल त्याने यशस्वीरीतीने सावरला !

त्यांचा मुलगा चांगला आठ पौंडाचा होता, रूपानेही देखणा होता. मणिदीपाच्या आयुष्याचा धोका आता टळला होता. अजूनही ती शुद्धीवर आलेली नव्हती, पण त्यात काळजी करण्यासारखे काही नव्हते. मनीषानेही शुद्धीवर येऊन डोळे उघडले होते. मात्र तिच्या कमरेचे भागाला स्पर्शही करण्याची सोय नव्हती, तिचे दोन्ही पाय चेतनारहित व गलित दिसत होते.

दुसऱ्या दिवशी हाडांच्या स्पेशॅलिस्टला आणून, त्याने आपल्या लेकीचे एक्सरे फोटो त्यांना दाखवून तिची नीट तपासणी करवली. कमरेच्या सांध्याजवळील मणक्याचे हाड तुटून आंतील मज्जातंतूना जबरदस्त मार बसला होता. शस्त्रक्रिया करून ते सांधण्याचा त्यांनी निष्फळ प्रयत्न केला. हाड नीट बसावे म्हणून दोन तीन महिने तिला प्लॅस्टरमधे ठेवावे लागणार होते.

मणिदीपाने तिला पाहण्यासाठी सगळ्यांचा जीव नकोसा केला. नुकतेच मोठे ऑपरेशन झाल्यामुळे तिला जागचे हालता येत नव्हते. तिला वाटे, मनीषाला नक्कीच काही तरी दगाफटका झाला आहे, नुसताच अपघात असता तर एव्हांना ती मला दिसली नसती का ? या विचाराच्या नुसत्या शंकेनेही तिचे मन भयाकुल होई, व ती कळवळून विचारी, "माझी मनीषा कुठं आहे ? मला आधी दाखवा." सदानंदलाच काय, पण इतर दुसरे डॉक्टर व नर्सेस् यांचे जवळही ती मनीषाला लवकर दाखवा असा हट्ट धरी. सगळे तिला सांगत, 'आता छान बरी आहे मनीषा,

पण अजून तिला बिछान्यावरून हालवता येणार नाही.' यावर तिचा विश्वास बसत नसे.

एक दिवस तर ती विलक्षणच हटून बसली. "मी कुठं म्हणते तिला हलवा म्हणून? पण मग माझा बिछाना तिच्याच खोलीत का नेत नाहीं? मला वघू दे तिला, नाहीतर मी अन्न घेणार नाही."

मनीषाची पांगळी अवस्था सहन करण्याइतकी मणिदीपाच्या मनाची व शरीराची ताकद नसल्यामुळे इतके दिवस तिचे म्हणणे सदानंद मानीत नव्हता. त्याने परोपरीने तिची समजून घालण्याचा प्रयत्न केला. "तुम्हा दोघींना एकाच खोलीत ठेवले तर मनीषा तू तिच्याजवळ बसावं म्हणून हट्ट करील. तुला तर अजून बिछान्यातून उठणे इष्ट नाही, शिवाय छोटचा बाळाचा पाळणा पण त्याच खोलीत आणावा लागेल. त्याच्या रडण्याने मनीषाची झोपमोड होईल व तिला विश्रांति मिळणार नाही."— अशी अनेक कारणे त्याने सांगून पाहिली, पण मणिदीपाची समजूत पटेना. मनीषा दगावली आहे अशी शंका तिला व्याकुळ करीत आहे हें जेव्हा त्याच्या प्रथम लक्षात आले तेव्हा मात्र मुळीच विलंब न करता, मनीषाची छोटी कॉट त्याने मणिदीपाच्या खोलीत आणवली.

या अपघाताची हकीकत कळल्यामुळे सदानंदाची आई मिरावर घर टाकून ताबडतोब इकडे आली होती. या विलक्षण प्रसंगातही सदानंदाची शांत वृत्ति पाहून तिचा त्याच्याविषयीचा जिव्हाळा अधिकच दुणावला. नातीला आलेल्या जन्माच्या व्यंगामुळे नातू झाल्याचा आनंद निर्भेळपणे घेता येत नव्हता. त्या दोघांचे वैभव पाहून आई अगदी दिपूनच गेली होती. एरवी कधी ती इकडे आली असती तर तिने या सगळ्याविषयी खूप आनंद व्यक्त केला असता. पण ती वेळ कौतुक करण्याची नसल्यामुळे ती काहीच बोलली नाही. या ऐश्वर्यातही मुलाचा व सुनेचा कमालीचा साधेपणा पाहून तिला ते जास्त प्रिय वाटू लागले होते. त्यांच्या परिस्थितीत दुसरे कोणीही असते तरी त्यांना अहंकाराची बाधा झाल्यावाचून राहिली नसती. तेथे जास्त दिवस राहणे मात्र तिला शक्य नव्हते. मिराची परीक्षा जवळ आली होती नि सदानंदाच्या वडलांचे कितीही बरे असले, तरी त्यांना जपून रहावे लागत असल्यामुळे तिचा एक जीव मुंबईत अडकलेला होता.

९

त्या दोघींना घरी आणल्यावर एक दिवस सदानंद मणिदीपाला म्हणाला, "आपल्या बाळाचे नाव आपण 'देवाशिस' ठेवू या. देवाने हा आशिर्वाद दिला नसता तर आपले हे दुःख विसरण्यास आपल्याला फार प्रयास पडले असते." त्याच्या या सूचनेला वरकरणी संमति दिली तरी तिला मनातून वाटले होते, 'हा कसला देवाचा शापित आशिर्वाद! या बाळाच्या जन्माचा आनंद मानू, की माझ्या निष्पाप लेकीला जन्माच्या पांगळेपणाची शिक्षा वाटयाला आली याची खंत करू!'

मुरलीला अनेकप्रकारे खोदून विचारल्यावर त्याच्या बोबडया बोलातून 'बीरू पळाला' असा तर अर्थ निघत नाही ना, असे सदानंदाला वाटले. कारण तो वेडा हातवारे करून 'बीयू भागयो' असे म्हणे. मागे एकदा झाडावरच्या पपया चोरताना माळ्याने बीरूला हटकल्याचे त्याच्या कानावर होते. पटलबाबू निघून गेला असला तरी बीरू त्याच्या वडील भावाकडे इथंच रहात होता, तेव्हा नक्की बीरूचेच हे कृत्य, शंकाच नको, असे त्याला वाटले. ज्याला त्याने मरतामरता वाचवले होते तोच बीरू आपल्या उपकारकर्त्यावर उलटला होता! तो मोठा नारळ मनीषाच्या डोक्यात पडला असता तर त्या चिमुकल्या पोरीचे आयुष्य संपुष्टातच आले असते. बहुधा त्वेषाने मस्तकाचा नेम धरून मारलेला नारळ मनीषा अचानक ओणवी झाल्यामुळे तिच्या कमरेवर बसला असावा.

सदानंदाची ही शंका ऐकून मणिदीपा संतापाने थरथर कापू लागली. "पोलिसात कळवा. आधी त्याला पकडा," ती रागाने म्हणाली. पोलिसात कळवल्याने विशेष उपयोग होईलसे वाटत नसल्यामुळे तो स्वस्थच राहिला होता.

"तुम्हाला कशी नाही चीड येत? का नाही तक्रार नोंदत पोलिसांत?" असे ती त्वेषाने म्हणे. "मरू दे त्याला आपल्याच कर्मानं!"—हा सदानंदाचा अध्यात्मवाद पचवण्याचे मनस्थितीत ती नव्हती. त्याच्या या निष्कृतीचा तिला अर्थच कळत नव्हता.

पटलबाबूला जेव्हा इथून हाकलले तेव्हासुद्धा त्याच्यावर फिर्याद करू या, असं ती म्हणाली होती. पण नव्या उत्साहाने नर्सिंगहोम सुरू करण्याचे

घाईत, कशाला हवा हा कोर्टकचेऱ्यांचा नसता गोंधळ, असे तो म्हणाला होता. बेलघुरियाच्या वाड्यात मनाजोगा संसार थाटण्याचे उभारीत ती होती, त्यामुळे ती गोष्ट तिने विशेष मनावर घेतली नव्हती. पण आता त्या दुष्टाचा मुलगा आपल्या लेकीच्याच जिवावर उठला हे पाहून मात्र तिचे मातृहृदय खवळून उठले .

सदानंदाला वाटे, फिर्याद करण्यात काय अर्थ आहे, आणि केली तरी साक्ष कोणाची देणार, तर या वेडसर मुरलीची ! ती साक्ष कोण खरी मानणार ? आणि इतकेही करून बीरूला शिक्षा झाली, तरी मनीषाचे गेलेले पाय परत येणार आहेत काय ? त्याच्यावर सूड उगवण्याची काय जरूर ? आपल्या दुष्कृत्यांनी तो स्वतःच आपले मरण ओढवून आणील. त्याचे हे विचार ऐकले की ती म्हणे, "तुम्ही असाल खूप साधुसंत, पण मी नाही. असल्या या दुर्जनांना दंड दिल्यावाचून जगात चालतं का ?" तो तिची समजूत करी, "दंड देणार तरी कोण ? इतकी लायक न्यायालयें व निःपक्षपाती न्यायाधीश आहेत का या जगात ?"

—कधीकधी तिला वाटे, आपली ही वास्तु तर शापित नाही ना ! या घरात पूर्वी रहायला आलो, नि थोड्याच दिवसात मा दगावली, पुढं काही वर्षांतच बाबाही गेले ! उगाच इथं रहायला येण्याचा हट्ट आपण धरला.—लहानपणी मोठ्या आवडीनं बाहुलीचं नाव तिनं मनीषा ठेवलं होतं, व पुढं त्या बाहुलीचे पाय तुटले होते ! ते अपशकुनी नाव आपण आपल्या मुलीला ठेवायला नको होतं.

तिचा मनस्ताप पाहिला की सदानंद म्हणे, "माझा योगायोगावर फार विश्वास आहे. आयुष्यात जे घडायचं असतं ते कुठंही राहिलं तरी घडतंच. झाल्या गोष्टीची नुसती खंत करण्यात काय अर्थ आहे ? खंबीर मनानं प्रसंगाला तोंड द्यायला नको का ? बीरूवर व पटलवर जळफळण्यात तू दिवसाचा जितका वेळ व मनाची शक्ति खर्च करते आहेस तोच वेळ या स्थितीत आपल्या मुलीसाठी जास्तीत जास्त चांगले काय करता येईल याचा विचार करण्यात घालवलास तर ते मनीषाच्या निःसंशय उपयोगी पडेल."

—अत्यंत दुःखाच्या नि मनःक्षोभाच्या अवस्थेतही त्याची शांत वृत्ति पाहिली की तिला नवल वाटे. त्याला सुविचारी म्हणावे की भावनाशून्य,

असे तिला कोडे पडे. पण तो भावनाशून्य कसा असेल ?—तिच्यावरचे व मुलांवरचे त्याचे अपरंपार प्रेम व त्याची कर्तव्यतत्परता ती क्षणाक्षणाला अनुभवीत नव्हती का ?

१०

सूर्य पश्चिमेकडे कलला होता. झाडांच्या लांबच लांब सावल्या अंगणांत पसरल्या होत्या. नदीकाठाने येणारी दक्षिणेची थंड हवा सुखदायक वाटत होती. पाचसहा महिन्याच्या छोट्या आशिसला. मांडीवर घेऊन मणिदीपा व्हरांड्यातील केनच्या सोफावर बसली होती. तिचे जवळच सदानंदही बसलेला होता. मनीषाला चाकाच्या खुर्चीत बसवून मुरली तिला बागेत फिरवीत होता.

"नाचाबागडायच्या या वयात बिचारीला असं दुसऱ्याकडून हिंडवून घेण्याची वेळ यावी ना !" असे पुटपुटताना मणिदीपाचे डोळे पाण्याने भरून आले. मनीषाकडे पाहून ती दिवसातून दहादा दुःखाचे निःश्वास सोडी.

धरमतल्याच्या कोपऱ्यावर वळण घेत असलेल्या चालत्या बस्‌मध्ये घाईने चढत असताना तोल सुटून तो नीच वीरू रस्त्यात पडला व बस्‌चे मागील चाक त्याचे दोन्ही पायावरून गेल्याने घायाळ होऊन तो हॉस्पिटलमधे अत्यवस्थ असल्याची बातमी पूर्णचंद्रकडून त्यांना नुकतीच समजली होती—त्या दुष्टाला यापेक्षा उचित शासन कोणीच देऊ शकले नसते. 'मरू दे त्याला आपल्याच कर्मानं'—हे सदानंनाचे सात्विक संतापाने उच्चारलेले शब्द अक्षरशः खरे ठरले होते. मनातून अखंड त्याचेवर जळफळत असलेल्या मणिदीपाला हे ऐकून अर्थातच योग्य बदला मिळाल्याचे समाधान वाटले होते—तरीपण लहान वयात पंगु झालेल्या आपल्या लेकीकडे पाहून तिचे मातृहृदय वारंवार कळवळे.

ती मनीष्याच्या वेळी प्रसूत होत असताना, काळजीने व्याकुळ झालेल्या सदानंदाला डॉ. शर्मा म्हणाले होते, "इतकं हळवं प्रेम करू नकोस. प्रीतीतही खंबीरपणा असावा. प्रेमाच्या हळुवारपणाने तू स्वतः तर कष्टी होशीलच, पण तुझा प्रेमविषय असलेल्या मणिदीपाला तू दुबळी नि भित्री करशील." त्यावेळी त्यांचा हा उपदेश त्याला नीटसा कळला

नव्हता. पण मणिदीपाचा हा अहोरात्र चाललेला मनस्ताप पाहून हाच उपदेश तिला करण्याची पाळी त्याच्यावर आली होती. त्याला वाटले तिला म्हणावं, "प्रेमात हळवेपणा उपयोगी नाही—खंबीर प्रीति ही आयुष्याची संजीवनीं आहे. जगण्याची उमेद वाढवणारी, नव्या आशांनी आयुष्याचा मार्ग उजळून टाकळारी ती एक दिव्य शक्ति आहे! पण दुबळी प्रीति ही मात्र, 'अतिस्नेहः पाकशंकी' या न्यायाने शंका-कुशंकांचे बागुलबुवे उभे करून जीवनाचा मार्ग निराशेच्या अंधारात बुडवून टाकणारी एक अमावास्येची काळी रात्र आहे!"

आपले विचार मनाशी गोळा करीत तो तिला म्हणाला, "मणिदीपा, 'बिचारी बिचारी' म्हणून तू सारखी मनीषाची कीव करू नकोस,—निदान तिच्यासमोर तरी नकोच! कीव करण्यासारखं काहीतरी वैगुण्य आपल्या आयुष्यात आहे असे एकदा तिच्या मनाने घेतले तर ती खचून जाईल, जीवनाविषयी उदास होईल. आपल्याला परमेश्वराचे संकेत कळूं शकतात का? आपली मनीषा कुणीतरी अलौकिक व्यक्ति व्हावी हा हेतु सुद्धा या घटनेमागे असू शकेल. चारचौघीसारखी ती असती तर मोठेपणी लग्न करून संसार करण्यापलीकडे तिनं विशेष असं काही केलंही नसतं. आता तो सर्वसाधारण मार्ग बंद झाल्यामुळे ती उत्तम कवयित्री, नाहीतर लेखिका किंवा कुशल चित्रकर्ती होणार नाही कशावरून? तू स्वतः चित्रकला जाणतेस, गातेसही गोड, या गुणांची आवड तू सुद्धा तिच्यात निर्माण करू शकशील. या परिस्थितींतही तिच्या व्यक्तिमत्वाला शक्य तितका वाव देऊन आयुष्य यशस्वीपणे जगण्याची शिकवण आपण तिला देऊ या. इतक्या आशादायी विचारांनी आणि उत्साहानी आपण तिला वाढवू, की स्वतःच्या व्यंगाची खंत न करता आपल्या एकाकीपणाचा उपयोग हरतऱ्हेने करून, आयुष्य अष्टपैलू करण्यासाठी तिने मोठ्या उमेदीने झटावे"—

"हुं!"—जसं काही आपल्याला वडलांच मनोगत समजलंच आहे अशा थाटात छोट्या आशिसने हुंकार दिला. ते पाहून मणिदीपा मनापासून हसली. सदानंदाच्या आशादायी विचारांच्या प्रकाशाने, व या गोड बाळाच्या हुंकाराने, आपल्या मनावरचे दुःखाचे अभ्र हळुहळु विरत आहे असं तिला वाटलं.

१८१८३.

मुरलीने मांडीवर टाकलेल्या पांढऱ्या चाफ्याच्या फुलांची माळ, देठं एकातएक अडकवून करीत, छोटी मनीषा आनंदाने गात होती. त्यावेळचे तिचे हावभाव फारच मोहक वाटत होते. मॉंटेसरी शाळेत तिला शिकवलेलं ते एक रवीन्द्र संगीत होतं—

"कोथाय आमार हारिये जावा नेई माना,
मने, मने !
बोले दिलेम गानेर सुरे एइ जाना,
मने, मने ! —"

मनातल्या मनात कुठंही हरवून जायला मला कोणाची हरकत असणार? सप्त पाताळ, सप्त समुद्र, उत्तुंग पर्वतशिखरें, जादूगारांचे नि परींचे मायावी देश, राक्षस-चेटकिणींचे भयंकर प्रांत, राजपुत्र-राजकन्यांचे सुंदर प्रासाद—मी मनाने कुठंही जाऊ शकते, कोण मला अडवणार? —अशा अर्थाचे ते गाणे ती मोठ्या तन्मयतेने गात होती.

सदानंदाला वाटले, अजाणतेपणाने आयुष्याचा आनंद लुटण्याची मुलांची ही उमेद मोठेपणीही माणसाला टिकवता आली तर काय बहार होईल !

मनीषाचा तो या स्थितीतलाही मुग्ध खेळकरपणा, आशिसचे निर्व्याज हास्य, नि सदानंदाचा तर्कशुद्ध विचारीपणा ! —मणिदीपाला वाटले, हे सारे प्रेमपाश भोवती असताना, खेदाचे विचार मी का मनांत आणावे? मलासुद्धा सदानंदासारखं सुविचारी नि समाधानी होता येणार नाही का?

मांडीवर खेळणाऱ्या आशिसचा मुका घेण्यासाठी ती खाली वाकली. तिच्या चेहऱ्यावरचे मंदहास्य पाहून आपण तिच्या मनावरची खिन्नता दूर करू शकलो याचं समाधान सदानंदाच्या मनाला सुखकारक वाटलं.

निष्कपट आनंदाने समोर खेळत असलेली मनीषा, अन् शेजारी ही लाडकी मणिदीपा नि आशिस यांच्या सान्निध्यात सुखाने भारावल्यासारखे होऊन, सदानंदाने कोचावर मागे डोकं टेकीत डोळे मिटून घेतले. तो मनाशी म्हणत होता, "देवा, संकटाचे कितीही डोंगर माझ्या आयुष्य पथावर उभे केलेस तरी चालेल—पण त्या संकटांना धीराने तोंड देण्याचे मनःसामर्थ्य मला दे."

वाशिंब, ठाण. रत्नागि

पथिक

किंमत : सहा रुपये

सौ. कमला भागवत यांनीं लिहिलेली 'पथिक' ही कादंबरी आवडीनें वाचली. कादंबरींतली बंगीय सृष्टि फार चित्ताकर्षक वाटली. उच्च अभिरुची, रेखीव वर्णनें, आणि गतिमान् कथानक यामुळें कादंबरी वाचनीय झाली आहे. तेंच तेंच वातावरण आणि मनोविश्लेषणाखालीं चाललेला उत्तानपणा यांना विटलेल्या वाचकाला हें पुस्तक खास सात्त्विक आनंद देईल. देखाव्यांची काटकसर आणि महत्त्वाच्या प्रसंगांचें अधिक विस्तारानें चित्रण असतें तर कादंबरी अधिक सकस झाली असती.

गोपीनाथ तळवलकर

आयुष्य हें सुखदुःखमिश्रित असतें परंतु सुखद व दुःखद प्रसंगीं मनाचा समतोलपणा राखून जो वागतो तो आयुष्यांत यशस्वी होतो हें लेखिकेनें डॉ. सदानंद व मणिदीपा यांच्या द्वारें या कादंबरींत उत्कटपणें दाखविलें आहे. डॉ. सदानंदाला कांही घरगुती कारणाने गृहत्याग करावा लागून अनेक आपत्तींशीं झगडावें लागलें. मणिदीपाचे मातापिता बालवयांत निधन पावले व घरची श्रीमंती असतांहि ती असहाय झाली. पुढे पोर्ट ब्लेअर येथे तिची व डॉ. सदानंद यांची भेट होऊन उभयतांचा विवाह झाला. महाराष्ट्रीय व बंगाली असा. व तो अंती सुखकर झाला. या अनुषंगानें लेखिकेनें अंदमानचें वर्णन अत्यंत सुंदर केलें आहे. व प्रचलित परिस्थितीवरहि निर्भीड टीका केली आहे. कादंबरीची भाषा सुडौल व आकर्षक आहे.

केसरी

एकमेव विक्रेते

संयुक्त साहित्य : लक्ष्मी रोड, पुणे २